
# दामोदर धर्मानंद कोसंबी

चिंतामणी देशमुख



ग्रंथाली

# दामोदर धर्मानंद कोसंबी

## ( जीवन आणि कार्य )

चिंतामणी देशमुख
1 Feb 2004

**चिंतामणी देशमुख**

चिंतामणी देशमुख
२४ मार्च. १९९३

ग्रंथाली

ग्रंथघर उपक्रम पुस्तक क्र. १०
**दामोदर धर्मानंद कोसंबी**
© चिंतामणी देशमुख
२१-सी, शुभेच्छा, विवेकानंद रस्ता,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२
22) 25402614
**प्रकाशक :**
सुदेश हिंगलासपूरकर
संयोजक, ग्रंथघर उपक्रम
ग्रंथाली, पाचवा मजला,
इंडियन एज्यु. सोसायटीची
म. फुले कन्याशाळा,
बाबरेकर मार्ग,
ऑफ गोखले रोड (उ),
दादर (प), मुंबई ४०० ०२८

**अक्षरजुळणी :**
स्वयम् टाइपसेटर्स, कुसुमबाग,
फडके रोड, डोंबिवली (पू)

ग्रंथघर
माझ्या घरी
माझी पुस्तके

**मुद्रक :**
मोहन खैरे
जयमल्हार प्रिंटिंग प्रेस
२१७, आशीष इंडस्ट्रीयल इस्टेट,
गोखले रोड (द),
दादर, मुंबई ४०० ०२५

**मुखपृष्ठ :**
नंदकुमार पाटील

**पहिली आवृत्ती : जानेवारी १९९३**

**मूल्य : ४० रुपये**

*वडील द्वारकानाथ वामन देशमुख*
*व*
*आई इन्दुमती देशमुख*
*यांच्या स्मृतीस*

# मनोगत

*या शतकातील श्रेष्ठ भारतीय संशोधक-विद्वानांत दामोदर धर्मानंद कोसंबींची गणना करावी लागेल.*

*एक गणितज्ञ, सांख्यिकीतज्ञ, तसेच प्राचीन संस्कृत ग्रंथांच्या चिकित्सक आवृत्त्या तयार करणारे विद्वान एवढ्या कामगिरीवर चांगली मान्यताप्राप्ती त्यांना झालीच असती. परंतु पेशाने गणिती असूनही भारतीय इतिहासाच्या अभ्यासाला एक मूलभूत नवी दृष्टी प्राप्त करून देण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी पार पाडले, व आंतरराष्ट्रीय किर्ती संपादन केली.*


*याचबरोबरीने विज्ञान व समाज यांतील परस्परसंबंधाबद्दल त्यांनी केलेले विश्लेषण व मार्गदर्शन आजच्या घडीलाही उपयुक्त ठरणारे आहे. एकापरीने देशातील सध्याच्या लोकविज्ञान चळवळीचे आद्य पुरस्कर्ते म्हणून त्यांचे नाव घ्यावे लागेल. अण्वस्त्रविरोधी शांतता चळवळीत सक्रिय भाग घेतानाच १९५० ते ६०च्या दशकातच त्यांनी सौरऊर्जेचा जोमदार पुरस्कार केला होता. त्यामुळे भारतीय विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्राच्या प्रस्थापित जडणघडणीला पर्यायी भूमिका मांडणारे म्हणूनही महत्त्वाचे स्थान त्यांना द्यावे लागते.*

*कोसंबींच्या या विविधरंगी, विविधढंगी कामगिरीला मार्क्सवादी विचारांची व्यापक बैठक व पार्श्वभूमी होती. परंतु मार्क्सवादाचा वापर त्यांनी यांत्रिकपणे न करता भारतातील विशिष्ट परिस्थितीला अनुसरून सर्जनशीलपणे व वैज्ञानिक दृष्टिकोन शाबूत ठेवून केला.*

*त्यामुळेच आज देशांतर्गत, तसेच आंतरराष्ट्रीय, परिस्थितीत व्यापक बदल होऊन कोसंबींच्या काळातील अनेक संदर्भ पार उलटेसुलटे झाले असले तरी त्यांचे विचार अजूनही कालबाह्य झालेले नाहीत. यामुळेच त्यांचे सविस्तर चरित्र मराठीत आणण्यासाठी केलेला हा लेखनप्रपंच.*

*या प्रकल्पाची सुरुवात करताना कोसंबी व भाभा यांची चरित्रे एकत्र लिहिण्याचे ठरवले होते. भारतीय ज्ञान-विज्ञान क्षेत्रातील दोन वेगळ्या प्रवाहांचे, वेगळ्या प्रवृत्तींचे प्रतिनिधीत्व हे दोघे करत असल्याने ही एकत्र चरित्रे महत्त्वाची ठरतील असे वाटले होते. प्रत्यक्ष लिखाण पूर्ण होईतो बदललेल्या परिस्थितीत याबद्दल शंका उपस्थित झाली. त्यामुळे संपादकीय सल्ल्यानुसार ही दोन चरित्रे वेगवेगळी छापण्याचे ठरविले. एकत्र चरित्र लेखनाच्या मूळ उद्दिष्टाची छाप येथे क्वचित् जाणवण्याची शक्यता आहे, यासाठी हा खुलासा.*

*या कामात अनेकांनी सहकार्याचा व उत्तेजनाचा हात दिला. त्या सर्वांचे नावनिशीवार आभार मानणे येथे शक्य नाही. परंतु उल्लेख केलेच पाहिजेत.*



Progress in the month of March 1915

| | English. | Second Language | Vernacular | History & Geography | Mathematics. | Science. |
|---|---|---|---|---|---|---|
| Marks. | · | · | 14 | 19 | 78 | · |
| Out of | · | · | 50 | 75 | 135 | · |
| Rank. | · | · | 28 | 14 | 27 | · |

General Conduct. Good

Fine, if any.

| Rank in Class. | Boys in Class. | Days Present. | Out of |
|---|---|---|---|
| 26 | 30 | 16 | 20 |

Remarks.

He is very weak in mathematics

Teacher's Signature.

Remarks.

D. Kosambi

Guardian's Signature.

THE

NEW ENGLISH SCHOOL, POONA.

PROGRESS BOOK

OF

Damodar Kosambi

Standard I Division C


From

to

POONA:

Printed at the "Arya-Bhushana" Press.

गणित कच्चे ! प्रगतीपुस्तकातील नोंद



19 HIGH AND LATIN SCHOOL 23

KIRBY, EUGENE JOSEPH "Count"
25 Cowperthwaite Street
St. Paul's Grammar School
September 12, 1907

"If there's one thing that is beautiful,
It's E. Kirby's flaming hair.
There's nothing in the school at all,
That with it can compare."
Business College


KOSAMBI, DAMODAR D. "Baba"
360 Harvard Street
Harvard Grammar School
New English High School, Poona, India
July 31, 1907

"The rest to some faint meaning make pretense,
But Baba never deviates to sense."
Swimming, 1923
Track, 1923
Winner Review Literary Contest, 1923
Harvard

1923


अमेरिकेमधील शाळेतील नोंद

दामोदरांची सही






पत्नी, माणिक, दामोदर आणि मनोरमा यांच्यासह धर्मानंद



माणिक, धर्मानंद, दामोदर

पोर्तुगीज अमलाखालील गोव्यात ३१ जुलै १९०७ रोजी दामोदरांचा जन्म झाला. आई बाळाबाई गोव्यातील लाड कुटुंबातील. वडील धर्मानंद दामोदर कोसंबी सांखवाळ गावचे. घराणे सारस्वत-ब्राह्मण, परंतु धर्मानंद कोसंबी यांचे तोपर्यंतचे व नंतरचे कर्तृत्व लक्षात घेता हा वारसा नावापुरताच म्हणावा लागेल. वडिलांकडून मिळालेल्या थेट वारशामुळे दामोदर जातपात, परंपरागत धर्मरूढी यांपासून जन्मतःच दूर गेले.

एका अर्थाने दामोदरांचा जन्म झाला त्या परिस्थितीला एक ज्ञानेश्वरी पैलू होता!

दामोदरांचे बालपण व शालेय जीवन फार आगळ्यावेगळ्या तऱ्हेने गेले. याला सर्वार्थानी धर्मानंद जबाबदार होते. त्याच्या चांगल्या तसेच वाईट परिणामांची दाट सावली दामोदरांच्या उत्तरायुष्यावर दिसून येते. त्यामुळे येथे, सुरुवातीस धर्मानंदांच्या आयुष्याचा थोडक्यात आढावा घेणे उचित ठरेल.

आचार्य धर्मानंदजी म्हणून स्वातंत्र्यसंग्रामात व गांधीजींच्या निकटवर्ती वर्तुळात अतिशय आदराचे स्थान प्राप्त करणाऱ्या धर्मानंद कोसंबींचे आयुष्य स्वातंत्र्यलढ्याने भारावलेल्या व अनेक महान व्यक्तिमत्त्वांनी गजबजलेल्या त्या काळातही फार लोकविलक्षण ठरणारे होते.

धर्मानंदांचा जन्म १८७६ सालचा. प्रकृतीने काहीसे अशक्त, पण बुद्धीने अतिशय तल्लख; घरची परिस्थिती हलाखीची झालेली, व त्या खेडवळ वातावरणात विशेष महत्त्वाकांक्षेला वाव नव्हता. त्यामुळे मराठी पाचवीनंतर शाळा सोडून वृद्ध पित्यास मदत म्हणून धर्मानंद घरचा कारभार सांभाळण्यामागे लागले. पंधराव्या वर्षी त्यांचे लग्नही झाले. याच सुमारास त्यांना वाचनाची गोडी लागली. मिळेल ते वाचावे व त्यावर भरपूर चिंतन करावे! यातून त्यांचा स्वतःच्या परिस्थितीबद्दलचा असंतोष वाढत गेला. माडांची राखण करण्यापलिकडे काही काम नसल्याने जीवन निरर्थक वाटू लागले. कर्मधर्मसंयोगाने त्यांच्या हाती तुकारामाची गाथा व तुकोबांचे चरित्र पडले, त्याचबरोबर

मुलांसाठी लिहिलेले बुद्धचरित्रही त्यांच्या वाचनात आले. या दोहोंचा फार गहिरा परिणाम त्यांच्यावर झाला, व संसाराविषयी विरक्तीची भावना त्यांच्या मनात निर्माण झाली. मात्र याचबरोबर मडगावातील एका सुधारक आप्तेष्टांमुळे आगरकरादी सुधारकांचे लेखनही त्यांच्या वाचनात आले. त्यामुळे अस्वस्थ असूनही धर्मानंद ईश्वरभक्ती, भजन-कीर्तन, वा अध्यात्माकडे वळले नाहीत. उलट त्यांच्यातील सुप्त ज्ञानलालसा तीव्रतेने उफाळून आली, आणि संस्कृतचे गाढे अध्ययन करण्याचा व बुद्धाची शिकवण जाणण्याचा ध्यास त्यांनी घेतला. यासाठी गोवे सोडून बाहेर पडण्याचा विचार त्यांच्या मनात प्रबळ होऊ लागला. तीनदा ते घराबाहेरही पडले. एकदा कोल्हापूर, दुसऱ्यांदा गोकर्ण, व तिसऱ्यांदा मंगळूरपर्यंत गेले; परंतु द्विधा मनस्थिती होऊन प्रत्येक वेळी दहा-बारा दिवसांनी घरी परतले.

त्यांचे वडील १८९८ साली निवर्तले. आता धर्मानंदांची घराबाहेर पडण्याची ओढ वाढली. त्यांच्या पत्नीने १८९९ साली कन्यारत्नाला जन्म दिला, आणि महिन्याभरात धर्मानंदांनी पुन्हा एकदा घर सोडले. स्वतःच्या संसारात अडकून पडण्याची धास्ती जबर असावी म्हणा, यावेळी मात्र अर्ध्या वाटेवरून न परतता तब्बल सात वर्षं त्यांनी घराबाहेर काढली.

एक तांब्या, सतरंजी व थोडे पैसे गाठीला बांधून त्यांनी यावेळी उत्तरेस पुण्याच्या रोखाने प्रयाण केले. तेथे संस्कृतचे जगद्विख्यात अभ्यासक व सुधारकांतील एक अग्रणी, प्रार्थनासमाजवादी डॉ. रा. गो. भांडारकरांची भेट होऊन त्यांनी संस्कृतच्या अभ्यासासाठी मदत मागितली. काही दिवस त्यांची तात्पुरती सोय लागली. परंतु धर्मानंदांनी प्रार्थनासमाजाच्या प्रसाराचे काम करावे असा भांडारकरांचा रोख दिसला. आपण आधी बौद्धधर्माचा अभ्यास करून मगच काय तो निर्णय घेऊ असे धर्मानंदांनी ठामपणे सांगितले. त्यावर, बौद्धधर्माचा या देशाला काही उपयोग नाही, शिवाय त्याचा अभ्यास करायचा तर नेपाळ व श्रीलंकेला जाणे आवश्यक आहे, असे भांडारकरांच्या तोंडून ऐकल्यावर धर्मानंदांनी पुणे सोडले. ग्वाल्हेरमार्गे ते काशीला पोहोचले. गंगातीरी अन्नछत्रात जेवण, अनेक हालअपेष्टा व प्रसंगी अपमान सोसत सव्वा वर्ष त्यांनी पाठशाळेत संस्कृतचे अध्ययन केले. तेथून नेपाळ व पुढे श्रीलंका, ब्रह्मदेश अशी भटकंती करत त्यांनी पाली भाषेचा अभ्यास केला. पाली ही मुळात जनसामान्यांची भाषा म्हणून बुद्धाने वापरलेली. कालांतराने राजाश्रयप्राप्तीनंतर बौद्धधर्मीय भिक्षू संस्कृतचा वापर करू लागले. त्यामुळे संस्कृतइतकेच पालीतही बौद्धधर्मीय साहित्य होते. – विशेषतः काही मूळ ग्रंथ पालीतच उपलब्ध होते. भारतात बौद्धधर्माचा लोप झाला व पालीभाषेबरोबर हे ग्रंथही विस्मृतीत गेले. परंतु श्रीलंका व ब्रह्मदेशात बौद्धधर्म प्रचलित असल्याने तेथील मठांत हे ग्रंथ उपलब्ध होते, तसेच पाली जाणणारेही. ही प्राचीन भारतीय भाषा आत्मसात करून, बौद्ध धर्मग्रंथांचा अभ्यास करण्याचे कार्य पार पाडून १९०४ च्या जानेवारीत धर्मानंद कलकत्त्यात आले.

धर्मग्रंथांचा अभ्यास करताना ब्रह्मदेशात ते विधिवत भिक्षूही झाले, व पिवळी चिवरे त्यांच्या अंगावर आली. याचबरोबर बौद्धधर्माविषयी श्रद्धाही त्यांच्या हृदयात निर्माण



झाली. कलकत्त्याहून कुशिनारा, बुद्धगया, राजगृह, श्रावस्ती, कपिलवस्तू, लुंबिजीवन, अशी बौद्धक्षेत्रांची यात्रा करून ते पुन्हा ब्रह्मदेशी गेले व निरनिराळ्या विहारांत अधिक अभ्यास व तपश्चर्या करून १९०६ च्या जानेवारीत कलकत्त्यात आले.

गोवे सोडल्यापासूनच्या सहा वर्षांत त्यांच्यात फार मोठे परिवर्तन घडून आले. सर्वार्थांनी त्यांचे शिक्षण या काळात घडले. संस्कृत व पाली ते शिकलेच, पण इंग्रजीचा श्रीगणेशाही त्यांनी श्रीलंकेतच गिरवला. कठीण धर्मग्रंथ त्यांनी समजून घेतले व व्यापक भ्रमंतीमध्ये जगाचा बराच अनुभवही गाठी बांधला. हे सर्व करताना गोंयकाराची सुशेगात वृत्ती बाजूस ठेवून अपार हालअपेष्टाही त्यांनी जिद्दीने सोसल्या.

या साऱ्या संचिताचा उपयोग बौद्धधर्मज्ञानाचा प्रसार करण्यासाठी, तसेच पालीभाषा भारतात पुन्हा रुजविण्यासाठी करण्याचा त्यांचा निर्धार होता. पण बौद्ध भिक्षूंवरची परंपरागत कडक बंधने पाळून (अंगावर पैसे व अन्य सामानसुमान न बाळगणे, विशिष्ट वेळीच भिक्षा मागून जेवण करणे, इत्यादी) आजच्या आगगाडी-मोटारगाडीच्या जमान्यात हे कार्य पुढे नेणे कठीण जाईल हे लक्षात आल्याने त्यांनी भिक्षुकीचा विधिवत त्याग केला.

आपल्या अंगीकृत कामासाठी पुणे वा आसपास राहण्याचा त्यांचा विचार होता. परंतु कलकत्त्यातच पाली शिकण्याची उत्सुकता असलेल्या हरिनाथ दे या गृहस्थांची गाठ पडून त्यांचा तेथील मुक्काम लांबला. त्या काळात मनमोहन घोष यांच्याशी त्यांची ओळख झाली. इंग्रजीचे प्राध्यापक व कवी असलेले मनमोहन घोष हे अरविंद घोष (वंदेमातरम्-खटल्यातील क्रांतिकारक व नंतरचे श्री. अरविंदऋषी) व बारीन्द्र घोष (माणिकतोला बॉंबखटल्यात फाशी गेलेले) यांचे थोरले बंधू. राष्ट्रीय चळवळीचे मान्यवर पुढारी सत्येन्द्रनाथ टागोर, रासबिहारी घोष, इत्यादींसह नॅशनल कॉलेजची स्थापना करून ते मार्गी लावण्यात मनमोहन घोष यावेळी गुंतलेले होते. नॅशनल कॉलेज सुरू करण्याची (१५ ऑगस्ट १९०६ ही, तारीखही निश्चित झाली होती. मनमोहन घोष यांनी धर्मानंदांना तेथे पालीचा शिक्षणक्रम सुरू करण्याचे आमंत्रण दिले व ते स्वीकारून, वेळ थोडा असूनही धर्मानंदांनी अभ्यासक्रमाची आखणी पार पाडली.

नॅशनल कॉलेजच्या पहिल्या दिवसापासून पालीचे अध्यापक म्हणून मासिक तीस रुपये पगारावर धर्मानंदांनी काम सुरू केले. भारतात परतल्यापासून अवघ्या आठ महिन्यांत पालीभाषा शिकवणारे आधुनिक भारतातील पहिले केंद्र त्यांनी मार्गी लावले होते! सहा वर्षांच्या खडतर स्वयंसेवी ज्ञानयात्रेनंतर, मराठी पाचवी शिकून, माडांची राखण करणाऱ्या धर्मानंदांचे एका साधुस्वरूपी बहुश्रुत विद्वानात रूपांतर झाले. पेज जेवणारा हा गोवेबाबू ऑक्सफर्ड-केंब्रिजला शिकून आलेल्या बंगालीबाबूंच्या खांद्याला खांदा भिडवून नॅशनल कॉलेजात प्राध्यापकी करू लागला! मनाच्या ज्या अवस्थेत घर सोडले होते ती संपून आयुष्याच्या नव्या कालखंडाची सुरुवात होत होती. यावेळी घरी परतावेसे त्यांना वाटले असावे. जवळजवळ सात वर्षांनी म्हणजे १९०६ च्या ऑक्टोबरात ते गोव्यात परतले. या पुनर्भेटीबद्दल त्यांचेच शब्द उद्धृत करणे योग्य ठरेलः

'ते (श्रीयुत विष्णु नाईक) व मी गाडी करून सांखवाळीस गेलो. तेथे माझ्या

आगमनाची वार्ता पूर्वीच समजली होती. मला मंडळीने बंगाली पोषाखात पाहिल्याबरोबर एकदम रडण्यास सुरुवात केली! शेवटी श्रीयुत विष्णू नाईक यांनी सर्वांचे समाधान केले. फार दिवस घरी राहता येणे शक्य नव्हते. ऑक्टोबर महिन्यातील दुर्गापूजेची सुट्टी संपण्यापूर्वी मला कलकत्त्यास जावयाचे होते. म्हणून मी घरी दोन-तीन दिवस राहून मडगावला आलो; माझे कुटुंब मजबरोबर कलकत्त्यास येण्यास सिद्ध झाले. परंतु माझी मुलगी माझ्या दाढीला इतकी घाबरून गेली, की ती आमच्याबरोबर येण्यास कबूल होईना. मडगावहून तिला आजीच्या घरी (चिखलीस) पाठवून देऊन मी व माझे कुटुंब कलकत्त्यास आलो'

मुलगी जेमतेम सव्वा महिन्याची असताना तेवीस वर्षीय धर्मानंदांनी घर सोडलेले. नंतर साधु-बैरागी अवस्थेत भटकंती करत बौद्धभिक्षुकी स्वीकारून, ज्ञानतपस्या करून, पुन्हा भिक्षुकीचा त्याग करून व नोकरी पत्करून ते संसारात परतलेले. बाळाबाईंच्या दृष्टीने ही गोष्ट स्वप्नवत् व पुढील संसारी आयुष्याबद्दल अपेक्षा निर्माण करणारीच असणार. परंतु धर्मानंदांच्या पायाला एकतर भिंगरी लागलेली होती, व दुसरीकडे संसारविषयक विरक्ती हा त्यांचा स्थायीभाव झालेला असावा. पुढील आयुष्यातही ते फारसे कोठे स्थिरावले नाहीत व बाळाबाईंबरोबर त्यांचा संसारही फार काळ अखंड चालला नाही. थोडे दिवस कुटुंबासमवेत काढावेत व कसल्यातरी कामानिमित्त फिरतीवर बाहेर पडावे हा त्यांच्या संसारातील एक नियमच झाला. त्याला कलकत्त्यातील सहवासही अपवाद ठरला नाही. जेमतेम दोन महिने राहिल्यावर बाळाबाईंची तब्येत बिघडली. परप्रांती आजारी पत्नीची देखभाल करणे कठीण वाटल्याने धर्मानंदांनी पत्नीस पुन्हा गोव्यात पाठविले.

बाळाबाई १९०६ च्या डिसेंबरात गोव्यात परतल्या. त्यांनी ३१ जुलै १९०७ला मुलास जन्म दिला. घरातील ज्येष्ठ चिरंजीव, त्यामुळे प्रथेनुसार दिवंगत आजोबांचे नाव नातवास दिले गेले– दामोदर. याच महिन्यात धर्मानंद कलकत्ता विद्यापीठात पालीचे व्याख्याते म्हणून कामास लागले. नॅशनल कॉलेजात पाली शिकवणे सुरू केल्यावर वर्षभरातच प्रस्थापित विद्यापीठातही या भाषेला स्थान प्राप्त व्हावे ही त्यांच्या दृष्टीने भाग्याचीच गोष्ट होती. अर्थात् धर्मानंदांची कलकत्त्यातील उपस्थितीच याला कारणीभूत होती. विद्यापीठात काम करताना नॅशनल कॉलेजचे काम आपण थांबविणार नाही, असे त्यांनी कुलगुरू सर आशुतोष मुखर्जी यांना सांगितले व ते मान्यही झाले. मात्र विद्यापीठाकडून दरमहा १०० रु. पगार मिळू लागला, म्हणून नॅशनल कॉलेजचे काम ते विनामोबदला करू लागले. तरीही ते कलकत्त्यात स्थिरावण्याचे चिन्ह नव्हते, कारण महाराष्ट्रात परतून पाली भाषा व बौद्धधर्मविचारांचा प्रसार करण्याचा बेत त्यांचा मनात पक्का होता.

बडोदा संस्थानचे सयाजीराव महाराज कलकत्त्यास गेले असता धर्मानंदांनी त्यांची गाठ घेतली. महाराजांच्या आमंत्रणानुसार १९०८च्या जुलैमध्ये धर्मानंदांनी बडोद्यास



भेट दिली. त्यांना कलकत्ता सोडून बडोद्यास येण्याचा सयाजीमहाराजांनी आग्रह धरला. त्यावर 'पैसे मिळवून श्रीमंत होण्याची मला मुळीच इच्छा नाही. माझ्या आवडीचे काम मला मिळाले, आणि निर्वाहापुरता पैसा मिळाला तर ते मला हवे आहे. तेव्हा पुणे-मुंबईसारख्या ठिकाणी राहून माझे काम मला करू द्यावे व निर्वाहापुरती बडोदेसरकारकडून मला मदत व्हावी,' असे धर्मानंदांनी सुचविले. आणि थोड्या अवधीतच त्यांना कलकत्त्यास अर्जंट तार मिळाली –'तुम्ही महाराष्ट्रातील कोणत्याही शहरी रहात असाल तर तुम्हाला बडोदेसरकारातून दरमहा ५० रु. मिळतील, व ही मदत तीन वर्षपर्यंत चालू राहील. मात्र वर्षातून एखादे पुस्तक बडोदेसरकारसाठी तुम्ही लिहून तयार केले पाहिजे.'

हे निमंत्रण स्वीकारण्याचे तात्काळ ठरवून त्यांनी महाराजांना कळवूनही टाकले की, महिन्या-दीड महिन्यात, येथील कामे आटोपून मी पुण्यास जाऊन राहीन. सप्टेम्बरात ते पुन्हा एकवार ब्रह्मदेशात जाऊन आले. यावेळी पालीभाषेतील छापून प्रसिद्ध झालेली सर्व पुस्तके आणण्यासाठी विद्यापीठाने ३००-४०० रुपयेही त्यांच्याबरोबर दिले होते.

धर्मानंद परतले तोवर त्यांची कसोटी पाहणारी घटना तेथे घडून आली होती!

विद्यापीठात पालीभाषेचे उत्तम केंद्र निर्माण होण्यासाठी धर्मानंदांना कलकत्त्यात थोपवून धरणे महत्त्वाचे आहे, असे त्यांचे शिष्य हरिनाथ दे यांनी, कुलगुरू आशुतोष मुखर्जींना पटवले होते. त्यानुसार विद्यापीठाच्या सिंडीकेटने एक ठराव करून धर्मानंदांचा पगार शंभरवरून अडीचशे रु. केला. त्याबरोबर त्यांनी किमान तीन वर्षे कलकत्त्यात रहावे अशी अट विद्यापीठाने घातली. शंभर रु. पगाराची नोकरी सोडून पन्नास रुपयांवर पुणे-मुंबईला येण्यास सहज तयार झालेल्या धर्मानंदांचीही मनस्थिती अडीचशेचा लठ्ठ आकडा ऐकताच दोलायमान झाली. परंतु स्वकर्तव्य व सयाजीरावांना दिलेले वचन यांचे भान ठेवून ते सावरले. 'आज बुद्धाच्या आणि बोधिसत्वाच्या अनुकंपेने मी लोभावर विजय मिळविला, म्हणून मला आनंद वाटत आहे!' ही त्यांनी एका परिचिताजवळ व्यक्त केलेली तेव्हाची प्रतिक्रिया!

कलकत्ता विद्यापीठ तेव्हा भारताच्या राष्ट्रीय पुनरुत्थान प्रक्रियेतील अग्रगण्य केंद्र होते. आशुतोष मुखर्जींच्या आधिपत्याखाली भारतीय विज्ञानक्षेत्राचे अर्वाचीन सुवर्णयुग तेथे उजाडत होते. त्यादृष्टीने पाहता निव्वळ पैशाचा प्रश्न बाजूस ठेवला तरी धर्मानंदांचा निर्णय तसा विक्षिप्तच मानायला पाहिजे. (हाच तऱ्हेवाईकपणा चिरंजीव दामोदरांमध्ये उतरलेला दिसून येतो, परंतु एक गोष्ट मात्र कबूल करावी लागेल की धर्मानंदांच्या विधिलिखिताचा विचार करता असे घडणे आवश्यकच होते. त्यांच्या स्वतःच्या व बरोबरीने लहानग्या दामोदरच्या आयुष्याला एक जगावेगळी कलाटणी थोड्याच अवधीत लाभणार होती. धर्मानंद कलकत्त्यास राहिले असते तर पुढचे योग कदाचित जुळून आलेही नसते!

धर्मानंद १९०८च्या ऑक्टोबरात मुंबईस आले. त्यांच्या परिचयातील माडगावकर कुटुंबियांच्या बोरिवली येथील बंगल्यात ते उतरले. (पुढे याच कुटुंबातील मुलगी त्यांनी सून म्हणून निवडली) पत्नी, मुलगी माणिक, व छोटा दामोदर मुंबईत आले. काही

दिवस बोरिवलीत काढल्यावर त्यांनी गिरगावात प्रार्थनासमाजासमोरच्या एका चाळीत बिऱ्हाड केले. मुंबईतील त्यांचा हा मुक्काम जेमतेम सहा महिने टिकला. नंतर कुटुंब गोव्यास पाठवून ते स्वतः वर्षभर पुण्याला मुक्कामास गेले.

मुंबईतील या अल्प मुक्कामात प्रसिद्ध संस्कृतज्ञ व प्रार्थनासमाजाचे प्रसारक डॉ. वासुदेव अनंत सुखटणकर यांच्याशी धर्मानंदांची ओळख झाली. सुखटणकरांचा स्नेह अप्रत्यक्ष रीत्या धर्मानंदांना अमेरिका व रशियाच्या परदेशवाऱ्या घडविण्यास कारणीभूत ठरला. अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठातील डॉ. जेम्स वुड्स यावेळी संस्कृतचा सखोल अभ्यास करण्यासाठी मुंबईत आले होते. सुखटणकरांकडून धर्मानंदांची ओळख होताच डॉ. वुड्स यांनी त्यांच्याकडून चार महिने पालीची शिकवणी घेतली. यामुळे धर्मानंदांचे नाव हार्वर्डला पोचले. हार्वर्डच्या पौर्वात्य संशोधन केंद्रात 'विसुद्दीमग्ग' (विशुद्धीमार्ग) या बौद्धग्रंथाची चिकित्सक आवृत्ती तयार करण्याचे काम प्रा. वारन यांनी सुरू केले होते. वारन यांच्या मृत्यूमुळे अपुरे राहिलेले हे काम पूर्ण करण्याची जबाबदारी घेतलेल्या प्रा. लॅनमन यांना सहकाऱ्याची जरूर भासत होती. अमेरिकेत परतल्यावर डॉ. वुड्स यांनी धर्मानंदांची शिफारस केली व धर्मानंदांना चक्क हार्वर्ड विद्यापीठाचे आमंत्रण मिळाले.

हे आमंत्रण १९१० च्या फेब्रुवारीत आले तेव्हा धर्मानंदांना पुण्यात येऊन वर्ष होत आले होते. बडोदे संस्थानच्या मदतीवर रहात असल्याने त्यांनी सयाजीराव महाराजांचा सल्ला मागितला. त्यांची परवानगी मिळाल्याने, एप्रिलमध्येच इंग्लंडमार्गे अमेरिकेला जाण्यास ते बोटीवर चढले. दोन वर्षे हार्वर्डला काढून १९१२ साली ते परतले.

विसुद्दीमग्गाचे काम काही कारणांमुळे अपुरे राहिले. परंतु गोव्याहून काशी-नेपाळ-श्रीलंका-ब्रह्मदेश येथे केलेल्या भ्रमंतीइतकीच ही इंग्लंड-अमेरिकेची सफरही त्यांच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली. वाटेतील इंग्लंडमधील मुक्कामात एका डच व्यापाऱ्याने त्यांना मार्क्स व समाजवादी तत्वज्ञानाची माहिती करून दिली. कार्ल मार्क्सचे चरित्र व समाजवादावरची अन्य पुस्तके बरोबर घेऊनच त्यांनी इंग्लंड सोडले. हार्वर्डमधील मुक्कामात त्यांनी समाजशास्त्रविषयक पुस्तकांचे भरपूर वाचन केले. त्यांच्या धार्मिक अभ्यासाला यामुळे आधुनिक विचारांची व्यापक बैठक प्राप्त झाली.

अमेरिकेहून परतल्यावर त्यांचे मित्र, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी त्यांना पुण्यातील फर्गसन कॉलेजात नोकरी करण्याचा सल्ला दिला. धर्मानंद व रा. गो. भांडारकरांच्या प्रयत्नामुळे काही काळापूर्वी मुंबई विद्यापीठाने पाली भाषेच्या अभ्यासक्रमास मान्यता दिली होतीच. तेव्हा महाराष्ट्रातील पालीशिक्षणाचे पहिले केंद्र पुण्यात सुरू करण्याची ही संधी होती. महर्षी शिंदे यांनी स्वतः धर्मानंदांची शिफारस करणारे पत्र फर्गसनच्या व्यवस्थापनाला लिहिले. रँग्लर र. पु. परांजपे तेव्हा फर्गसनचे प्राचार्य होते. त्यांनी धर्मानंदांना कळविले :

'फर्गसन कॉलेजात आम्ही तुम्हास कायमचे नोकर म्हणून घेण्यास तयार आहोत. तहहयात मेंबरांचा पगार आता आम्ही १०० रुपये करून घेतला आहे. पण तुम्हाला ७५ रु. मिळतील, व तुम्ही निदान पाच वर्षं कॉलेजात शिकविण्याची अट मान्य केली



पाहिजे.'

आपणाकडे बी. ए., एम्. ए. ची डिग्री नाही; विद्यापीठीय निष्कर्षाचा विचार करायचा तर आपण मॅट्रिक पासही नाही, तेव्हा तहहयात सदस्य म्हणून डेक्कन एज्युकेशन सभा आपणास घेऊ शकत नाही हे धर्मानंदांनाही पटत होते. परंतु हे इतरांना १०० रु. व आपणास मात्र ७५ रुपये देऊ करतात हे त्यांना खटकले. वयोमानातील फरक, एकूण सेवेचा काळ वगैरे लक्षात न घेता सर्वच तहहयात सदस्य १०० रुपयांचा सारखाच पगार घेत, कारण कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी तेवढे पैसे आवश्यक होते. असे डेक्कन एज्युकेशन सभेचे तत्त्व होते, अधिक पैसे न घेण्याच्या आपल्या या त्यागवृत्तीबद्दल फर्गसनातील प्राध्यापकांचा कडवा अभिमानही सर्वत्र जाहीरच होता. अशा परिस्थितीत धर्मानंदांना ७५ रु. देऊ करणे ही गोष्ट तहहयात सदस्यांना अहंगंडाची बाधा झाल्याचे लक्षण मानले पाहिजे.

यावेळी हार्वर्डला मिळालेल्या वेतनातून प्रवासखर्च व वडिलांचे कर्ज फेडूनही दीड हजार रुपये धर्मानंदांकडे शिल्लक राहीले होते. तेव्हा पाच वर्षे दरमहा २५ रु. तूट सहन करता येईल आणि पुण्यात पालीभाषेचा प्रसार करावयास मिळेल, हे ठीक आहे, असा विचार धर्मानंदांनी केला. डॉ. भांडारकर, तसेच सयाजीराव महाराजांना धर्मानंदांचा हा निर्णय पसंत नव्हता. सयाजीरावांनी तर 'अमेरिकेला हार्वर्ड युनिव्हर्सिटीत नोकरी करून आलात आणि आता दरमहा ७५ रु. आपली किंमत ठरविता, हे योग्य वाटते काय?' असा प्रश्नही केला.

पुढे दामोदरांचा संबंधही फर्गसनाशी येणार असल्याने ही कथा येथे महत्त्वाची!

सहा वर्षे धर्मानंदांनी फर्गसनात अध्यापन केले. काही उत्तम विद्यार्थ्यांनी त्यांच्या हाताखाली एम्. ए. केले. चिं. वि. जोशी (चिंतामणराव फेम) व डॉ. पु. वि. बापट (पाली-पंडित म्हणून जगन्मान्यता मिळवलेले संशोधक) ही त्यापैकी दोन नावे.

पुण्यातील कारकिर्दीत (१९१२ ते १८) धर्मानंदांचा संसार मात्र तब्बल सहा वर्षे अखंड चालला. रविवारपेठेतील मोतीचौकातील भाड्याच्या जागेत बाळाबाई, तेरा वर्षांची माणिक, व पाच वर्षांचा दामोदर, असे सर्व कुटुंब एक आले. दामोदरांच्या पाठीवर त्यांना आणखी दोन मुली झाल्या—मनोरमा व कमला. नंतर धर्मानंदांनी एरंडवण्यात डॉ. भांडारकरांच्या शेजारी 'आरण्यक कुटी' नावचे स्वतःचे छोटेसे घरही बांधले.

दामोदरांच्या चरित्रात या काळाकडे आपण पुन्हा नजर टाकूच. येथे एवढेच नोंदणे महत्त्वाचे की १८ साली डॉ. वूड्स यांनी धर्मानंदांना पुन्हा हार्वर्डला येण्याचा आग्रह केला. फर्गसनातील किमान पाच वर्षे होऊन गेली होती, बराच काळ एका ठिकाणी राहिल्याने त्यांना अस्वस्थही वाटू लागले असणार, तशात 'विसुद्दीमग्गा'चे काम पूर्ण करण्याची आलेली संधी धर्मानंदांनी जाण्याची तयारी सुरू केली. यावेळी फर्गसन कॉलेजने त्यांना थोपविण्याचा प्रयत्न केला. रँ. परांजप्यांनी इतर तहहयात सभासदांइतकाच १०० रु. पगार करण्याची तयारी दाखविली; अखेर त्यांचा राजीनामा न स्वीकारता त्यांना दोन वर्षे रजा मंजूर केली.

[illegible] धर्मानंद आपल्याबरोबर माणिक व दामोदरला शिक्षणासाठी अमेरिकेत घेऊन गेले. जवळजवळ चार वर्षे त्यांनी तेथे काढली. 'विसुद्दीमग्गा'चे काम काही [illegible]मुळे पुन्हा अपुरे राहिले, पण पाली शिकवणे व अन्य पाली ग्रंथांचे संस्करण करणे, ही कामे त्यांनी पार पाडली. या काळात लिओ वीनर या हार्वर्डमधील पोलीश यहुदी (ज्यू) प्राध्यापकाशी त्यांचा जवळचा संबंध आला, व त्यांच्याकडून ते रशियन भाषा शिकले. दामोदरला शिक्षणासाठी मागे ठेवून मुलीसह १९२२ च्या ऑगस्टमध्ये ते भारतात परतले.

यावेळी ते अहमदाबादला गेले. तेथे राष्ट्रीय शिक्षणाचा एक प्रयत्न म्हणून महात्मा गांधींनी गुजरात विद्यापीठाची स्थापना केली होती. यात जुन्या वाङ्मयाचे संशोधन करण्यासाठी 'पुरातत्त्व मंदिर' म्हणून एक खास विभाग उभारला गेला होता. एक संशोधक म्हणून २५० रु. पगार होता. अमेरिकेत शिकणाऱ्या मुलास पैसे पाठवावे लागत असल्याने धर्मानंदांची गरज अधिक, म्हणून गांधीजींनी त्यांना ३५० रु. पगार दिला. फर्गसन कॉलेजच्या नेमका उलटा हा अनुभव! तेथे धर्मानंदांना थोडे अपमानित झाल्यासारखे वाटले होते, येथे अधिक पगार घेणे त्यांना धर्मसंकटासारखे वाटू लागले.

पुरातत्त्व मंदिरात तीन वर्षे त्यांनी अध्ययन, संशोधन, व ग्रंथलेखन केले. जैनधर्मतत्वांचा अभ्यासही केला. ते १९२६ मध्ये तिसऱ्यांदा हार्वर्डला जाऊन वर्षाने परतले.

धर्मानंदांची क्षितिजे आता खूपच रुंदावली होती. सोविएत क्रांतीच्या दहाव्या वर्धापन सोहळ्यानिमित्त जवाहरलाल नेहरू, वडील मोतीलाल यांच्याबरोबर रशियाचा दौरा करून आले होते. यानंतर लिहिलेल्या एका लेखात जवाहरलालजींनी लेनिनग्राद येथील बौद्धधर्माचा अभ्यास करणाऱ्या संस्थेचा उल्लेख केला होता. त्याने कुतूहल चाळवले जाऊन सोविएत युनियनला भेट देण्याची इच्छा धर्मानंदांच्या मनात निर्माण झाली. त्यांनी नेहरूंचा सल्ला मागितला. आपण अवश्य रशियास जावे, तेथे बोध घेण्यासारख्या बऱ्याच गोष्टी अनुभवण्यास मिळतील, असे सांगून नेहरूंनी संपर्काचा पत्ताही पाठविला. परिणामी, सोविएत अकादमी ऑफ सायन्सेसतर्फे धर्मानंदांना रशियाभेटीचे आमंत्रण मिळाले. लेनिनग्राद येथील बौद्धसंस्था, तसेच लेनिनग्राद विद्यापीठ येथे १९२९ सालात पाली शिकविण्याचे काम करतानाच त्यांनी मास्को व अन्य शहरांना भेटी देऊन क्रांतीनंतरच्या समाजपरिस्थितीचा अभ्यासही केला.

ते ३० सालाच्या सुरुवातीस भारतात परतले. हे वर्ष गांधीजींच्या दांडीयात्रेचे. ठिकठिकाणी मिठाचे सत्याग्रह सुरू झाले, असहकारितेची चळवळ फोफावू लागली. गुजरात विद्यापीठात काम करताना गांधीजींच्या निकटवर्ती वर्तुळात धर्मानंदांना स्थान मिळाले होते. साहजिकच ते सत्याग्रहात पडले. मे मधील शिरोड्याच्या मीठसत्याग्रहात त्यांनी भाग घेतला. नंतर मुंबईतील कामगारवर्गात सत्याग्रहाच्या चळवळीचा प्रसार करण्याचे काम काँग्रेसच्या मुंबई प्रांतिक समितीने त्यांच्यावर सोपविले. यात ऑक्टोबरमध्ये त्यांना अटक होऊन एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा झाली व ठाण्याच्या तुरुंगात रवानगीही. पण उच्च न्यायालयात निर्दोष ठरल्याने थोड्या दिवसांतच ते सुटले.



त्यांनी ३१-३२ सालात अमेरिकेची चौथी व अखेरची वर्षभराची सफर केली. यावेळी परतताना दोन आठवडे त्यांनी रशियात घालविले. नंतर पुणे, बनारस हिंदू विद्यापीठ, काशी विद्यापीठ, असे ते थोड्या थोड्या काळाकरिता फिरत राहिले.

त्यांनी ३९ साली, मुंबईत परळ येथे 'बहुजन विहार' स्थापन केला, व ४० पर्यंत तेथे काम केले. पुन्हा पुणे, मुंबई, बंगलोर, अहमदाबाद, सारनाथ, काशी असे ते फिरत राहिले. एव्हाना धर्मानंद थकले होते, सत्तरी आली होती. मधुमेहाचे जुने दुखणे फार तापदायक वाटू लागले होते. यापुढे आपल्या हातून काही कार्य होणे शक्य नाही, तेव्हा जैनधर्मियात प्रचलित असलेले 'मारणांतिक सल्लेखन' म्हणजे आमरण उपवास करून देह सोडण्याचे त्यांनी ठरवले. गांधीजींच्या वर्धा येथील सेवाग्राम आश्रमात जवळजवळ महिनाभर अनशन करून ४ जून १९४७ ला त्यांनी जगाचा निरोप घेतला.

धर्मानंदांनी बौद्धधर्म जवळजवळ पन्नास वर्षं अत्यंत जाणीवपूर्वक आत्मसात करून पाळला. त्यांचे एकंदर जीवन निःसंग अपरिग्रहवृत्तीने व्यतीत झाले. त्या अर्थाने ते धार्मिक होते. परंतु त्यांची धार्मिकता कर्मकांडात गुंतून जाणे, वा भोवतालच्या सामाजिक घडामोडींकडे दुर्लक्ष करून अध्यात्मात बुडून जाणे, अशा प्रकारची मर्यादित नव्हती. धर्मानंदांचे चरित्रकार ज. स. सुखटणकर यांनी त्यांचे वर्णन एक 'सश्रद्ध नास्तिक' असे केले आहे, ते फारच समर्पक म्हणावे लागेल. धर्मानंदांच्या विचारसरणीत बुद्धिवादाचा मोठा हिस्सा होता, त्याचप्रमाणे समाजशास्त्रीय विचारांचा पक्का धागाही. त्यामुळे त्यांच्या दृष्टिकोनाला विवेकी आधुनिकतेची चौकट प्राप्त झाली होती.

पुण्यात १९१२ साली न. चिं. केळकरांच्या अध्यक्षतेखाली, वसंत व्याख्यानमालेत त्यांचे भाषण झाले. विषय होता 'कार्ल मार्क्स यांचे चरित्र व मते'! या आधुनिक समाजवादी मतांची ओळख भारतीय स्वातंत्र्यचळवळीला महत्वाची ठरेल या भावनेने आपल्याजवळची समाजवादावरची पुस्तके त्यांनी केळकरांना दिली. परंतु लोकमान्यांच्या तुरुंगवासाच्या काळात केसरीचे संपादकत्व चालविणाऱ्या केळकरांनी काही त्याचा फारसा वापर केला नाही, असे खुद्द धर्मानंदांनीच लिहून ठेवले आहे.

लाहोर अधिवेशनात (१९२९) –काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून नेहरूंनी आपण समाजवादी असल्याचे सांगितले तेव्हा धर्मानंदांनी आनंद व्यक्त केला. तसेच गांधीजींबद्दल अतिशय आदर व त्यांच्याशी जवळीक असूनही जमीनदार व भांडवलदार यांनी समाजाचे विश्वस्त असल्याप्रमाणे वागावे या गांधीजींच्या विचाराबद्दलची नाराजीही त्यांनी स्पष्ट व्यक्त केली होती.

अर्थात् समाजवादी तत्वज्ञानाबद्दलचा धर्मानंदांचा ओढा, ते तत्वज्ञान बौद्ध तत्वज्ञानास पूरक व समांतर आहे, या कारणास्तवच होता. विशेषतः मार्क्सवादात अनुस्यूत असलेली क्रांतिकारी हिंसा त्यांना अमान्य होती. मार्क्ससारख्या महान तत्ववेत्त्यावरही युरोपिअन संकुचितपणाचा झालेला हा परिणाम आहे असे त्यांचे मत होते. समाजवादातील मानवतावाद व समतेचे तत्व त्यांना आपलेसे वाटणे साहजिकच होते. परंतु मार्क्सचा 'कॅपिटल' हा ग्रंथ काही आपणास समजला नाही, असेही त्यांनी लिहून ठेवले आहे.

धर्मानंदांचा हा वैचारिक प्रवास, चिरंजीव दामोदर यांच्या काही वैशिष्ट्यांवर प्रकाश पाडण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

पिता-पुत्र- संबंधातील प्रेम व वैर, स्वीकार व नकार, अनुकरण व विरोध ही द्वंद्वे तशी सर्वसामान्य आहेत. परंतु असामान्य पिता व असामान्य पुत्र अशा दुर्मिळ जोडगोळीच्या बाबतीत ही द्वंद्वात्मक ओढाताण अधिकच महत्त्वाची ठरावी हे उघडच आहे.

आता मुख्य चरित्रनायक दामोदर कोसंबींकडे वळुया.

गोव्यात ३१ जुलै १९०७ला दामोदरांचा जन्म झाला तेव्हा धर्मानंद कलकत्त्यात होते. त्यानंतर अमेरिकेची वारी करून १९१२ साली धर्मानंदांनी फर्गसन महाविद्यालयात नोकरी पत्करली व बिऱ्हाड पुण्यास हलवले. मध्यंतरातील सहा महिन्यांचा मुंबईतील मुक्काम सोडल्यास आयुष्याची ही पहिली पाच वर्षे दामोदरांनी गोव्यातच आजोळी काढली. त्यामुळे मराठीबरोबरच कोकणीही त्यांची मातृभाषा झाली होती.

धर्मानंदांनी कुटुंबासह १९१२ ते १८ ही सलग सहा वर्षे पुण्यात काढली. मोठी मुलगी माणिक हिचे शालेय शिक्षण पूर्ण होत आले होते, तर दामोदर व दुसरी मुलगी मनोरमा यांचे शिक्षण सुरू झाले होते. धाकटी कमला खूपच लहान होती. आई, वडील, व बहिणी या सर्वांसमवेत एकत्र राहण्याचा हा दामोदरांचा आयुष्यातील काळ. असा काळ पुन्हा त्यांच्या नशिबी येणार नव्हता.

दामोदरचे शिक्षण सुरू झाले न्यू इंग्लिश स्कूलमध्ये. लहानपणापासूनच अतिशय तरल बुद्धीचा हुशार विद्यार्थी म्हणून त्याची प्रसिद्धी होती. महत्त्वाची गोष्ट म्हणजे शाळेतील इयत्ताही त्याने फार भराभर ओलांडल्या. बहुधा धर्मानंदांनी आपल्या एकुलत्या एक लेकास लहान वयात वरच्या वर्गात घातले असावे. वयाची आठ वर्षे पूर्ण होण्याआधीच, १९१५ साली दामोदरने इंग्रजी पहिली म्हणजे आताची पाचवी इयत्ता पास केली. शाळेतील शिक्षकांना या चिमुकल्या मुलाच्या हुशारीचे फार कौतुक होते. दामोदरांची धाकटी बहीण, मनोरमा यांच्या आठवणीप्रमाणे वर्गात एखादा कठीण प्रश्न विचारल्यावर इतर मुलांना उत्तर आले नाही की शिक्षक दामोदरकडे वळायचे व म्हणायचे– 'मोठे मोठे वीर थकले, आता अभिमन्यू काय करतात पाहू ! आणि बहुतेक वेळा दामोदर चक्रव्यूह भेदायचाच.

अर्थात् लहान वयात वरच्या वर्गात बसल्याचे काही गमतीशीर परिणाम सुरुवातीस झालेच. इंग्रजी पहिलीतील त्यांच्या एका उपलब्ध प्रगतीपुस्तकाच्या पानावर काही आश्चर्यकारक नोंदी आढळतात. गणिती व इतिहासज्ञ म्हणून पुढे आलेल्या दामोदर कोसंबींना गणितात मिळाले आहेत १३५ पैकी २८ गुण, तर इतिहास-भूगोल या विषयात ७५ पैकी १९ ! त्या महिन्याच्या प्रगतीपत्रावर ओकगुरुजींचा शेरा आहे–



'हा मुलगा गणितात फार कच्चा आहे!' परंतु सुरुवातीच्या या अपरिपक्वतेवर दामोदरने लवकरच मात केली. अकरावे वर्ष पूर्ण होण्याआधीच, १९१८ साली इंग्रजी चौथी (सध्याची आठवी) पास होईपर्यंत तो शिक्षकांच्या कौतुकाचा विषय झाला होता.

शिक्षकांनी दामोदरला अभिमन्यू म्हणून उल्लेखण्यास लहान वयाबरोबरच आणखीही एक कारण असावे, व तेही त्यांच्या नंतरच्या परिचित व्यक्तिमत्त्वाशी विरोधाभास दर्शविणारे होते. यावेळी दामोदर प्रकृतीने फारच अशक्त होता. नेहमी सर्दी, खोकला, ताप यांचा त्याला त्रास व्हायचा. शरीरयष्टीपण किडकिडीत व लहान चणीची. शाळेतून परतल्यावर रोज पाय दुखतात म्हणून त्याची तक्रार असे. मनोरमा दोन वर्षांनी लहान, पण दोघांची उंची सारखीच होती. 'मी एका हाताने त्याचा एक हात पिळायची, पण त्याला दोन हातांनी माझा हात पिळता येत नव्हता,' अशी आठवण त्यांनी नमूद केली आहे.

दामोदरचा या काळातील आणखी एक पैलू त्यांच्या सर्वात धाकट्या बहिणीने वर्णन केला आहे. कमलाबाईंनी सांगितले की, 'तो अति लाडावलेला मुलगा होता. कोणालाही फटकन् काहीतरी बोलत असे– भीडभाड न ठेवता व लहानमोठे न बघता, आईने त्याचे फार लाड केले; वडील मात्र थोडेफार दटावत असत. या जोडीलाच तो हट्टी व शीघ्रकोपीही होता. त्याच्या एखाद्या वस्तूस हात लावला तरी तो पटकन चिडत असे.'

या शीघ्रसंतापाची दुसरी बाजू म्हणजे प्रेमळपणा व दिलदारपणाही तेवढाच ठळक होता. एकदा मनोरमाचे डोळे आल्याने ते बांधून ठेवले होते, व तिला हिंडता-फिरता येत नव्हते. त्या काळात स्वारी शाळेतून आली की आवर्जून बहिणीला हात धरून फिरवायची व एक खास झोपाळा बांधून त्यावर बसवून झोके द्यायची.

फटकळ, शीघ्रकोपी, आणि दिलदार प्रेमळपणा हे बालवयातील दोन गुण दामोदरांनी नंतरच्या आयुष्यातही कसोशीने जोपासले.

१९१८ साली धर्मानंद दुसऱ्यांदा अमेरिकेला जाण्यास निघाले. मोठी मुलगी माणिक १९ वर्षांची होती. व कॉलेजची प्रिव्हियस परीक्षा पास झाली होती. हार्वर्ड विद्यापीठातच जावयाचे असल्याने धर्मानंदांनी पुढील शिक्षणाकरिता तिला बरोबर नेण्याचे ठरविले होतेच. प्रारंभी बाळाबाई दामोदर व मुलींच्या शिक्षणासाठी पुण्यातच रहाणार असे ठरले होते. परंतु त्याच सुमारास त्यांची तब्येत बिघडली. तेव्हा धर्मानंदांनी त्यांना मुलींबरोबर गोव्यात पाठविले. दामोदरला पुण्यातच वसतिगृहात ठेवावा लागेल हे दिसत होते. परंतु तो तब्येतीने अशक्त असल्याने त्याला एकटा पुण्यात ठेवणे त्यांना योग्य वाटले नाही. याशिवाय लहान वयात वरच्या वर्गात गेल्याने येथे दामोदरची तीन वर्षे फुकट जाण्याचाही प्रश्न होताच. त्यावेळी मॅट्रीकच्या परीक्षेस बसण्याची वयोमर्यादा १७ वर्षे होती, व दामोदर १४ व्या वर्षीच मॅट्रीकच्या वर्गात पोचणार होता.

या परिस्थितीचा विचार करून धर्मानंदांनी दामोदरलाही आपल्याबरोबर नेण्याचे ठरवले.

दोन मुलांसह धर्मानंद १९१८च्या जूनमध्ये बोटीने अमेरिकेस निघाले. पहिले महायुद्ध चालू असल्याने सुएझ कालवा-अटलांटिक महासागरमार्गे अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील बोस्टनला न जाता त्यांच्या बोटीने सिंगापूर, जपानमार्गे अमेरिकेचा पश्चिम किनारा गाठला. तब्बल चार महिन्यांनी ते सान्फ्रान्सिकोला पोचले, व तेथून गाडीने बोस्टनला गेले. आगगाडीच्या या प्रवासात दामोदरला इन्फ्ल्युएंझाने गाठले. बराच ताप चढून श्वास कोंडल्याने तो कावराबावरा झाला होता. ताप लवकरच उतरला तरी अशक्तता बरेच दिवस टिकून होती. बोस्टनला १९१८ च्या १४ ऑक्टोबरला पोचल्यावर धर्मानंद मॅसॅच्युसेट्स राज्यातील केंब्रिज येथे स्थायिक झाले. हे हार्वर्ड विद्यापीठाचे गाव. प्रथम त्यांनी मुलांच्या शिक्षणाची सोय लावली.

अशा रीतीने दामोदरांच्या आगळ्या शिक्षणाची सुरुवात झाली.

इंग्रजी अंमलाच्या त्या काळातही परदेशी शिकणे महत्त्वाचे होतेच, परंतु आजच्या इतके ते सहज नव्हते. प्रामुख्याने श्रीमंत, संस्थानिक, जमीनदार वर्गातील मुले सहजरीत्या परदेशी जात, तसेच मोजके निवडक मध्यमवर्गीय हुशार तरुणही. या शिक्षणाची मुख्य केंद्रे होती इंग्लंडात-ऑक्सफर्ड, केंब्रिज, लंडन ही. विज्ञान, पौर्वात्यविद्या यासाठी जर्मनीत शिक्षणास जाणारेही काही होते. पण कितीही झाले तरी ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या ऑक्सफर्ड-केंब्रिजचे महत्व वेगळेच होते! ऑक्सफर्डचा पदवीधर अधिक लंडनचा बॅरिस्टर किंवा केंब्रिजचा रँग्लर यांचे महत्त्व आय्. सी. एस्. ची सनदी परीक्षा दिलेल्या वा सँड्हर्स्टच्या लष्करी संस्थेत शिकलेल्या अधिकाऱ्यांच्या तोडीचे असे. त्यांना लाभणारी संधी व सामाजिक प्रतिष्ठा यांची सर इतरत्रच्या शिक्षणाला नव्हती. अगदी स्वातंत्र्यलढ्याच्या संदर्भाचा विचार केला तरी काँग्रेसपासून कम्युनिस्ट पक्षापर्यंतच्या राजकीय नेतृत्वात ऑक्सफर्ड-केंब्रिज शिक्षित व्यक्तींचे प्राबल्य आढळते.

अमेरिकेला जाणे त्यावेळी साहजिकच फारसे फॅशनेबल व रूढ नव्हते. उगवता देश असला तरी अजून तो जगाच्या केंद्रस्थानी आला नव्हता. नाही म्हणायला ज्ञानकोशकार केतकर, बाबासाहेब आंबेडकर, जयप्रकाश नारायण अशा अपवादात्मक व्यक्तींनी अमेरिकेत शिक्षण घेतले. अभियांत्रिकी शिक्षणासाठी हार्वर्डशेजारच्याच एम्. आय्. टी. (मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) येथे मोजके भारतीय विद्यार्थी त्याकाळीही होते. परंतु एकंदरीत पाहता केंब्रिज (इंग्लंड) पुढे केंब्रिज (मॅसॅच्युसेट्स) चे स्टेटस् काहीच नव्हते.

मुख्य गोष्ट म्हणजे हे परदेशी शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी होत असे. शालेय शिक्षणासाठी परदेशी जाण्याचे भाग्य फक्त संस्थानिकांचे चिरंजीव वा दोराब टाटांसारखे उद्योगपतींचे चिरंजीव वा जवाहरलाल नेहरूंसारख्या अतिशय मोजक्याच व्यक्तींच्या ललाटी होते.



शालेय व त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी दामोदरांनी दहा वर्षे अमेरिकेला काढली. वैयक्तिक आयुष्यातील अतिशय संवेदनाक्षम अशा पौगंडावस्थेतील ही दहा वर्षे एका राष्ट्राच्या आयुष्यातील खळबळजनक वाढीच्या कालखंडाशी जुळली गेली होती. दामोदरांच्या जडणघडणीवर याचा फार मोठा ठसा उमटणे अपरिहार्य होते. या आपल्या भारतीय समाजात येथील इंग्रजी वळणाच्या प्रस्थापितांना ते आपलेसे वाटले नाहीत याची काही कारणे त्यांच्या अमेरिकन घडणीत सापडू शकतील.

धर्मानंदांनी सुरुवातीस दामोदरला रिंज टेक्निकल हायस्कूलात पाठवले. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर 'बौद्धिक शिक्षणाचा हिंदुस्थानला काही फायदा नाही असे दामोदरचे म्हणणे होते' परंतु मूळची नाजूक प्रकृती फ्ल्यूने अधिक खालावलेली. त्यामुळे कार्यशाळेत घण वगैरे मारण्याचे मेहनतीचे काम त्याला कठीणच होते– निदान तेव्हातरी. त्यातच थोड्या दिवसांत हायस्कूलचे प्रिन्सिपॉल मि. वूड यांना दामोदरच्या बौद्धिक क्षमतेचा अंदाज आला. तेव्हा त्यांनीच धर्मानंदांना बोलावून घेतले व समजावून सांगितले की 'ही शाळा दामोदरसारख्या हुषार मुलांसाठी नाही. येथे सुतार, लोहार वगैरे कारागीर बनतात. प्रथम त्याने हायस्कूलचे शिक्षण घ्यावे, मग टेक्नॉलॉजिकल संस्थेत जाऊन पाहिजे तर उत्तम इंजिनीयर व्हावे.' दामोदरच्या नाखुषीकडे दुर्लक्ष करून, प्रि. वुड यांचा सल्ला मानण्याचे धर्मानंदांनी ठरवले, आणि घरापासून एक-दोन फर्लांगावर असलेल्या हार्वर्ड ग्रामर स्कूलमध्ये त्यांनी मुलाला दाखल केले.

तेथील पद्धतीप्रमाणे प्राथमिक शिक्षण ग्रामर स्कूलमध्ये होऊन मग चार वर्षे हायस्कूलचे शिक्षण, व नंतर विद्यापीठात पदवीसाठी शिक्षण अशी रचना होती. प्राथमिक शिक्षणाचा सर्व खर्च म्युनिसिपालिटी करे. फी नव्हतीच, वर अभ्यासाची सर्व पुस्तके मिळत. वैद्यकीय तपासणी मोफत होती. त्यामुळे सुरुवातीस तरी धर्मानंदांना दामोदरच्या शिक्षणाचा काही खर्च येत नव्हता.

दामोदरची शारीरिक तपासणी झाल्यावर त्याच्या घशाच्या गाठी काढल्या गेल्या. त्यानंतर, त्याच्या तब्येतीच्या सर्व तक्रारी दूर झाल्या. तसेच रोज जिम्नॅशियममध्ये जाऊन व्यायाम करणेही त्याने सुरू केले. वजन वाढले, उंची वाढली, दामोदरला अमेरिकेची हवा मानवली!

वर्षभर ग्रामर स्कूलमध्ये काढून १९२० साली दामोदरने केंब्रिज हाय ॲन्ड लॅटिन स्कूलमध्ये प्रवेश केला. त्याच्या चतुरस्त्र वाढीची सुरुवात झाली.

ज्ञानलालसा व ती तृप्त करून घेण्यासाठी अतीव श्रम घेण्याची तयारी हे गुण दामोदरने वडिलांपासून वारसाहक्कानेच उचलले होते. साथीला कुशाग्र बुद्धिमत्तेची देणगीही लाभलेली. मुलाने ज्ञानसंपादनाबाबत कसलीही हयगय करता कामा नये व घेतलेल्या प्रत्येक विषयात प्रावीण्य संपादले पाहिजे असा धर्मानंदांचा आग्रह होता. तो शंभर टक्के रास्तच म्हटला पाहिजे. त्यांनी स्वतः गोव्यासारख्या मागस भागातून बाहेर पडून वणवण फिरत, हालअपेष्टा काढत सहा वर्षे केवढी तपश्चर्या केलेली! त्या कमाईच्या जोरावर एकुलत्या एक मुलाला अमेरिकेसारख्या अनेक अर्थांनी संपन्न राष्ट्रात, हार्वर्ड विद्यापीठासारख्या अग्रणी शैक्षणिक केंद्राच्या परिसरात शिकण्याची संधी

समाधान मानावे अशी दामोदरची वृत्ती नव्हती. त्यामुळे अवांतर साहित्याचे वाचन करून या भाषांवर चांगले प्रभुत्व त्याने प्राप्त केले.

(पुढे बहुभाषापटुत्वाचा उपयोग दामोदर कोसंबींना आपल्या संशोधनकार्यात मोठ्या प्रमाणावर झाला व त्याचा पाया या शालेय अभ्यासक्रमातच घातला गेला.)

केंब्रिजमधील वातावरणात विज्ञान व तंत्रज्ञानावर चांगला भर होता. वैज्ञानिक व तांत्रिक क्षेत्रातील प्रगतीमुळे अमेरिकन राष्ट्राची होणारी जडणघडण दामोदरच्या डोळ्यासमोर उलगडत होती. विज्ञानविषयक साहित्यही मुबलक उपलब्ध होते. उत्तम ग्रंथालयात उत्तमोत्तम पुस्तके हाताशी होती. वाचनाची अतिशय आवड, वाचनाचा अफाट वेग व जोडीस जवळजवळ एकपाठी म्हणावी अशी स्मरणशक्ती यांची देणगी लाभलेल्या दामोदरने चतुरस्त्र वाचन केले. सर्वसामान्य वाचकाला निरनिराळ्या विषयांची ओळख करून देणारी सोपी सुगम पुस्तके ग्रंथालयांच्या कपाटात उभी होती. विविध विज्ञानशाखांसंबंधित अद्यावत ज्ञान सोप्या स्वरूपात सांगणारे अनेक आराखडे उपलब्ध होते. त्यामुळे दामोदरांच्या शब्दात सांगायचे तर 'विज्ञानाच्या प्रत्येक शाखेबद्दल काहीतरी ज्ञान प्राप्त करून घेणे शक्य होते.' आणि दामोदरने या शक्यता प्रत्यक्षात उतरविल्या. याचा गोळाबेरीज परिणाम त्याच्यात प्रखर वैज्ञानिक भौतिकवादी दृष्टिकोन निर्माण होण्यात झाला. जगाविषयीच्या अध्यात्मिक तत्वज्ञानापेक्षा विज्ञानाचे हे निसर्गाधिष्ठित तत्वज्ञान लहान वयातच दामोदरच्या रक्तात भिनले.

जीवनाच्या इतर क्षेत्रांतही त्याने भरपूर संचार केल्याचे आढळले. बौद्धिक प्रगतीइतकीच दामोदरची शारीरिक व क्रीडाक्षेत्रातील प्रगती, या काळात खूप लक्षणीय होती. जिम्नॅशियममध्ये जाऊन वजने उचलून त्याने शरीर कमावले होतेच. शिवाय पोहणे, धावणे, लांबवर ट्रेकिंगला जाणेही चालूच होते. हिवाळ्यात बर्फावरचे स्केटिंग असे. अमेरिकन बॉय-स्काऊट्सच्या केंब्रिज शाखेचा तो सभासद होता. स्काऊटिंगच्या निरनिराळ्या कार्यक्रमात हिरीरीने भाग घेऊन येथेही त्याने प्रावीण्य संपादले होते. अनेक पदके व ईगल (गरुड) हा स्काऊटमधील वरच्या दर्जाचा किताब त्याने पटकावला होता. धाकटी बहीण, मनोरमा यांच्या आठवणीनुसार ही सर्व पदके त्याच्या स्काऊटच्या कोटावर शिवली होती, व तो जेव्हा भारतात परतला तेव्हा त्याच्या या कोटाची संपूर्ण बाही त्यांनी भरून गेलेली होती.

शाळेच्या पहिल्या चार वर्षांत दामोदर, वडील व मोठी बहीण माणिकताई यांच्यासमवेत रहात होता. त्यामुळे काही अंशी तरी कुटुंबात रहात असल्याचे सुख दामोदरला मिळाले. आठ वर्षांनी मोठ्या असलेल्या माणिकताईने आईची उणीव भरून काढली. वडिलांचे साहचर्यही तितकेच महत्त्वाचे होते. अभ्यास व संशोधनविषयक दृष्टिकोन घडविण्यात वडिलांचा प्रभाव त्याच्यावर पडला, व त्यांची या कामी खूप मदत झाली हे उघडच आहे. पण त्याचवेळी वडिलांच्या हार्वर्ड विद्यापीठातील कामामुळे तेथील अनेक प्राध्यापक विद्वानांशी परिचय होण्याचा योगही त्याला शालेय जीवनात लाभला. यापैकी एक महत्त्वाचा योग म्हणजे वीनर कुटुंबाशी प्रस्थापित झालेले जवळचे संबंध, स्लाविक भाषांचे प्राध्यापक लिओ वीनर यांच्याशी धर्मानंदांचा परिचय होऊन



त्यांच्याकडून रशियन भाषेचे धडे त्यांनी घेतले होते. लिओ वीनर यांचे चिरंजीव नोर्बर्ट वीनर यांनी एम्.आय्.टी.च्या गणित विभागात फार महत्त्वाचे संशोधन केले व सायबरनेटिक्स शास्त्राचे जनक म्हणून ते ख्यातनाम झाले. नोर्बर्ट वीनर दामोदरपेक्षा १२-१३ वर्षांनी मोठे होते. त्यांची पत्नी माणिकताईंची वर्गमैत्रीण होती. शाळकरी वयात नोर्बर्ट वीनरशी झालेला दामोदरचा परिचय पुढे दृढ मैत्रीत रूपांतरीत झाला.

या मैत्रीमागचे एक महत्त्वाचे कारण होते दोघांच्या व्यक्तिमत्त्वातील व जडणघडणीतील साम्य. नोर्बर्ट वीनर यांचे आयुष्य दामोदर कोसंबींपेक्षाही अधिक विलक्षण होते. या शतकातील प्रमुख बालप्रतिभावंतांत त्यांची गणना होते. वयाच्या तिसऱ्या वर्षी वाचू लागलेल्या नोर्बर्टची असामान्य बुद्धिमत्ता लक्षात येताच त्याच्या वडिलांनी, म्हणजे प्रा. लिओ वीनरमहाशयांनी मुलाला प्रतिभावान बनविण्याची जबाबदारी स्वतःवर घेतली. अतिशय कडक रीतीने, जवळजवळ निष्ठुरपणाने त्यांनी ती पार पाडली. गणितासकट नाना विषयांचे ज्ञान त्यांनी मुलाला पाजण्यास सुरुवात केली, व नोर्बर्टचीही प्रतिभा अशी की लष्करी शिस्तीलाही लाजवेल अशा तऱ्हेने वडिलांनी चालविलेल्या ज्ञानयज्ञातून तो तावून-सुलाखून बाहेर पडला. अवघ्या अकराव्या वर्षी त्याने कॉलेजात प्रवेश केला आणि एकोणीस वर्षे पूर्ण होण्याआधीच हार्वर्ड विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. वीनर बहुभाषाकोविद होते (हा गुण दामोदरमध्येही होताच). जन्माने ज्यू पण विचाराने नास्तिक वीनर यांचे प्रस्थापितांशी कधी पटले नाही. गरिबांबद्दल तसेच मेक्सिन, आशियाई अशा अमेरिकेतील अल्पसंख्याकांबद्दल त्यांना अपार सहानुभूती होती. तसेच पौर्वात्य संस्कृतीबद्दल त्यांना कौतुकमिश्रित आदर होता. मुख्य म्हणजे मानवतावादी भूमिकेशी त्यांनी सच्ची बांधिलकी दाखवली. दुसऱ्या महायुद्धकाळात अमेरिकेतील प्रमुख गणितज्ञांत निर्विवाद स्थान प्राप्त झाले असूनही अणुबाँबसंबंधित मॅनहॅटन प्रकल्पाशी निगडित काम करण्यास त्यांनी नकार दिला. मात्र बचावाशी निगडित असलेल्या विमानविरोधी तोफांचा मारा अधिक अचूक बनविण्याच्या प्रकल्पावर त्यांनी काम केले. आपण यापुढे कसल्याही प्रकारचे लष्करी संशोधन करण्यास हातभार लावणार नाही अशी घोषणा १९४७ मध्ये त्यांनी केली, व उर्वरित आयुष्यात गणिती संशोधनाबरोबरच भविष्यात येऊ घातलेल्या स्वयंचलितीकरणाचे महत्त्व व त्यातून निर्माण होऊ शकणारे प्रश्न यांच्यासंबंधी मानवजातीला सजग करण्याच्या प्रयत्नाला त्यांनी स्वतःला वाहून घेतले.

नोर्बर्ट वीनर व दामोदर कोसंबी या दोघांशी दोस्ती असलेल्या एका अमेरिकन मित्राने लिहून ठेवलेय की वीनरची छोटी, स्थूल मूर्ती व कोसंबींची दणकट कमावलेली शरीरयष्टी हा एक फरक सोडला तर त्या दोघांमध्ये विलक्षण साम्य होते. बुद्धिमत्ता व क्षमता, विभिन्न विषयांतील रस, नाना भाषा शिकण्याची हातोटी, तसेच युद्ध व सामाजिक अन्यायाविरुद्ध परखडपणे टीका करण्याची वृत्ती, त्याचबरोबर आपल्या गणितीक्षेत्राच्या पूर्णपणे बाहेरील वैज्ञानिक व सांस्कृतिक घडामोडींवर अधिकारवाणीने भाष्य करण्याची त्यांनी कमावलेली कुवत त्या दोघांना एक खास गटात बसविणारी होती.

वीनर व कोसंबी यांच्या वयातील अंतर १२-१३ वर्षांचे होते. त्यांची प्रथम ओळख झाली तेव्हा कोसंबी १३-१४ वर्षांचे विद्यार्थी तर वीनर केंब्रिजच्या शिक्षणक्षेत्रातील दैदिप्यमान कर्तृत्वाचे तरुण होते. या गोष्टी लक्षात घेता नोर्बर्ट वीनरच्या व्यक्तिमत्त्वाचा व कर्तृत्वाचा परिणाम प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कोसंबींच्या जडणघडणीवर झाला असणार हे स्पष्ट आहे.

माणिकताईंनी १९२२ साली रॅडक्लिफ कॉलेजातून पदवी प्राप्त केली. धर्मानंदांचे कामही तोवर संपत आले होते. त्यामुळे ते मुलीला घेऊन भारतात परतले, व उरलेले शिक्षण पूर्ण करण्यासाठी दामोदर वसतिगृहात राहू लागला. त्याला दरमहा २५ डॉलर्स (त्या काळचे ७५ रुपये) उपलब्ध होतील अशी तजवीज धर्मानंदांनी करून ठेवली होती. शालेय शिक्षणाची उरलेली दोन वर्षे दामोदरला एकट्याला काढावी लागली. मात्र या दोन वर्षांत तो आपल्या भोवतालच्या अमेरिकन समाजाशी खूप एकरूप होऊन गेला.

केंब्रिजचे निदान त्यावेळी तरी दोन भाग होते– एक 'टाऊन' म्हणून ओळखला जाई तर दुसरा 'गाऊन' म्हणून. टाऊनमध्ये म्हणजे गावात प्रामुख्याने औद्योगिक कामगार व कचेरीतील कर्मचाऱ्यांची वस्ती होती, तर गाऊन भागात हार्वर्ड विद्यापीठातील बुद्धिजीवी उच्चभ्रूंची वसाहत होती. दामोदरचे जवळचे मित्रमंडळ गावात रहाणारे होते. केंब्रिज सेंट्रल स्क्वेअरमध्ये वाय्.एम्.सी.ए.ची इमारत होती. दामोदरचा येथे खूप राबता होता. वाय्.एम्.सी.ए.ची व्यायामशाळा व कॅफेटेरिआ यांचा तो भरपूर वापर करीत असे. पुढे, हार्वर्ड विद्यापीठात शिकायला लागल्यावर दामोदर गाऊन समाजाचा भाग झाला. परंतु यावेळीही 'गावाशी' असलेले संबंध त्याने टिकवून ठेवले होते, असे बरोबरीच्या एका सहाध्यायीने लिहून ठेवले आहे. गाऊन-मधील हार्वर्ड स्क्वेअरपेक्षा गावातील केंब्रिज सेंट्रल स्क्वेअरमध्ये फिरणे त्याला अधिक पसंत होते व त्या भागातील स्वस्त हॉटेले व सिनेमागृहे यांचा भरपूर वापर तो करीत असे.

अमेरिकन आचार व जीवनपद्धतीत तो रुळला होता असेही म्हणता येईल. इतर विद्यार्थ्यांप्रमाणेच सुटीत कोणाच्या तरी गोठ्यावर किंवा फळबागेत तो कामे करी. स्वतःच्या हाताने काम करणे, स्वतंत्रपणे आपला मार्ग शोधून काढणे, सामाजिक वा अधिकारांच्या उतरंडींची फारशी पर्वा न करता परखडपणे वागणे, असे काही, भारतात दुर्मिळतेने सापडणारे, गुण त्याने तेथे आत्मसात केले.

दामोदर शालान्त परीक्षा १९२४ साली उत्तमरीत्या उत्तीर्ण झाला. हार्वर्ड विद्यापीठात शिरकाव करून घेण्यासाठी त्यावेळी प्रवेश परीक्षा द्यावी लागे. परंतु काही थोड्या, उच्च गुणवत्तेच्या विद्यार्थ्यांना प्रवेशपरीक्षेशिवाय थेट प्रवेश दिला जायचा. दामोदरला असा थेट हार्वर्ड प्रवेश प्राप्त झाला.

केंब्रिज हाय व लॅटिन स्कूलच्या वार्षिकात शेवटच्या वर्षातील मुलांबद्दल फोटोसकट थोडक्यात माहिती व दोन ओळींत विद्यार्थ्यांचे गुणदर्शन करण्याची प्रथा होती. १९२३-च्या वर्गाविषयी असलेल्या एका पानावर दामोदरचा फोटो व त्यासमोर खालील ओळी आढळतात:



Kosambi, Damodar D. "Baba"
360 Harvard Street
harvard Grammer School
New English High School, Poona, India
July 31, 1907
"The Rest To Some Faint Meaning Make Pretense,
But Baba Never Deviates To Sense."

Swimming, 1923
Track, 1923
Winner Review Literary Contest, 1923
Harvard.

ह्या छोट्याशा नोंदीवरून दामोदरच्या शालेय जीवनातील कर्तृत्वावर भरपूर प्रकाश पडतो. नावापुढे अवतरण चिन्हात विद्यार्थ्यांमधील प्रचलित त्यांचे टोपणनाव लिहिले आहे–'बाबा'. बाबा हे दामोदरचे घरगुती नाव (धर्मानंदांना घरात बापू म्हणत) पण या घरगुती, कुटुंबातील लाडक्या नावानेच दामोदर शाळेतील व गावातील मित्रमंडळीत प्रसिद्ध होता. (नंतरच्या काळातही जवळचे मोजके मित्र त्यांना बाबा म्हणूनच संबोधीत. दामोदरांचाही त्यांना तसाच आग्रह असे.)

थेट हार्वर्ड-प्रवेशाच्या उल्लेखाबरोबरच या शेवटच्या वर्षातील त्याच्या इतर कामगिरीची तोंदही महत्त्वाची आहे. पोहणे, तसेच धावणे यात त्याने नंबर काढला आहेच. शिवाय निबंधस्पर्धेतही बक्षिस पटकावले आहे. आणि त्याचा स्वभाव दर्शविणाऱ्या दोन ओळी तर फारच मार्मिक आहेत. 'बाकीचे थोडासा अस्पष्ट अर्थ समजून घेण्यातसुद्धा धन्यता मानतात. पण बाबा मात्र कधीही सुस्पष्टपणाकडे ढळत नाही–' आणि हे वाक्य दामोदरच्या पुढील आयुष्यातील कार्याबद्दलही बऱ्याच अंशी चपखलपणे लागू पडणारे आहे. येथील व्यंगोक्ती लक्षात घेतल्यास प्रस्थापित, समाजमान्य मार्गाने न जाता खोडकरपणाने व हूडपणाने वागण्याची वृत्ती दामोदरने शाळेतच दाखविली असावी. पुढेही सकारण-अकारण धक्कातंत्र वापरण्याची सवय त्यांनी कायम ठेवलेली दिसते.

हार्वर्ड विद्यापीठातील प्रवेशाबरोबरच एक शिष्यवृत्तीही दामोदरने पटकावली होती. यावेळेपर्यंत त्याने अनेक विषयांत रस घेऊन त्यांत प्रावीण्य संपादले होते. परंतु त्यातल्या त्यात गणिताबद्दल विशेष गोडी त्याच्या मनात निर्माण झाली होती. नुसती गोडी नव्हे तर एक खास ओढही. नंतर त्यांनीच स्वतःबद्दल लिहिताना एके ठिकाणी म्हटले आहे की 'मी गणित विषय निवडला कारण त्याची जादू टाळणे मला शक्य झाले नाही.' साहजिकच, अमेरिकेत वयाच्या अकराव्या वर्षी पाऊल ठेवताना तांत्रिक शिक्षण घेण्याची त्याने प्रकट केलेली इच्छा आतापर्यंत विरून गेली होती. त्यामुळे

केंब्रिजमध्येच एम्.आय्.टी. सारखी उत्कृष्ट तांत्रिक शिक्षणसंस्था असूनही दामोदरने तेथे प्रवेश घेण्याचा प्रश्नच उरला नव्हता. त्याऐवजी हार्वर्डसारख्या उत्कृष्ट व त्याकाळीही युरोपीय विद्यापीठांच्या खांद्याला खांदा लावून उभ्या असलेल्या विद्यापीठात उच्च शिक्षण सुरू करण्याची संधी त्याने कमावली.

दुर्दैवाने या संधीचा पूर्ण फायदा उठविण्याचा योग दामोदर कोसंबींच्या नशिबी नव्हता.

१९२४ साली शालांत परीक्षा उत्तीर्ण होताना दामोदरचे सतरावे वर्ष चालू होते. अकरा वर्षाच्या बालवयात वडिलांनी त्याला पुण्याहून उचलून केंब्रिजला आणलेले. त्याकाळच्या पुण्यातील घरगुती व छोटेखानी संरक्षित वतावरणातून अमेरिकेतील अपरिचित सांस्कृतिक, व सामाजिक दृष्ट्या पूर्णपणे भिन्न अशा वातावरणांत प्रवेश करणे तसे धक्कादायकच असणार. त्यातून तो समाजही जोमाने वाढणारा व अतिस्पर्धात्मक. अंगणातल्या हौदात डुंबण्याची सवय असलेल्या मुलाला एकदम उचलून समुद्रात पोहायला उतरवावे अशी काहीशी ही घटना. पहिली चार वर्षे दामोदरला वडील व मोठ्या बहिणीची साथ व आधार होता, तसेच उत्तम बुद्धिमत्तेचा लाभ झालेला असल्याने या नवीन अपरिचित वातावरणाशी जुळवून घेऊन आपली चमक दाखविणेही त्याला शक्य झाले. केवळ बौद्धिक नव्हे तर शारीरिक पातळीवरही त्याने उत्कृष्ट कामगिरी केल्याचे दिसते. दामोदरच्या जीवनात अमेरिकेत, भावनिक व मानसिक पातळीवर कोठेतरी पोकळी राहिली असणे वा असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असणे साहजिकच दिसते. विशेषतः आईपासून दूर रहावे लागणे दामोदरच्या बालमनास त्रासदायक वाटले असणार. भारतीय कुटुंबात मुलाचे सर्वसाधारणपणे जादा लाड होणे अजूनही आढळते. दामोदर तीन मुलींमधील एकुलता एक, हुशार लेक. त्यातच पहिल्या मुलीच्या जन्मानंतर घर सोडून गेलेला पती तब्बल सात वर्षांनी परतल्यावर झालेला हा मुलगा. अशा परिस्थितीत आईने दामोदरवर जीव ओवाळून टाकून प्रेम करणे नैसर्गिक होते. ('आईने त्याला फार लाडावले होते' असे दामोदरच्या धाकट्या बहिणीनेच सांगून ठेवले आहे.) आणि आई व मुलामधील हे खास आत्मियतेचे बंध लहान वयातच तुटले होते. मनातील हे ताणतणाव शालेय शिक्षण संपल्यावर एकदम उफाळून आले असावेत. कारण यावेळी घरच्या आठवणीने दामोदर फार अस्वस्थ झाला. घरी परतण्याच्या अनावर ओढीमुळे त्याचे लक्ष अभ्यासावर लागणे कठीण होई अशी धर्मानंदांची धारणा झाली व त्यांनी त्याला भारतात परत बोलावले.

हार्वर्ड विद्यापीठातील शिक्षणच काही काळ लांबणीवर टाकून दामोदर भारतात परतला.

दामोदर १९२४ च्या उत्तरार्धात भारतात परतला तेव्हा धर्मानंदजी साबरमती आश्रमाजवळच्या गुजरात विद्यापीठाच्या पुरातत्त्व मंदिरात काम करीत होते; तर माणिकताई इंदुरात अहिल्याश्रमामध्ये सुपरिटेंण्डेण्ट होत्या. आई बाळाबाई व धाकट्या



दोन बहिणी माणिकताईंबरोबर इंदूरलाच रहात होत्या. दामोदरने अहमदाबाद, इंदूर येथे काळ व्यतीत केला. गुजरात विद्यापीठात, तसेच गांधीजींच्या निकटवर्ती वर्तुळात धर्मानंदांना आदराचे स्थान होते, त्यामुळे येथील मुक्कामात अनेक मान्यवरांना जवळून बघण्याचेच नव्हे तर त्यांच्याशी परिचय करून घेण्याचे भाग्य दामोदरला लाभले. गुजरात विद्यापीठाचे तेव्हाचे प्राचार्य आचार्य कृपलानी, पुरातत्त्व मंदिराचे आचार्य मुनी जिनविजयजी हे त्यातील दोघे. खुद्द गांधीजींचे जवळून दर्शनही याच काळात दामोदरला झाले असण्याची शक्यता आहे. कारण यानंतरच्या काळात गांधीजींमुळे ते फार प्रभावित झालेले होते असे त्यांच्या काही निकटवर्तीयांनी नमूद केले आहे. पुढे प्रौढावस्थेतही गांधीजींबद्दलचा त्यांचा आदर टिकून राहिला, व काही काळ ते कटाक्षाने खादी वापरत असत. याचे कारण या तरुण वयातील भेटीत असू शकेल ! दामोदरची नंतरची वैचारिक वाढ लक्षात घेता गांधीवादाबद्दल त्यांना फार प्रेम असण्याचे कारण दिसत नाही. मुनी जिनविजयजी हे जैनधर्माचे मोठे पंडित व ते धर्मानंदांचे खास दोस्त होते. उच्चपदस्थांशी असलेल्या आपल्या परिचयाचा फारसा उपयोग दामोदरने कधी करून घेतला नाही, परंतु जिनविजयजीमुनींशी झालेला हा परिचय मात्र पुढील आयुष्यात त्यांच्या कामी आला. जिनविजयजींचा पाठिंबा व प्रोत्साहन यांमुळे वीसएक वर्षांनी दामोदरांची काही संस्कृत पुस्तकं प्रसिद्ध झाली.

या भारतभेटीतील इंदूर येथील एक आठवण प्रा. रा. भि. जोशी यांनी विस्तृतपणे लिहून ठेवली आहे. दामोदरचे त्यावेळचे व्यक्तिमत्त्व नजरेसमोर येण्यासाठी जोशींचे शब्द उद्धृत करणे योग्य ठरेल:

"इंदूरच्या होळकर कॉलेजातील विद्यार्थ्यांची एक सहल आयोजिलेली होती. पाताळपाण्याला डॉ. सुखटणकरांच्या बंगल्यात रात्र काढून दिवसभर पाताळपाणी, ब्रह्मकुंड, मेंदीकुंड वगैरे धबधबे पहात डोंगर चढउतार करण्याचा कार्यक्रम होता. सहलीचे पुढारी इंदूरच्या स्काऊट चळवळीचे प्रमुख विष्णुपंत बारपुते हे होते. या सहलीत दामोदर धर्मानंद म्हणजे बाबा कोसंबी सामील झाला होता.

बाबा सहलीत येण्याचे आम्हा सर्वांना फार कौतुक वाटत होते. अमेरिकेत शिकत असलेला, एका जगविख्यात महाराष्ट्रीय विद्वानाचा मुलगा बोलतो कसा, वागतो कसा याचे कुतूहल होते. प्रथम लांबून लांबूनच पहात होतो. आमच्यात केवढी तफावत होती ! आम्हाला सराईतपणे इंग्रजी बोलताही येत नसे. त्याचे बहुतेक बोलणे इंग्रजीत व तेही अमेरिकन इंग्रजीत ! थोडेबहुत मराठी बोलत होता. तेही कानांना कृत्रिम वाटे. सोळा-सतराचे वय. त्यामानाने अंगकाठी भरदार व दणकट. उघड्या कॉलरीच्या खाकी शर्टमधून खांद्याचे स्नायू भरीव व पिरॅमिडच्या बाजूसारखे उतरते दिसत होते. हाफशर्टच्या बाह्यांबाहेरचे कोपरांपासून खालचे हात कोरल्यासारखे रेखीव होते. खाकी शर्ट, खाकी निकर्स, पाठीवर हॅवरसॅक व हातात मजबूत काठी, अशा थाटातील त्याची मूर्ती इकडून तिकडे जाताना पहात रहावेसे वाटेच; पण त्याचे बोलणे इतके सहज व मोकळे होते की लवकरच मिसळून तो आमच्यापैकी झाला. त्याचे इंग्रजी कळू लागले. पुस्तकी व बोली इंग्रजीतील फरक जाणवला. त्याने टॉफी आणल्या होत्या व त्या

इतरांना देत होता. मध्येच 'Hi, you have one too many!' म्हणून एकाकडली टॉफी काढून दुसऱ्याला द्यायचा. हा वाक्प्रचार मी तेव्हा प्रथम ऐकला व अजून लक्षात आहे. मध्येच तो बारपुत्यांचीही पोरकट थट्टा करी.

मेंदीकुंडात स्नान करताना त्याने कपडे काढले तेव्हा ग्रीक पुतळ्यासारखे प्रमाणबद्ध शरीर पाहून आम्ही थक्कच झालो. मग तो व्यायामाबद्दल बोलू लागला. डंबेल्स, चेस्ट एक्स्पँडर वगैरे साधने न वापरता खांद्यांना, पाठीच्या स्नायूंना आकार देण्यासाठी कोणते व्यायाम करावे ते त्याने सांगितले. "बर्नार मॅकफॅडनचे आपल्याकडे फार कौतुक आहे, तसं तिकडे अमेरिकेत मुळीच नाही" असे तो म्हणाला.

जोराने वाहणारा प्रवाह ओलांडताना, तसेच डोंगर चढत-उतरताना डगमगणाऱ्यांना हात द्यायला बाबा पुढे असायचा. बाबा शिष्ट नव्हता."

यावेळी नातेवाईकांना भेटण्यासाठी दामोदरने गोव्यालाही भेट दिली. मामा, चुलत भावंडे, तसेच धर्मानंदांचे स्नेहीसोबती, असा बराच गोतावळा गोव्यात होता. या गोवाभेटीतील त्यांच्या भ्रमंतीबद्दल त्यांच्या नंतरच्या परिचितांनी काही आठवणी नमूद करून ठेवल्या आहेत. त्या दामोदरांच्या तोंडूनच त्यांना ऐकण्यास मिळाल्या असाव्यात. गोव्यातील तेव्हाच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यात त्याने बराच वेळ कारणी लावला. गोव्यातील खनिजसंपत्ती, तसेच जलसंपत्तीविषयी त्याने बरीच माहिती गोळा केली होती. तसेच या अमाप निसर्गसंपत्तीचा योग्य वापर होत नसल्याने त्यासंबंधी काय उपाय योजता येतील याचीही बरीच चौकशी त्याने केल्याचे दिसते. जंगलातून भटकण्याचा आपला, पुढे आयुष्यभर जोपासलेला छंदही त्यांनी येथे भागवून घेतला. बौद्धधर्मज्ञानाचा प्रसार करण्यास वाहून घेतलेल्या व गांधीजींच्या अहिंसक चळवळीशी पूर्ण एकरूप झालेल्या धर्मानंदांच्या चिरंजिवांना शिकारीचीही आवड होती. गोव्यातील या मुक्कामात बंदूक घेऊन सह्याद्रीच्या जंगलात त्याने शिकारीसाठी भ्रमंती केल्याचे त्यांच्या मेव्हण्यांनी नमूद करून ठेवले आहे.

दामोदरची शिकारीची हौस नंतर काही वर्षे तरी टिकून होती हे नंतरच्या काळातील त्यांच्याविषयीच्या काही आठवणीवरून दिसते. परंतु त्यांच्या शिकारकौशल्याबद्दल व कर्तृत्वाबद्दल अधिक माहिती उपलब्ध नाही. मात्र या संबंधित एक आख्यायिका आहे. बंदूक हाती आल्यावर केवळ शिकार करण्यावर समाधान न मानता बंदुकीच्या गोळीचा मार्ग प्रत्यक्षात कसा जातो, यावर, म्हणजे problem of ballisticsवर त्यांनी स्वतःच अभ्यास केला. प्राथमिक पातळीवर पहाता बंदुकीच्या गोळीचा मार्ग पॅराबोलाचा असतो हे शाळकरी मुलांना ठाऊक असतेच. परंतु प्रत्यक्षात हवेचे घर्षण, वाऱ्याची दिशा, गोळीचा आकार, वगैरे वास्तवातील लहानमोठे, बदलते घटक विचारात घेऊन हा प्रश्न सोडवायचे म्हटले तर तो बराच किचकट बनतो. दामोदरांनी वास्तवपातळीवर हा प्रश्न सोडविण्यात एकट्यानेच बरीच प्रगती साधली, व त्याचवेळी प्रत्यक्ष फैरी झाडून आपली समीकरणे कितपत बरोबर आहेत हे पडताळण्याचेही प्रयोग केले असे म्हणतात. पुढे महाविद्यालयाच्या प्रथम वर्षात हाच प्रश्न सोप्या पातळीवर प्रयोगशाळेतील शिक्षकाने समजावून सांगण्यास सुरूवात केली तेव्हा 'काय फालतू गोष्टी सांगण्यात वेळ वाया



दवडताहेत' अशा अर्थाचे उद्‌गार काढून, खांदे उडवत दामोदरने वर्गत्याग केला, असा या आख्यायिकेचा शेवट आहे. दामोदरांनी नक्की कशाप्रकारे हा प्रश्न हाताळला होता हे कळणे शक्य नसले तरी त्यांचा यातून आढळून येणारा एक गुण स्पष्ट होतो— एखाद्या विषयाची मूलतत्त्वे समजून घेतल्यावर प्रत्यक्ष वास्तवातील प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचा वापर करू पाहण्याची वृत्ती. त्यांच्या पुढील आयुष्यात या स्वतंत्र वृत्तीचा वारंवार प्रत्यय येतो. पुस्तकी ज्ञान व व्यावहारिक प्रश्न यांच्यात फारकत ठेवण्याची सर्वसाधारण भारतीय विद्यार्थ्यांची (बहुदा मेकॉलेच्या शिक्षणपद्धतीमुळे) निर्माण झालेली वृत्ती पाहता अमेरिकेतील शिक्षणसंस्कारामुळे लहान वयातच दामोदरने हा गुण उचलला!

भारतातील ही भ्रमंती चालू असताना दामोदरच्या पुढील शिक्षणाचा प्रश्न मात्र तसाच लोंबकळत होता. एखाद्या भारतीय विद्यापीठात म्हणजे संलग्न महाविद्यालयात प्रवेश मिळविण्याचे थोडेफार प्रयत्न त्याने केले असावे. दामोदरने अमेरिकेत दिलेल्या शालान्त परीक्षेला भारतीय विद्यापीठात त्यावेळी मान्यता नव्हती, त्यामुळे त्याला कॉलेजात सहजासहजी प्रवेश मिळणे शक्य झाले नाही; धर्मानंद स्वतः भारतीय शिक्षणक्षेत्रात वावरलेले, परंतु तरीही त्यांनी मुलाच्या कॉलेजप्रवेशासाठी खास धडपड केली नाही, असे त्यांचे चरित्रकार ज. स. सुखठणकर यांनी लिहिलेले आहे. कदाचित हार्वर्डला शिकण्याची संधी हातात असताना भारतातील एखाद्या महाविद्यालयात चाकोरीबद्ध, कमी प्रतीचे शिक्षण घेण्यात फारसा राम नाही असेही पिता, पुत्र, वा दोघांनाही वाटले असणे शक्य आहे. त्यामुळेही धर्मानंदांनी दामोदरच्या शिक्षणाची येथेच व्यवस्था लावण्याच्या दृष्टीने फार प्रयत्न केले नसावेत.

परिणामी, १९२५ साल दामोदरने भारतात नुसतेच काढले. यावर्षी धर्मानंदांचे तिसऱ्यांदा हार्वर्डला जाण्याचे घाटत होतेच: अखेरीस गुजरात विद्यापीठ सोडून त्यांनी १९२६ च्या जानेवारीत अमेरिकेस प्रयाण केले. दामोदरही वडिलांबरोबर हार्वर्डला परतला.

घरच्या ओढीने अस्वस्थ झालेले त्याचे मन आई व बहिणीबरोबर कुटुंबात राहून मिळालेल्या मानसिक व भावनिक विश्रांतीनंतर निश्चितच स्थिरावले व पुन्हा हार्वर्डला पदार्पण केल्यावर त्याने नव्या जोमाने व पूर्वीच्याच उमेदीने शिक्षणाला सुरुवात केली.

आणखी एका दृष्टीनेही ही वर्षभराची मधली सुटी सत्कारणी लागली. दामोदरची भारतातील मुळे स्थिरावण्यासाठीही सुटीचा उपयोग झाला. भारतातील परिस्थितीची, येथील प्रश्नांची प्रत्यक्ष ओळख त्यांना या काळात झाली. अमेरिकेतील अनुभवांबरोबर येथील अनुभवांची तुलना करण्याची संधीही मिळाली. अकराव्या वर्षी बालवयात अमेरिकेत गेलेल्या दामोदरला, तेथे उच्च शिक्षण सुरू करण्यापूर्वी मायदेशाशी पुन्हा धागेदोरे जुळवून घेणे गरजेचे होते, व ती गोष्ट या काळात घडून आली.

प्रत्यक्षात मात्र हे वर्ष दामोदरला फार महागात पडले. चार वर्षांनंतर दामोदरला पदवी प्राप्त केली तेव्हा जागतिक मंदीची नुकतीच सुरुवात झाली होती, व त्या कठीण परिस्थितीत पुढील संशोधन अशक्य झाल्याने डॉक्टरेटची पदवी न घेताच त्यांना भारतात परतावे लागले. एक वर्ष आधी ते पदवीपरीक्षा पास होते तर कदाचित पीएच्. डी.

मिळवूनच ते भारतात परतते, आणि मग कदाचित त्यांचे पुढील संशोधनआयुष्य वेगळ्या वाटेने जाते! परंतु नियतीच्या मनात वेगळीच योजना असावी.

जानेवारी १९२६ मध्ये दामोदरांनी हार्वर्ड विद्यापीठात प्रवेश केला- पदवी शिक्षणासाठी. याखेपेस पिताजी धर्मानंद तेथे दीड वर्ष राहिले. याकाळात १० ट्राऊब्रिज स्टीट ह्या केंब्रिजमधील एका रुमिंग हाऊसमध्ये पहिल्या मजल्यावरील हवेशीर जागी बापलेक रहात होते. मोठ्या झालेल्या दामोदरांनी आपला अभ्यास सांभाळून वडिलांना त्यांच्या संशोधनकार्यातही मदत केली; दुसऱ्या बाजूला पाली भाषेचे, तसेच पुरातन ग्रंथांच्या संस्करण-संशोधन प्रक्रियेचे प्राथमिक धडेही वडिलांच्या पायाशी बसून गिरवले.

धर्मानंद मायदेशी परतल्यावर दामोदर त्याच घराच्या सर्वात वरच्या मजल्यावरील एका खोलीत रहावयास गेले. आठवड्याला चार डॉलर्स भाडे असलेली ही जागा केंब्रिजमधील स्वस्त दराच्या खोल्यांपैकी होती. वरच्या मजल्यावरील या खोल्या उबदार राखण्याची सोय नव्हती. दामोदरांची खोली तर जिन्याच्या टोकाला होती. उतरते छप्पर व एकच खिडकी, तीही आरामपूर्ण नसली तरी दामोदरांच्या लेखी ते महत्त्वाचे नव्हतेच. चैनीत राहणे, विश्रांती घेणे त्यांच्या स्वभावात नसावे. शिवाय यासाठी त्यांना वेळही नव्हता. त्यांचे सर्व ध्यान होते ज्ञानाच्या कमाईकडे व ते ज्ञानही एखाद्याच मर्यादित क्षेत्रातील, नव्हे तर निरनिराळ्या-विभिन्न क्षेत्रांतील.

त्यांच्या बाजूच्या इतर तीन खोल्यांत अमेरिकन विद्यार्थी रहात होते. त्यांपैकी एकाने दामोदरांच्या खोलीच्या 'सजावटी'चे वर्णन लिहून ठेवले आहे. त्याच्या आठवणीनुसार त्या खोलीला शोभा आणील असे एकच चित्र टांगलेले होते. ते म्हणजे गांधीजींचे छायाचित्र. खोलीच्या बाकी सर्व भिंती पुस्तकांच्या फळ्यांनी व्यापलेल्या होत्या व त्यावरील पुस्तकांच्या विषयांचे वैविध्य कोणालाही थक्क करणारे होते. विज्ञानातील विविध विषयांवरची पुस्तके होतीच, पण त्यातील बहुतांशी जर्मन भाषेतील होती. (दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या त्या काळात जर्मनी हे विज्ञानाचे सर्वांत महत्त्वाचे केंद्र होते.) याशिवाय भाषाशास्त्रावरचे मोठमोठे ग्रंथ होते. लॅटिन, ग्रीक, जर्मन, फ्रेंच व इतर भाषांतील बायबलच्या आवृत्त्या होत्या (निरनिराळ्या भाषांचा अभ्यास करताना तुलना करण्यासाठी ते बायबलचा वापर करीत). शिवाय फ्रेंच, इटालियन, जर्मन भाषांतील साहित्याच्या पेपरबॅक्सची तेथे रेलचेल होतीच. दामोदरांचे वाचन फार दांडगे व प्रचंड आवाका असलेले- वाचनाचा वेग फार झपाट्याचा व स्मरणशक्ती फार दांडगी. आयुष्यभर त्यांचा हा गुण त्यांच्या सहवासात आलेल्यांना प्रकर्षाने जाणवला, ऐन विशीच्या उमेदीत त्यांनी हा गुण कमावल्याचे दिसते.

गंभीर वाचनाचा ताण हलका करण्याचा सोपा उतारा होता, हलकेफुलके वाचन. रहस्यकथांचा फडशा ते फार झपाट्याने पाडत. त्यांचे रहस्यकथांचे वेड शेवटपर्यंत राहिले. पुणे-मुंबई डेक्कन क्वीनच्या एका फेरीत रहस्यकथांची तीन-तीन पुस्तके ते



वाचून संपवीत अशी 'आख्यायिका' सांगणाऱ्या एक-दोन व्यक्ती लेखकाला भेटल्या आहेत. दुसरा उतारा होता सिनेमा बघणे. करमणुकीच्या या नवीन माध्यमाचा दामोदरांनी चांगलाच वापर केला. आठवड्याला दोन-तीन सिनेमा ते नियमितपणे पहात असत. याशिवाय अभिजात पाश्चात्य संगीताचे, सिंफनीचे कार्यक्रम असले की दामोदर त्यांना कटाक्षाने हजर असत- मात्र हे संगीत ते ऐकत सर्वात स्वस्त अशा पंचवीस सेंटच्या तिकिटावर, उंचावरल्या बाल्कनीत बसून. रूमिंगहाऊसमधल्या वरच्या मजल्यावर पत्त्यांचे डावही रंगत, व त्यात खेळापेक्षा आरडाओरडाच अधिक असे, व ही धमाल करण्यात दामोदर अग्रेसर असत. नंतरच्या काळातही पुणे-मुंबई डेक्कन क्वीनच्या प्रवासात मोठमोठ्या आवाजात सहप्रवाशांची थट्टामस्करी ते करत असत.

त्यांचा आणखी एक विरंगुळा म्हणजे आजुबाजूच्या प्रदेशात भटकणे. केंब्रिजमधून वाहणाऱ्या चार्ल्स नदीच्या काठचा बराच भाग त्या काळात जंगली झाडाझुडपांनी व्यापलेला होता. सुटीच्या दिवशी मित्रांबरोबर तेथे लांबवर फिरायला जाण्याची त्यांना मोठी हौस होती. भटकण्याची, हायकिंगची ही हौसही त्यांनी आयुष्यभर जोपासली. पुण्याला मुक्काम केल्यावर रोजच्या हनुमान टेकडीवरील फिरण्याबरोबरच सुटीच्या दिवसांत आजुबाजूच्या प्रदेशात लांबवर मोहिमा काढून त्यांनी क्षेत्रीय निरीक्षण केले व प्रागैतिहासिक काळासंबंधी महत्त्वपूर्ण संशोधन केले. या मोहिमांत सामील झालेल्या सहकाऱ्यांनीही कोसंबींबरोबर भटकण्यातील मजा वर्णिली आहे.

गावातील स्वस्त हॉटेलांत जाऊन तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ चवीने खाण्याचीही त्यांना गोडी होती. हार्वर्डमधील चिनी विद्यार्थ्यांबरोबर दोस्ती झाल्याने चायनीज खाण्याची आवड त्यांनी उचलली होती. खाण्याच्या बाबतीत फारसा विधिनिषेध ते बाळगत नव्हते. वडील धर्मानंदजी मात्र पक्के शाकाहारी होते. खाण्यासंबंधीच्या सवयीही दामोदरांच्यात टिकून राहिल्या. नंतर काही काळ अलीगढला असताना, तेथील बाजारपेठेतील मुसलमान हॉटेले धुंडाळून त्यापैकी, उत्तम बिर्याणी देणारे हॉटेल त्यांनी आपलेसे केले होते व मित्रमंडळींना त्याची खास शिफारस ते करीत. मुंबईत टाटा मुलभूत संशोधन संस्थेत असतानाही गेटवेजवळील नानकिंग व त्या समोरीलच एका छोट्या चायनीज रेस्तोरांमध्ये ते बरेच वेळा जेवण्यास जात. काही निवडक मित्र व विद्यार्थ्यांना तेथे त्यांच्यासमवेत जेवण्याचे भाग्य लाभे. सध्याच्या जमान्यात हे विशेष नसले तरी १९३०-३५ च्या काळात एका ब्राह्मण जातीतल्या व्यक्तीने मुसलमान हॉटेलात मांसभक्षण करणे वा १९५० च्या दरम्यान एका मराठी माणसाने चायनीज जेवण चवीने खाणे नक्कीच अप्रूप होते. परंतु हॉर्वर्ड मधील मुक्कामात अंगवळणी पडलेल्या या गोष्टी दामोदरांनी भीडभाड न बाळगता येथेही चालवल्या.

अमेरिकेत जडलेली त्यांची आणखी एक सवय म्हणजे चॉकलेट्स खाणे. त्यांच्या टॉफी खाण्याचे वर्णन प्रा. रा. भि. जोशी यांनी केलेले आहेच. पुढेही कॅडबरी व इतर निरनिराळी आयात चॉकलेटे (महागडी असूनही, खाण्याची त्यांची सवय त्यांच्या सहवासात आलेल्यांना ठळकपणे जाणवत असे. 'मी केलेल्या कामावर प्रा. कोसंबी एकदम खुश झाले व त्यांनी मला कॅडबरीचा मोठा बार (वा चॉकलेटस्‌चा डबाच)

घेऊन दिला' अशा आठवणी सांगणारे बरेच जण आहेत.

सर्वसाधारण अमेरिकन विद्यार्थ्यांप्रमाणेच सुटीच्या काळात कोणाच्या तरी फळबागेत वा एखाद्या डेअरीत काम करून चार पैसे मिळवण्याचे उद्योग ते करीत. नंतरच्या काळात, आपण विद्यार्थीदशेत दुधाचे भरलेले मोठेमोठे कॅन्स वाहण्याचे, अंगमेहनतीचे काम केल्याने आपल्याला सांधेदुखीचा त्रास उद्भवला आहे असे काहीसे तक्रारीच्या सुरात तर काहीसे अभिमानाने ते परिचितांना सांगत असत.

अर्थात या सगळ्या दुय्यम गोष्टी झाल्या. दामोदर कोसंबींच्या व्यक्तिमत्त्वाला अमेरिकेतील एका दशकाच्या वास्तव्यामुळे प्राप्त झालेले विशिष्ट रंगरूप त्यातून दिसून येते. परंतु कोसंबींचे मुख्य कार्य होते हार्वर्डमध्ये शिक्षण प्राप्त करणे व ते त्यांनी अतिशय उत्तमपणे पार पाडले.

कोसंबींचे हार्वर्डमधील पदवीशिक्षण वैशिष्ट्यपूर्ण झाले. त्यानंतर अधिक शिक्षण त्यांनी घेतले नाही; ते सरळ गणित शिकविण्याच्या व आपल्या स्वतंत्र वैयक्तिक संशोधनाच्या मागे लागले. पदवीपरीक्षेचा अभ्यास करताना कोसंबींनी काही थोड्या, मोजक्या विषयांमध्ये स्वतःला बांधून घेतले नाही, तर विविध विषयांचा अभ्यास करण्यावर त्यांनी भर दिला. अमेरिकेतील शिक्षणपद्धतीमध्ये आपल्याकडील पद्धतीप्रमाणे अभेद्य कप्पे नसल्याने पदवीसाठी विज्ञानापासून ते समाजशास्त्र, इतिहास, भाषा अशा नाना प्रकारचे कोर्सेस (अभ्यासक्रम) घेणे शक्य होते. वर्षात त्यांनी अठरा कोर्सेस घेऊन त्यात चांगलीच सफलता प्राप्त करून दाखविली.

अर्थात् गणित हा त्यांचा सर्वात आवडता व मुख्य विषय होता. हार्वर्डला त्यांना गणिताचे गुरूही फार उत्तम लाभले. प्रा. जॉर्ज डेव्हिड बिरकॉफ यांच्याकडे गणित शिकण्याची संधी त्यांना मिळाली. प्रा. बिरकॉफ यांचे चिरंजीव गॅरट बिरकॉफ हेही पुढे मोठे गणिती होऊन अधिक प्रसिद्ध झाले. परंतु अमेरिकन गणितक्षेत्रात जॉर्ज डेव्हीड बिरकॉफ यांचे स्थान अद्वितीय आहे. आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त करणारे ते पहिले 'स्वदेशी' अमेरिकन गणितज्ञ, तोपर्यंत गणितात उत्तम कामगिरी करणारे अमेरिकन गणिती युरोपात उच्च शिक्षण घेऊन आलेले होते. युरोपात उमेदवारी करून न आलेली व्यक्ती फार काही करू शकेल असे खुद्द अमेरिकनांनाही वाटत नसे, असा तो काळ होता. आपल्याकडे भौतिकीत ज्याप्रमाणे रामन यांनी परदेशी न जाता येथेच नोबेल पारितोषिक पटकावणारे संशोधन केले, तसाच पराक्रम बिरकॉफ यांनी अमेरिकन गणितक्षेत्रात गाजवलेला होता. याशिवाय बिरकॉफ यांनी स्वतःचे असे गणिती पीठही तयार केले, उत्तम दर्जाचे गणिती त्यांनी अमेरिकन भूमीवरच तयार केले, व अमेरिकेला जगाच्या गणिताच्या नकाशावर स्थान प्राप्त करून दिले. अशा या स्वयंभू मान्यवर गुरूकडे गणित शिकण्याची संधी कोसंबींना लाभली. त्यांनीही बिरकॉफ यांचे कौतुक व त्यांच्या खास विद्यार्थीवर्तुळात प्रवेश संपादन केला. निवडक विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक मार्गदर्शन करणारा खास कोर्स बिरकॉफ देत असत. मेनी-बॉडी प्रश्नावर त्यांनी दिलेल्या



अशा खास कोर्समध्ये कोसंबींना प्रवेश मिळाला होता.

कोसंबींकडून पुढील संशोधनाबद्दल ते अपेक्षा बाळगून होते. त्यामुळेच कोसंबींनी निवडलेल्या विविध कोर्सेसचा विचार करून त्यांनी सल्ला दिला की कोसंबींनी गणितावर अधिक लक्ष केंद्रित करावे. परंतु येथे कोसंबी द्विधा मनस्थितीत सापडले. गणिताची ओढ त्यांना होतीच, व त्यात अधिक खोलवर संशोधन करण्याची तीव्र इच्छाही. परंतु त्याचवेळी नानाविध ज्ञानक्षेत्रांचा ओढाही जबरदस्त होता. गणितावर लक्ष केंद्रित करायचे म्हणजे इतर विषयांचे कोर्सेस बंद नाही, तरी निदान कमी तरी करावे लागले असते. कोसंबींची स्वतःची इच्छा असे करण्याची नव्हती. परंतु प्रा. बिरकॉफ यांचा सल्ला धुडकावणेही सोपे नव्हते. अखेर दामोदरांनी वडिलांचा कौल घेण्याचे ठरवले व पत्र लिहून त्यांचा सल्ला मागितला. धर्मानंदांनी येथे मुलाला पूर्ण पाठिंबा दिला. या टप्प्यावर जास्तीत जास्त विषयांत ज्ञानप्राप्ती करून घेण्याची तुझी इच्छा पाहून मला आनंद होतो आहे, अशा प्रकारचे उत्तर वडिलांकडून मिळाल्यावर दामोदरांच्या मनाला शांती लाभली, व प्रा. बिरकॉफ यांचा सल्ला न मानण्याचे धार्ष्ट्य ते दाखवू शकले. धर्मानंदांच्या आपल्या मुलाकडून अपेक्षाही मोठ्या होत्या. त्याने नुसतेच भाराभर विषय निवडू नयेत, तर निवडलेल्या प्रत्येक विषयात वरच्या दर्जाचे प्रावीण्य संपादन करावे अशी ठाम इच्छा ते बाळगून होते, व तसे त्यांनी दामोदरांना स्पष्टपणे सुनावलेही होते. यासंबंधीचा एक किस्सा खास नमूद करण्याजोगा आहे.

एका वर्षी दामोदरचा सत्रपरीक्षेतील निकाल कळल्यावर धर्मानंदांनी मुलाला पत्र लिहिले. त्या निकालानुसार दामोदरांना तीन विषयांत 'अ' तर एकात 'ब' श्रेणी प्राप्त झाली होती. हार्वर्ड विद्यापीठात तीन 'अ' व एक 'ब' श्रेणी मिळवणे म्हणजे उत्तम कामगिरीचे मानले जाई. परंतु धर्मानंदांना तसे वाटत नसल्याने एका 'ब' वर लक्ष ठेवून त्यांनी कडक पत्र लिहून मुलाची निर्भर्त्सना केली. सर्व विषयांत 'अ' श्रेणी मिळवता येत नसेल तर तू तुझा वेळ फुकट घालवतो आहेस असेच म्हणावे लागेल व या परिस्थितीत तू भारतात परतणेच अधिक योग्य ठरेल, अशा शब्दात त्यांनी मुलाची कानउघाडणी केली. यामुळे दामोदर अतिशय अस्वस्थ झाले व काहीतरी करून वडिलांकडून कौतुकाचे बोल मिळवावे असा त्यांनी निश्चय केला. तोपर्यंत दुसरे सत्र चालू झाले होते. तेव्हा उन्हाळ्याच्या सुटीत एक जादा कोर्स घेऊन वडिलांना कृतीने उत्तर द्यायचे त्यांनी ठरवले.

निरनिराळ्या भाषांमध्ये दामोदरांना रस व गती होती. वडीलही पालीभाषेचे एक प्रख्यात अभ्यासक-संशोधक, तेव्हा कदाचित यामुळेच त्यांनी एक नवीन भाषा निवडली- इटालियन. तोपर्यंत ग्रीक, लॅटिनबरोबर जर्मन-फ्रेंच या भाषा त्यांना येत होत्या, पण इटालियन येत नव्हती. उन्हाळ्याच्या सुटीत इटालियनचा प्राथमिक कोर्स त्यांनी सुरू केला. त्यासाठी इटालियन साहित्यातील चार पुस्तकांच्या, खास विद्यार्थ्यांसाठी बनवलेल्या सोप्या आवृत्ती प्रमाणित केलेल्या होत्या व त्या चारांपैकी कोणत्यही दोन पुस्तकांचा अभ्यास करावयाचा होता. वडिलांच्या टीकेमुळे जिद्दीस पेटलेल्या दामोदरांनी चारही पुस्तकांच्या मूळ आवृत्ती मिळवल्या व त्यांचा कसून अभ्यास केला. त्यावेळी

त्यांच्या प्राध्यापकांनी एक चिठी त्यांना पाठविली. त्यात म्हटले होते की, 'इटालियन भाषेचा प्राध्यापक म्हणून मी बरीच वर्षं काम करीत आहे. परंतु 'अ+' श्रेणी द्यावी लागल्याची ही माझी पहिलीच वेळ आहे.' अतिशय समाधानाने दामोदरांनी इतर काही न लिहिता नुसती ती चिठीच भारतात वडिलांकडे पाठवून दिली!

यानंतर एकदा दामोदरांच्या शेजारच्या खोलीत रहाणाऱ्या लॉरेन्स अर्गिमबाऊ नावाच्या मित्राने त्यांना दुसऱ्या एका विद्यार्थ्याशी बराच वेळ तावातावाने चर्चा करताना ऐकले. तो विद्यार्थी गेल्यावर त्याने दामोदरांपाशी कुतुहलाने चौकशी केली, तेव्हा दामोदर सहजपणे म्हणाले, 'ओह, तो दाँते या इटालियन तत्त्ववेत्यावर डॉक्टरेटचा थिसीस लिहितोय. मी त्याला त्याबद्दल सल्ला देत होतो.'

इटालियनचा प्राथमिक कोर्स घेऊन 'अ+' श्रेणीच नव्हेतर डॉक्टरेटच्या विद्यार्थ्याशी चर्चा करण्याइतपत प्रावीण्य कोसंबींनी संपादले, यात कदाचित कोणाला अतिशयोक्तीचा वास येण्याची शक्यता आहे. परंतु आर्गिमबाऊंना मात्र दामोदरांच्या उद्‌गारांत अजिबात अतिशयोक्ती व गर्वीष्टपणा जाणवला नाही. कारण त्यांचा स्वतःचाच एक अनुभव फार बोलका होता.

हा मित्र अणुविज्ञानात पदवीचा कोर्स करीत होता. कोसंबींचा मुख्य विषय गणित, व भौतिकीचा प्रथम वर्षीय (सोफोमोर) कोर्सही त्यांनी पुरा केला नव्हता. (बंदुकीच्या गोळीचा प्रसंग आठवा!) एकदा सहजच बोलताना आर्गिमबाऊंनी बोहर-अणुसंबंधित आपण वाचलेल्या आईन्स्टाईनच्या एका लेखाचा उल्लेख केला. तो लेख एका जर्मन संशोधनपत्रिकेतील होता व फारसा प्रसिद्धही नव्हता. परंतु त्या सहज उल्लेखानंतर झालेल्या चर्चेतून मित्राच्या लक्षात आले की कोसंबींनी तो लेख व्यवस्थित अभ्यासलेला होता. इतकेच नव्हे तर वर त्यांनी मित्राला संबंधित विषयावरील आईन्स्टाईनच्या इतर लेखांचे संदर्भही दिले. ते त्याने अणुविज्ञानाचा विद्यार्थी असूनही वाचलेले नव्हते!

कोसंबींनी आपल्या व्यापक, सर्वांगपूर्ण शिक्षणाचा पाया किती मजबूत रोवला होता याची साक्ष देणाऱ्याच या हकीगती आहेत. पण याचे सर्व श्रेय निव्वळ त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेला व अफाट मेहनत करण्याच्या क्षमतेलाच देऊन चालणार नाही. दामोदरांच्या अंगभूत गुणांना फुलण्यास वाव देणारे सभोवतालचे वातावरण, त्यांच्या महत्त्वाकांक्षी बुद्धीला तितकेच तोलामोलाचे आव्हान देऊन सजग करणारी, तसेच योग्य ती संधी देऊ शकणारी परिस्थिती त्यांना अमेरिकेत लाभली. अमेरिकन समाज त्यावेळी उत्थानाच्या मार्गावर होता. शिक्षणक्षेत्रात अभिजात युरोपीय संस्कृतीबरोबरच आधुनिक वैज्ञानिक-तांत्रिक संस्कृतीवरही चांगलाच भर होता. व्यापक स्वरूपाचे ज्ञानभांडार त्या समाजात मोठ्या प्रमाणावर व सहजतेने उपलब्ध होते. हार्वर्ड विद्यापीठातील वीडेनर ग्रंथालय जगातील उत्कृष्ट व संपन्न ग्रंथालयातील एक मानले जाते. प्राचीन वाङ्मयापासून अर्वाचीन साहित्य, विज्ञान-तंत्रज्ञान यांवरील ग्रंथ, तसेच संशोधनपत्रिका सढळपणे व सहज उपलब्ध झाल्याने दामोदरांच्या वेगवान वाचनाला व एकपाठी स्मरणशक्तीला तालीम करण्यास येथे भरपूर वाव मिळाला.



याबरोबरच त्या समाजातील व्यापार व उद्योगक्षेत्रातील स्पर्धात्मक वातावरणाचे परिणाम हार्वर्डमधील शैक्षणिक वातावरणावर उमटणेही नैसर्गिक होते. हार्वर्डसारख्या प्रथम दर्जाच्या विद्यापीठात त्या उगवत्या समाजातील अनेक बुद्धिमान तरूण मोठ्या प्रमाणावर एकत्रित झाले होते. साहजिकच या उच्च दर्जाच्या सहाध्यायांबरोबर टिकून राहण्याची गरज होती, सहकाऱ्यांचा दबाव (peer pressure) म्हणता येईल तो चांगला जबरदस्त होता. अगदी धावण्याच्या शर्यतीतही आपण पाहतोच की स्पर्धक तोलामोलाचे असले की सर्वांचीच धावण्याची गती वाढते, पण तोलामोलाचा एकही स्पर्धक नसेल तर सर्वोत्कृष्ट धावपटूही तेवढेच अंतर कापण्यास आपल्या विक्रमी वेळेपेक्षा अधिक वेळ घेतो. हीच गोष्ट शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रालाही लागू पडते. बिरकॉक यांच्यासारखे गुरू, नोर्बर्ट वीनरसारखा संशोधनाचा आदर्श, व उत्तम दर्जाचे सहकारी, यांच्यामुळे दामोदरांच्या बुद्धिमत्तेच्या हिऱ्याला पैलू पाडण्याचे काम या काळात घडून आले. भारतातील मर्यादित शैक्षणिक वातावरणात अशी संधी काही त्यांना मिळू शकली नसती.

अखेर तीन वर्षांच्या अभ्यासानंतर १९२९ मध्ये हार्वर्डची ए. बी. (आर्टस् बॅचलर) पदवी घवघवीत यश मिळवत त्यांनी पदरात पाडली. 'सुम्माकम लॉड' (म्हणजे आपल्याकडील डिस्टिंक्शन) हा प्रावीण्यदर्शक किताब व 'फाय्-बीटा-कॅप्पा' सदस्यत्व त्यांनी प्राप्त केले.

परंतु त्यावेळी परिस्थितीने असे विचित्र वळण घेतले की दामोदरांना अमेरिकेत पुढील संशोधन पार पाडून डॉक्टरेट मिळवणे अशक्य होऊन बसले.

कोसंबींनी अमेरिकेत काढलेला पहिल्या महायुद्धानंतरचा दहा-एक वर्षांचा काळ हा अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या मुक्त, अफाट वाढीचा काळ होता. पण ती सद्दी आता संपत आली होती. १९२९ साली जागतिक अर्थव्यवस्था प्रचंड आर्थिक मंदीच्या भोवऱ्याकडे खेचली जाण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. अमेरिकन अर्थव्यवस्था मंदीच्या गर्तेत कोसळण्याचा प्रत्यक्ष क्षण वर्षअखेरीस आला होता. पैसेवाले सट्टेबाज एका दिवसात कफल्लक झाले होते. उद्योगधंदे बंद पडू लागल्याने नोकऱ्या सुटून कामगार व मध्यमवर्गाला बेकारीचा मोठा तडाखा बसला. अगदी उच्चशिक्षित लोकांनाही, मिळतील ती लहानसहान कामे स्वीकारून दिवस काढावे लागणार होते. यात अनेक होतकरू, तरुण संशोधकांचाही समावेश होता. कारण विद्यापीठांतील प्राध्यापकांच्या संशोधनमदतनीसांच्या जागाही मोठ्या प्रमाणावर कमी झाल्या. ही परिस्थिती बरीच वर्षे चालू रहाणार असे भाकित होते. प्रेसिडेंट फ्रँकलिन रुझवेल्ट यांच्या न्यू डीलने सरकारी हस्तक्षेपाचा वापर करून अर्थव्यवस्थेचा तोल थोडाबहुत सावरेपर्यंत ही परिस्थिती राहिली.

पण या वादळाचे काळे ढग १९२९ च्या सुरुवातीपासूनच जमा होऊ लागले होते. अर्थव्यवस्थेचा तोल ढासळून वाढीच्या प्रक्रियेला खीळ बसू लागली. एरवी सुटीच्या

काळात विद्यार्थ्यांना सहजी मिळू शकणाऱ्या प्रासंगिक नोकऱ्या झपाट्याने नाहीशा होऊ लागल्या. आर्थिक तंगी जाणवू लागल्यावर विद्यापीठांतील शिष्यवृत्या, फेलोशिप्स यांच्या उपलब्धतेवर प्रथम कुऱ्हाड पडली.

या परिस्थितीचा फटका दामोदरांना प्रथम बसणे काही अंशी अपरिहार्य होते व तसा तो बसलाही !

पदवीपरीक्षेत 'सुम्माकम लॉड' असे प्राविण्य मिळवूनही कोसंबींना पदव्युत्तर गणितशिक्षणासाठी हार्वर्डला फेलोशिप दिली गेली नाही, यामागे तशी दोन-तीन कारणे दिसून येतात; सर्वसाधारण, तशीच कोसंबींच्या वैयक्तिक 'गुणावगुणांशी' निगडित एखाद्या ठिकाणी चार-पाच वर्षे विद्यार्थ्याने घालविल्यावर पुढील शिक्षणासाठी दुसऱ्या एखाद्या विद्यापीठात, वेगळ्या वातावरणात त्याने जाणे योग्य अशी हार्वर्ड विद्यापीठाची सर्वसाधारण भूमिका होती, व तशी ती अजूनही आहे. पण याला काही अपवाद असत व निवडक विद्यार्थ्यांना पुढील संशोधनासाठी तेथेच प्रवेश मिळे. फेलोशिप्स्ची संख्या कमी झाल्याच्या त्या काळात कोसंबींचा क्रमांक या निवडक विद्यार्थ्यांत लागला नाही. त्यांना फेलोशिप देण्याची हार्वर्डच्या गणितविभागाची तेव्हा तयारी नसावी. कारण नाना विषयांत रस असल्याने ते गणिताबाहेरच्या ज्ञानसाधनेत वेळ घालविणार नाहीत याची त्यांना खात्री वाटत नसावी. पदवीसाठी आपल्या हाताखालून गेलेल्या उत्कृष्ट विद्यार्थ्यांमध्ये प्रा. बिरकॉफ कोसंबींची गणना करत होते, परंतु पदवीच्या अभ्यासक्रमात गणितावरच अधिक लक्ष केंद्रित करण्याचा आपला सल्ला त्यांनी मानला नाही हेही त्यांच्या लक्षात असणारच. भरीस भर म्हणून कोसंबींना खास रस असणाऱ्या डिफरशिअल जॉमेट्री या विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक ग्राऊस्टाईन त्यावेळी वर्षभराच्या रजेवर हार्वर्डबाहेर गेले होते !

या सर्व घटकांची गोळाबेरीज कोसंबींच्या विरुद्ध जाऊन ते फेलोशिपपासून वंचित राहिले. पुढील काळात हार्वर्डमधील एका अमेरिकन मित्राला लिहिताना स्वतः कोसंबींनी आपल्याला फेलोशिप न मिळण्याची कारणे लिहिलेली आहेत. 'नाना विषयांत रस असणे' याबरोबरच 'भरीस माझा अव्यवस्थित अवतार, उर्मट वागणे, व इतर गोष्टी' आपल्याविरुद्ध गेल्या असे ते म्हणतात.

फेब्रुवारीत पदवीपरीक्षा उत्तीर्ण झाल्यावर दोनेक महिने प्रयत्न करून पाहिल्यावर अमेरिकेतच पुढील शिक्षण घेण्याचा विचार त्यांनी सोडून दिला व मे मध्ये ते परतीच्या प्रवासास लागले. बोटीच्या या प्रवासात, वाटेत, फ्रान्स व इटालीमध्ये त्यांनी अल्पकाळ मुक्काम केला. पॅरिसमध्ये एली कार्टन व रोममध्ये लेवी चिविता हे डिफरन्शियल जॉमेट्री या कोसंबींच्या आवडत्या विषयातील तज्ज्ञ संशोधक कार्यरत होते. त्यांच्याशी संपर्क साधण्याचा त्यांनी प्रयत्न केला, परंतु त्यातूनही फारसे काही निष्पन्न झाले नाही. अखेर ते भारतात परतले हार्वर्डची ए. बी. ही पदवी गाठीला बांधून.

जवळजवळ दहा वर्षे शालेय व पदवीशिक्षणासाठी अमेरिकेत काढल्याने इतरही



चांगले संस्कार त्यांच्यावर घडले. व्यक्तिस्वातंत्र्य, श्रमप्रतिष्ठा यांचे महत्त्व त्यांच्या अंगी बाणले. अमेरिकन समाज अधिक मोकळा, अधिक सामाजिक अभिसरण चालू असलेला, व कमी सामाजिक उतरंडी मानणारा होता. त्यामुळे भारतापेक्षा काय पण इंग्लंडपेक्षाही अधिक मुक्त अशा व्यक्तिमत्त्वाची वाढ येथे होणे साहजिकच होते. मानमरातबांच्या उतरंडींची पर्वा न करणारा निर्भीड स्पष्टवक्तेपणा, हाताने स्वतःची कामे स्वतः करण्याची वृत्ती, मोकळेपणाने सर्व थरांतील व्यक्तींशी बरोबरीने वागणे, तसेच वस्तुनिष्ठतेबद्दलचा आदर व संशोधनविषयक उच्च मूल्ये हे गुण त्यांनी येथेच कमावले. या गुणांबरोबरच काही अवगुण येणेही नैसर्गिकच होते. स्पष्टवक्तेपणा, सत्यासंबंधी कोणाचा मुलाहिजा न बाळगणे हे गुण धर्मानंदांच्या व्यक्तिमत्त्वातही प्रकर्षाने होते. आपल्याला जे सत्य वाटेल ते स्पष्ट बोलून दाखविण्यात त्यांनी गांधीजींचीही भीड बाळगली नव्हती, मग इतरांची काय कथा? एरवीच्या सर्वसाधारण वागणुकीत मात्र धर्मानंद फार गरीबपणे व सालसरीत्या वागणारे होते. पण दामोदरांच्या स्पष्टवक्तेपणात उर्मटपणाची झाकही होती. ते फार काटेरी बोलत व बरोबरीच्या लोकांना तुच्छतेने वागवत. काही प्रमाणात हा त्यांचा मुखवटा असला, काही प्रमाणात त्यांना मिळालेल्या वागणुकीविरुद्धची ती प्रतिक्रिया असली, तरी यात त्यांनी अमेरिकेत कमावलेल्या अतिआत्मविश्वासाचा व अहंगंडाचा बराच अंश असणेही शक्य आहे. शेवटपर्यंत त्यांच्या बोलण्यात अमेरिकन ढब, उच्चारपद्धती टिकून होती. आणि थट्टेत का होईना स्वतःला 'अ वाईज गाय फ्रॉम केंब्रिज' म्हणवून घेण्यात त्यांना अभिमान वाटत होता.

कोसंबींनी केलेले गुणसंपादन हे त्यांच्या परिस्थितीचे एक अंग झाले. याच परिस्थितीचे दुसरे अंग म्हणजे त्यांच्या वाढीवर झालेले इतर परिणाम; त्यांना दुष्परिणाम म्हणणेही योग्य ठरणार नाही, कारण काही दृष्टींनी तेही सुपरिणामच होते. परंतु कोसंबींच्या व्यक्तिमत्त्वाचे काही बोचक कंगोरे निर्माण करण्यास ते कारणीभूत होते असे निश्चितच म्हणता येईल. यासाठी त्यांच्या अमेरिकेतील सामाजिक स्थानाबद्दल थोडेफार तर्क करणे चुकीचे ठरू नये. कोसंबींच्या अमेरिकेतील वास्तव्यासंबंधीचे जे त्रोटक उल्लेख अस्तित्वात आहेत त्यांच्याआधारे यासंबंधी खूप अस्पष्ट का होईना पण एक चित्र आपल्यापुढे उभे राहू शकते.

शालेय जीवनात त्यांचे मित्रमंडळ गावातीलच होते. परंतु नंतर विद्यापीठात शिकतानाही त्यांनी गावातच अधिक वहिवाट ठेवली. कळत-नकळत का होईना पण त्यांनी स्वतःला अमेरिकेतील उच्चवर्गीयांपेक्षा सामान्य लोकांशी जास्त जोडून घेतलेले दिसते. याची काही कारणे त्यांच्या प्रत्यक्ष परिस्थितीत अनुस्यूत होती. आर्थिक दृष्ट्या त्यांची परिस्थिती सामान्य होती. त्यात भर म्हणजे एक आशियाई म्हणून त्यांचा त्या समाजातील उपरेपणा. यासंबंधी उदाहरणादाखल नोर्बर्ट वीनर यांच्या आत्मचरित्रातील एक उल्लेख विचारात घेणे योग्य ठरेल. कोसंबी केंब्रिजला शिकत असताना त्यांच्याशी झालेल्या ओळखीबद्दल लिहिताना वीनर सहजपणे लिहून जातात की 'दामोदरांचे वडील भारतातून परागंदा होऊन हार्वर्डला तेव्हा शिकवीत होते.' वास्तविक धर्मानंद

हार्वर्ड ओरिएंटल स्कूलच्या आमंत्रणावरून तेथे गेलेले. आश्रयार्थी म्हणून तेथे जाण्याजोगे काही राजकीय स्वरूपाचे कामही त्यांनी कधी केलेले नव्हते. शिवाय नोर्बर्ट वीनर यांच्या वडिलांशी त्यांचा चांगला परिचय झालेला होताच. तरीही वीनरसारख्या कोसंबींशी मैत्री व सहानुभूती असलेल्या व्यक्तीने अशा प्रकारचा चुकीचा उल्लेख करावा. यावरून कोसंबींसंबंधी आजुबाजूच्या लोकांच्या काय कल्पना असाव्या हे थोडेफार लक्षात येते.

पहिल्या महायुद्धानंतरच्या या आर्थिक भरभराटीच्या काळात आधीच्या दशकातील अमेरिकन उदारमतवादी लोपला होता व त्याची जागा जीवघेण्या भांडवलशाही स्पर्धेने घेतली होती. या काळात वर्णभेद व ज्यूद्वेष मोठ्या प्रमाणावर उघडपणे व्यक्त होत होता. काळ्या-पिवळ्या कातडीचे लोक, तसेच यहुदीवंशीय यांना गोऱ्या व ख्रिश्चन समाजाकडून अपमानास्पद वागणूक भोगावी लागत होती. त्याबरोबरच मेक्सिकन्, लॅटिन अमेरिकन, तसेच मध्यमवर्गाबाहेर असलेल्या इटालियन, स्पॅनिश अशा अल्पसंख्य गटांची परिस्थितीही फार चांगली नव्हती. सावत्रपणाची, दुय्यम दर्जाची वागणूक त्यांना सहन करावी लागे. कोसंबींनाही या परिस्थितीचे चटके काही प्रमाणात बसले असणे शक्य आहे.

'गव्हाळ वर्ण व ज्यूंचे म्हणून ओळखले जाणारे लांब नाक या दोन गोष्टी माझ्या विरुद्ध जातात' असे खुद्द कोसंबींनी आपल्या अमेरिकन मित्रांजवळ उद्‌गार काढल्याच्या आठवणी आहेत. या आपल्या लांब नाकामुळे आपले छायाचित्र काढू देण्यास ते खळखळ करीत असेही त्यांच्या एका मित्राने लिहून ठेवले आहे. भारतात तथाकथित उच्च जातीत जन्मलेल्या मुलाला त्या समाजात काहीशी खालच्या थरातील व्यक्तीला मिळणारी उपऱ्यासारखी-दलितासारखी वागणूक मिळाली असेल तर ती तीव्रतेने जाणवणे साहजिकच आहे.

सर्वसाधारण परिस्थितीत या गोष्टींचा परिणाम त्यांच्यावर विशेष झालाही नसता. त्यांनी अभ्यास उत्तमरीत्या पार पाडून आपली गुणवत्ता दाखवून शैक्षणिक क्षेत्रातील पदके, पारितोषिके वगैरे मिळवलीच. परंतु १९२९ च्या सुरुवातीस बिकट होत चाललेल्या परिस्थितीत जेव्हा कमी-अधिक ठरविण्याचा प्रश्न आला तेव्हा वरील घटकांची गोळाबेरीज कोसंबींच्या विरोधात गेली असे दिसते.

एक व्यक्ती म्हणून त्यांच्या विचारांना जे डावे, समाजाभिमुख वळण होते त्यामागची भावनिक पार्श्वभूमी येथे सापडू शकते. उपेक्षित, दडपलेल्या वर्गांबद्दलची सच्ची सहानुभूती, आणि प्रस्थापितांच्या स्वार्थी, शोषक धोरणांविरुद्ध सात्त्विक संताप हा त्यांचा स्थायीभाव होता. त्यांच्या लिखाणात विद्वत्ता, तर्कशुद्धता, तरल कल्पनाशक्ती यांच्या बरोबरीने एक व्यापक मानवतावादी दृष्टिकोन प्रकर्षाने आढळतो. याची मुळे त्यांच्या अमेरिकन अनुभवात काही प्रमाणात असणारच.

मात्र फक्त पदवी घेऊन कोसंबींना भारतात परतावे लागले याचा एक सर्जनशील



संशोधक म्हणून त्यांच्या पुढील गणिती करिअरवर नकारात्मक परिणाम झाला. संशोधनाच्या दृष्टीने विद्यार्थीजीवनात अधिक महत्त्वाचा जो काळ तेव्हा त्यांना अमेरिकेहून परतावे लागले. एक संशोधक म्हणून परिपक्व होण्यासाठी चांगल्या सधन डॉक्टरेटच्या थिसीसवर काम करण्याचा जो अनुभव त्यांना मिळावयास हवा होता, त्यापासून ते अचानक वंचित झाले. कोसंबी खूप जिद्दी व लढाऊ वृत्तीचे होते. त्यामुळे ते हताश होणे शक्य नव्हते. जी गोष्ट सरळपणे होऊ शकली नाही ती स्वतःच्या एकट्याच्या जोरावर साध्य करून घेण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. भारतात आल्यावर येथील तुटपुंज्या परिस्थितीत, प्रतिकूल वातावरणात जागतिक दर्जाचे संशोधन करण्यासाठी एकलव्याच्या निष्ठेने त्यांनी प्रचंड मेहनत व तपश्चर्या केली व त्या दिशेने खूप साधलेही. पण तरीसुद्धा, किंबहुना त्यामुळेच, ऐन मोक्याच्या कालखंडात पुढारलेल्या विद्याकेंद्रातील संशोधन-अनुभवाला त्यांना मुकावे लागले, हा तोटा अधिक तीव्रतेने जाणवतो.

नोकरीसाठी त्या काळात फार क्षेत्रे उपलब्ध नव्हती, आणि कोसंबींच्या दृष्टीने विचार करता एखाद्या विद्यापीठात प्राध्यापकी करण्याची शक्यता फक्त येथे होती. त्यावेळी भारतीय शिक्षणक्षेत्रात ही अशा जागांची कमतरता होतीच.

अमेरिकेतून परतल्यावर कोसंबी काही दिवस आपल्या मोठ्या बहिणीकडे बंगलोरला राहिले. त्यांचे मेव्हणे, माणिकताईंचे पती, डॉ. राम प्रसाद अमेरिकेतील मॅसॅच्युसेटस् इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये अभियांत्रिकीचे उच्च शिक्षण घेऊन आलेले होते व केंब्रिजला शिकत असतानाच कोसंबींचा त्यांच्याशी परिचय झालेला होता. राम प्रसाद यांनी त्यांना कलकत्ता वा बनारस हिंदू विद्यापीठात नोकरीसाठी प्रयत्न करण्याचा सल्ला दिला. धर्मानंदांचे अनेक स्नेही याठिकाणी असल्याने दामोदरांना चांगल्या वातावरणाचा लाभ आपसुक होईल असा त्यांचा होरा असावा!

यावेळी बनारस हिंदू विद्यापीठात गणिताच्या प्राध्यापकाची जागा मोकळी होती. कोसंबींची तेथे नियुक्ती झाली. दरमहा साधारण तीनशे रुपये पगार, रहाण्यास जागा. पंडित मदनमोहन मालवीय तेव्हा कुलगुरू होते. मालवीयजींना धर्मानंदांबद्दल खूप आदर होता. त्यामुळे अमेरिकेत शिकून आलेला धर्मानंदांचा बुद्धिमान पुत्र म्हणून कुलगुरूंची आपुलकीही त्यांना सुरुवातीस लाभली.

त्यावेळची जी थोडीफार उपलब्ध माहिती आहे त्यावरून कोसंबींनी येथे बऱ्यापैकी सुरुवात केल्याचे जाणवते. हा तरुण प्राध्यापक विद्यार्थ्यांत मिळून मिसळून असे— हॉकी वगैरे मैदानी खेळांत त्यांच्याबरोबरीने भाग घेई. आपल्या संशोधनकार्याचाही त्यांनी येथेच प्रारंभ केला. १९३० च्या 'इंडियन जर्नल ऑफ फिजिक्स'मध्ये 'प्रिसेशन्स ऑफ ॲन एलिप्टिक आर्बिट' हा त्यांचा पहिला संशोधनलेख प्रसिद्ध झाला. अणुभौतिकीतील एका प्रश्नासंबंधित या लेखाने त्यांच्या कारकीर्दीची सुरुवात झाली हे वाजवीच म्हटले पाहिजे. गणित शिकविण्याबरोबरच जर्मन भाषा शिकवण्याचा वर्गही त्यांनी फावल्या

वेळात सुरू केला. आधुनिक विज्ञानाचा अभ्यास करताना अद्यावत रहायचे असेल तर जर्मनभाषा येणे अत्यावश्यक आहे, कारण बहुतांशी संशोधनलेख जर्मनमध्ये प्रसिद्ध होतात, ही त्यांची यामागची भूमिका होती.

परंतु कोसंबी बनारसला अस्वस्थ होते. बनारस हिंदू विद्यापीठातील पुराणमतवादी वातावरणात त्यांच्यासारख्या पुरोगामी विचारसरणीच्या तरुणाला रुळणे शक्य नव्हते. त्यात भर म्हणजे त्यांचा काटेरी स्वभाव. कोसंबींच्या इतरांना दुखावणाऱ्या वागणुकीचे एक उदाहरण म्हणून त्यांच्या जर्मनभाषेच्या वर्गाचा एक किस्सा खास नमूद करण्याजोगा आहे. आपल्या वर्गात जे शिकवायला येतील त्यांनी काटेकोरपणे वेळेवर यावे अशी सक्त ताकीद त्यांनी सुरुवातीलाच दिलेली. या वर्गात एक ज्येष्ठ प्राध्यापकही हजर रहात असत. तर एकदा सदरहू प्राध्यापक वर्ग सुरू झाल्यावर पाच मिनिटांनी आत आले. कोसंबींनी उशिरा आल्याबद्दल त्यांना चक्क बाहेर जाण्यास सांगितले! हार्वर्डमध्येही अशा प्रकारची वागणूक खटकणारी ठरली असती, आपल्याकडील ज्येष्ठ-कनिष्ठतेच्या उतरंडी मानणाऱ्या समाजात तर बघायलाच नको. त्यातूनही एक उत्साही तरुण प्राध्यापक, अमेरिकेतून एवढा शिकून आलेला, त्याला उत्तेजन द्यावे एवढ्या माफक हेतूने सदरहू प्राध्यापक त्यांच्या वर्गाला येत असण्याचीही खूप शक्यता असावी. अशा प्रकारच्या कोसंबींच्या वागण्याचा इतरांवर काय परिणाम होत असेल याची कल्पना करणेच योग्य. कुलगुरू मालवीयांशीही त्यांचे विशेष पटले नाही.

दुसरीकडे गणितविषयाच्या अध्यापन व संशोधनाच्या दृष्टीनेही तेथे फारसे उत्साहवर्धक काही नव्हते. गणितात फार रस असलेले सहकारी नव्हते व विद्यार्थीवर्गही प्रामुख्याने परीक्षार्थीच पदवी प्राप्त करण्यापलिकडे रस नसलेला. विद्यार्थी-बेशिस्त तेव्हाही होतीच. एकूण त्या काळातील विद्यापीठांची परिस्थिती आतापेक्षाही वेगळी नसावी. अशी परिस्थिती भारतीय शिक्षणक्षेत्रात सर्वत्रच असल्याने याबाबत तक्रार करण्यास कोसंबींना जागा नव्हती. पण एकूण परिणाम एवढाच झाला की तेथे वर्ष पूर्ण होण्याआतच कोसंबी दुसरीकडे नोकरी शोधण्याच्या विचारास लागले. आणि लवकरच त्यांना तशी संधीही चालून आली. बनारस हिंदू विद्यापीठातून अलिगढ मुस्लिम विद्यापीठात जाण्याची!

अलिगढ मुस्लिम विद्यापीठाच्या गणित विभागाच्या प्रमुखपदी त्यावेळी आंद्रे वाईल ह्या अतिशय हुशार व तरुण यहुदी फ्रेंच गणितज्ञाची नियुक्ती झाली होती. आंद्रे वाईल पुढे गणितातील फार मोठे अधिकारी व आधुनिक गणिताचे एक संस्थापक म्हणून कीर्तिमान झाले. भारतीय विद्यापीठात उच्च दर्जाच्या शिक्षणाचा पाया घालून येथेच संशोधनक्षम वातावरण निर्माण करावे यासाठी अधुनमधून केल्या गेलेल्या प्रयत्नांतील हा एक प्रयत्न अ. मु. वि. ने केलेला. गणितविभागाची वाढ करण्याच्या दृष्टीने चांगले सहकारी शोधण्याच्या प्रयत्नात आंद्रे वाईल तेव्हा होते. कलकत्त्यातील एका परिषदेत वाईल यांची कोसंबी व दुसरे एक तरुण गणितज्ञ डॉ. विजयराघवन यांच्याशी ओळख झाली. रामानुजन यांचे आश्रयदाते व सहकारी प्रा. हार्डी हे डॉ. विजयराघवन यांचे गुरू होते, व रामानुजन यांचा छोटा अवतार असा काहीसा



लौकिकही विजयराघवन यांच्यापाठी होता. त्यामुळे वाईल यांनी जेव्हा कोसंबी व विजयराघवन यांना अलिगढला येण्याचे आमंत्रण दिले तेव्हा बनारस सोडण्यास उत्सुक असलेल्या कोसंबींची, आंधळा मागतो एक डोळा तर देव देतो दोन अशीच स्थिती झाली असावी.

दरम्यानच्या काळात दामोदरांचे लग्नही ठरले होते. मुंबईच्या श्री. बळवंतराव माडगावकर यांची बी.ए. झालेली सुविद्य व सुस्वरूप कन्या, नलिनी यांच्याशी. हे लग्न वडिलधाऱ्यांनीच ठरवलेले होते. श्रीमंत माडगावकर कुटुंबातील बळवंतराव हे जस्टिस माडगावकरांचे बंधू. बळवंतराव धर्मानंदांचे मित्र तसे सहाय्यकही होते. धर्मानंद जेव्हा प्रथम १९१० साली इंग्लंडमार्गे अमेरिकेस गेले होते तेव्हा बळवंतरावांनी त्यांना आर्थिक सहाय्य दिले होते. तत्पूर्वी, १९०८ मध्ये धर्मानंद कलकत्ता विद्यापीठातून राजीनामा देऊन मुंबईस आले तेव्हा स्वतंत्र बिऱ्हाड करण्यापूर्वी एक-दोन महिने माडगावकरांच्याच बोरिवलीतील बंगल्यात ते सहकुटुंब राहिले होते; एक वर्षाच्या दामोदरसहित. तेवीस वर्षांनंतर या कुटुंबाशी कोसंबी घराण्याची सोयरीक जुळून आली. दामोदर ७ मे १९३१ रोजी मुंबईत चतुर्भुज झाले व एका प्रतिष्ठित, श्रीमंत घराण्याशी त्यांचा संबंध आला.

अलिगढला आंद्रे वाईल यांच्याबरोबर काम करण्याची संधी त्यांच्या हाती होतीच. अशा प्रकारे त्या त्या वेळच्या मान्यवर प्रतिष्ठित व्यक्तींशी व संस्थांशी संबंध जुळून येण्याचे अनेक योग त्यांच्या आयुष्यात वेळोवेळी आले. मात्र या संधींचा पुरेपूर लाभ उठवण्याचे, हे संबंध जोपासून स्वतःच्या फायद्यासाठी वापरण्याचे कसब काही कोसंबी दाखवू शकले नाहीत. वडिलांप्रमाणे इतरांपासून अलिप्त, फटकून राहण्याचे, 'उपरा' म्हणून झगडत राहण्याचे त्यांच्या नशिबी असावे. तेच त्यांना आवडत असावे! अर्थात् या पुढच्या गोष्टी झाल्या.

कोसंबी १९३१ मध्ये अ. मु. वि. त रुजू झाले. वाईल व विजयराघवन या प्रथमश्रेणीच्या गणितज्ञांबरोबर वावरण्याची संधी मिळाल्याने व्यावसायिक दृष्टीने त्यांना चांगला काळ लाभला होता. त्या सर्वांचाच तो उमेदवारीचा काळ होता, तिघेही गणितातील कूट प्रश्नांत गुंगणारे. मात्र त्यांच्या प्रकृतिधर्मांत फरक होता. वाईल व विजयराघवन संथ व धीम्या प्रकृतीचे. कोसंबी याउलट. कसदार तगडे शरीर व अतिशय चपळ हालचाली, यांमुळे त्यांचे रुबाबदार व्यक्तिमत्त्व शंभरात उठून दिसे. विलक्षण स्मरणशक्ती, अफाट वाचनाची जोड, व आपले ज्ञान आडपडदा न ठेवता खुलेआम वाटत सुटण्याचा मोकळेपणा. भरीला वागण्याची आक्रमक वृत्ती. त्यामुळे कोसंबींच्या अमेरिकन उच्चारांतील, शब्द खात भराभर बोलण्याचा ओघ एकदा सुरू झाला की त्यांना थोपवून स्वतःचे म्हणणे मांडणे इतरांना कठीणच असे. वाईल व विजयराघवन ह्यांचीही हीच स्थिती होई.

त्यावेळच्या एका विद्यार्थ्याच्या आठवणीनुसार गणितविभागाच्या खोलीत साधारणपणे पुढील प्रसंग घडून येई. वाईल व विजयराघवन भिंतीवर टांगलेल्या फळ्यावरील गणिती समस्यांकडे पहात गंभीरपणे विचार करीत बसलेले असत. अशा वेळी कोसंबी खोलीत अवतरले की तेथे एकदम चैतन्य पसरे. ते फळ्याकडे नजर टाकत ताडताड पावले टाकत फळा गाठून खडू उचलत, व भराभर लिहू लागत. त्यांच्या तोंडातून फ्रेंच व जर्मन संशोधनपत्रिकांतील नवनवीन संदर्भ पटापट बाहेर पडत असत. 'आणि मग वाईल व विजयराघवन ते संदर्भ जुळवून वाचू लागत,' असे त्या विद्यार्थ्याने म्हटले आहे. कोसंबींचे स्वतःचे संशोधनही येथे बऱ्यापैकी मार्गी लागले होते. डिफरेंशियल जॉमेट्री, पाथ स्पेसेस या विषयांवरचे त्यांचे आठ संशोधन लेख दोन वर्षांत प्रसिद्ध झाले, त्यातील तीन परदेशी संशोधनपत्रिकांत होते (एक इटालियन तर दोन जर्मन), इंडियन मॅथेमॅटिकल सोसायटीच्या कामातही ते सहभाग घेऊ लागले. पॅरिस व रोममधील त्याच्या विषयासंबंधित संशोधकांच्याबरोबर त्यांचा नियमित पत्रव्यवहार चालू होता.

शिकविण्यासंबंधीचे आपले कर्तव्य ते कसोशीने व सचोटीने पार पाडत होते. विषयाला मुळापासून सुरुवात करून तो फुलवत अगदी त्यातील अद्यावत् संशोधनापर्यंतची माहिती आपल्या ओघवत्या शैलीत ते विद्यार्थ्यांना देत. गणितात आघाडीवर राहण्यासाठी फ्रेंच व जर्मन भाषा, विशेषतः जर्मन शिकण्याचा ते आवर्जून सल्ला देत. अधुनमधून विनोदी चुटके सांगण्याची त्यांची लकबही विद्यार्थ्यांकडून दाद मिळवायची. त्यांचे चमकदार व्यक्तिमत्त्व व विद्वत्ता याबद्दल विद्यार्थ्यांनाही आदर होता. परंतु यापलिकडे फारसे काही निष्पन्न होण्याजोगे नव्हते. त्यावेळची आपल्या देशाची स्थिती अशी मागसलेली होती की पदवी प्राप्त करण्यापलिकडे विषयात फारसा रस विद्यार्थ्यांना नसेच. इंग्रजी काळातील शिक्षणपद्धतीही निव्वळ परीक्षार्थी होती- अंतिम परीक्षेत पास झाले की गंगेत घोडे न्हाले! विषय खरोखर किती समजला वगैरे गोष्टी दुय्यम. अशा पद्धतीत गणिती संशोधनाला उपयुक्त ठरेल अशा प्रकारचे कोसंबींचे शिकवणे बहुतांशी विद्यार्थ्यांच्या डोक्यावरून जायचे. त्यामुळे विद्यार्थ्यांना कोसंबींबद्दल 'अनाकलनीय' विद्वत्तेच्या जडपणाचे कौतुक जरुर वाटत असले तरी त्यातून दोन्ही पक्षी समाधान काही लाभत नव्हते.

गणिताशिवाय इतर विषयही संशोधनासाठी त्यांच्या डोक्यात तेव्हापासूनच घोळत असल्याचे दिसते. सेतु माधवराव पगडी त्यावेळी अलाहाबादला विद्यार्थी होते. कोसंबींनी त्यांना सुटीच्या काळात अलिगढला बोलावलेले. मॅकिआवेलीच्या 'प्रिन्स' या राज्यशास्त्रावरील अभिजात ग्रंथाचे मराठी रूपांतर करण्याचा त्यांचा बेत होता. सेतू माधवरावांनी १९३२ सालचा मे महिना अलिगढला कोसंबींच्या विद्यपीठातील बंगल्यात काढला. निजामशाहीतील आंबेजोगाई येथे दासोपंतांची हस्तलिखिते असल्याचे कोसंबींना कळले होते. सुमारे सव्वा लाख ओव्या असलेली ही हस्तलिखिते मिळवून त्यावर काम करण्याविषयीची चर्चाही त्यांनी पगडींबरोबर केली होती. मॅकिआवेली व दासोपंत, या दोघांबद्दल पुढे काहीच निष्पन्न झाले नाही, तरी



यावेळेपासूनच कोसंबी आपली नजर विविध क्षेत्रांवर टाकत असल्याचे स्पष्ट होते. पगडींच्या आठवणीनुसार नाना विषयांवरची तीन ते चार हजार पुस्तके तेव्हाही कोसंबींच्या ग्रंथालयात होती.

अलिगढच्या या मुक्कामात कोसंबी अधुनमधून तराईच्या जंगलात शिकारीला जात. या निमित्त भटकत असताना त्या प्रदेशातील प्रागैतिहासिक व ऐतिहासिक अवशेषांचे निरीक्षण करून तत्संबंधी टिपणेही त्यांनी तयार केली होती. भरीस इतिहास व अर्थशास्त्रासंबंधीचे भौतिकवादी-मार्क्सवादी विचार निवडक विद्यार्थी व प्राध्यापकांबरोबर चर्चिण्यासही त्यांनी सुरुवात केली. मार्क्सवादी अर्थशास्त्रावरची आपली टीका न आवडल्याने ते नाराज झाले होते असे पगडींनी सांगितले आहे.

या नानाविध गोष्टींप्रमाणे कोसंबींच्या इतर सवयीही, त्या काळाच्या मानाने, इतरांच्या डोळ्यात भरणाऱ्या होत्या. आपल्या व्यावसायिक जीवनाला नुकतीच सुरुवात केलेल्या तरुण व्याख्यात्याच्या मानाने त्यांची राहण्याची व वागण्याची बिनधास्त पद्धत इतरांना थोडीफार खुपणारी असावी. त्यांची राहणी साधी होती. अंगात शर्ट-पँट व पायात पेशावरी चपला घालून ते वर्गात शिकवीत. कित्येक वेळा अर्ध्या पँटीत बाजारातून फिरताना ते आढळत. हिंदू ब्राह्मण असून इतके मोकळेपणाने व अपराधी न वाटता ते मांसाहार करीत याचे कौतुक वाटल्याने 'कोसंबी, त्यांच्या समधर्मीयांच्या मानाने फारच पुढारलेले होते' असे शिफारसपत्रही त्यांच्या एका मुस्लिम विद्यार्थ्याने दिले आहे. परंतु कोसंबींचे असले वागणे पुराणमतवादी हिंदूंना एकीकडे खटके, तर त्यांचे मार्क्सवादी पाखंडी विचार अलिगढमधील पुराणमतवादी मुस्लिमांनाही खटकत असणार!

एका परीने अ. मु. विद्यापीठ ब. हि. विद्यापीठाचीच दुसरी बाजू असावी. विद्यार्थी वर्ग, विद्यापीठव्यवस्थापनातील राजकारण या गोष्टी उत्साहवर्धक नव्हत्याच. दोन सहकाऱ्यांचा सहवास हे एक आकर्षण होते. पण तेही लवकरच संपले. आंद्रे वाईल पूर्णपणे गणिती संशोधनाला वाहिलेले. विद्यापीठातील एकूण परिस्थितीत व कारभारात आपल्या कार्याला सुयोग्य वातावरण लाभणे शक्य नाही हे लक्षात येताच त्यांचे मन विटून गेले, व १९३२ मध्ये त्यांनी अलिगढला रामराम ठोकला. त्यांच्या मागोमाग डॉ. विजयराघवनही ढाका विद्यापीठात निघून गेले. कोसंबींनाही त्यामुळे अलिगढला राहण्यात काही स्वारस्य उरले नाही. तेही दुसरीकडे मुक्काम हलविण्याच्या मार्गाला लागले.

कोसंबीनी १९३२ च्या डिसेंबरात पुण्याला रँग्लर र. पु. परांजपे यांना लिहिलेल्या एका पत्रावरून, कोसंबींच्या यावेळच्या मनस्थितीची थोडीफार कल्पना येते.

"मदतीची विनंती करण्यासाठी हे पत्र लिहीत आहे" अशी सुरुवात करून कोसंबींनी लिहिले होते की "उन्हाळ्यात आपण भेटलो तेव्हा येथील परिस्थिती मी आपणास समजावून सांगितलीच होती, गणित विभागाचे पूर्वीचे मुख्य वाईल यांनी, ते येथे का राहू शकत नाहीत, हे आपणास सांगितलेच असेल. आता तर मला येथे राहणे पूर्णपणे अशक्य झाले असून थोड्याच दिवसांत मी ही जागा सोडणार हे निश्चित,

कारण माझ्या साध्या मागण्याही मान्य करण्याची विद्यापीठाची तयारी दिसत नाही. नाताळात इंडियन मॅथेमॅटिकल सोसायटीच्या अधिवेशनावेळी भेटू तेव्हा मी याविषयी आपल्याशी सविस्तर बोलेन. शिक्षणसत्राच्या मध्यातच दुसरी नोकरी मिळणे अशक्य आहे. तरीही आपण माझी परिस्थिती लक्षात घेऊन कोठे नोकरीची शक्यता असल्यास कळविण्याची कृपा करावी. आपण रागावू नये. परंतु मी माझ्याविषयीची काही शिफारसपत्रे व गुणपत्रिका सोबत जोडत आहे. एखाद्या जागेसाठी आपण माझी शिफारस केल्यास ती केवळ गुणवत्तेवर आधारित असावी व आपणास माझ्याबद्दल वा माझ्या वडिलांबद्दल वाटणाऱ्या आपुलकीमुळे नसावी, एवढ्याचसाठी हे करीत आहे."

धर्मानंदही या गोष्टीमुळे काहीसे व्याकुळ झाले असावे. कारण या सुमारास मुनी जिनविजयजी या आपल्या गुजरात विद्यापीठकाळातील मित्रास त्यांनी लिहिले होते की 'दामोदर अजून स्थिरावलेला नाही, अस्वस्थच आहे. त्याला पत्र लिहून तुम्ही चार शब्द सांगावे.'

अखेर जेमतेम दोन वर्षे अलिगढला काढून कोसंबी तेथून बाहेर पडले, व पुण्यास आले.

**कोसंबी डेक्कन** एज्युकेशन सोसायटीच्या पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयात गणिताच्या अध्यापकपदी आले, व त्यांचे पाय स्थिरावले. पुण्यास १९३३ मध्ये आल्यावर, आयुष्याच्या अखेरपर्यंत पुढची तेहतीस वर्षे ते पुण्यासच चिकटून राहिले. त्यांचे पुण्यात येणे आर्थिक दृष्ट्या त्यांना फारच तोट्याचे होते. फर्गसनात त्यावेळी पगार होता मासिक १३० रुपये तोही सर्वांना सारखा. दरवर्षी पगारवाढ वगैरे गोष्टी नव्हत्याच. अ. मु. वि. मध्ये त्यांचा पगार तीनशेच्या आसपास होता! दुसरे म्हणजे एका विद्यापीठातून ते महाविद्यालयात आले होते. म्हणजे संस्थात्मक उतरंडीवर एक पायरी खालीच. मात्र देशात त्यावेळी फर्गसन महाविद्यालयाचे नाव वरच्या पातळीवर होते. परंतु गणितातील संशोधनासंबंधीच्या वातावरणाबद्दल काही फर्गसन प्रसिद्ध नव्हते. परांजपे, महाजनी (जे तेव्हा प्राचार्य होते) अशी इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठातून रँग्लर पदवी प्राप्त केलेली मंडळी फर्गसनच्या गणित विभागाशी संबंधित असली तरी शिकविण्यापलिकडे सक्रिय गणिती संशोधन काही त्यांपैकी कोणी केले नव्हते व करतही नव्हते.

मात्र कोसंबींना पुण्याचे आकर्षण वाटणे, पुण्याविषयी नॉस्टॅल्जिया असणे साहजिक होते. पूर्वी वयाच्या अकराव्या वर्षापर्यंतचे बहुतेक बालपण त्यांनी पुण्यातच काढलेले; त्यामुळे पुण्याला येण्यात पुन्हा आपल्या मातीत येण्याचे समाधान होते. परंतु याही पलिकडे जाऊन पुण्यात दीर्घकालीन स्थिरावण्याचा विचार त्यांच्या मनात असावा. कारण पुण्यात कायमचे बिऱ्हाड ठेवण्याच्या दृष्टीनेही त्यांनी याचवेळी पावले टाकलेली आहेत. डेक्कन जिमखान्यावर भांडारकर इन्स्टिट्यूट रस्त्यावर जागा घेऊन तेथे स्वतःचा



बंगला बांधण्यासही त्यांनी सुरुवात केली.

धर्मानंदांनीही घरबांधणीच्या कामात सक्रिय भाग घेतला. या काळात जवळजवळ दोन वर्षे त्यांचा मुक्काम बहुतांशी पुण्यातच होता – नवीन घराच्या कामावर देखरेख करण्यासाठी. 'पुण्याला चि. दामोदरसाठी बंगला बांधण्याचे काम हाती घेतले. ते पुरे झाल्यावर १९३४ च्या ऑगस्ट महिन्यात मी बनारसला जाऊन राहिलो' असे स्वतः धर्मानंदांनी लिहिले आहे.

कोसंबींच्या पत्नीचे माहेर मुंबईचे व त्यांना पुणे सोयीचे होते. कोसंबींच्या सासरच्या माणसांकडूनही त्यांच्या घरबांधणीस उत्तेजनच मिळाले. हाही घटक त्यांच्या पुण्यातील स्थिरावण्यात महत्त्वाचा असावा.

पुण्याला आल्यावर कोसंबी स्थिरचित्ताने आपल्या संशोधनसाधनेत बुडून गेले. त्यांची किंमत जाणणारी, त्यांना व त्यांच्या कामाला मान देणारी माणसे अनेक ठिकाणी होती. पण कोसंबींनी नंतर पुणे सोडले नाही. स्वातंत्र्यपूर्व काळातील एक मान्यवर गणिती प्रा. सिद्दीकी उस्मानिया विद्यापीठाचे संशोधन-संचालक असताना त्यांनी कोसंबींना संशोधक-प्राध्यापकाची जागा देऊ केली. परंतु मोठ्या पगाराची ही जागा त्यांनी स्वीकारली नाही, असे खुद्द सिद्दीकींनी लिहून ठेवले आहे. पुढे होमी भाभांनी त्यांच्या, नव्याने स्थापन झालेल्या टाटा मूलभूत संशोधन संस्थेमध्ये येण्याचे आमंत्रण कोसंबींना दिले. ते त्यांनी स्वीकारलेही. परंतु मुंबईत त्यावेळी चांगली जागा मिळणे सहज शक्य असूनही आपले पुण्याचे बिऱ्हाड काही त्यांनी उठवले नाही. उलट बराच काळपर्यंत डेक्कन क्वीनने पुणे-मुंबई प्रवास करण्याचे वेळखाऊ व तापदायक श्रम त्यांनी स्वीकारले.

पुण्यातील एकूण शैक्षणिक-सामाजिक वातावरण, फर्गसनाचे व्यवस्थापन, तसेच तेथील चौकटीत त्यांचे कोणाशी फारसे जुळले नाही, हे खरे असले तरी त्यांच्या वैयक्तिक विविधांगी संशोधनकार्याच्या दृष्टीने पुण्याने त्यांना अनेक संधी व सोयी उपलब्ध करून दिल्या, हे निश्चित.

कोसंबींनी १९३३ ते ४५ असे पूर्ण एक तप फर्गसनच्या गणित विभागात काढले. या काळाचे आपला 'बारा वर्षांचा वनवास' असे वर्णन ते स्वतः मित्रांजवळ करीत; थोडेफार गमतीने, थोडेफार कडवटपणे. वनवासाचे अनेक अर्थ निघू शकतात. सत्ताधाऱ्यांपासून दूर राहणे व प्रस्थापितांपासून अलग पडणे या अर्थी त्यांच्या येथील वास्तव्यास वनवास म्हणता येईल. पण या अर्थाने ते फर्गसनातच काय, पण पूर्ण आयुष्यभरच वनवासी होते. वनवास म्हणजे तपश्चर्या, ज्ञानसाधनेसाठी जगातील इतर मोह, मानमरातब, प्रतिष्ठा इत्यादीकडे दुर्लक्ष करून केलेली तपश्चर्या, असा अर्थ घेतला तर मात्र कोसंबींचा हा वनवासकाळच होता, असे निश्चित म्हणता येईल.

हा काळ त्यांच्या एकलव्या ज्ञानसाधनेचा होता. नानाविध ज्ञानक्षेत्रांत त्यांनी जे बहुमूल्य काम केले, व आधुनिक भारतातील एक आघाडीचा समग्र दृष्टिकोन असलेला

क्रांतिकारक विचारवंत म्हणून जी कीर्ती संपादन केली, त्या कार्याच्या ठोस पायाभरणीचे काम त्यांनी फर्गसनातील या वास्तव्यातच केले.

नंतरच्या एक-दोन पिढ्यांतील अनेक मंडळी कोसंबींना गुरुस्थानी मानत आली. त्यातील अनेकांनी विविध क्षेत्रांत महत्त्वाची कामगिरीही बजावली, व काही अजूनही बजावत आहेत. परंतु कोसंबींचे वैशिष्ट्य म्हणजे या बहुतेकांचे ते पदसिद्ध गुरू नव्हते. ही मंडळी या ना त्या निमित्ताने, आपले काम करीत असता त्यांच्या सान्निध्यात आली, व त्यांच्यापासून खूप शिकून व स्फूर्ती घेऊन गेली. त्यांना लाभलेले हे शिष्यही इतर क्षेत्रांतील होते – गणितातील नव्हेत!

फर्गसनातील पदवीपूर्व, तसेच पदव्युत्तर विद्यार्थ्यांना उपयोजित गणित, डायनॅमिक्स, डिफरेन्शियल जॉमेट्री, टेन्सॉर्स वगैरे उपविषय ते शिकवीत असत. कोसंबींची शिकविण्याची पद्धत म्हटली तर आदर्श होती. विषयाच्या मूलतत्त्वांपासून सुरूवात करून तो विषय फुलवीत एकेक सिद्धान्त ते शिकवत जात व शेवटी त्या विषयातील अद्यावत् घडामोडींचीही कल्पना विद्यार्थ्यांना देत. विषयाचा एकंदर आवाका, गणितातील इतर उपशाखांशी असलेले त्या विषयाचे लागेबांधे, विज्ञानाच्या इतर क्षेत्रांत त्या विषयाचा होणारा वापर यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यावर त्यांचा कटाक्ष असे. परंतु दुर्दैवाने आपल्याकडील परीक्षार्थी शिक्षणपद्धतीत अशा प्रकारच्या निर्मितिक्षम शिकवण्याला फारसा वाव नव्हता. स्वतः कोसंबींनीही याबाबत फार समजुतदारपणा दाखवल्याचे दिसत नाही. विद्यार्थी तयारीत कमी पडतात तेव्हा त्यांना सांभाळून, सहानुभूतीने त्यांनी वागवल्याचे आढळत नाही. उदाहरणादाखल, इंटर सायन्सच्या वर्गात त्यांची गणिताची व्याख्याने ऐकलेल्या एका विद्यार्थ्याची आठवण नमूद करता येईल. ते म्हणे सांगायचे, 'तुम्हाला यातले काही कळणार नाही. पण नुसते ऐकून घ्या. पुढे कधीतरी उपयोगी पडेल.' त्यांचे व्यक्तिमत्त्व व दरारा असा कडक की सामान्य विद्यार्थी त्यांच्याशी बोलण्यासही धजत नसे. अडवून शंका विचारणे तर दूरच राहिले.

वरच्या वर्गासाठी, म्हणजे खास गणिताचे पदवीचे व पदव्युत्तर विद्यार्थी असलेल्या वर्गासाठी त्यांची मोजमापपट्टी थोडी जास्तच कडक असावी. विद्यार्थ्यांना, व्यवस्थित कालवलेले घास भरवणे त्यांना मान्य नव्हते. उलट विद्यार्थ्याने स्वतः खूप मेहनत घेतली पाहिजे, अभ्यासात ढिलाई करता कामा नये. तसेच अर्ध्याकच्च्या ज्ञानात समाधान मानता कामा नये अशी त्यांची अपेक्षा होती. नंतरही इतर क्षेत्रांत त्यांच्याबरोबर काम करू इच्छिणाऱ्या व्यक्तींकडून, तसेच अन्य संशोधकांकडूनही त्यांनी हीच अपेक्षा बाळगली व त्याबाबत कमी पडणाऱ्यांना आपल्या काटेरी जिभेचे व तितक्याच तीक्ष्ण लेखणीचे फटकारे देऊन खूप शत्रू निर्माण केले.

यामुळे वर्गात ते फक्त सैद्धान्तिक शिकवत. प्रश्नांची उत्तर सांगणे, उदाहरणे सोडवून देणे वगैरेसाठी त्यांनी फळा कधी वापरला नाही. फारतर उत्तराची दिशा ते सूचित करत. त्यांच्या हाताखाली पदवी व पदव्युत्तर गणिताचा अभ्यास केलेल्या एका उत्तम



विद्यार्थ्याच्या आठवणीनुसार, एकदा विद्यार्थ्यांनी त्यांना काही कठीण उदाहरणे पूर्ण सोडवून दाखविण्याचा आग्रह धरला, सरांना स्वतःलाच उदाहरण पूर्ण सोडविता येत नसावे अशी शंका विद्यार्थ्यांना आली होती. कोसंबींनाही ते जाणवले. तेव्हा मात्र त्यांनी दोन-तीन खूप कठीण प्रश्न घेऊन ते व्यवस्थित समजावून, सविस्तर सोडवून दाखवले. यानंतर ते पुन्हा आपल्या मूळ वळणावर परतले. याबाबत स्वतःची भूमिकाही त्यांनी स्पष्ट केली. 'एखादे प्रमेय, एखादा सिद्धान्त समजून घेणे, हे खरे महत्त्वाचे. ते समजावण्याचे काम माझे. तेव्हा समजले नसेल तर दहादा विचारा, मी पुन्हा पुन्हा विशद करून सांगीन. पण एकदा सिद्धान्त समजल्यावर त्याचा वापर करून प्रश्न सोडवणे तुम्हाला आले पाहिजे! सिद्धान्त समजला, पण प्रश्न सोडविता येत नाही याचा अर्थ एकतर तुम्हाला सिद्धान्त पूर्ण कळलेला नाही वा प्रश्न सोडविण्यासाठी पुरेशी चिकाटी न दाखविता तुम्ही आळशीपणा करताहात. मग तुम्ही पदवी मिळविण्याच्या योग्यतेचे नव्हेत.'

सैद्धान्तिक पातळीवर ही खरोखरच उत्तम, नाव न ठेवता येण्यासारखी भूमिका होती. परंतु व्यवहारिक पातळीवर याचे परिणाम वेगळे झाले. समजत नसल्याने व परीक्षेच्या दृष्टीने उपयोगाचे नाही म्हणून बरेच विद्यार्थी त्यांच्या वर्गाला दांडी मारत. अधुनमधून त्यांच्या शिकवण्याविरुद्ध वर तक्रारीही जात.

या गोष्टी अखेर त्यांच्या विरोधात गेल्या, व अशा कारणांमुळे फर्गसन सोडण्याची पाळी त्यांच्यावर आली. ही आपल्या परीक्षार्थी शिक्षणपद्धतीची शोकान्तिका आहे, असे कोसंबींचे एक जवळचे सहकारी व मित्र प्रा. व्ही. व्ही. गोखले यांनी नमूद केले आहे. ही अर्थात् बरीच पुढची गोष्ट झाली, व तीही काही अंशी खरी मानली पाहिजे. कारण व्यवस्थापनाशी बिघडलेले संबंध तुटण्याइतके ताणले गेले, तेव्हा या तक्रारी केवळ निमित्तमात्र म्हणून वापरल्या गेल्या असतील, अशीही खूप शक्यता आहे.

तसे पाहता या परिस्थितीची चांगली जाणीव कोसंबींना होती. परंतु तडजोड करणे त्यांच्या स्वभावात नव्हते. 'हुशार विद्यार्थ्यांकरिता मी एक चांगला शिक्षक आहे., अशी माझी समजूत आहे' असे उद्गार त्यांनी आपल्या एका लाडक्या विद्यार्थ्याजवळ काढले होते. पण बहुसंख्य विद्यार्थ्यांना आपले शिकवणे समजत नाही हा आपला दोष नव्हे, ही त्यांची भूमिका! त्यातच त्यांची वृत्तीही शक्यतो स्वतःच एकांडेपणे काम करण्याची होती. त्यामुळे स्वतःच्या भलाईसाठी का होईना विद्यार्थी गोळा करावे, त्यांच्याकडून काम करवून घेऊन, प्रसंगी त्यांना मदत करून, आपला दबदबा निर्माण करावा अशी योजकतेची भावनाही त्यांच्याकडे नव्हती. जे काही चांगले विद्यार्थी त्यांना भेटले त्यांना कोसंबींनी मनापासून, अगदी फावला वेळ खर्चूनही, शिकवले. आणि मग अखेरपर्यंत ते विद्यार्थी कोसंबींना आपले गुरू मानत राहिले; त्यांची भेट घडली नसती तर आपले आयुष्य वेगळ्या दिशेने गेले असते असे मनापासून सांगत राहिले. परंतु येथेही स्वतः त्या विद्यार्थ्याने पुढाकार घेणे व कोसंबींच्या कसोटीस उतरणे आवश्यक असे. मदतीचा वा प्राथमिक मार्गदर्शनाचा हात त्यांच्याकडून प्रथम अपेक्षिणे व्यर्थ होते.

यासंबंधी एक किस्सा सांगण्याजोगा आहे. एकदा एक हुशार, चुणचुणीत विद्यार्थिनी

त्यांच्याकडे आली व म्हणाली, 'मला गणितात संशोधन करायचे आहे.' कोसंबींनी विचारले की 'कोणत्या शाखेत संशोधन करू इच्छितेस;' तेव्हा ती उत्तरली, 'कोणत्याही चालेल.' मग तिला अधिक समजावण्याच्या भरीस न पडता कोसंबी म्हणाले, 'तू भलतीच हुशार दिसतेस. पण मला गणितातील काही मर्यादित शाखांत थोडीफार गती आहे. त्यात काम करायची इच्छा असेल तर हे दहा संदर्भ वाचून, समजून घे, व मगच माझ्याशी बोलायला ये.' ती बिचारी विद्यार्थिनी पुन्हा काही आली नाही.

अशाप्रकारे शिक्षक म्हणून ते फारसे सफल झाले नाहीत, तरी गणितातील आपल्या संशोधनकार्यात मात्र त्यांनी येथे चांगलीच प्रगती केली. फर्गसनात येण्यापूर्वीच पाथ स्पेसेस, डिफरेन्शियल जॉमेट्री या विषयांत संशोधनाला त्यांनी सुरुवात केली होती व त्यांचे आठ संशोधनलेखही प्रसिद्ध झाले होते. एक उगवता तरुण गणितज्ञ म्हणून त्यांचे नाव भारतीय गणितक्षेत्रात मान्यता पावत होते. पुण्यास आल्यावर १९३४ साली वर्षभरातच पहिले 'रामानुजन स्मृती पारितोषक' त्यांना मिळाले. त्याच वर्षी बंगलोर येथे रामन यांनी भारतीय विज्ञान अकादमीची स्थापना केली यावेळी देशातील निवडक प्रस्थापित, तसेच तरुण व होतकरू वैज्ञानिकांना अकादमीचे संस्थापक (फाऊंडेशन) फेलो म्हणून निवडले गेले. कोसंबींचे नाव या संस्थापक फेलोंमध्ये होते. त्यांच्याबद्दलच्या अपेक्षांची ही पावतीच मानली पाहिजे.

फर्गसनातील सुरुवातीच्या काळात त्यांनी स्वतःला गणिती संशोधनामध्ये बुडवून घेतल्याचे दिसते. रँग्लर परांजपे यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या इंडियन मॅथेमॅटिकल सोसायटीच्या कार्यक्रमांत बनारसला आल्यापासून त्यांनी भाग घ्यायला सुरुवात केली होती. सोसायटीचे ग्रंथालय फर्गसनातील अँफीथिएटरच्या इमारतीत वसलेले होते. त्याचा पुरेपूर फायदा घेण्याची संधी त्यांना आता लाभली. इं. मॅ. सोसायटीचे हे ग्रंथालय, स्वतःचा खाजगी ग्रंथसंभार, व आपल्या विशिष्ट संशोधन-क्षेत्रांतील आघाडीवरच्या गणितज्ञांशी पत्रव्यवहाराद्वारे चालू असलेला संपर्क, यांच्या आधारे त्यांनी आपले गणितीज्ञान व संशोधन चांगल्यापैकी अद्यावत ठेवले होते. गणितातील त्यांचे चौदा शोधनिबंध १९३३ ते ३९ या काळात प्रसिद्ध झाले. यांतील सात मान्यवर परदेशी संशोधनपत्रिकांत होते (एक जर्मन, एक जपानी, दोन फ्रेंच, तर तीन इंग्लिश पत्रिकांत). बाकीचे मुंबई विद्यापीठ, भारतीय विज्ञान अकादमी व भारतीय गणिती सोसायटीच्या पत्रिकांत छापून आले.

त्यांच्या विषयांतील तेव्हाच्या आघाडीवरच्या गणितज्ञांच्या तोडीचे व सर्वसाधारणपणे त्याच मार्गाने जाणारे कोसंबींचे काम होते असे उल्लेख आंद्रे वाईल व रँग्लर नारळीकर यांनी केले आहेत.

कोसंबींचे मित्र प्रा. सिद्दिकी यांनी आपल्या आठवणीत दुसऱ्या विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी त्यांच्याबरोबर काम करण्यासाठी पाठविला गेल्याचे लिहिले आहे. तर कोसंबींचे एक विद्यार्थी व नंतर दीर्घकाळ त्यांच्या संपर्कात राहिलेले बा. आ.



ओळकर यांनी, एका मुस्लिम विद्यार्थ्याची डॉक्टरेटची तयारी कोसंबींनी अवघ्या दोनेक वर्षात करून घेतली व तो एक विक्रमच होता असे सांगितले आहे. पण हा एक अपवाद म्हटला पाहिजे. कारण एकूण संशोधनाबाबत ते विद्यार्थ्यांपासून व विद्यार्थी त्यांच्यापासून दूरच राहिलेले दिसतात. तसे पाहिले तर फर्गसनातील गणितविभागातील सहकाऱ्यांनीही त्यांच्या उपस्थितीचा व क्षमतेचा फायदा घेऊन गणितात संशोधन करण्याचे काही प्रयत्न केल्याचे दिसत नाही. तेव्हा याबाबत विद्यार्थ्यांना दोष देण्यातही फारसा अर्थ नाही.

मात्र आपल्या संशोधनासाठी चर्चेची देवाणघेवाण करण्यासाठी विद्यार्थी वा निकटचे सहकारी उपलब्ध नसले तरी देशातील इतर गणितज्ञांबरोबर त्यांचा संपर्क टिकून होता. भारतीय गणिती सोसायटीच्या सभा व अधिवेशनानिमित्त प्रा. सिद्दिकी, रँग्लर नारळीकर यांच्याशी त्यांचा जवळचा परिचय झालेला. त्यांचे अलिगढचे सहकारी डॉ. विजयराघवनही अनेक वेळा त्यांना भेटत. अर्थात् या गाठीभेटीतून चर्चा घडून येत असली तरी कोणाबरोबर त्यांचे संशोधनात्मक सहकार्य झाले नाही.

कोसंबींचे १९३० ते ३८ या कालखंडातील सर्व संशोधनलेख गणितातील होते. गणितातील त्यांचा रस व निर्मितिक्षमता तशी शेवटपर्यंत टिकून राहिली व उर्वरित आयुष्यात गणितातील आणखी चाळीसएक लेख त्यांच्या नावावर जमा झाले. जवळ जवळ दरवर्षी नेमाने त्यांचे एक-दोन लेख निरनिराळ्या गणिती संशोधन पत्रिकांत प्रसिद्ध होत राहिले. मृत्युपूर्वी त्यांनी पूर्ण केलेले (परंतु अप्रकाशित राहिलेले) त्यांचे शेवटचे हस्तलिखित शुद्ध गणितातील नंबर थिअरीवरचे होते.

परंतु १९३९ पासून त्यांचे संशोधनक्षेत्र रुंदावल्याची चिन्हे दिसू लागली. कारण तेव्हापासून गणिताबरोबरच इतर विषयांवरचे त्यांचे लिखाण व संशोधन प्रसिद्ध होण्यास सुरुवात झाली. संस्कृत साहित्य व प्राचीन संस्कृत ग्रंथांच्या चिकित्सक आवृत्ती, प्राचीन नाण्यांच्या अभ्यासासाठी संख्याशास्त्राचे उपयोजन, प्राचीन भारतीय इतिहास, तसेच इतिहासशास्त्र, उत्खननशास्त्र, अशा विविध विषयांत त्यांनी पुढें जे मूलभूत व पथदर्शक कार्य केले आणि एक महत्त्वाचे भारतीय वैज्ञानिक व पंडित (स्कॉलर) म्हणून जागतिक मान्यता प्राप्त केली त्या बहुढंगी व बहुरंगी कार्याची सुरुवात यावेळी झाली. त्याचबरोबर मार्क्सवादी ऐतिहासिक भौतिकतावादी दृष्टिकोनातून प्राचीन व अर्वाचीन घटनांवर टीकाटिप्पणी, विज्ञान व समाज यातील परस्परसंबंधांचा वेध, अशा प्रकारचे सामाजिक प्रबोधन करणारे लिखाणही त्यांनी याच सुमारास सुरू केल्याचे दिसते.

त्या दृष्टीने १९३९ साल त्यांच्या कारकीर्दीतील स्थित्यंतराचे वर्ष होते असे म्हणावे लागेल! घरगुती पातळीवर त्यांच्या कुटुंबास पूर्णता आली ती याच वर्षी. १० नोव्हेंबर १९३५ ला त्यांची मोठी मुलगी माया हिचा जन्म झाला होता. तर २४ एप्रिल १९३९ ला धाकटी मुलगी मीरा जन्माला आली.

१९३९ ते ४४ या पाच वर्षांच्या काळात एकूण ३२ लेख त्यांच्या नावे प्रसिद्ध

झाले. त्यातील बारा गणितातील तर इतर विभिन्न ज्ञानक्षेत्रांशी संबंधित होते.

नाणकशास्त्रातील पाच लेखांत त्यांनी ऐतिहासिक अभ्यासाला गणितीज्ञानाची जोड देण्याचा प्रयत्न केला. साधारणपणे नाण्यांवरील मुद्रा, चित्रे, अक्षरे यांचे वाचन व वर्णन करणे आणि वजन, आकार, व धातू निश्चित करणे या पातळीवर नाणकशास्त्राचे काम चालले होते. फुटकळ सापडणाऱ्या नाण्यांबद्दल अधिक काही करणे शक्यही नव्हते. परंतु तक्षशीला वगैरेसारख्या अनेक ऐतिहासिक स्थळी उत्खननात जुन्या नाण्यांचे एकगठ्ठा संग्रह सापडलेले होते, व येथे गणिती तत्त्वे लावणे शक्य होते.

नाणी म्हणजे त्या त्या काळातील राजांच्या नामोनिशाणीचे एक-प्रतीक हे खरेच. परंतु त्यांचा मुख्य व्यावहारिक उद्देश म्हणजे आर्थिक व्यवहारातील चलनवलन व देवाणघेवाणीचे ते एक साधन. त्याअर्थी काही ऐतिहासिक माहिती या नाणेसंग्रहातून मिळविण्याचा प्रयत्न कोसंबींनी केला व त्यात ते बरेच यशस्वीही झाले.

काळजीपूर्वक नाणी साफ करून फर्गसनातील रसायनशास्त्र विभागातील संवेदनाक्षम तराजूवर त्यांनी शेकडो नाण्यांची बारकाईने वजने केली. सारख्या नाण्यांच्या वजनांतील वापरामुळे झालेल्या झीजेतील सूक्ष्म फेरफार त्यांनी नोंदविले व त्यांचे आलेख काढले. संख्याशास्त्रीय कसोट्या लावून या नाण्यांचा चलनवेग, त्यांची कालनुक्रमे रचना, याविषयी वैज्ञानिक कसोटीला उतरू शकतील असे निष्कर्ष काढण्यात ते यशस्वी झाले. हे आलेख तसेच नाण्यांवरील टांकसाळीच्या व व्यापारी पेढ्यांच्या खुणा यांवरून त्या नाण्यांच्या चलनी काळातील परिस्थितीसंबंधीही तर्क करणे त्यांना शक्य झाले.

जुन्या काळातील अशा साठवून पुरून ठेवलेल्या नाण्यांबद्दल अनेक घटक अज्ञात होते –पाडणाऱ्यांपासून वापरणारे व साठवून ठेवणारे सर्वच अनामिक व अनिश्चित. अशा परिस्थितीत आलेखातून काही निष्कर्ष काढायचे म्हटले तरी त्याला तुलनेसाठी काही परिमाण जरुर होते. हे परिमाण तयार करायला त्यांनी शेकडोनी चालू चलनी नाणी गोळा केली, त्यांची मोजमापे घेऊन आलेख काढले. यासाठी वेगवेगळ्या बँकांच्या शाखांत जाऊन तेथे जमा झालेली विविध प्रकारची नाणी घेऊन येणे असे उद्योगही त्यांना करावे लागले. मात्र यामुळे नाणकशास्त्राला ठोस गणिती पाया मिळवून देण्यात त्यांना यश आले.

रामन त्यांच्या भारतीय विज्ञान अकादमीच्या 'करंट सायन्स' या पत्रिकेत नाण्यांवरचा कोसंबींचा पहिला लेख ४० साली प्रसिद्ध झाला. पुढील वर्षीच 'न्यू इंडियन अँटिक्वेरी' या पत्रिकेतील 'ठसे मारलेल्या चांदीच्या नाण्यांचा अभ्यास व मोजमापे' (ऑन द स्टडी अॅन्ड मेट्रॉलॉजी ऑफ सिल्व्हर पंच-मार्कड् कॉईन्स) हा महत्त्वाचा प्रदीर्घ लेख तब्बल ६३ पानी होता. त्यांच्या मृत्यूनंतर नाणकशास्त्रावरील लेखसंग्रहाचे त्यांचे स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध झाले. इतकी भरीव कामगिरी त्यांनी या विषयात केली.

अशा प्रकारे प्राचीन नाणी हाताळत असताना त्यांच्या मनात भारतीय इतिहासाबद्दल अनेक प्रश्न उमटत गेले. ही नाणी पाडणारे राजे, महाराजे होते तरी कोण? त्यांचे राज्य



किती प्रदेशावर विस्तारले होते? त्यावेळची प्रजा कोणते उद्योगधंदे करीत होती? व्यापारी कसला व्यापार किती प्रमाणावर करत होते? सामान्य जनतेचे राहणीमान कसे होते? हे प्रश्न उत्सुकता वाढविणारे होते. नाण्यांच्या अभ्यासावरून त्या काळातील सरासरी परिस्थितीची अस्पष्टशीदेखील कल्पना येणे शक्य नव्हते.

खोलात जाण्याचा प्रयत्न केल्यावर त्यांच्या लक्षात आले की त्या नाण्यांच्या काळातील सर्वसामान्य प्रजेबद्दल सोडाच राजांबद्दलही लिखित स्वरूपात, निश्चित अशी माहिती उपलब्ध नव्हती. जे काही वाङ्मय उपलब्ध होते त्यात ऐतिहासिक अंश कमी होता. साहित्य, कथा, काव्य, आणि पुराणे भरपूर होती. परंतु ऐतिहासिक नोंदी विरळाच. अन्य समाजांची तुलना करता भारतीय संस्कृतीचे सर्वांत महत्त्वाचे अंग म्हणजे तिचे या देशात टिकून राहिलेले सातत्य. या परिस्थितीत रोमन वा इजिप्ती वा मेसोपोटेमियातील केव्हाच नष्ट झालेल्या संस्कृतीचे इतिहास जितक्या निश्चितपणे ज्ञात आहेत तेवढाही प्राचीन भारतीय इतिहास ज्ञात नसावा हा विरोधाभास आव्हानात्मक होता.

हे आव्हान स्वीकारताना कोसंबींचे पाऊल प्राचीन भारतविद्या (इंडॉलॉजी) या क्षेत्रांत पडले. पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या पत्रिकेत 'तीन इंडो-युरोपिअन जमातीमधील राष्ट्रीय गुणधर्मांचा उदय' हा त्यांचा इंग्रजी लेख ४० सालीच प्रसिद्ध झाला. कोसंबींनी स्वतःच या लेखाचे वर्णन आपली 'प्राचीन भारतविद्याक्षेत्रातील चाचपणी' असे केले आहे.

प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासात शिरताना कोसंबींना आणखी एका गोष्टीची गरज भासली. ती म्हणजे संस्कृतचे चांगले ज्ञान प्राप्त करण्याची. याबाबत अनुकूल परिस्थितीही त्यांना लाभली होती. वडिलांच्यामुळे संस्कृताभ्यासाची परंपरा घरात होतीच. शिवाय फर्गसनातील त्यांचे खास जवळचे मित्र प्रा. गोखले संस्कृतज्ञ होते, व त्यांचे सहकार्य सहज उपलब्ध होते. शिवाय घराजवळील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत संस्कृताभ्यासासाठी भरपूर साधनेही उपलब्ध होती. मुख्य म्हणजे संस्थेतील डॉ. वि. सी. सुखठणकरांशी कोसंबींचा चांगला परिचय होता. सुखठणकर यावेळी महाभारताची चिकित्सक आवृत्ती तयार करण्याच्या प्रचंड प्रकल्पाची साधने जुळविण्याच्या कामात गढलेले होते. सुखठणकरांच्या या कामामुळे कोसंबी फार प्रभावितही झाले होते. कोसंबींच्या संस्कृत आत्मसात करण्याच्या कल्पनेला सुखठणकरांचे उत्तेजन लाभले. त्यांनी कोसंबींना एक सोपी गोष्ट म्हणून, भर्तृहरीच्या सुभाषितांपासून सुरुवात करण्याचा सल्ला दिला आणि कोसंबी भर्तृहरीकडे वळले. फर्गसन महाविद्यालयाच्या वार्षिकात 'भर्तृहरीच्या काव्यातील विरक्तीचा दर्जा' हा एक टीकात्मक लेख त्यांनी ४१ साली लिहिला. प्रस्थापित परंपरावादी विद्वानांच्या भारतीय इतिहास, साहित्य, व संस्कृतीकडे बघण्याच्या दृष्टिकोनापेक्षा वेगळा व परखड दृष्टिकोन कोसंबींनी मांडला. त्याची पहिली झलक येथे दिसून आली.

या दीर्घलेखात एकीकडे कवी म्हणून भर्तृहरींचा गौरव करतानाच, त्यातील विरक्तीचे वर्णन कसे फोल व उथळ आहे हे मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कोसंबींचे म्हणणे

थोडक्यात असे होते की भर्तृहरी हा लोककवी नव्हता, तर राजदरबारात वावरणारा बुद्धिजीवी वर्गातील कवी होता. त्याचे अनुभवही सच्चे नव्हते. त्यामुळे कबीर, तुकाराम, तुलसीदास यांनी जनमानसात जे स्थान कमावले ते भर्तृहरीला लाभले नव्हते. सध्याच्या भाषेत ज्याला बुद्धिजीवी मध्यमवर्ग म्हटले जाईल अशा वर्णाचा तो प्रतिनिधी होता. भारतीय समाजाला दास्याच्या गुंगीत ठेवण्यासाठी देशी तसेच परकी सत्ताधाऱ्यांच्या हातातील सर्वात उपयुक्त हत्यार म्हणून या वर्गाने कामगिरी बजावली असे लिहून कोसंबींनी पुढे म्हटले की बऱ्याच अंशी अजूनही हा वर्ग हेच काम करीत आहे.

भर्तृहरीसारख्या परंपरागत टिकलेल्या महाकवीच्या काव्याचे असे विश्लेषण बहुतेकांना आवडले नसतेच. त्यात स्वतःच्या वर्गाविषयी काढलेले त्यांचे हे उद्‌गार त्यांच्या सहकाऱ्यांना धक्कादायक वाटले. पुढे 'भगवद्‌गीतेची सामाजिक व आर्थिक अंगे' (१९५९) या लेखातही त्यांनी असेच प्रस्थापितविरोधी व धक्कादायक निष्कर्ष काढले, व मोठा रोष ओढवून घेतला. मात्र कोसंबी एवढ्यावर थांबले नाहीत. भर्तृहरीच्या शतकत्रयीच्या अभ्यासावर त्यांनी बरेच श्रम घेतले. नानाविध ठिकाणांहून शतकत्रयीच्या उपलब्ध आवृत्ती बनविण्याचे कार्य त्यांनी पार पाडले.

पंडित कृष्णमूर्ती शर्मांबरोबर त्यांनी अनुक्रमे उत्तरेकडील व दक्षिणेकडील प्रतींवर आधारित शतकत्रयीच्या चिकित्सक आवृत्ती संपादित केल्या, त्या ४५ व ४६ साली प्रसिद्ध झाल्या, तर ४८ साली शतकत्रयीसकट भर्तृहरीच्या सुभाषितांची चिकित्सक आवृत्ती आली. पुढे ५७ साली राम आचार्य यांच्यासह संपादन केलेले 'सुभाषित त्रिशती' हे चौथे पुस्तक बाहेर आले. शतकत्रयीच्या रचनाकाराचा मागोवा घेणारा एक लेखही त्यांनी ४६ साली प्रसिद्ध केला.

खळबळ माजवून, धक्के देऊन का होईना भर्तृहरीवर त्यांनी भरघोस कार्य केले.

नाणकशास्त्र, भर्तृहरीसंबंधी संस्कृतअभ्यास व प्राचीन भारतविद्या या नवीन विषयांत काम करीत असतानाच, ४४ साली त्यांनी अनुवंशशास्त्रातही आपला हात चालविला. या साली 'ॲनल्स ऑफ युजेनिक्स या संशोधनपत्रिकेत 'दि एस्टिमेशन ऑफ मॅप डिस्टन्स फ्रॉम रिकॉम्बिनेशन व्हॅल्यूज्' हा छोटेखानी चार पानी लेख प्रसिद्ध झाला. पेशींमधील रंग (गुण) सूत्रे अनुवंशिकता निश्चित करतात. या रंगसूत्रांमधील निरनिराळ्या जीन्स वा जीन्सगटांमधील 'अंतरे' निश्चित करणारे एक सूत्र त्यांनी मांडले. तोपर्यंत हॉल्डेन यांनी १९१९ साली मांडलेले सूत्र वापरात होते. कोसंबींचे नवे सूत्र अधिक अचूक व परिणामकारक असल्याने अनुवंश शास्त्रज्ञांना प्रयोग करण्यास एक अधिक प्रभावी हत्यार मिळाले. अजूनही वापरले जाणारे हे सूत्र 'कोसंबी फार्म्युला' म्हणून संबोधले जाते, व त्यामुळे एका सर्वस्वी निराळ्या क्षेत्रात कोसंबींचे नाव कोरले गेले.

याच बरोबरीने या काळात साम्यवादीपक्षाच्या मुखपत्रात पुस्तकपरीक्षणे, विज्ञान व विज्ञानाचे सामाजिक अंग अशा प्रकारचे सर्वसाधारण लिखाणही त्यांनी सुरू केले. 'जनचळवळीतील नेतृत्वाचे कार्य,' 'भाषाशास्त्र', 'भारतातील कापडाची निर्मिती व खप' असेही काही लेख त्यांच्या हातून उतरले.

अशा प्रकारे शुद्ध गणितापासून सुरुवात करून संख्याशास्त्र, नाणकशास्त्र, संस्कृत



व प्राचीन भारतविद्या अशी एकेक संशोधनदालने कोसंबी धुंडाळत गेले. ही केवळ एकमार्गी वळणे नव्हती, तर त्यांच्या संशोधनप्रवाहाला फाटे फुटत जाऊन त्यांच्या संशोधनक्षेत्राची व्याप्ती वाढत गेली. अखेर इतिहाससंशोधनाचा प्रवाह अधिक जोमदार झाला, व शुद्ध गणिताचा क्षीण झाला. हे खरे असले तरी शेवटपर्यंत त्यांच्या संशोधनात हे वेगवेगळे प्रवाह वाहतच होते.

कोसंबींनी त्यांच्या 'जनचळवळीतील नेतृत्वाचे कार्य' या, १९४० सालच्या लेखात स्फटिकीकरणाची उपमा वापरलेली आहे. समजा, पाण्यात मीठ विरघळवून त्याचे द्रावण बनवले. अधिकाधिक मीठ मिसळत गेल्यावर एका टप्प्यावर हे द्रावण संपृक्त होते व आणखी मीठ त्यात विरघळू शकत नाही. असे संपृक्त द्रावण अतिशय स्थिर वातावरणात ठेवल्यास बराच काळ त्या द्रवीभूत स्थितीत राहू शकते. परंतु समजा, त्यात थोडी ढवळाढवळ झाली वा एखादा अगदी सूक्ष्म कण जरी पडला तरी त्याच्या स्फटिकीकरणाला सुरुवात होते व अल्पावधीत त्या द्रवाचे घन स्फटिकात रूपांतर होते. एखादा समाज निरनिराळे ताणतणाव, अंतर्गत प्रश्न व समस्या इत्यादींमुळे संपृक्त झाला असता जर एखादी योग्य व्यक्ती नेतृत्वपदी आली तर स्फटिकीकरणाची सुरुवात होऊन त्या समाजात महत्वाचे क्रांतीसदृश बदल घडून येतात, म्हणजे समाजाची परिस्थिती संपृक्तावस्थेची असली तर योग्य नेतृत्व स्फटिकबीजकणाची वा बाह्य हेलकाव्याची भूमिका बजावून त्या समाजात बदल घडवून आणण्यास कारणीभूत ठरते, अशा प्रकारचे विश्लेषण कोसंबींनी केले होते.

हीच उपमा त्यांच्या बाबतीत लावायची तर असे म्हणता येईल की विस्तृत व सखोल वाचन, सूक्ष्म निरीक्षण यांमुळे निरनिराळ्या विषयांतील खूप माहिती त्यांच्याकडे जमा झाली होती. समग्र एकात्म दृष्टिकोनामुळे भिन्न भिन्न क्षेत्रांतील गोष्टींचे परस्परसंबंध जाणवण्याइतकी संवेदनक्षमताही त्यांच्या ठायी होती. व्यापक नजरेने संपूर्ण ज्ञानक्षेत्रावर दृष्टिक्षेप टाकण्याची कुवत व इच्छाही त्यांच्याजवळ होती. त्यामुळे त्यांच्या मनात एक संपृक्त द्रावण तयार झाले होते. कोठून तरी एखादा किंचितसा हेलकावा त्यांना मिळाला असावा आणि मग संख्याशास्त्र, नाणकशास्त्र, संस्कृतसाहित्य, भारतीय इतिहास अशा मार्गाने त्यांच्या ज्ञानाचे स्फटिकीकरण घडून आले.

कोसंबींचे बरेचसे काम (गणितातील धरून) हे अंतःस्फूर्तीतून झाल्यासारखे वाटावे असे आहे. ते एक intuitive स्कॉलर संशोधक होते असे बऱ्याच जणांनी म्हटलेही आहे. वरील प्रक्रियेवरून कदाचित याचा थोडा उलगडा होऊ शकेल. पण एका बाबतीत मात्र हे पूर्ण सत्य होते– त्यांच्या अनुवंशशास्त्रातील छोटेखानी संशोधनलेखाबाबत. त्यातील सूत्र खास 'कोसंबी सूत्र' म्हणून ओळखले जाऊ लागले, इतके ते महत्वाचे ठरले. आणि हा लेख त्यांना एखादी कविता स्फुरावी तसा स्फुरला होता. अनुवंशशास्त्र हा काही त्यांच्या खास अभ्यासाचा विषय नव्हता, मात्र त्यातील घडामोडींची अद्यावत् माहिती व चांगली जाण त्यांना असावी व त्यातून 'कोसंबी सूत्राची' निर्मिती झाली. (यासंबंधी प्रा. ओवेन यांनी केलेले भाष्य सुरुवातीस उद्‌धृत् केलेले आहे.)

गणिताची आवड असूनही त्या क्षेत्रात फार भरीव कामगिरी त्यांच्या हातून झाली

नाही. नंतर गणितातल्या ज्या संशोधनशाखा वाढल्या व पुढे आल्या त्याबाबत कोसंबी पुरेसे अद्यावत नव्हते असे म्हणतात. त्यांच्या स्वतःच्या विशिष्ट संशोधनक्षेत्रातही फार मोलाची भर टाकणे शक्य नाही याचीही त्यांना जाणीव झाली असावी. शुद्ध सैद्धान्तिक संशोधनाबाबत अशी परिस्थिती अनेकांच्या बाबत येतेच. त्यातून कोसंबी अमेरिकेत गणितातील संशोधनाचा अनुभव न घेताच भारतात परतले होते. आणि कदाचित या सुप्त जाणिवेच्या हेलकाव्यामुळे गणितावरचे त्यांचे एकाग्र चित्त इतर क्षेत्रांकडे वळले असावे असा एक कयास करता येईल.

या वेळेसच त्यांच्या लिखाणाचा दुसरा एक प्रवाह होता पत्रकारी, प्रबोधनकारी, व भाष्यकारी लेखनाचा. नाणकशास्त्र, प्राचीन भारत विद्याविषयक संशोधनलेख अशा तांत्रिक स्वरूपाच्या लेखांपेक्षाही या लिखाणामुळे एक पुरोगामी व प्रस्थापितविरोधी विचारवंत म्हणून डाव्या चळवळीत कोसंबींना आदराचे स्थान प्राप्त होण्यास मदत झाली. प्रस्थापितांनी त्यांची जी दखल घेतली तीही या लिखाणामुळे प्रक्षुब्ध होऊनच.

या प्रकारच्या लिखाणास त्यावेळच्या अस्थिर राजकीय परिस्थितीने कोसंबींना प्रवृत्त केले असावे. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर बदलत्या परिस्थितीत देशातील स्वातंत्र्यलढ्याच्या संदर्भातही गोंधळाची परिस्थिती होती. काँग्रेसने प्रथम युद्धाला पाठिंबा देऊन नंतर 'चलेजाव' आंदोलन पुकारले. साम्यवादी पक्षाचा प्रथम या युद्धास साम्राज्यवादी म्हणून विरोध होता, परंतु सोविएत युनियन युद्धात ओढले गेल्यावर हे 'लोकयुद्ध' म्हणून घोषित केले गेले. काँग्रेसमधील गोंधळाच्या परिस्थितीत अनेक विचारवंत, लेखक, कलावंत मंडळी यावेळी साम्यवादी पक्षाभोवती गोळा झाली. कॉ. पुरणचंद जोशी यांच्या सौम्य व समावेशक नेतृत्वामुळे यास बळकटी आली. या परिस्थितीत कोसंबींचाही पक्षाशी संबंध येऊन, त्यांनी पक्षाच्या मुखपत्रात लिखाण करण्यास सुरुवात केली, असे दिसते. एरवी कोसंबींचे लिखाण पक्षाच्या मुखपत्रात येणे कठीणच होते.

अशा प्रकारे, १९३३ ते ४५ या बारा वर्षांतील फर्गसनातील वनवासात केलेल्या ज्ञानसाधनेच्या तपश्चर्येने कोसंबींचे व्यक्तिमत्त्व एक बहुअंगी, बहुस्पर्शी संशोधक आणि एक परखड स्वतंत्र बुद्धीचा मार्क्सवादी विचारवंत म्हणून विकसित झाले.

परंतु असे असूनही याच काळात सामाजिक पातळीवर मात्र एकंदरीत महाराष्ट्रात नव्हे तर खुद्द पुण्यातही ते दुसऱ्या अर्थाने वनवासीच राहिले. विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यात हा विद्वान काही पुणेरी विद्वत्‌जनांच्या सभेत मानाचे स्थान व तदनुषंगिक सन्मान प्राप्त करू शकला नाही. उलट तेथील विद्वत्‌जगात त्यांनी अनेक शत्रू निर्माण केले व त्याची परिणती त्यांनी फर्गसन सोडण्यात झाली. कोसंबी व इतर प्रस्थापित यांच्यात बराच कडवटपणा निर्माण झाला, परंतु याचे श्रेय बऱ्याच अंशी कोसंबींकडे जाते. कोसंबींच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक बोचणारे कंगोरे होते. ते शीघ्रकोपी होते. त्यांच्याबद्दल लिहिताना अनेकांनी 'त्यांना मूर्खपणा अजिबात सहन होत नसे' असे



वारंवार म्हटले आहे. अशा वेळी ते फटकन लागणारे व तोडणारे शब्द बोलून जात. समोरची व्यक्ती वयाने वा मानाने किती ज्येष्ठ वा कनिष्ठ आहे याचा विचार करण्याचे भान त्यांना उरत नसे. एवढेच नव्हे, अनाठायी तापटपणाही त्यांच्या अंगी होता, कित्येकदा बारीकसारीक क्षुल्लक चुकीकरताही ते दुसऱ्याला तोडून बोलत. त्यांना बौद्धिक अहंकार फार होता. त्यांच्या स्वतःच्या क्षमतेच्या जोडीस नम्रता नसल्यामुळे इतरांची बौद्धिक पातळी फार कमी आहे असे समजण्याची त्यांची प्रवृत्ती होती. भरीस त्यांच्या मनात एक हूड व्रात्य मुलगाही होता. त्यामुळे गंमत म्हणून दुसऱ्यास टप्पल मारावी, त्याची टोपी उडवावी असा मोह त्यांना होत असे. शिवाय दुसऱ्यांना त्यांच्या चाकोरीबद्ध विचारांतून बाहेर काढण्यासाठी विरुद्ध टोकाची भूमिका मांडण्याचे धक्कातंत्र वापरण्याचीही त्यांची प्रवृत्ती होती. आपण होऊन भोवतालच्यांशी संवाद साधणे सोडाच, पण कोणी स्वतः होऊन आल्यास त्याला शक्यतो नाउमेद करावे, असे त्यांचे वरपांगी तरी वागणे असे.

वानगीदाखल काही किस्से नमूद करावेसे वाटतात. कोसंबींची कीर्ती ऐकून अनेक तरुण मंडळींना त्यांच्याकडून मार्क्सवाद, इतिहास वगैरे विषयांवर काही मार्गदर्शन घडावे असे वाटे. पण अभ्यासमंडळ घेता का असे विचारावयास गेलेल्यांना ते सुनावत, 'जरुर घेईन, पण एक अट आहे. जे कोणी पहिल्या खेपेस येतील त्यांनी न चुकता नंतर प्रत्येक वेळी हजर असलेच पाहिजे, व तेही ठरल्यावेळी. याची जबाबदारी घेत असाल तर इतरांना घेऊन या, नाहीतर नको!' एवढा नियमितपणा व वक्तशीरपणा इतरत्र पाळला जाणे ही मुश्किल, तर आपल्याकडे, व तोही अशा बाबतीत कोण पाळणार? तेव्हा विचारणारा बिचारा हाय खाऊन परत जायचा. त्यांना सहज कौतुकाने भेटायला जाणाऱ्यांनाही प्रथम आडवेतिडवे प्रश्न विचारून ते भांबावून टाकत व मग बहुधा उडवून लावत. आणि हे केवळ सामान्य, अनोळखी लोकांपुरते मर्यादित नव्हते. तर मान्यवर, नामांकित व्यक्तींनाही त्यांनी हीच वागणूक दिल्याची उदाहरणे आहेत. एकदा पु. ग. सहस्रबुद्धे त्यांच्याशी मार्क्सवादावर चर्चा करावी या उद्देशाने आले. कोसंबींनी सुरुवातीसच त्यांना प्रश्न केला की 'ही ही पुस्तके तुम्ही वाचली आहेत का?' त्यांनी नाही म्हणताच 'आधी ती वाचून या मग आपण बोलू' असे म्हणत त्यांनी भेट संपवली, पाच-दहा मिनिटे अवांतर बोलण्यात काही वेळ दवडला नाही.

त्यांच्या या अशा वागण्यातून रँग्लर र. पु. परांजपेपण सुटले नाहीत. परांजपे तसेच पुण्यातील इतर रँग्लर मंडळी विद्याक्षेत्रात वावरत असूनही काही संशोधन न करता व्यवस्थापन व इतर गोष्टीत जास्त रस घेतात याचा कोसंबींना राग होता. एकदा रँ. परांजपे कोसंबींच्या घरावरून जात असता, धर्मानंदांच्या मुलाचे कसे काय चाललेय याची सहज चौकशी करायला आत शिरले. कोसंबींनी त्यांना इतरांप्रमाणेच बाहेरच्या व्हरांड्यातील बाकावर बसवले व विचारले, 'काय काम आहे?' ते म्हणाले, 'काही नाही, सहज चौकशीला आलो, कसे काय चाललेय विचारायला' कोसंबींनी 'ठीक चाललेय' म्हणत त्यांना रामराम केला! रँ. परांजपे झाले तरी आधी वेळ न ठरवता व काम नसता आले म्हणून त्यांनाही कोसंबींनी ही वागणूक दिली. अशा वागणुकीचे

परिणाम इतरांवर काय होत असतील, हे उघडच आहे.

फर्गसनचे संचालकमंडळ देणग्या मिळविण्यासाठी संस्थानिकांना आवाहन करीत असे. त्यांना कोसंबी बोलून दाखवत, 'संस्थानिकांचा जमाना केव्हाच संपला, आता भांडवलशाही युग चालू आहे. देणग्यांसाठी संस्थानिकांकडे कसले जाता, भांडवलदारांकडे जा, चांगले पैसे मिळतील.' सूचना खरोखरच योग्य. पण तीही त्यांनी अशा खोचकपणे केलेली की ऐकणारा, कारण नसता दुखावणार-वैतागणार.

त्यांना ग्रीक भाषा येत होती. फर्गसनात आल्यानंतर त्यांनी ग्रीक तत्वज्ञान वाचले आणि मग एकदा तत्वज्ञानाच्या एका ज्येष्ठ प्राध्यापकाला सुनावले की, 'तुम्ही तत्वज्ञानाचे प्राध्यापक मग ग्रीक भाषा का शिकला नाहीत? म्हणजे मूळ स्रोतांचा अभ्यास करू शकला असतात!'

प्रत्येक वेळी त्यांचाच दोष असे असेही नाही, इतरांचा कमीपणाही कित्येकदा असेच. एकदा एक फ्रेंच पाहुणे आलेले. त्यांचे भाषण इंग्रजीतून सांगण्यासाठी फ्रेंचचे प्राध्यापक उभे राहिले. प्राध्यापकांनी पाहुण्यांचे भाषण आधीच भाषांतर करून लिहून आणलेले. पण भाषण सुरू झाल्यावर गडबडीत त्यांच्या हातातील कागद पुढेमागे झाले, व प्राध्यापकमहाशय गडबडले. तेव्हा कोसंबी चटकन् उठले आणि पाहुण्यांच्या फ्रेंचचे थेट भाषांतर करू लागले. बिचारे फ्रेंचचे प्राध्यापक खजिल होऊन गेले!

कोसंबींच्या या गुणांची त्यांच्या मित्र व स्वकीयांनाही चांगलीच जाणीव होती. धर्मानंदांनी एकदा म्हटले होते की, 'आमच्या बाबाचा (दामोदरचा) अभिमान त्याच्यापेक्षाही मोठा आहे.'

पुढे साम्यवादी पक्षाशी जेव्हा जास्त संबंध आला तेव्हा ज्येष्ठ नेते कॉ. अधिकारी यांच्याशी कोसंबींची चांगली मैत्री जमली. कॉ. अधिकारी जर्मनीतून डॉक्टरेट संपादन करून आलेले एक वैज्ञानिक, म्हणून कदाचित त्यांचे जुळले असेल. एकदा धर्मानंदांची डॉ. अधिकारींशी भेट झाली असता त्यांनी विचारले, 'आमचा बाबा अजून तुमच्याशी भांडला नाही? आश्चर्य आहे!' अधिकारी हसत उतरले, 'आमचे भांडण होत नाही, कारण नेहमी बोलणे ते करतात व मी फक्त ऐकत असतो.'

अशीच एक गमतीशीर प्रतिक्रिया पुण्यातील भाषापंडित प्रा. वाडेकर यांनी व्यक्त केलेली. कोसंबी १९४९-५० मध्ये अमेरिकेस पुन्हा एकवार गेले तेव्हा आईन्स्टाईन यांची भेट घेण्याचे त्यांनी ठरवले होते. यावेळी वाडेकरांनी एका परिचित व्यक्तीस गमतीने सांगितले, 'कोसंबी सध्या अमेरिकेत गेले आहेत. आईन्स्टाईनला सापेक्षतावाद शिकवायला!' त्यांना समजून घेऊन, सहानुभूतीने वागवणाऱ्या अशा व्यक्ती फारच थोड्या असणे साहजिक होते. बहुतेकांना त्यांच्या या वागण्याने दूरच लोटले. त्यामुळे मित्र थोडे, शत्रू बरेच, व दूर राहून टाळणारे सर्वाधिक, अशी कोसंबींची स्थिती राहिली.

परिणामी, त्यांच्या हातून घडत असलेल्या चांगल्या कार्यासाठीही त्यांच्याभोवती फार माणसे जमणे कठीण जाई. रँ. वि. वि. नारळीकरांच्या आठवणीनुसार एकदा डॉ. विजयराघवन पुण्यात आले असता भारतीय गणित सोसायटीतर्फे त्यांचे व्याख्यान कोसंबींनी आयोजित केले. पण दोन-तीन जणांपेक्षा अधिक कोणी त्यास उपस्थितही



राहिले नाहीत.

त्यांचे व्यक्तिमत्त्व खरोखरीच फणसासारखे होते. अंतर्यामी ते फार प्रेमळ, निस्वार्थी, व सच्च्या मैत्रीला जागणारे होते. सत्य व विद्याभ्यासाची अपार चाड आणि अन्यायाची चीड त्यांच्या रक्तातच भिनलेली होती. त्यांच्या बाह्यांगी काटेरी कवचाला न बिचकता त्यांच्याजवळ जाण्याचे धाडस करणाऱ्यांना त्यांच्या दिलदार स्वभावाचा चांगला अनुभव येत असे. त्यांचे वरपांगी दिसणारे विक्षिप्त, दूर लोटणारे वागणे म्हणजे त्यांनी स्वतःभोवती उभारलेले एक संरक्षक कवच होते. ती एक चाळणी होती. त्यातून पार पडू शकणारे त्यांच्याजवळ जाऊ शकत होते, तर इतर दूर रहात होते. व्यावहारिक पातळीवर मानसन्मान, सत्ता इत्यादी दर्शविणाऱ्या गोष्टींत त्यांना खरोखरच रस नव्हता. सभासंमेलनात बोलावे, सार्वजनिक पातळीवर वावरावे, समित्या वगैरेंवर कामे करावी या गोष्टी त्यांच्या दृष्टीने फार महत्वाच्या नव्हत्या, त्यांची प्रवृत्तीही यास अनुकूल नव्हती. त्यामुळे अशा गोष्टी व असे संबंध टाळणे त्यांना आवश्यकच होते, व ते काम त्यांची वागणूक घडवून आणत होती, असेच म्हणावे लागेल.

त्यांच्या वागणुकीतील कडवटपणामागे त्यांची प्रामाणिक सच्चाईची भावनाही होती. भोंगळपणा, गोलमाल विचार, उक्ती व कृती यांतील अंतर, भोंदूपणा, लाळघोटेपणा, या भारतातील वरिष्ठ व मध्यमवर्गियांत मोठ्या प्रमाणात आढळणाऱ्या गुणांचा त्यांना मनापासून तिटकारा होता. त्यांच्या लढाऊ वृत्तीमुळे, जमेल तेव्हा- संधी मिळेल तेव्हा यावर कडाडून हल्ला करण्यात, बुरखे फाडण्यात त्यांना खरोखरच रसही होता. सर्व प्रकारच्या परस्परविरोधी विचार व कल्पनांना नांदवून घेण्याच्या सर्वसमावेशक वृत्तीमुळे आपला समाज प्रगतिपथावर पुढे न जाता एकाच जागी फार खोळंबून राहिला असे त्यांनी भारतीय संस्कृतीच्या संदर्भात अनेकवार म्हटले आहे.

याबाबत प्रा. हाल्डेन यांनी कोसंबींना दिलेले एक उत्तर उद्‌धृत करणे पुरेसे ठरावे. हाल्डेन हेही असेच विक्षिप्त प्रस्थापितांशी सकारण-अकारण दोन हात करण्यास शिवशिवणारे व्यक्तिमत्त्व. अखेरची काही वर्षे इंग्लंडचे नागरिकत्व सोडून भारतात येऊन त्यांनी येथील नागरिकत्व स्वीकारलेले. येथेही अनेकांचे दंभस्फोट करण्यात त्यांनी कुचराई केली नाहीच. या हाल्डेनना कॅन्सर झाला व त्यांचा मृत्यू समीप आल्याचे स्पष्ट झाले. या दिवसात एकदा कोसंबींनी त्यांना काही कामानिमित्त पत्र लिहिले व शेवटी 'तुमची प्रकृती लवकरच सुधारो' अशी आशा व्यक्त केली. हाल्डेननी प्रत्युत्तर दिले, त्यात शेवटी म्हटले होते– 'मला सहानुभूतीची गरज नाही–जशी ती तुम्हालाही नाही.'

भोवतालच्या घडामोडींत सहभागी होण्याचा थोडाफार काळ त्यांनी फर्गसनात असताना उपभोगला, तो बेचाळीसच्या चलेजाव आंदोलनात. अच्युतराव पटवर्धनांनी भूमिगत असताना एक-दोन दिवस त्यांच्या घरी आसरा घेतला होता. परिणामी नंतर कोसंबींच्या घरासमोर एक गुप्त पोलीस काही काळ नजर ठेवून होता. थोडीफार पैशाची मदत त्यांनी केली. तसेच जखमींना औषधोपचारासाठी मदत करणे व बाँब टाकून महाविद्यालयाची इमारत उडवून लावण्याचे मनोरथ रचू पाहणाऱ्या काही तरुण

विद्यार्थ्यांना त्यापासून परावृत्त करणे, असे कार्य आपण केल्याचे त्यांनीच आपल्या एका पुस्तकाच्या प्रस्तावनेत लिहून ठेवले आहे. बेचाळीसची चळवळ ज्याप्रकारे चालली होती त्यातून काही निष्पन्न होणार नाही असे कोसंबींचे मत होते. परंतु साम्यवादी पक्षाची या चळवळीविरुद्धची भूमिकाही त्यांना मान्य नव्हती. त्यामुळे, ही थोडी सहानुभूती त्यांनी व्यक्त केली असावी. त्यावेळची एकंदर झपाटलेली परिस्थिती, तसेच कोसंबींची डावी व लढाऊ विचारसरणी विचारात घेता हा थोडाफार काठावरचा सहभाग म्हणजे काही विशेष नव्हे. याच काळात आपले जुन्या नाण्यांवरचे संशोधन कितपत अचूक आहे हे ठरविण्यासाठी नेहमीची चलनी नाणी गोळा करून त्यांची अचूक वजने करण्यात, तसेच भर्तृहरीच्या शतकत्रयीच्या पाठभेदांचा तुलनात्मक अभ्यास करण्यातही ते गुंतलेले दिसतात.

परंतु व्यवस्थापनास ते नकोसे झाले असल्याने ही गोष्टही त्या विरोधात नोंदली गेली असणे साहजिक दिसते. कोसंबींचे व्यवस्थापनाशी अखेरचे भांडण होण्यास लवकरच एक निमित्त घडूनही आले.

भारतीय गणित सोसायटीच्या फर्गसनातील अँफीथिएटरच्या इमारतीतील ग्रंथालयात १९४४ ते ४६ या कालावधीकरता कोसंबींची ग्रंथपाल म्हणून नेमणूक झाली होती. या सुमारास प्रा. स. वा. कोगेकर यांची फर्गसनचे उपप्राचार्य म्हणून नव्याने नेमणूक झाली होती. भारतीय गणित सोसायटीच्या ग्रंथालयात पार्टिशन टाकून एक खोली वेगळी काढून ती नवीन उपप्राचार्यांच्या कचेरीसाठी दिली गेली. ही गोष्ट कोसंबींची पूर्वसंमती घेऊन झाली असावी अशी प्रा. कोगेकरांची समजूत होती. पण तसे झालेले नव्हते. त्यामुळे तापट स्वभावाचे कोसंबी भडकले. चिडाचीड व वादावादी झाली. राष्ट्रीय पातळीवरील संस्थेचा हा अपमान आहे अशी भूमिका कोसंबींनी घेतली. याचा एक परिणाम म्हणजे हे ग्रंथालय मग फर्गसनातून मद्रासला डॉ. विजयराघवन काम करीत असलेल्या संस्थेत हलवले गेले ! कोगेकरांच्या म्हणण्यानुसार दुसरा परिणाम झाला तो कोसंबींनी फर्गसन सोडण्यात. कोसंबींशी घनिष्ठ मैत्री असलेल्या व डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य असलेल्या गोखल्यांच्या आठवणीनुसार, सोसायटीच्या सभेत कोसंबींची नेमणूक रद्द करण्याचा प्रस्ताव मांडला गेला. त्यांचे शिकवणे विद्यार्थ्यांना समजत नाही मग त्यांना पगार देण्याचा भार संस्थेने का सोसावा असा प्रश्न गणित विभागातीलच, कोसंबींना कनिष्ठ असलेल्या एका सहकाऱ्याने उपस्थित केला. फक्त दोन आजीव सदस्यांनी याविरोधी मत टाकले.

अशा रीतीने कोसंबींची फर्गसनातील कारकीर्द संपुष्टात आली—दोन्ही बाजूंना भूषणावह ठरू नये अशा प्रकारे !

मात्र याचा परिणाम शेवटी उभयपक्षी चांगलाच झाला. एकीकडे कोसंबींसारखा बोचणारा काटा दूर झाल्याने फर्गसनातील बुजूर्गांना आराम मिळाला असावा. तर दुसरीकडे कोसंबींना पुण्यातील स्थानिक स्वरूपाच्या वातावरणातून बाहेर मुंबईत टाटा मुलभूत संशोधन संस्थेच्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय वातावरणात पदार्पण करण्याची संधी प्राप्त झाली.



फर्गसनातील त्यांच्या अखेरच्या काही वर्षांत कोसंबींचा डॉ. होमी भाभांशी परिचय घडून आला होता. भाभा १९३९ सालापासून बंगलोरच्या भारतीय विज्ञानसंस्थेत भौतिकीचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले होते. कोसंबींचा बंगलोरशी जुनाच संबंध होता. मोठी बहीण, माणिकताईंचे यजमान डॉ. राम प्रसाद यांचे बंगलोरात घर होते व कोसंबी तेथे जात येत असत. शिवाय बंगलोरच्या संशोधनजगताला कोसंबींचा परिचय होताच. रामनांच्या भारतीय विज्ञान अकादमीचे फाऊंडेशन फेलोपद १९३४ साली त्यांना मिळाले. अकादमीच्या करंट सायन्स' या पत्रिकेत १९४० च्या सुमारास त्यांचे नाणकशास्त्रावरचे व अन्य लेखही प्रसिद्ध होत होते. या सुमारास भारतीय विज्ञान संस्थेमध्ये नाणकशास्त्रावर त्यांचे भाषणही आयोजित झाले होते. त्यामुळे भाभांशी यावेळी त्यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आलेला असावा. भाभा त्यावेळी मुंबईत आपली स्वतंत्र संशोधनसंस्था उभारण्याच्या मागे लागलेले होते. संस्थेत भौतिकी व गणित या दोन विषयांत मूलभूत संशोधन सुरू करण्याचा त्यांचा निश्चित मानस होता.

फर्गसनातील वादावादीनंतर कोसंबींनी मुंबईस जाऊन भाभांची भेट घेतली. भाभांच्या गाडीतून ते दोघे चौपाटीवर गेले, विविध विषयांवर त्यांची बरीच चर्चाही झाली. कोसंबींचे तोपर्यंतचे संशोधन, त्यांचे विचार यांनी भाभाही प्रभावित झाले असावेत. त्या काळच्या परिस्थितीत दोघांचे विचारतरंगही जुळले असणे बरेच शक्य दिसते, कारण १९३० च्या दशकातील केंब्रिज, इंग्लंड येथील वास्तव्यामुळे भाभांवरही बर्नालवादाचा खूप प्रभाव त्यावेळी होता.

परिणामी, कोसंबींना गणिताचे प्राध्यापक म्हणून टाटा मुलभूत संस्थेत येण्याचे आमंत्रण भाभांकडून मिळाले. आणि मुंबईत पेडर रोडवरील केनिलवर्थ या बंगल्याच्या अर्ध्या भागात सुरू झालेल्या या संस्थेत १ जून १९४५ रोजी कोसंबी रूजू झाले. त्यांच्या आयुष्यातील एक नवे पर्व सुरू झाले.

आर्थिक दृष्ट्या ही नेमणूक त्यांच्या फायद्याचीच होती. दरमहा १४० रुपयांवरून त्यांची मासिक प्राप्ती ८०० रु. वर गेली. त्यावेळच्या मानाने हा पगार खूप मोठा होता. पण याहीपेक्षा महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांचे पाऊल फर्गसनातील संकुचित परिसरातून भारतीय विज्ञानक्षेत्रात उज्जवल भवितव्य असलेल्या एका संस्थेत पडले. टाटा मूलभूत संशोधन संस्थेची सुरुवात छोटेखानी स्वरूपाची होती हे खरे. भाभा संचालक व भौतिकीचे प्राध्यापक, तर कोसंबी गणिताचे. बाकी दोनेक तरुण तंत्रज्ञ सहकारी व चार-दोन व्यवस्थापनातील मंडळी. म्हटले तर कोसंबींचे स्थान भाभांनंतर दुसऱ्या क्रमांकाचे, म्हटले तर ज्येष्ठ संशोधकांत शेवटचे, अशी ही स्थिती. परंतु लवकरच संस्था देशातील एक आघाडीची संशोधनसंस्था म्हणून पुढे येणार हे तेव्हाही लक्षात येणे कठीण नव्हते. टाटा ट्रस्टच्या पाठिंब्याने तेव्हाच्या मुंबई सरकारच्या सहाय्याने भाभांनी संस्था सुरू केलेली. बंगलोरात रामन तर कलकत्त्यात मेघनाद शाह असे बुजूर्ग आपापल्या संस्थांच्या उभारणीसाठी देणग्यांच्या शोधात प्रयत्नशील असताना टाटांनी आपले वजन भाभांच्या पारड्यात टाकलेले. भाभा त्यावेळचे भारतातील सर्वात तरुण प्रमुख वैज्ञानिक—वय अवघे ३६ व वैज्ञानिक कर्तृत्व ऐन भरात असलले, तेही

भौतिकीतील आघाडीवरच्या क्षेत्रातील.

भाभांची महत्वाकांक्षा फार दांडगी होती, व ती सार्थ करण्यासाठी सर्व बाजूंनी अनुकूल परिस्थितीही त्यांना लाभली होती.

आणि अशा भाभांच्या संस्थेत कोसंबी रुजू झाले होते. देशातील इतर कोणत्याही विद्यापीठात वा संशोधनसंस्थेत पूर्ण प्राध्यापकाच्या जागेवर जाण्यापेक्षा ही नेमणूक अधिक महत्वाची मानली पाहिजे. इतर ठिकाणचे अपरिहार्यपणे येणारे विद्यापीठीय राजकारण, हितसंबंधांची गुंतागुंत, बऱ्यावाईट परंपरांचे जाळे हा सर्व बजबजाट व गोंधळ येथे नव्हता. परंपरागत भारतीय मातीवर भाभांनी एक आधुनिक, आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे बेट निर्मिण्याची सुरुवात केली होती. एक शुद्ध संशोधनसंस्था, परीक्षार्थी विद्यार्थ्यांना शिकविण्याचे बंधन नाही, तसेच इतरत्रच्या लालफीतीचा अभाव, अशी ही कोऱ्या पाटीवरची सुरुवात होती.

कोसंबींसारख्या एकांड्या परंतु नाना क्षेत्रांत मुक्त संचार करू इच्छिणाऱ्या संशोधकास योग्य वातावरण प्राप्त होण्याची शक्यता येथे निश्चितच अधिक होती. त्याचबरोबर त्यांच्या कार्यास देशात व परदेशात अधिक प्रमाणात मान्यता प्राप्त होण्याची संधीही येथे जास्त उपलब्ध होती.

सुरुवातीच्या काळात कोसंबी दोन वर्षे रोज पुणे-मुंबई करत, नंतर पाच वर्षे मुंबईत आपल्या बहिणीच्या बिऱ्हाडी राहिले. पत्नी व दोन मुलींचे बिऱ्हाड त्यांनी पुण्यातच ठेवले होते. शनिवार-रविवार ते पुण्यात काढत. शुक्रवारी संध्याकाळी डेक्कन क्वीन पकडून पुण्यास जाणे व सोमवारी सकाळी परतणे असा क्रम त्यांनी सुरू केला. नंतर पुन्हा दहा वर्षे पुणे-मुंबई डेक्कन क्वीनबरोबरच्या त्यांच्या दीर्घसंबंधांना यावेळी सुरुवात झाली.

या नवीन नेमणुकीमुळे कोसंबींची मान्यता वाढल्याचे लवकरच दिसून आले. मुंबईचा शाही (रॉयल) विज्ञानसंस्थेचा रौप्य महोत्सव १९४५ साली साजरा झाला. नोव्हेंम्बर महिन्यातील कार्यक्रमात चार वैज्ञानिकांची भाषणे आयोजित करण्यात आली होती. होमी भाभा व भारतीय विज्ञान व औद्योगिक अनुसंधान परिषदेचे प्रमुख सर शांतिस्वरूप भटनागर यांच्या जोडीने, कोसंबींचीही एक माननीय वक्ते म्हणून वर्णी लागली होती.

भारतीय विज्ञान परिषदेचे चौतिसावे अधिवेशन १९४७ च्या जानेवारीत दिल्ली येथे भरले होते. पंडित नेहरू परिषदेचे सर्वसाधारण अध्यक्ष होते. उद्घाटनानंतर अधिवेशनाचे कामकाज विषयवार विभागून चालते. यावेळी गणिताचे विभागीय अध्यक्षपद कोसंबींकडे आले होते. भाभांशी संबंध आल्यामुळेच कोसंबींना हा मान मिळू शकला असे म्हणणे फारसे वावगे ठरणार नाही.

पंडित नेहरू त्यावेळी व्हाइसरॉयच्या अंतरिम सरकारात उपाध्यक्ष होते. लवकरच येणाऱ्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या राजकीय नेतृत्वात त्यांचे स्थान फार महत्त्वाचे राहणार हेही उघडच होते. त्यामुळे विज्ञान परिषदेचे हे अधिवेशन वैज्ञानिकांच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले पाहिजे. या संधीच्या निमित्ताने कोसंबींनी नेहरूंशी पत्रव्यवहार



केल्याचेही आढळून येते. विज्ञानपरिषदेचे कामकाज अधिक कार्यक्षमतेने व फलदायी स्वरूपात चालण्यासाठी काही कल्पना मांडून त्यांच्या अंमलबजावणीबाबत पं. नेहरूंनी पुढाकार घ्यावा असे सुचविणारे पत्र १९४६ मधे कोसंबींनी लिहिले होते. ('भारताचा शोध' या नेहरूंच्या पुस्तकाच्या याच वर्षी केलेल्या परीक्षणात कोसंबींनी नेहरूंच्या ऐतिहासिक व राजकीय दृष्टिकोनातील काही वैगुण्यांवर परखड टीका केली होती. नेहरू देशाचे भावी नेते आहेत हे निःसंदिग्धपणे मान्य करून त्यांना इशारेवजा सल्ला देण्याचा कोसंबींचा हेतू येथे स्पष्ट होता. याच पार्श्वभूमीवर विज्ञानपरिषदेच्या अधिवेशनानिमित्त येऊ घातलेल्या संबंधाचा आधार घेऊन त्यांनी परिषदेच्या कामकाजाविषयीच्या सूचना नेहरूंपुढे मांडल्या हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लवकरच कोसंबींना पुन्हा परदेशवारीची संधी मिळाली. आपली संस्था सर्वतोपरी अद्यावत राहील यावर भाभांचा कटाक्ष होता. संगणकयंत्रे तसेच संगणकविज्ञान त्यावेळी फारच प्राथमिक अवस्थेत होते. परंतु त्यांच्या वापराची, तसेच त्याविषयीच्या संशोधनाची मुहूर्तमेढ भारतात रोवण्याची योजना भाभांच्या मनात होती. या कामानिमित्त युनेस्को-फेलो म्हणून कोसंबींना इंग्लंड-अमेरिकेत पाठवले होते.

कोसंबींचा हा १९४८-४९ मधील दौरा बराच मोठा होता. संगणक म्हणजे त्यावेळच्या इलेक्ट्रॉनिक गणना यंत्रविषयक सैद्धान्तिक व तांत्रिक बाबींचा अभ्यास करण्याबरोबरच इतरही काही कामगिरी त्यांनी पार पाडली. शिकॅगो विद्यापीठाकडून पाहुणे प्राध्यापक म्हणून येण्याचे निमंत्रण त्यांना मिळाले होते. त्यानुसार १९४९ च्या हिवाळी सत्रात जॉमेट्रीचे पाहुणे-प्राध्यापक म्हणून काम करताना टेन्सॉर ॲनॅलिसिस या विषयाचा ३६ भाषणांचा एक कोर्स त्यांनी तेथील विद्यार्थ्यांना दिला.

तसेच प्रिन्स्टन येथील इन्स्टिट्यूट फॉर ॲडव्हान्स स्टडीज या संस्थेतही ते काही काळ राहून आले. या संस्थेचे त्यावेळचे मुख्य आकर्षण म्हणजे, अल्बर्ट आईन्स्टाईन तेथे ज्येष्ठ प्राध्यापक म्हणून वावरत होते. आईन्स्टाईनसारख्या विसाव्या शतकातील वैज्ञानिकाचे दर्शन मिळणे हीही मोठीच गोष्ट मानली पाहिजे. कोसंबींचे भाग्य याहूनही मोठे होते, कारण त्यांना आईन्स्टाईन यांच्याबरोबर दीर्घ चर्चा करण्याची संधी लाभली. सापेक्षतावादातील गणिती प्रश्नांशी निगडित असे कोसंबींचे चार-पाच संशोधनलेख त्या आधी प्रसिद्ध झालेले होते. त्यामुळे या विषयाबाबत, तसेच आईन्स्टाईन त्यावेळी काम करीत असलेल्या एकात्म क्षेत्र सिद्धान्तावर कोसंबींनी त्यांच्याशी चर्चा केली. याखेरीज प्रिन्स्टन येथे संशोधन करीत असलेल्या काही तरुण भारतीय गणितज्ञांशीही त्यांच्या गाठीभेटी झाल्या. भाभांनी यांपैकी काहीना मुंबईस टा.मू.सं.सं.मध्ये येण्याचे आमंत्रण दिले होते, व त्यातील काही लवकरच कोसंबींचे सहकारी बनणार होते. आपल्या हार्वर्ड वास्तव्यातील मित्रमंडळींना भेटून जुन्या आठवणींना उजाळा देण्याची संधीही त्यांनी साधली. केंब्रिजगावातील वाय्.एम्.सी.ए.तील मित्रांबरोबरच एम्.आय्.टी.तील प्रा. नोर्बर्ट वीनर यांना ते भेटून आले. जुन्या परिचितांबरोबर झालेल्या या गाठीभेटीमुळे युद्धानंतरच्या अमेरिकेतील तत्कालिन परिस्थितीची चांगली कल्पना येण्यास त्यांना मदत झाली.

परतीच्या मार्गावर लंडन येथील अल्प मुक्कामात आणखी एका महत्त्वाच्या व्यक्तीशी त्यांचा परिचय झाला. लंडन विद्यापीठात संशोधन करीत असलेले इतिहासज्ञ प्रा. बॅशम (ज्यांनी भारतीय प्राचीन इतिहासाबद्दल खूप मौलिक लिखाण केले आहे.) यांची व कोसंबींची पहिली भेट झाली. या परिचयाचे पुढे दीर्घ मैत्रीत रूपांतर झाले.

अशा प्रकारे टा.मू.सं.सं.मध्ये गणिताचे प्राध्यापक म्हणून रुजू झाल्यावर कोसंबी तदनुषंगिक क्षेत्रांत अधिक व्यापक प्रमाणात सक्रिय झाल्याचे दिसते. परंतु इतर ज्ञानक्षेत्रांतील त्यांचे बहुढंगी कामही खंड न पडता चालूच होते. इतकेच नव्हे तर या नव्या संस्थेच्या पाठिंब्याचा या कामातही त्यांना उपयोग झाल्याचे आढळून येते.

भारतीय विद्याभवनचे तेव्हाचे मानद संचालक आचार्य मुनी श्री जिनविजयजी धर्मानंदांचे जवळचे मित्र होते. दामोदरांच्या भर्तृहरीवरील कामासंबंधी धर्मानंदांनीच त्यांना प्रथम कळवले होते. मुनीजी ग्रंथांच्या मालिकेचे सर्वसाधारण संपादकही असल्याने कोसंबींची दोन पुस्तके प्रसिद्ध होण्यात त्यांचा मोठा हातभार व उत्तेजन लाभले. गणिताचे प्राध्यापकपद भूषविणाऱ्या या मुलाने संस्कृत ग्रंथांच्या चिकित्सक आवृत्तीचे काम काटेकोरपणे व उत्कृष्टरीत्या पार पाडले. पूर्णवेळ संस्कृतचे प्राध्यापक म्हणून काम करणाऱ्या विद्वानांनी या तरुण गणितज्ञापासून स्फूर्ती घ्यावी, अशा शब्दात मुनीजींनी कोसंबींचा गौरव केला.

याबरोबरच ठिकठिकाणी उत्खननात सापडलेले जुन्या नाण्यांचे संग्रह मागवून त्यांची वजने करून संख्याशास्त्रीय विश्लेषण करण्याचे नाणकशास्त्रीय संशोधन चालूच होते. या विषयातील कोसंबींच्या कीर्तीमुळे पुरातत्त्वखात्यातील अधिकाऱ्यांकडून सापडलेले नाणीसंग्रह तपासण्याची विनंतीही ठिकठिकाणाहून त्यांना होऊ लागली होती. मुंबईत या कामासाठी टा.मू.सं.सं.तर्फे परदेशी बनावटीचा एक उत्कृष्ट तराजू खास त्यांच्याकरिता मागवला गेला होता.

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी थोडेच दिवस आधी, म्हणजे चार जून १९४७ ला धर्मानंदांनी हे जग सोडले. त्यांचा मृत्यूची परिस्थिती दामोदरांना बरीच क्लेशकारक ठरली असावी. धर्मानंदांनी अखेरच्या दिवसांत कुटुंबीय मंडळींना दर्शनास येण्याचीसुद्धा मनाई केली होती. त्यामुळे दामोदरच काय परंतु त्यांच्या मातोश्रीही अंतिम क्षणी धर्मानंदांजवळ उपस्थित नव्हत्या. दामोदर या प्रायोपवेशनकाळात फार अस्वस्थ झाले होते. 'काय करावे सुचत नाही, बापू (धर्मानंदजी) स्वप्नात येतात' असे जवळच्या आप्तमित्रांजवळ ते बोलत असत. या पिता-पुत्रांचे संबंध बरेच गुंतागुंतीचे असावेत. एकीकडे धर्मानंदांचा प्रभाव दामोदरांच्या जडणघडणीवर मोठा होता. दुसरीकडे वैचारिक पातळीवर दोघे दोन भिन्न दिशांना गेलेले. शिवाय वैयक्तिक पातळीवर वडिलांच्या आयुष्यक्रमामुळे आईची झालेली परवडही दामोदरांना फार खोलवर कोठेतरी जखमी करून राहिली असणार! मात्र ही जखम अव्यक्तच राहिली होती.

धर्मानंदांच्या मृत्यूनंतर झालेला एक घोटाळा व त्यावरची दामोदरांची प्रतिक्रिया नमूद करण्याजोगी आहे. धर्मानंदांचे पूर्ण नाव धर्मानंद दामोदर कोसंबी. त्यांच्या मृत्यूची बातमी अमेरिकेत हार्वर्डला पोचली तेव्हा डी. डी. कोसंबी अशी सारखी अद्याक्षरे



असलेल्या या पिता-पुत्रांबद्दल गोंधळ होऊन हार्वर्डमधील गणिताचा विद्यार्थी गेला अशा समजुतीने माजी विद्यार्थ्यी संघातर्फे मुलाच्या नावाने शोक व्यक्त केला जाऊन त्या शोकसंदेशाचे पत्रही पुण्यास दामोदरांच्या पत्त्यावर पाठवले गेले. बऱ्याच वर्षांनी थट्टेत 'माझा मृत्यू चार जून १९४७ रोजी घोषित केला गेला होता. तारीख व महिना कदाचित खरे असतील पण वर्ष मात्र नक्कीच चुकले होते. १९६१ मधील पानशेतच्या पुरातून वाचलेल्या कागदपत्रांवरून मी १९५८ पर्यंत तरी नक्कीच जिवंत असल्याचा पुरावा मिळतो.' अशा प्रकारची वाक्ये कोसंबींनी लिहिली होती. मात्र येथे वडिलांच्या व आपल्या आद्याक्षरामुळे हा घोटाळा झाला हे काही त्यांनी स्पष्ट केले नव्हते.

टा.मू.सं.सं.मध्ये आल्यानंतरचा पाचएक वर्षांचा काळ कोसंबींना सुखाचा व भरभराटीचा गेला, असे म्हणण्याचा मोह होतो. भाभांबरोबर त्यांचे जवळकीचे संबंध होते. अनेक वेळा दोघे गप्पा मारताना व चर्चा करताना इतरांना आढळत. बंगलोरला असताना भाभांनी विश्वकिरणासंबंधी काही प्रयोग केले होते. त्यातील निरीक्षणांवर आधारित दोन संशोधनलेख टा.मू.सं.सं.च्या स्थापनेनंतर थोड्याच अवधीत भाभा व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रसिद्ध केले. यात कोसंबींनी दिलेल्या गणिती व संख्याशास्त्रीय मदतीचा आभारपूर्वक उल्लेख आढळतो. सुरुवातीच्या या काळात भाभा संस्थेची वाढ घडवून आणण्याच्या कामात बराच काळ मुंबईबाहेर असत. दोनदा दीर्घकाळच्या परदेशी सफरीवरही गेले होते. यावेळी संस्थेच्या दैनंदिन कामकाजात कोसंबींना लक्ष द्यावे लागे. नवीन कर्मचाऱ्यांच्या मुलाखतींना हजर राहणे, त्यांच्या नेमणूकपत्रांवर सह्या करणे, बाहेरून आलेल्या पाहुण्यांना संस्था दाखवणे, वगैरे गोष्टींत त्यांचा सहभाग असे. शिवाय भाभांचे जे चार-दोन विद्यार्थी होते त्यांच्याकडेही कोसंबी लक्ष देत. केवळ गणिती व संख्याशास्त्रीय मदतीसाठी नव्हे तर इलेक्ट्रॉनिकमधील कामासाठीही कोसंबींकडे गेल्याचे भाभांच्या त्या विद्यार्थ्यांच्या आठवणीत आहे. त्यावेळचे दुसरे एक तरुण संशोधक अल्लाडी रामकृष्णन् (यांनी पुढे मद्रासला इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिकल सायन्सेस ही संस्था स्थापन केली) यांनी तर आपल्या आठवणीत त्याकाळी भाभांवर कोसंबींचा बराच पगडा होता, असे काहीसे तक्रारवजा स्वरात लिहूनही ठेवले आहे. कोसंबी ४८ साली अमेरिकेस जाण्यास निघाले तेव्हा त्यांना निरोपाची पार्टी भाभांनी स्वतःच्या मलबार हिलवरील घरी दिली होती. संस्थेतील सर्व संशोधक-विद्यार्थीही त्या मेजवानीस हजर होते. याबरोबरच संस्थेच्या कार्यभाराशी संबंधित टाटा उद्योग समूहातील महत्त्वाच्या अधिकारपदी असलेल्या व्यक्तींशीही त्यांचे चांगले संबंध होते.

टा.मू.सं.सं.च्या स्थापनेनंतर लवकरच संस्थेचा व्याप वाढत गेला. निरनिराळे प्रकल्प संस्थेसाठी मिळविण्यात भाभा यशस्वी ठरले. अणुशक्ती आयोग १९४७ साली स्थापन झाला. त्याचेही अध्यक्षपद भाभांकडे आल्याने सरकारदरबारी त्यांचे वजन व अधिकारही वाढले. माणसे धुंडाळण्याच्या भाभांच्या प्रयत्नांना यश येऊन अनेक ज्येष्ठ तसेच तरुण सक्षम संशोधक संस्थेत येऊ लागले. पेडर रोडवरील केनिलवर्थ बंगल्याचा अर्धा भाग त्यामुळे अपुरा वाटू लागला. तेव्हा गेट वे ऑफ इंडियाशेजारच्या ओल्ड

यॉट क्लबची मोठी इमारत भाभांनी संस्थेसाठी घेतली, व ४९ सालच्या सप्टेंबरात संस्था तेथे हलवली.

कोसंबी अमेरिका-ब्रिटनची वारी करून परतले, व या नव्या वास्तूत रुजू झाले तेव्हा त्यांचे व भाभांचे संबंध दुरावण्यास सुरुवात झाली होती. अखेर याची परिणती कोसंबी टा.मू.सं.सं.मध्ये अलग पडण्यात झाली. हे घडून येण्यामागे दोन-तीन कारणे आढळतात. एक म्हणजे कोसंबी व भाभा यांचे मार्ग आता भिन्न होऊ लागले होते. कोसंबींचे काम त्यांच्या आतापर्यंतच्या पद्धतीनेच चालू होते. नाणकशास्त्र, संस्कृत साहित्य चिकित्सा यांच्या जोडीला प्राचीन भारतीय इतिहासाची भर पडली होती. त्यासंबंधीचे वाचन, चिंतन, संशोधन व लेखन जोमाने चालू होते. गणितातील त्यांचे संशोधनकार्य चालूच होते, पण पूर्वीच्याच धर्तीवर- फुटकळ व वैयक्तिक स्वरूपाचे. काही वेगळ्या दिशेने वा एखाद्या विशिष्ट क्षेत्रात अधिक खोलवर जात वा विद्यार्थ्यांचा एखादा भरीव गट तयार करीत ते चालले होते असे दिसत नाही.

भाभांच्या बाबतीत वेगळी गोष्ट होती. त्यांचे भौतिकीमधील संशोधनकार्य जवळजवळ थांबले होते, व टा.मू.सं.सं.चे व्यवस्थापन व चारी अंगांनी वाढ, याबरोबरच अणुशक्ती आयोगाच्या कामकाजात, तत्संबंधी संस्थाउभारणीच्या आखणीत ते अधिकाधिक गुंतले होते. कोसंबींचे विचार या बाबतीत रामनांशी जास्त मिळते-जुळते होते. भाभांसारख्या उच्च दर्जाच्या वैज्ञानिकाने, संस्थाउभारणीच्या कार्यात गुंतून जाऊन, संशोधनच थांबवावे हे त्यांना रुचणारे नव्हते. याबद्दलची आपली नाराजी ते उघडपणे बोलूनही दाखवत. भाभांचा मनस्वीपणाही कोसंबींइतकाच तीव्र असल्याने याचे परिणाम उघड होते.

दुसरे कारण म्हणजे १९४९-५० पासून संस्थेतील ज्येष्ठ व कर्तृत्ववान संशोधकांची संख्या वाढीस लागली – भौतिकीविभागाप्रमाणेच गणितविभागातही. प्रा. फर्नांद लेवी हे ज्येष्ठ गणिती, कलकत्ता विद्यापीठातून निवृत्त झाल्यावर, संस्थेत आले. अमेरिकेतून मसानी, रामनाथन, चंद्रशेखरन् असे तरुण वयाचे व उत्तम संशोधन गाठीस असलेले संशोधक आले. लेवी थोड्याच काळाने युरोपात परतले. मसानींचे संस्थेत नीट न पटल्याने तेही बाहेर पडले. दोनेक वर्षे मुंबईच्या विज्ञानसंस्थेत घालवून ते पुन्हा अमेरिकेत गेले. रामनाथन उत्कृष्ट काम करीत दीर्घकाळ संस्थेत राहून निवृत्त झाले. परंतु गणितविभागाच्या दृष्टीने महत्त्वाची नेमणूक ठरली ती डॉ. कोमारवलू चंद्रशेखरन् यांची.

चंद्रशेखरन् प्रिन्स्टन येथे हर्मान वाईल या प्रख्यात गणितज्ञाचे शिष्य होते. १९४६-४७च्या आपल्या अमेरिकाभेटीत भाभांनी त्यांची गाठ घेऊन मुंबईत येण्यासाठी त्यांचे मन वळवले. प्रिंस्टनमधील काम संपवून टा.मू.सं.सं.मध्ये येण्यास त्यांनी दोनेक वर्षे घेतली, व १९४९ साली ते रीडर म्हणून गणितविभागात रुजू झाले. चंद्रशेखरन यांचे गणितातील भवितव्य उज्ज्वल, आश्वासक होते, त्यामुळे प्रिन्स्टनसारखे आघाडीचे केंद्र सोडून मुंबईसारख्या गणितीक्षेत्राच्या दृष्टीने 'मागस खेड्यात' येण्यामध्ये भावी कारकिर्दीच्या दृष्टीने ते एक धोकाच पत्करत होते. हा धोका पत्करताना त्यांनी



भाभांकडून बरेच स्वातंत्र्य मागून घेतले होते. चंद्रशेखरन् यांनी धडाडी दाखवून या मिळवलेल्या मोकळेपणाचा पूर्ण फायदाही उठवला. आपणास हवे ते विद्यार्थी निवडणे, संशोधनविषय ठरवणे वगैरे पावले टाकत, तसेच भाभांची पूर्ण मर्जी व विश्वास संपादन करीत त्यांनी तरुण गणितज्ञांचा उत्तम गट आपल्याभोवती तयार केला. टा.मू.सं.सं.च्या गणितविभागास जगन्मान्यता प्राप्त करून देण्यास त्यांचे हे कर्तृत्व बऱ्याच अंशी कामी आले. कालांतराने ते संस्थेत उपसंचालक (गणित) या पदावर पोचले. चंद्रशेखरन यांचे आगमन व वाढते वर्चस्व यांमुळे कोसंबी बाजूस पडले. संस्थेतील एकूण सतरा वर्षांच्या कारकिर्दीत फक्त दोन-तीन विद्यार्थ्यांनी त्यांच्या हाताखाली काम केले, व तेही संख्याशास्त्रीय विषयात, गणितातील आघाडीवरच्या एखाद्या क्षेत्रात नव्हे. वैयक्तिक पातळीवरही चंद्रशेखरन यांच्याबरोबर त्यांचे पटले नाही.

कोसंबी व भाभा यांच्यात दुरावा निर्माण करण्यास आणखी एक घटक कारणीभूत झाला. हा घटक युद्धोत्तर जागतिक परिस्थितीशी निगडित होता– अण्वस्त्रस्पर्धा व शीतयुद्धाशी संबंधित. जगाला विनाशाच्या खाईकडे ओढणाऱ्या अण्वस्त्रांना व अण्वस्त्रस्पर्धेला विरोध करण्यासाठी जगभर शांततावादी चळवळ सुरू झाली. अनेक वैज्ञानिक व विचारवंत या चळवळीत ओढले गेले. तसे पाहता अणुबाँबनिर्मिती प्रकल्प कार्यरत असतानाच नील्स बोहर सारख्या वैज्ञानिकाला भावी संकटाची चाहूल लागली होती, व त्यांनी त्या दृष्टीने इतर वैज्ञानिक व राज्यकर्त्यांना याची जाणीव करून देण्याचे प्रयत्नही केले होते. परंतु बहुसंख्य वैज्ञानिक विज्ञानक्षेत्राबाहेरील भावी परिणामाविषयी विचार करण्याच्या परिस्थितीत नव्हते, तर चर्चिल व रुझवेल्ट हे राजकीय नेते बोहर यांच्याकडेच संशयाने पाहू लागले होते. चर्चिल यांनी बोहर यांच्या हालचालींवर पाळत ठेवण्याचा आदेश दिला होता. प्रत्यक्ष अणुबाँबचा वापर झाल्यानंतर मात्र वैज्ञानिकांचे डोळे खाडकन् उघडले व अणुबाँबप्रकल्पावर प्रत्यक्ष काम केलेले अनेक वैज्ञानिकही अण्वस्त्रविरोधी चळवळीत सामील झाले. भारतात कोसंबीही या चळवळीत ओढले गेले. जागतिक शांतता परिषद, या साम्यवाद्यांच्या प्रभावाखालील संघटनेत साधारण १९५०पासून त्यांचा सहभाग सुरू झाला. अण्वस्त्रांना विरोध, जागतिक शांततेचा पुरस्कार ही आपली उद्घोषित सरकारी धोरणे होतीच; कोसंबींच्या मार्क्सवादी विचारसरणीमुळेही भाभा नाराज होण्याचे कारण नव्हते. परंतु यावेळी मात्र भारतीय शांतता परिषदेचे काम करणाऱ्यांना सरकारकडून त्रासाची व संशयाची वागणूक मिळाली, कारण साम्यवादी पक्षाच्या नेहरू सरकारविरोधी आक्रमक धोरणाचा तो काळ होता. त्यामुळे कोसंबींनाही सरकारी रोषाचा हिसका बसला व त्याबरोबरच भाभांचा रोषही त्यांनी ओढवून घेतला.

त्यावेळची जगभरची तणावग्रस्त परिस्थिती लक्षात घेता अणुशक्तीसंशोधनाचे ऊर्जा निर्मितीशी संलग्न स्वरूप व अण्वस्त्र उत्पादनाशी निगडित स्वरूप यांत फार भेद करणे कठीणच होते. ऊर्जानिर्मिती व इतर शांततापूर्ण कामांसाठीच अणुशक्ती वापरण्याचा दावा करीतच बहुतेक राष्ट्रे अण्वस्त्रस्पर्धेत उतरली होती. कोसंबींची नजर साहजिकच अण्वस्त्रांकडून अणुऊर्जा कार्यक्रमांकडे वळली. आणि भारतीय संदर्भात

ऊर्जानिर्मितीसाठी अणुशक्तीवर अवास्तव भर न देता इतर मार्गांचा, विशेषतः सौरऊर्जेचा, विचार व्हावा असे ते प्रतिपादन करू लागले.

भारतीय अणुऊर्जाप्रकल्पच नव्हे तर अणुसंशोधनप्रकल्पही त्यावेळी विशेष मार्गी लागले नव्हते. परंतु भाभा पूर्णपणे अणुशक्तीला वाहिले गेले होते, बद्ध झाले होते. त्यासंबंधीच्या महत्त्वाकांक्षी योजना कार्यान्वित करण्यावर त्यांचे सर्व लक्ष केंद्रित झाले होते. नेमक्या याच वेळी कोसंबी अणुशक्तीचे टीकाकार बनल्याने ते थेट आपल्या विरोधात उभे राहिले असेही भाभांना वाटले.

परिणामी, कोसंबी व भाभा यांतील दुरावा असा वाढत गेला की एकमेकांशी बोलणे सोडाच, समोरासमोर आले तरी दोघे नजरानजर करीत नसत. कोसंबींना त्यामुळे टा.मू.सं.सं.मध्ये फारसे भवितव्य उरले नाही. संस्था १९६२ मध्ये सोडीपर्यंत सरकारदरबारचे मानमरातब वगळाच पण संस्थेतील साधी पदोन्नतीही त्यांना मिळाली नाही. भाभांचाही एकूण दबदबा असा की त्यांच्याशी बिनसल्यानंतर संस्थेतील इतर सहकारीही कोसंबींशी फार संबंध ठेवण्यास धजावले नाहीत.

मुंबईतील बहिणीकडचा मुक्काम हलवून, १९५२-५३ नंतर त्यांनी पुण्याहून डेक्कन क्वीनने ये-जा सुरू केली होती. साहजिकच सकाळी अकरा ते दुपारचे चार-सव्वाचार एवढाच वेळ ते संस्थेत घालवीत. नंतर नंतर तर रोज संस्थेत येणेही त्यांनी थांबवले. बरेच वेळा एक दिवसाआड, आठवड्यातून तीनदाच ते संस्थेत येत. संस्थेपासून आलेल्या अलिप्तपणामुळे मिळालेला वेळ व शक्ती त्यांनी आपल्या इतर कार्यक्षेत्रात ओतली असे दिसते.

संस्कृत साहित्यविषयक एका महत्त्वाच्या प्रकल्पात १९५१पासून कोसंबी गुंतून गेले होते. हार्वर्ड विद्यापीठाच्या पौर्वात्य ग्रंथमालेसाठी विद्याकर संकलित 'सुभाषित-रत्नकोश' या संस्कृत काव्यसंग्रहाची चिकित्सक आवृत्ती तयार करण्याचा प्रकल्प त्याच्याकडे आला होता.

कोसंबींनी भर्तृहरीच्या शतकत्रयीची जी संपूर्ण चिकित्सक आवृत्ती ४८ साली प्रसिद्ध केली तिची संस्कृत पंडितांच्या जगात चांगली दखल घेतली गेली. हार्वर्ड विद्यापीठातील संस्कृतचे संशोधक प्रा. डॅनिएल इंगाल्स यांनी कोसंबींच्या या ग्रंथाचे परीक्षण लिहिले व त्या निमित्ताने कोसंबींचा त्यांच्याशी पत्रव्यवहार सुरू झाला. १९५१च्या जानेवारीत कोसंबींनी इंगाल्स यांना पहिले पत्र लिहिले व (बॅशम यांच्यानंतर) आणखी एका दीर्घ मैत्रीची सुरुवात झाली. शतकत्रयीवरील त्यांच्या कामाने खुश झालेल्या इंगाल्स यांनी हार्वर्ड पौर्वात्यमालेसाठी सुभाषित रत्नकोशाची चिकित्सक आवृत्ती तयार करण्याच्या कामगिरीबद्दल कोसंबींकडे विचारणा केली. 'सुभाषितरत्नकोश' हा उपलब्ध संस्कृत हस्तलिखितांतील सर्वात प्राचीन काव्यसंग्रह होता. महापंडित राहुल सांस्कृत्यायन यांनी तिबेटमधील आपल्या भ्रमंतीत याच्या मूळ हस्तलिखिताच्या फोटोप्रती काढून आणल्या होत्या.



इंगाल्स यांचे हे आमंत्रण कोसंबींनी एका अटीवर स्वीकारले. कोसंबींचे फर्गसनातील मित्र प्रा. गोखले यांनाही आपल्याबरोबर संयुक्त संपादक नेमावे ही ती अट. इंगाल्सनी ती मान्य केली आणि मग, शनिवार-रविवार हे साप्ताहिक सुटीचे दिवस कोसंबी व गोखले सुभाषितरत्नकोशाच्या कामात घालवू लागले.

इंगाल्स १९५२ साली भारतात आले तेव्हा चार महिने पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत त्यांचा मुक्काम होता. स्वतःच्या संशोधनाबरोबरच कोसंबी व गोखले यांचे संपादनाचे काम जवळून पाहण्याची उत्सुकता हाही त्यांच्या भेटीमागचा एक उद्देश होता. (इंगाल्स तेव्हा हार्वर्ड पौर्वात्यमालेचे सर्वसाधारण संपादक होते.) सुभाषितरत्नकोशासंबंधी कामाबरोबरच इतर अनेक विषयांवर चर्चा व गप्पागोष्टी करीत कोसंबींबरोबर दूरवरच्या (कधीकधी दिवसभराच्या) हाईक्सना गेल्याच्या आठवणी त्यांनी नमूद केल्या आहेत.

'सुभाषितरत्नकोश' चिकित्सक आवृत्ती हार्वर्ड पौर्वात्यमाला क्र. ४२ अशी अमेरिकेत १९५७ साली प्रसिद्ध झाली. अर्थात् मधला काळ काही निर्विवाद गेला नव्हता. कोसंबींच्या बाबतीत ते शक्यही नव्हते. या ग्रंथाला एक मोठी प्रस्तावना लिहिण्याचे काम कोसंबींनी स्वतःकडे घेतले; प्रा. गोखले यात सहभागी झाले नाहीत. आपला मार्क्सवादी ईहवादी दृष्टिकोन वापरून कोसंबींनी बरीच टीकाटिप्पणी प्रस्तावनेत केली. त्यांनी मांडलेल्या साहित्यविषयक दृष्टिकोनाबद्दल तसेच संस्कृतखेरीज इतर अभिजात तसेच आधुनिक पाश्चात्य साहित्यावर केलेल्या टीकेबद्दल इंगाल्स यांनी बरेच जोरदार आक्षेपही घेतले. बऱ्याच गरमागरम पत्रांनी भारत ते अमेरिका व अमेरिका ते भारत असा प्रवास केला. सुदैवाने ही वादावादी प्रस्तावनेतील एक-दोन भागांपुरती मर्यादित राहिली. फार मोठे बदल न होता प्रस्तावना (कोसंबींची एकट्याचीच) अखेर छापली गेली, तसेच इंगाल्स व कोसंबी यांच्या परस्परांविषयीच्या आदरभावनेवर तसेच वैयक्तिक मैत्रीच्या संबंधांवरही वादाचा काही अनिष्ट परिणाम झाला नाही.

भारतीय इतिहासविषयक लेख विविध संशोधनपत्रिकांत कोसंबींच्या नावे ४०-४२पासून नियमित प्रसिद्ध होत होतेच. उपलब्ध लिखित वाङ्मयाच्या बरोबरीनेच प्रत्यक्ष क्षेत्रीय निरीक्षण, मानववंशशास्त्रीय व भाषाविषयक अभ्यास या मार्गाने कोसंबी भारतीय इतिहासात अधिकाधिक खोल शिरत गेले. या त्यांच्या पंधराएक वर्षांच्या अभ्यासाची फलश्रुती झाली ती 'भारतीय इतिहासाभ्यासाची ओळख' (इंट्रोडक्शन टू द स्टडी ऑफ इंडियन हिस्टरी) हा ग्रंथ प्रकाशित होण्यात. चारशेहून अधिक पृष्ठांचा व साठांवर छायाचित्रे असलेला हा ग्रंथ १९५६ साली मुंबईच्या पॉप्युलर प्रकाशनातर्फे प्रसिद्ध झाला आणि भारतीय इतिहासावरील महत्त्वपूर्ण ग्रंथांतील एक म्हणून तात्काळ मान्यता पावला. कोसंबींच्या इतिहासविषयक संशोधनकार्याला कायमस्वरूपी, टिकाऊ स्थान प्राप्त झाले ते या ग्रंथामुळे. त्यांचे भारतीय इतिहासविषयक विविध प्रकारचे संशोधन या ग्रंथात एका निश्चित सूत्रात गुंफलेले आढळते.

नाकारली यातून स्पष्ट होतेच. कॉम्रेड डांगे यांच्या 'इंडिया फ्रॉम प्रिमिटिव्ह कम्युनिझम् टू स्लेव्हरी' या पुस्तकाचे परीक्षण करतानाही त्यांनी म्हटले होते की 'स्वतंत्र विचार करण्याची गरज पडू नये यासाठी उपलब्ध असलेला तयार पर्याय म्हणजे मार्क्सवाद नव्हे. उलट मार्क्सवाद हे विश्लेषणाचे एक हत्यार, एक साधन आहे. काही किमान कौशल्य व समज आत्मसात करून मगच हे साधन योग्य त्या क्षेत्रात वापरले पाहिजे.'

कोसंबींनी पुरस्कार केलेल्या संयुक्त अभ्यासपद्धतीत क्षेत्रीय निरीक्षणावर मोठा भर दिला होता. आणि यामागे खास कारणही होते.

'आपण येथे केलेल्या इतिहासाच्या व्याख्येनुसार भारताचा इतिहास इथल्या खेडोपाडी जागोजागी खूप बारकाव्यांसहित लिहिलेला आढळतो. मात्र हा इतिहास वाचण्यासाठी आवश्यक असलेल्या दृष्टिकोनाची व जाणिवेची येथे नितांत गरज आहे.' असे कोसंबींचे मत होते. त्यांच्या म्हणण्यानुसार भारतीय समाजाची वाढ हिंसेपेक्षा एकापाठोपाठ होत गेलेल्या धार्मिक परिवर्तनांनी अधिक झाल्याचे आढळते. प्राचीन भारतात निरनिराळ्या टोळीगटांना एकत्र आणून सर्वसाधारण समाजात सामावून घेण्याची प्रक्रिया धर्माच्या व धर्मबदलांच्या आधारे झाली. जेत्यांनी पराजितांना वा पुढारलेल्या गटांनी आदिम अवस्थेत असलेल्यांना नष्ट वा नामोहरम न करता आपल्यात सामावून घेतले. यात परस्पर देवाणघेवाणही झाली, व एक संकरित समाज घडत गेला. रानावनात भटकत शिकारीवर व अन्न गोळा करून गुजराण करणारे गट, गुरे पाळून फिरत राहणारे गट, एका जागी स्थिरावून शेती करणारे गट यांची जेव्हा एका समाजात बांधणी झाली तेव्हा मागस गटांची देवदैवते प्रगत गटांनीही स्वीकारली. आदिवासींच्या मातृदेवतांनी शंकराच्या पार्वतीचे रूप धारण केले. जसजसा शेतीचा प्रसार वाढत गेला तसतसे काठावरचे एकेक समाजगट संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात सामील होत गेले. त्यांच्या देवता, त्यांचे यातुविधी यांसह.

भारतीय समाजाचे वैविध्य व हिंसेचा अभाव यामुळे या विलिनीकरणाच्या, एकत्रीकरणाच्या प्रक्रियेचे थर अवशेषरूपाने अजूनही आपल्या समाजात टिकून आहेत; अगदी शेकडोहजारो वर्षांनंतरही. ब्रिटिशांबरोबर भांडवलशाही आली व या समाजरचनेचे विघटन सुरू होऊन आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत प्राचीन इतिहासाच्या खुणा जपणारे हे एकेक थर विरघळू लागले. परंतु आजही जसजसे आपण देशाच्या अंतर्भागात जाऊ, शहरांपासून दूर जाऊ, अधिकाधिक मागस प्रदेशात व जातींकडे जाऊ तसतसे हे थर अधिक सुस्पष्ट होऊ लागतात. कोसंबींच्या ग्रंथाचे दुसरे प्रकरण, आपल्या समाजात अजूनही प्रचलित असलेल्या या प्राचीन इतिहासाच्या खाणाखुणा उलगडून दाखविणारे आहे. पुण्याच्या आसपासच्या खेड्यापाड्यात, तसेच भटक्या जमातींच्या वस्त्यांत त्यांनी केलेल्या निरीक्षणाविषयीचे हे प्रकरण मुळातच वाचून काढण्याजोगे आहे.

या ठिकाणी कोसंबींच्या आणखी एका महत्त्वाच्या कार्याकडे आपण येतो. प्रागैतिहासिक काळाबद्दलची त्यांची ही एक मुख्य कामगिरी. आर्यांच्या आगमनापूर्वी येथे अस्तित्वात असलेल्या मूळ आदिम जमातींचे, आदिवासींचे अस्तित्व त्यांनी



ठळकपणे पुढे आणले. त्यापूर्वी भारतीय इतिहास आर्यांपासून सुरू होई. जणू काही आर्यांच्या टोळ्या पश्चिमेकडून आल्या व मानवसमाजरहित अशा या प्रचंड उपखंडात त्यांनी आपली वस्ती पसरविली. कोसंबींनी या आर्यपूर्व टोळ्यांची दखल घेऊन आर्यांचा संस्कृतिप्रसार म्हणजे या विखुरलेल्या टोळ्यांना एका समाजात गुंफण्याच्या प्रक्रियेचा भाग मानले. बौद्धधर्म, मौर्य साम्राज्याचा उदय, नंतरचा सामंतशाही समाज, तसेच जातिव्यवस्था व जातिभेद, इत्यादींकडे त्यांनी याच दृष्टिकोनातून पाहिले.

आता भारताचा इतिहास येथील आदिम जमातीपासून सुरू होतो; स्थानिक दैवते व त्यांचा इतिहास यांना महत्त्व प्राप्त झाले आहे; तसेच तेलातुपाचे कागद वाचून जनसामान्यांचा इतिहास लिहिणे ही संशोधनयोग्य गोष्ट मानली जाते. याचे बरेच श्रेय कोसंबींकडे जाते.

कोसंबींच्या या ग्रंथाचे स्वागत संमिश्र झाले; परंतु त्याची मोठ्या प्रमाणावर दखल घेणे मात्र कोणाला टाळता येण्याजोगे नव्हते.

'सायन्स इन हिस्टरी' या आपल्या ग्रंथात बर्नाल यांनी लिहिले की, 'कोसंबींच्या या पुस्तकामुळे प्रथमच भारतीय इतिहासाची संगती लागण्यास सुरुवात झाली.' बहुतेक परीक्षणकारांनी ते चाकोरीबद्ध नसले तरी अखेर मार्क्सवादी आहेत असे कटाक्षाने नमूद करण्याची खबरदारी घेतानाच त्यांच्या मांडणीतील नावीन्य व एकात्म, संयुक्त अभ्यासपद्धतीचे मुक्तपणे स्वागत केले. या ग्रंथाच्या पानापानावर भारतीय इतिहासावर मार्मिक व मूल्यवान प्रकाश टाकलेला आढळतो, नवीन प्रश्न व नवीन संशोधनविषय त्यातून सुचवले जातात, व त्यांवर विचार करणे अत्यावश्यक आहे यावरही अनेकांचे एकमत झालेले दिसते. इंगाल्स यांनी तर अमेरिकन पौर्वात्य संशोधनपत्रिकेत सात-आठ पानी दीर्घ परीक्षण लिहून कोसंबींची दखल घेतली.

'मार्क्सवादी नसलेल्यांनाही काही अर्थबोध होऊ शकेल असे मार्क्सवादी भूमिकेतून युरोपीय भाषेत लिहिलेले भारतीय इतिहासावरचे हे पहिलेच पुस्तक' असे सुरुवातीस नमूद करून त्यांनी कोसंबींच्या पूर्वसूरी मार्क्सवाद्यांना टोला हाणला. कोसंबींच्या ग्रंथावर इंगाल्स यांनी अनेक बाबींसंबंधी टीका केली. या ग्रंथात ऐतिहासिक जडणघडणीची रचना उभी करताना कोसंबींची कल्पनाशक्ती अनेकदा निष्काळजीपणे वाहवत गेली आहे असे इंगाल्स यांचे मत होते. मात्र तपशील व वस्तुस्थितीच्या बाबत हा निष्काळजीपणा क्वचितच आढळतो हे त्यांनी आवर्जून नमूद केले. मगध सत्तेचा उदय आणि खेड्यांभोवती केंद्रित अर्थव्यवस्थेची उभारणी याविषयी कोसंबींनी केलेले विवरण या ग्रंथाला कायम स्वरूपाचे मूल्य मिळवून देईल असे त्यांनी म्हटले होते. इंगाल्स यांच्या परीक्षणाचा अखेरचा प्रश्न महत्त्वाचा होता– 'येथे मगधकालीन नाण्यांना पंचवीस पाने बहाल केली आहेत, तर भगवद्गीतेच्या वाट्याला एक पान, भारतीय गणिताला तीन ओळी व तत्त्वज्ञानाच्या वाट्याला भले मोठे शून्य आले आहे, याला काय म्हणावे ?'

कोसंबींच्या इतिहासविषयक कार्यावर होणाऱ्या टीकेचा हा मुख्य रोख आहे. इंगाल्ससारख्या विद्वानाने कदाचित याकडे मार्क्सवादी विचारसरणीची एक त्रुटी, एक

अपुरेपणा म्हणून पाहिले असेल, परंतु येथील प्रस्थापित व पारंपारिक विद्वानांनी मात्र कोसंबींना याबद्दल शत्रूस्थानीच मानले.

मात्र कोसंबींची याबाबतची भूमिका स्पष्ट होती. 'मिथ अँन्ड रिॲलिटी' या, पुढे प्रकाशित झालेल्या लेखसंग्रहाच्या प्रस्तावनेत सुरुवातीसच त्यांनी म्हटले होते- 'सर्वसामान्यांच्या अंधःश्रद्धांनी लडबडलेल्या चिखलावर लक्ष केंद्रित करताना भारतीय तत्त्वज्ञानाच्या सुंदर कमळाकडे दुर्लक्ष करण्याची काय गरज आहे असा प्रश्न विचारला जाईल. परंतु तोच मुख्य मुद्दा आहे. सौंदर्याची जाणीव असलेली कोणीही व्यक्ती सुंदर फुललेल्या कमळाचे कौतुक करू शकेल, परंतु या चिखलातून ते कमळ कसे उगवले या प्रक्रियेचा मागोवा घेण्यासाठी मात्र मोठ्या प्रमाणावर वैज्ञानिक विश्लेषणाचे परिश्रम घ्यावे लागतात.' कमळाचे सौंदर्य वर्णन करण्यात अनेकांनी हातभार लावला होताच व ते करताना जमिनीवरील चिखलमातीकडे व अन्य काट्याकुट्यांकडे लक्ष दिले नव्हते. कोसंबींनी आपली संशोधननजर या केवळ दुर्लक्षित नव्हे तर मूलभूत जागी केंद्रित केली.

भारतीय इतिहासात दीर्घकालापासून लोकसंस्कृती व प्रस्थापित राजमान्य संस्कृती (ज्याला थोडक्यात 'ब्राह्मणी' संस्कृती म्हणता येईल) यांचे समांतर प्रवाह वाहत आहेत. कोसंबींनी लोकसंस्कृती प्रवाहावर भर दिला; आणि त्यामुळे भारतीय संस्कृतीतील उच्च तत्त्वज्ञानाकडे दुर्लक्ष केले, अशा प्रकारच्या टीकेला त्यांना तोंड द्यावे लागले. नव्या दमाच्या अनेक संशोधकांनी मात्र त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन नवीन वाटा चोखाळल्या.

साधारण १९५० पासून कोसंबी जागतिक शांतता परिषदेच्या कामात गुंतत गेले. या जागतिक शांतता परिषदेच्या कार्यात प्रमुख सहभाग होता डाव्या व समाजवादी विचारसरणीच्या वैज्ञानिकांचा व विचारवंतांचा. बर्नाल व जोलिओ-क्यूरी हे दोन वैज्ञानिक परिषदेचे प्रमुख नेते होते. दोघेही अनुक्रमे ब्रिटिश व फ्रेंच साम्यवादी पक्षांचे क्रियाशील सदस्य होते. अर्थातच सोविएत युनियन व त्या गटांतील राष्ट्रे यांचा परिषदेच्या कार्याला भरपूर पाठिंबा होता. जगातील साम्यवादी पक्षही परिषदेत सक्रिय भाग घेत होते.

भारतीय शांतता परिषदेची स्थापना साम्यवादी पक्षाची एक आघाडी संघटना म्हणूनच झाली. याचा भारतीय संदर्भही वैशिष्ट्यपूर्ण होता.

महायुद्धकाळात कॉम्रेड पूरणचंद जोशींच्या नेतृत्वाखाली अनेक विचारवंत, साहित्यिक, कलावंत मोठ्या प्रमाणावर पक्षाचे सहानुभूतीदार बनले होते व पक्षाच्या आघाडी-संघटनांत कार्यरत झाले होते. युद्धानंतर पुन्हा एकवार सगळे चित्र पालटले. युद्धकाळातील दोस्ती संपुष्टात येऊन सोविएत युनियन व अमेरिकन गट यांच्यात शीतयुद्धाचे वारे वाहू लागले. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर साम्यवादी पक्षाने तर एकदम आक्रमक पवित्रा घेतला. जोशींची १९४७ डिसेम्बरात हकालपट्टी होऊन रणदिवे पक्षसचीव बनले, व ४८च्या मार्चमध्ये पक्षाने उठावाची साद घातली. एकूण



परिस्थितीचा अंदाज चुकल्याने फार काही निष्पन्न झाले नाही. परंतु तेलंगणात मात्र सशस्त्र उठाव झाला. तो ५१ साली मागे घेण्यात आला. त्या वेळच्या पक्षनेतृत्वाचे हे साहसवादी धोरण बरेच वादाचे ठरले. यावेळी अनेक सहानुभूतीदार पक्षापासून दूर गेले, पक्षांतर्गत लढाही सुरू झाला. या सर्व परिस्थितीतून पक्षाला सावरण्याची गरज होती व शांतता चळवळीची आघाडी उभारण्याची संधी या कामी उपयोगाला आली.

भारतीय शांतता परिषदेत साधारणपणे पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते संघटनेत महत्त्वाच्या पदांवर राहतील व सर्वसाधारण पुरोगामी विचारवंत, कलावंत, साहित्यिक असे सहानुभूतीदार अध्यक्ष, उपाध्यक्ष वगैरे मानांच्या जागेवर राहतील अशी व्यवस्था होती. अखिल भारतीय शांतता परिषदेचे अध्यक्ष होते, डॉ. सैफुद्दीन किचलू, तर उपाध्यक्षपदांपैकी एका जागेवर कोसंबींची निवड झाली होती. मेघनाद शाह हे ज्येष्ठ वैज्ञानिकही यात सामील होते.

कोसंबी आतापर्यंत कोणत्या चळवळीत असे फारसे ओढले गेले नव्हते. स्वातंत्र्य चळवळीत, तसेच साम्यवादी पक्षाच्या कार्यक्रमात त्यांचा सहभाग काठावरचाच होता. तसे पाहता कोसंबींचा भारतीय साम्यवादी पक्षास व त्याच्या धेयधोरणास बिनशर्त पाठिंबा कधीच नव्हता, उलट ते पक्षाचे एक टीकाकार होते. आपली मार्क्सवादी विचारसरणी जितक्या स्पष्टपणे ते बोलण्यात व लिखाणात व्यक्त करीत, तितक्याच परखडपणे साम्यवादी पक्षाच्या धोरणांवरही ते टीका करीत. 'प्रस्थापित मार्क्सवादी' (ऑफिशिअल मार्क्सिस्ट) असे हेटाळणीवजा विशेषण त्यांनी भारतीय साम्यवाद्यांना लावले आहे. असे असूनही शांतता परिषदेच्या कार्यात मात्र ते हिरीरीने उतरले, कारण अण्वस्त्रविरोध व जागतिक शांतता या गोष्टी मानवजातीच्या भवितव्याच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या असून त्याबाबत लहानमोठ्या मतभेदांची व तात्कालिक फायद्यातोट्यांची पर्वा न करता निश्चित भूमिका घेऊन ती ठामपणे मांडणे हे प्रत्येकाचे नैतिक कर्तव्य आहे अशी त्यांची भावना होती.

त्यावेळी कोसंबी आठवडाभर मुंबईत रहात असत. मुंबई शांतता समितीच्या सचीवपदी असलेल्या तेव्हाच्या पक्षकार्यकर्त्या डॉ. कुमुद मेहता यांचे कोसंबींशी चांगले स्नेहसंबंध होते. न. र. फाटक मुंबई समितीचे अध्यक्ष होते. हाफकिन संस्थेचे संचालक डॉ. साहेबसिंह सोखे, प्रख्यात डॉक्टर बालिगा, पत्रकार-संपादक रुसी करंजिया हेही शांतता परिषदेच्या कामात सक्रिय झाले होते. अनेक सिनेकलावंत व संबंधित पुन्हा पक्षाभोवती गोळा झाले होते.

शांतताविषयक चळवळ १९५० ते ५५ या काळात बऱ्या प्रमाणात जनसंपर्क साधून होती. मुंबईत ठिकठिकाणी जाहीर सभा होत. परळच्या कामगार मैदानावर गिरणीकामगारनेत्यांची भाषणे होत, तर मध्यमुंबईत मदनपुरा विभागात सार्वजनिक बागेतील मुशायऱ्यांचे कार्यक्रम मोठी गर्दी खेचून घेत. साहिर लुधियानवी, कैफी आझमी, शैलेंद्र, अब्बास, इस्मत चुगताई, प्रेम अझीझ, बलराज सहानी वगैरे कलावंतांची येथे हजेरी असे. गिरगावात ब्राह्मणसभेत फाटकांच्या अध्यक्षतेखाली मध्यमवर्गीयांच्या सभा होत, तर दक्षिण मुंबईतील सुंदराबाई हॉलमध्ये विमा कचेऱ्या, बँका इत्यादीतील

कर्मचाऱ्यांपुढे भाषणे होत.

कोसंबींची हजेरी सुंदराबाई हॉलमधील सभांना असे. सुशिक्षित पांढरपेशा वर्गासमोर इंग्रजीत ते भाषणे करीत. पुण्यात मात्र एका सभेत त्यांनी मराठीत भाषण केल्याचे सांगतात. देशात अन्य ठिकाणीही त्यांनी सार्वजनिक सभांत भाग घेतला. मद्रासला एका सभेत कोसंबी व एम्. जी. रामचंद्रन् एकाच व्यासपीठावर होते, अशीही आठवण एका परिचिताने सांगितली आहे.

वक्ते म्हणून कोसंबी फार प्रभावी नव्हते, असे म्हणतात. त्यातच त्यांचे अमेरिकन उच्चार, अस्खलित ओघवते इंग्रजी व भराभर बोलण्याची सवय यामुळे श्रोतृवृंदालाही ते समजणे थोडे कठीण जात असावे. मात्र शांततेबद्दलची त्यांची तळमळ मनापासूनची असल्याने खूप मेहनतीने ते भाषण तयार करीत असत. माहितीपूर्ण व मुद्देसूद बोलण्यावर त्यांचा भर असे. निव्वळ राजकीय अभिनिवेशाने भोंगळ वा चुकीचे बोललेले त्यांना खपत नसे. त्यातच सभेतील वागणुकीचे नियम व संकेत वगैरे काटेकोरपणे पाळणे त्यांच्या स्वभावातच बसणारे नव्हते. त्यामुळे अधुमधून एखादा वक्ता आवेशपूर्ण जोरदार भाषण करीत असावा व मध्येच, व्यासपीठावरून कोसंबींनी हस्तक्षेप करून 'तुम्ही मुद्याला सोडून भलतेच काहीतरी वा चुकीचे बोलत आहात' असे सुनवावे, असेही घडत असे. या सभांमुळे व्यापक समुदायाशी परिचय होण्याची संधी त्यांच्या वाट्याला आली.

शांतता परिषदेतील या कार्याचा दुसरा परिणाम म्हणजे अनके देशांच्या वाऱ्या करण्याची त्यांना मिळालेली संधी. त्या काळात ही संधी दुर्मिळच होती, आणि टा. मू. सं. संमध्ये बाजूला पडल्यानंतर संस्थेतर्फे परदेशदौरे करणे काही त्यांच्या नशिबी येणार नव्हते.

अखिल भारतीय शांतता परिषदेच्या उपाध्यक्षपदाप्रमाणेच जागतिक शांतता परिषदेच्या कार्यकारी समितीचे सदस्य म्हणूनही त्यांची निवड झाली होती. कार्यकारी समितीच्या सभांना हजर राहण्यासाठी वा भारतीय शिष्टमंडळाचे एक सदस्य या नात्याने कोसंबींनी बऱ्याच परदेशवाऱ्या केल्या. दहाएक वर्षांत पश्चिम व पूर्व युरोप, सोविएत युनियन, तसेच चीन व जपान येथे अनेक वेळा ते जाऊन आले. त्यांच्या विविध विषयांतील व्यापक कार्यामुळे या भेटींचा उपयोग शांतता परिषदेच्या कामाबरोबर इतर क्षेत्रांतील त्यांच्या अनुभवाचा व कार्याचा पाया अधिक रुंद व प्रगल्भ होण्यातही झाला. हा एक वेगळा फायदाच होता.

भारतीय शांतता परिषदेचे अधिवेशन १९५१ च्या मे मध्ये मुंबईत भरले. मुळात ते दिल्लीस होणार होते, परंतु सरकारी विरोधामुळे ते मुंबईस भरवावे लागले. परदेशी शिष्टमंडळांवर पण सरकारने अनेक बंधने आणली होती, कित्येकांना व्हिसा नाकारला होता. याचवर्षी कोसंबींना चिनी शांतता परिषदेतर्फे चीनभेटीचे आमंत्रण मिळाले. परंतु तेथे भारतीय शिष्टमंडळ नेण्यात आलेल्या अडचणींमुळे त्यावेळी ते गेले नाहीत.

आशिया व प्रशांत महासागर विभागाच्या शांतता परिषदेची तयारी करण्यासाठी म्हणून एक तयारी-परिषद बेजिंग येथे १९५२ साली बोलावण्यात आली होती. भारतीय



पथकाचे नेते म्हणून कोसंबींची निवड झाली. मे अखेरीस होणाऱ्या या परिषदेस हजर राहण्यातही अनेक अडचणी आल्या. या काळात कोसंबींचा इंगाल्स यांच्याशी जो पत्रव्यवहार झाला त्यातून त्या वेळच्या परिस्थितीची थोडीफार कल्पना येते. मे च्या मध्यापर्यंत कोसंबींना आपण तयारी परिषदेसाठी बेजिंगला जाऊ शकू की नाही याची खात्री नव्हती. पंतप्रधानांच्या कार्यालयाशी त्यांचा पत्रव्यवहार चालू होता. कोसंबींच्या जाण्यासंबंधात काहीच प्रश्न नाही, परंतु त्यांच्या बरोबरच्या शिष्टमंडळसदस्यांबाबत काही अडचणी आहेत, अशा प्रकारची उत्तरे त्यांना मिळत होती असे दिसते. 'पंतप्रधानांच्या सचिवाने लिहिलेल्या पत्रावरून मी स्वतःही जाणे रद्द केले तर पंतप्रधानांना बरे वाटेल असे सूचित केले आहे' असे कोसंबींनीच लिहून ठेवले आहे. आपल्या हालचालींवर पाळत ठेवली जाते, आपला पत्रव्यवहार उघडला जातो, अशी तक्रार करून त्यांनी इंगाल्सना बजावले होते की भारत सरकारवर अमेरिकेचा प्रभाव आहे व त्यामुळे माझ्याशी उघड संबंध ठेवल्यास तुम्हालाही त्याचा त्रास होऊ शकेल. खुद्द इंगाल्स यांनी, असे काही त्यांच्या बाबतीत घडले नाही अशी कबुली दिली असली तरी त्या काळातील भारतातील परिस्थिती लक्षात घेता साम्यवाद्यांच्या हालचालींवर सरकारची कडक नजर होतीच, व शांतता परिषदेच्या कामात सहभागी झाल्याने कोसंबींना त्याची थोडीबहुत झळ बसली असावी.

परंतु एवढे होऊनही ५२ च्या मे मध्ये कोसंबी शिष्टमंडळ घेऊन बेजिंगला जाऊ शकले. तीन ते सहा जून या काळात झालेल्या या तयारी-परिषदेच्या उद्घाटनसत्राचे अध्यक्षपद कोसंबींनी भूषवले, ही गोष्ट भारतीय शिष्टमंडळाला दिल्या जाणाऱ्या मानाची निदर्शक होती. आशिया व प्रशांत महासागर विभागाची शांतता परिषद भारतात घेतली जावी असाही एक प्रस्ताव यावेळी आला होता. परंतु भारत सरकारचे सहकार्य लाभण्याची शक्यता नसल्याने अखेर ही परिषदही बेजिंगमध्येच घेण्याचे ठरले. या विभागीय परिषदेनिमित्त कोसंबींनी दुसऱ्यांदा चीनवारी केली.

राष्ट्रीय, विभागीय, अशा क्रमाक्रमाने वरच्या पातळ्यांवर घेतल्या गेलेल्या शांतता परिषदेच्या अधिवेशनांची अखेर परिणती झाली ती जागतिक शांतता अधिवेशनात. हेलसिंकी या फिनलंडच्या राजधानीत १९५५ साली ही परिषद झाली. जागतिक शांतता चळवळीचा, तसेच कोसंबींच्या यातील सहभागाचाही हा उच्च बिंदू मानला पाहिजे.

२२ ते २९ जून या काळात झालेल्या या जागतिक परिषदेचे अध्यक्ष होते प्रख्यात फ्रेंच अणुवैज्ञानिक नोबेल पारितोषिकविजेते व मादाम मारी क्यूरींचे जावई फ्रेडरिक जोलिओ-क्यूरी. बर्ट्रांड रसेल यांनी परिषदेला संदेश पाठविला होता. जगभरातून आलेल्या शिष्टमंडळांत वैज्ञानिक, साहित्यिक, तसेच राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. फ्रेडरिक जोलिओ-क्यूरींबरोबरच ब्रिटनचे जॉन डेस्मंड बर्नाल, सोविएत वैज्ञानिक ओपॅरिन, आईन्स्टाईनबरोबर काम केलेले पोलीश वैज्ञानिक लिओपोल्ड इनफील्ड असे मान्यवर वैज्ञानिक होते. रशियन कवी इल्या इहरेनबुर्ग व फ्रेंच साहित्यिक-तत्त्वज्ञ ज्याँ पॉल सार्त्र हेही होते. चीनचे प्रमुख नेते कुओ मोजो हजर होते. ही नुसती झलक झाली.

परिषदेतील सर्वात मोठे शिष्टमंडळ होते भारताचे. तब्बल नव्वद प्रतिनिधी असलेल्या या शिष्टमंडळाचे नेतृत्व करत होते, दामोदर कोसंबी. रोमेशचंद्र सचीव होते. आचार्य अत्रे शिष्टमंडळाचे एक प्रतिनिधी होते. परिषदेच्या कामकाजासाठी जवळजवळ दीडशे जणांची अध्यक्षीय समिती नेमली गेली होती. त्या समितीत कोसंबींबरोबरच मेघनाद शाह, साहेबसिंह सोखे, कॉ. डांगे, मुल्कराज आनंद प्रभृती भारतीय होते.

आचार्य अत्र्यांनी भारतीय शिष्टमंडळाचे नेते म्हणून कोसंबींनी केलेल्या भाषणाचा सारांश दिला आहे, तो त्यांच्याच शब्दांत उद्‌धृत करणे उचित ठरेल.

कोसंबी म्हणाले होते- "मी प्रथम आशियाचा नागरिक आहे- मग भारताचा. आमचा पक्ष कोणताही असो, आम्ही शांततेचे पुरस्कर्ते आहोत. प्रत्येक राष्ट्राला स्वयंनिर्णयाचा हक्क आहे. स्वतंत्र राष्ट्रांना परकी आक्रमणाविरुद्ध हमी मिळाली पाहिजे. वसाहती नष्ट झाल्या पाहिजेत व जगात शांततामय सहजीवन नांदले पाहिजे.

"दोन जर्मनी, दोन कोरिया, दोन विएतनाम या फाळण्या शांततेला धोकादायक आहेत. तैवानला चीनचे सरकार म्हणून अमेरिकेने युनोत बसवणे हास्यास्पद आहे. आर्थिक सहाय्याच्या नावाने अमेरिकेने पाकिस्तानात लष्करी तळ बांधणे शांततेला फार धोकादायक आहे. हा तळ आक्रमणासाठीच आहे. राष्ट्रांचे स्वातंत्र्य व शांततेची हमी या परस्परावलंबी गोष्टी आहेत हे आपण समजून घेतले पाहिजे.

"वसाहती हे जागतिक शांततेवरचे दुसरे मोठे संकट आहे. दक्षिण आफ्रिका, सीटो व नॅटो संघटना तिसरे युद्ध जवळ आणीत आहेत. जर्मनीचे शस्त्रीकरण हाही शांततेला मोठा धोका आहे.

"'पंचशील' तत्त्वाला मान्यता हा जगातील लोकमताचा प्रचंड विजय आहे. शांततेच्या कामासाठी आमच्या भारताचे पंतप्रधान प्रामुख्याने झटत आहेत, परिषदा भरवीत आहेत, लांबलांबच्या देशातून प्रवास करीत आहेत, याचा आम्हाला अभिमान वाटतो आहे. भारताची लोकप्रियता नेहरूंच्या द्वारे फार उत्तम रीतीने प्रकट होत आहे. जगातील लोकमत शांततेच्या बाजूला आणण्याची फार मोठी खटपट करायला हवी. चाऊ-नेहरूंच्या 'पंचशीले'ला प्रत्येक राष्ट्राकडून मान्यता मिळायला हवी. जागतिक शातंतेच्या दृष्टीने अमेरिकन सरकारची भूमिका चांगली नाही. परंतु अमेरिकन जनता शांततेची पुरस्कर्ती आहे.

"शांतताप्रेम, अनाक्रमणाची वृत्ती, व हस्तक्षेपबुद्धीचा अभाव या गोष्टी आम्हा भारतीयांच्या हाडीमासी खिळलेल्या आहेत. चला, साऱ्या जगातील लोक, आपण एकत्र येऊ या आणि आपल्या मुलाबाळांसाठी आपण सुखाचे, तेजाचे, व निर्भयतेचे जग निर्माण करुया."

अशाप्रकारे जागतिक पातळीवर भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्याचा मान कोसंबींना या हेलसिंकी परिषदेत लाभला. अर्थात् हे प्रतिनिधीत्व बिन-सरकारी होते हेही ध्यानात घेतले पाहिजे. त्याच वर्षी जिनेवा येथे 'अणुशक्तीचा शांततापूर्ण वापर' या विषयावर पहिली आंतरराष्ट्रीय परिषद झाली- हेलसिंकी परिषदेनंतर दीड-दोन महिन्यांतच. अणवस्त्रस्पर्धेतील दोन मुख्य राष्ट्रे- अमेरिका व सोविएत युनियन-



यांनीही भाग घेतलेल्या या महत्त्वपूर्ण पहिल्या जिनेवा परिषदेचे अध्यक्षपद मिळाले होते डॉ. होमी भाभांना. एकाच वर्षात कोसंबी व भाभांच्या पदरी पडलेले हे सन्मान म्हणजे एक सुंदर योगायोग होता; दोघांच्या वेगवेगळ्या प्रकारे उलगडलेल्या आयुष्यांवर उत्तम प्रकाश टाकणारा.

हेलसिंकी शांतता परिषद आटोपल्यावर कोसंबींनी सोविएत युनियनकडे प्रयाण केले -भारतीय वैज्ञानिकांच्या शिष्टमंडळासह. सोविएत विज्ञान अकादमीतर्फे त्यांना भेटीचे आमंत्रण मिळाले होते.

हेलसिंकी शांतता परिषदेनंतर लगेचच, जुलैमध्ये सोविएत युनियनने अणुशक्तीच्या शांततामय वापरासंबंधी एक खास परिषद आयोजित केली होती. बहुदा त्यांच्या दृष्टीने ऑगस्टमधील जिनेवा येथील जागतिक परिषदेची ही पूर्वतयारी असावी. मेघनाद शाह, साहेबसिंह सोखे या भारतीय वैज्ञानिकांबरोबरच कोसंबींनीही येथे हजेरी लावली. एक ते आठ जुलैपर्यंत चाललेल्या मॉस्कोतील या परिषदेत तीस देशांतील वैज्ञानिक सहभागी झाले होते. शीतयुद्धाचा काळ संपलेला नव्हता. त्यामुळे युद्धोत्तर अमेरिकेत सुरू केलेल्या मार्शल मदत योजनेतील राष्ट्रे येथे सहभागी नव्हती. यानिमित्त प्रतिनिधींना विविध वैज्ञानिक संशोधनसंस्थांना भेटी देण्याचीही संधी मिळाली.

यानंतर कोसंबींनी मॉस्को विद्यापीठात प्राचीन भारतीय इतिहासावर एक भाषणमाला दिली. तो काळ सुटीचा असल्याने विद्यापीठातील बहुतेक प्राध्यापक व संशोधक मॉस्कोबाहेर गेले होते. परंतु कोसंबींच्या भाषणासाठी भारतीय इतिहासाचे अभ्यासक खास लवकर परतले होते.

प्राचीन भारतीय इतिहासासंबंधी सोविएत संशोधकांनी केलेल्या कामाबद्दल कोसंबींचे मत विशेष चांगले नव्हते. भारतीय परिस्थितीच्या वेगळेपणाचा खास विचार व अभ्यास न करता मार्क्सवादाचा यांत्रिक पद्धतीने वापर करून सोविएत संशोधक ठोकळेबाज आराखडे बांधताहेत असे त्यांचे मत होते. आणि हे आपले मत त्यांनी मॉस्कोतील भारतीय प्राच्यविद्या संशोधकांपुढे परखडपणे मांडलेही. कोसंबींच्या टीकेचा रोख ज्यांच्या कामावर होता त्या ज्येष्ठ प्राध्यापकांना काही ही गोष्ट फारशी रुचली नाही. संशोधन-चर्चेच्या पातळीवर कोसंबींचा प्रतिवाद करण्याऐवजी कडवट शब्दांची देवाणघेवाण झाली असे दिसते. 'कोसंबींचा मार्क्सवाद कातडीपुरताच वरवरचा (skin deep) आहे' असे बोलले गेले. व त्यावर कोसंबींनीही तसेच तिखट प्रत्युत्तर दिले, 'शक्य आहे कदाचित, पण माझी कातडी खूप जाड आहे, किंबहुना मी संपूर्ण कातडीचाच बनलो आहे.' परंतु ही चकमक होऊनही हा दौरा त्यांच्या लेखी खूप समाधानाचा होता. आपल्या इतिहासविषयक कामाची भारतातील प्रस्थापित इतिहासकार दखल घेत नाहीत अशी त्यांची भावना होती. सोविएत विद्वानांनी निदान दखल तरी घेतली याचे ते समाधान होते.

या वास्तव्यात त्यांनी स्वतःवर वैद्यकीय उपचारही करून घेतले. कोसंबींना संधिवाताचे दुखणे फार त्रास देत असे. त्यासाठी विविध औषधोपचार ते करीत असत. त्यातील एक उपचार सोविएत युनियनमध्ये झाला.

जवळजवळ दोन महिन्यांच्या दीर्घ दौऱ्यानंतर ऑगस्टच्या तेरा तारखेला ते भारतात परतले. नेमक्या याच काळात दैवाने एक फार मोठा धक्का त्यांना दिला. त्यांचा सोविएत युनियनचा दौरा सुरू असतानाच ४ जुलै रोजी त्यांच्या मातोश्रींचे बंगलोर येथे निधन झाले. मातोश्रींची तब्येत ढासळल्यावर इतक्या लांबच्या दौऱ्यावरून त्यांना परत बोलावण्यासही वेळ नव्हता. 'बाबा आला का, बाबा आला का' असा जप करीतच बाळाबाई कोसंबींनी प्राण सोडला. कोसंबींच्या मनातील आईविषयक कोपरा हळवा होता. भारतात परतल्यावर ते बंगलोरला गेले तेव्हा ढसढसा रडले असे त्यांचे मित्र सांगतात.

जागतिक शांतता परिषदेच्या कार्याचे १९५५ ची हेलसिंकी परिषद हे सर्वार्थानी शिखर ठरले. त्यानंतर या शांतताचळवळीला ग्रहण लागण्यास सुरवात झाली. शांतता परिषदेच्या कार्यावर तसे साम्यवादी वर्चस्व होतेच. त्यामुळे साम्यवादी जगातील बदलत्या परिस्थितीचे निरनिराळ्या साम्यवादी पक्षांतील बदलत्या संबंधांचे परिणाम परिषदेच्या कामकाजावर उमटणे अपरिहार्यच होते. चीन व सोविएत युनियनमधील दुफळी निर्माण झाल्यानंतर त्याचे परिणाम इतर साम्यवादी पक्षांवरही झाले. यामुळे शांतता परिषदेतील एकजुटीला तडा गेला व निरनिराळे गट आपापल्या वेगवेगळ्या धोरणांचा पाठपुरावा करण्यासाठी परिषदेचा वापर करू लागले.

कोसंबींना ही परिस्थिती पटणारी नव्हती. कारण पक्षीय राजकारणात त्यांना विशेष रस नव्हता; जागतिक शांतता, अण्वस्त्रविरोध, या त्यांच्या दृष्टीने अधिक महत्त्वाच्या गोष्टी होत्या. त्यातच भारतीय शांतता परिषदेचे देशातील कामही थंडावू लागले. हंगेरियन जनतेने १९५६ साली केलेला उठाव सोविएत युनियनने सैन्य धाडून मोडून काढला. याची प्रतिक्रिया म्हणून येथील अनेक सहप्रवासी व सहानुभूतीदार पक्षापासून दूर गेले. कित्येक सक्रिय कार्यकर्ते असलेले विचारवंतही पक्षातून बाहेर तरी पडले वा निष्क्रिय झाले. शांतता परिषदेच्या कामात या मंडळींचा मोठा हिस्सा असल्याने याचा परिणाम जनसंपर्काच्या कामावर झाला. आधीचा उत्साह उरला नाही व परिषदेचे काम, कार्यकर्ते व नेत्यांच्या सभा-परिषदा यांपुरतेच, मर्यादित होत गेले. या निमित्ताने परदेशदौऱ्यांची संधी मिळावी म्हणून काम करणारे जास्त उरले, व शांततेची कळकळ असणारे कमी झाले.

या परिस्थितीत कोसंबींचेही इतर नेतृत्वाशी पटेनासे झाले. त्यांच्या फटकळ स्वभावामुळे मतभेदांचे रूपांतर वादावादीत होऊ लागले. जागतिक शांततेपेक्षा पक्षाच्या तत्कालिन ध्येयधोरणांना येथे अधिक किंमत दिली जाते आहे, अशा प्रकारची टीका कोसंबी करू लागले. 'स्वतःच्या कामापुरता या लोकांनी माझा वापर करून घेतला व आता मी त्यांना नकोसा झालो आहे' अशा प्रकारची तक्रारही त्यांनी केली आहे. अर्थात् शांतता परिषदेचे कार्यच एकदा थंडावल्यानंतर पक्षाची अशी प्रतिक्रिया होणे अपेक्षितच होते. कोसंबींचा सहभाग १९५९-६० पासून जवळजवळ संपुष्टातच आला. भारतीय शिष्टमंडळाचे सभासद म्हणून जाणेही बंद झाले. परंतु तरीही शांतता परिषदेपासून ते तात्काळ वेगळे झाले नाहीत. त्यांनी १९६३ मध्ये परिषदेचा राजीनामा



दिला.

या सुमारास एका विद्यार्थीमित्रास लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले आहे– 'दीर्घकाळ चलबिचल सहन करून अखेर मी राजीनामा दिला आहे. परिषदेच्या सध्याच्या चालू कार्यातून जागतिक शांततेला बळकटी आणण्याच्या दृष्टीने काही होऊ शकेल असे मला वाटत नाही. जे काही थोडेफार या दिशेने होत आहे ते जागतिक शांतता परिषद, तसेच भारतीय शांतता परिषद यांच्याशिवायही होऊ शकते. भारतीय शांतता परिषदेने तर माझ्याबाबत संधिसाधू वृत्तीच दाखविली आहे. परिषदेच्या मुख्य घटकांत शांतताकार्याबद्दल काही आत्मीयता व सचोटी शिल्लक असती तर हेही मी सहन केले असते. परंतु दुर्दैवाने, शांततेच्या व्यासपीठावरून ते साम्यवादी पक्षातील झगडे लढू पाहत आहेत, आणि याला माझा सक्त विरोध आहे, कारण मी या शांततेच्या मामल्याकडे खूप गंभीरपणे पाहतो.' याच संदर्भात त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की 'सुखासीन परदेशवाऱ्या करण्यासाठी भारतीय सभासदांनी आपली एक टोळीच बनविली आहे.'

अशा प्रकारे शांतता परिषदेच्या कार्यातही अखेर नाराजी व निराशाच कोसंबींच्या पदरी आली.

दुसरे महायुद्ध संपेपर्यंतच्या काळात सोविएत क्रांती व सोविएत युनियनमधील नवरचनेचा प्रयोग यांचा मोठा प्रभाव जगभरच्या बुद्धिवाद्यांवर पडला होता. युद्ध संपले तेव्हा सोविएत क्रांतीला पाव शतक होऊन गेले होते, आणि तेथील स्फूर्तिदायक घटनांबरोबरच तेथे सर्व काही आलबेल नाही याची जाणीव करून देणाऱ्या स्तालिनच्या दडपशाहीच्या हकीगतीही जगापुढे उलगडू लागल्या होत्या. सोविएत क्रांतीच्या वाटचालीतील खाचखळगे, काटेकुटे, साहजिकच, या क्रांतीपासून धडे घेऊ पाहणाऱ्यांना अंतर्मुख करणारे होते. आपल्या स्वतःच्या देशातील क्रांती वा समाजबदलाच्या प्रक्रियेसाठी इतर वाटा धुंडाळण्याची गरज यामुळे स्पष्ट झाली होती. समाजवादाचे ध्येय तसेच राहिले तरी प्रत्येक देशाने आपापली योग्य वाट शोधणे आवश्यक आहे ही जाणीव निश्चित स्वरूपात पुढे आली होती. युद्धोत्तर अनेक राष्ट्रे समाजवादाकडे वळली होती. सोविएत सैन्याच्या आधाराने पूर्व युरोपमध्ये समाजवादी सरकारे सत्तेवर आली होती. आपल्या देशातही नेहरूंच्या सरकारने समाजवादी समाजरचनेचे ध्येय उद्घोषित केले होते, तर १९४९ साली माओच्या नेतृत्वाखाली चिनी साम्यवादी पक्ष यशस्वी क्रांती करून सत्तेवर आला. चीनचा विस्तार, प्रचंड लोकसंख्या व तेथे झालेला प्रदीर्घ स्वयंभू, सशस्त्र लढा यांच्यामुळे ही क्रांती जगातील सत्तासमतोलाच्या दृष्टीने भारतीय उपखंडाच्या स्वातंत्र्यापेक्षाही अधिक महत्त्वाची ठरणारी होती.

साहजिकच चीनमधील नवीन राष्ट्रउभारणीच्या प्रयोगाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. आणि सोविएत युनियनमधील घटनांनी दोलायमान मनस्थिती झालेल्या अनेक पाश्चात्य तसेच पौर्वात्य विचारवंतांची सहानुभूती चीनकडे वळली. कोसंबीही याला अपवाद

ठरले नाहीत.

सोविएत क्रांतीला ज्याप्रमाणे बर्नार्ड शॉ, सिडनी व बिॲट्रिस वेब दांपत्य यांसारखे सहानुभूतीदार लाभले होते, तसेच चिनी क्रांतीलाही जोन रॉबिन्सन, जोसेफ नीडहॅम यांच्यासारखे अनेक नामवंत सहानुभूतीदार मिळाले होते. १९५८ मध्ये सुरू झालेली 'मोठी लांब उडी' (ग्रेट लीप फॉर्वर्ड) व नंतरची 'सांस्कृतिक क्रांती' यांनी या विचारवंतांना भविष्यकालीन समाजवादी जडणघडणीच्या शक्यतांची जाणीव करून दिली होती व भारावून सोडले होते. नंतरच्या काळातील चीनमधील घडामोडी लक्षात घेता प्रत्यक्ष परिस्थितीच्या ओघात या शक्यता मूर्त स्वरूप घेऊ शकल्या नाहीत हे स्पष्ट होते. परंतु त्यावेळी याची कल्पना येणे अवघडच होते. 'सांस्कृतिक क्रांती'ची सुरुवात झाली तेव्हा कोसंबी हयात नव्हते. परंतु चीनवरील त्यांच्या लेखनात जो शंकाविरहित आशावाद दिसतो तो त्यांच्या नेहमीच्या टीकात्मक सजग लेखनापेक्षा वेगळा उठून दिसणारा आहे. 'सामान्य चिनी माणूस अंतर्बाह्य बदलून गेला आहे,' 'नवा समाजवादी समाज येथे उभा राहिला आहे,' 'पेकिंगमधील लोक दारे बंद न करता वावरतात पण कधी चोरीसुद्धा होत नाही' अशा प्रकारचे वाजवीपेक्षा अधिक रम्य वर्णन त्यांनी करून ठेवले आहे. 'जुना चीन अजूनही दिसतो. हाँगकाँगमध्ये !' या त्यांच्या पुस्तीत क्रांतिपूर्व चीनमधील प्रचंड मानवी दैन्यावस्था व नंतरची तुलनात्मक दृष्ट्या नजरेत भरावी अशी सुधारलेली परिस्थिती, यांची पूर्ण जाणीव दिसते. परंतु तरीही क्रांतीनंतर अवघ्या दहा वर्षांत एवढा आमूलाग्र बदल झाल्याचे त्यांनी मुक्तकंठाने म्हणावे यास चीनमधील बदलांपेक्षा तेथील क्रांतीबद्दलची त्यांची सहानुभूती अधिक कारणीभूत होती असे म्हणणे वावगे ठरू नये.

कोसंबींच्या हातून येथे अतिशयोक्तीची वा काही अंशी अतिसुलभीकरणाची चूक झाली असेल असे म्हटले तरी चीनमधील काही घडामोडींची भलामण करत असताना त्यांच्या मनात त्या वेळच्या भारतातील परिस्थितीचे विशिष्ट संदर्भ होते हे लक्षात ठेवले पाहिजे.

स्वातंत्र्योत्तर भारतात नेहरू सरकारने एकीकडे समाजवादाची भाषा सोडली नाही तरी प्रत्यक्षात मात्र भांडवलशाहीधार्जिणे धोरण अवलंबिले. त्यामुळे कोसंबी नेहरू सरकारच्या धोरणाचे टीकाकार बनलेले होते. त्यांच्या या टीकेला चीनमधील जी जडणघडण त्यांनी बघितली तिची पार्श्वभूमी होती.

त्यांनी १९५२ पासून दहा एक वर्षात चीनला अनेक वेळा भेटी दिल्या. या भेटींच्या वेळी चीनमधील प्राच्यविद्याविशारद, बौद्धधर्मसंशोधक अशा अन्य क्षेत्रातील व्यक्तींशीही त्यांच्या गाठीभेटी झाल्या. भारतातून नामशेष झालेल्या काही दुर्मिळ ग्रंथांची हस्तलिखिते तिबेटातील बौद्धमठात उपलब्ध होती, त्यांच्या फोटोप्रती मिळविण्यासंबंधाने त्यांनी अनेकांशी पत्रव्यवहार करून त्यांच्या गाठीभेटीही घेतल्या होत्या. परंतु याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे एक सांख्यिकीतज्ञ म्हणून चीनमध्ये काही महिने राहून सल्लागार म्हणून काम करण्याची त्यांना मिळालेली संधी. अकादेमिया सिनिका या चिनी विज्ञानसंस्थेचे पाहुणे म्हणून त्यांना १९५९-६० मध्ये आमंत्रण मिळाले



होते. भारत व चीन यांमधील तज्ञांची अदलाबदल *करण्याच्या कार्यक्रमाखाली टा.मू.सं.सं.तर्फे त्यांना सांख्यिकीतज्ञ म्हणून पाठवले गेले होते. औद्योगिक व शेतीउत्पादन यांची आकडेवारी गोळा करून तिचे विश्लेषण करणारी यंत्रणा चीनमध्ये फारशी अस्तित्वात नव्हती. यासंबंधात कोसंबींनी सल्लामसलत दिली असे म्हणतात. या निमित्ताने अनेक लहान-मोठे कारखाने व शेतीसंस्थांना भेटी देण्याची संधी त्यांना लाभली. त्यावेळी चीनमध्ये 'ग्रेट लीप फॉरवर्ड' चळवळ सुरू होती. मोठमोठी सहकारीतत्त्वावर चालणारी कम्यून्स उभारली जात होती. एकेका कम्यूनच्या अधिपत्याखाली पन्नास ते ऐंशी हजारपर्यंत लोकवस्ती असे. सर्व जमीन एकत्र करून सामुदायिक रीत्या कसणे, जोपासणे, यावर मुख्य भर होता. जमिनीच्या मगदुराप्रमाणे ती शेतीखाली, जंगलाखाली वा कुरणांसाठी वापरणे वगैरे गोष्टी योजनाबद्ध व फायदेशीररीत्या करणे यामुळे शक्य झाले, गरजेनुसार उपलब्ध मनुष्यबळाचा योग्य तेथे योग्य प्रकारे वापर करणेही शक्य झाले. दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे या कम्यूनसची स्वयंपूर्ण वाढ करण्यावरचा भर. सामुदायिक लागवडीबरोबर शेती अवजारांसंबंधी व अन्य छोटे उत्पादन, कापड विणणे वगैरे प्रयोगही सुरू केले गेले. कम्यूनची लोखंड व पोलादाची गरज भागविण्यासाठी लोखंडाच्या छोट्या भट्ट्या चालविण्याचा प्रयोग हा या काळात फार गाजलेला.

स्वयंपूर्णतेबरोबरच स्वयंप्रशासन व व्यवस्थापन या दिशेनेही पावले टाकण्याची क्षमता कम्यूनसच्या या प्रयोगात (निदान त्या सुरुवातीच्या काळात तरी) दिसून येत होती. मालाची खरेदी-विक्री, बँकांचे व्यवहार, शाळा व प्रसंगी तंत्रशिक्षणसंस्था चालवणे यांबरोबरच स्थानिक सुरक्षेची व्यवस्था करणे असे नानाविध उपक्रम निरनिराळ्या कम्यूनसमध्ये चालवले जात होते. समाजवादी रचना म्हणजे लोकांच्या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी पुनर्रचना कार्यक्रम आखले जाणे, लोकांच्या हाती स्वतःचे भवितव्य घडविण्याची ताकद व अधिकार येणे या भूमिकेतून त्यांनी कम्यूनपद्धतीचे गोडवे गायले आहेत. स्थानिक व्यवस्थापकीय पातळीवर अधिक स्वायत्तता आल्याने मध्यवर्ती केंद्रीय प्रशासन संस्थेची स्थानिक पातळीवरील काही अंगे मोडीत निघाली व त्यामुळे withering away of the state ही लेनिनची संकल्पना प्रत्यक्षात अवतरण्याच्या दिशेने छोटेसे का होईना पण एक पाऊल पुढे पडले असेही कोसंबींनी नमूद केले आहे.

पुढील घडामोडींच्या संदर्भात हेही फारच रोमँटिक वाटण्याची शक्यता आहे. परंतु त्या वेळच्या वातावरणात समाजवादी समाजरचनेच्या ज्या विभिन्न क्षमता दृष्टिपथात येत होत्या त्या समजून घेण्याच्या दृष्टीने हे फार महत्त्वाचे आहे. पोलादनिर्मितीसारखा अवजड उद्योग छोट्या प्रमाणावर, विकेंद्रित पद्धतीने चालू शकावा असे काही ते तंत्रज्ञान नसल्याने 'परसदारच्या लोखंडाच्या भट्ट्यांचा' प्रयोग फसला. चीनच्या औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेस खीळ घालण्यास तो कारणीभूत ठरला, अशीही टीका नंतर केली गेली. परंतु शेती, जंगले, व कुरणांची निगराणी, लहानसहान उद्योग व सहकारी खरेदी-विक्री इत्यादींबाबत कम्यून व्यवस्था अयशस्वी ठरली वा निरुपयोगाची

होती असे म्हणता येणार नाही.

आणि नेमक्या या बाबतीत कोसंबींना चीनचे उदाहरण भारतीय परिस्थितीला मार्गदर्शक ठरेल असे वाटत होते. महाराष्ट्रातील त्या वेळच्या काही घडामोडी त्यांना या दृष्टीने महत्त्वाच्या वाटत होत्या. महाराष्ट्रात तेव्हा ग्रामीण भागात सहकारी तत्त्वावर नवीन जडणघडण चालू झाली होती. अनेक ठिकाणी सहकारी खरेदीविक्री संघ चालू होऊन उत्पादक शेतकरी व अंतिम खरेदीदार यांच्यामधील व्यापारी-दलालांचा मलिदा कमी होण्याची शक्यता प्रगट झाली. त्याचबरोबर सहकारी तत्त्वावर साखरकारखाने उभे राहण्याची प्रक्रिया मार्गी लागली. कारखान्याची उभारणी, व्यवस्थापन, व उत्पादनप्रक्रिया, तसेच उसाच्या म्हणजे कच्च्या मालाच्या उत्पादनापासून ते तयार साखरेची विक्री, अगदी निर्यातही, इथपर्यंत सर्व प्रक्रिया सहकारी तत्त्वावर होणे शक्य झाले. डॉ. धनंजयराव गाडगीळांसारखे तज्ञ व ग्रामीण उत्थानाच्या कार्याला वाहून घेतलेले अर्थशास्त्रज्ञ व त्यांचे निवडक सहकारी या कामी मोलाचे पायाभरणीचे व मार्गदर्शनाचे काम करीत होते. चिनी कम्यून व महाराष्ट्रातील सहकारी चळवळ यांतील समांतरता कोसंबींनी टिपली होती. दोहोतील फरकांचीही त्यांना अर्थातच जाणीव होती. चीनमध्ये अधिक जाणीवपूर्वक प्रयत्न चालू आहेत, त्यामानाने आपल्याकडील हे सहकारी प्रयोग विस्कळित व छोट्या प्रमाणावर असून त्याविरुद्ध व्यापारी तसेच उद्योगपतींनी आवाज उठविला आहे, स्वतंत्र पक्षाची स्थापना केवळ याच उद्देशाने झाली आहे व खुद्द सरकार याबाबत बोटचेपे, डळमळीत धोरण घेत असल्याने या मार्गाचा परिणामकारक वापर केला जाण्याची शक्यता कमी आहे असे त्यांचे मत होते. सरकारी पाठिंबा पुरेशा प्रमाणात व उत्साहाचा नसल्याने सहकारी कारखान्यांच्या कारभारात श्रीमंत व वजनदार शेतकऱ्यांचा दबदबा वाढून मूळ उद्देशावर खूप मर्यादा पडणेही शक्य आहे असेही त्यांनी म्हटले होते. याबाबत त्यांची भीती खरी ठरली असली, तरी सुरुवातीच्या काळात सहकारी ग्रामीण कारखानदारीत समाजवादी नवरचनेकडे पावले टाकण्याची क्षमता होती, असे त्यांचे मत होते व त्यांच्या या मताला चिनी कम्यून्सच्या अनुभवाची पार्श्वभूमी होती असे दिसते. भारतातील परिस्थितीसंबंधी त्यांनी मारलेला एक शेरा त्यांची मते तसेच त्यांच्या टीकेचा बोचरेपणा समजावून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

एका लेखात त्यांनी लिहून ठेवले – 'भारतात सर्वजण समाजवादाचे नुसते तोंडी गोडवे गाण्यात मग्न असतात. परंतु समाजवाद प्रत्यक्षात या समाजात येऊ शकेल यावर काही कोणाचा विश्वास नाही. त्यामुळे ग्रामीण सहकारी कारखानदारीसारख्या प्रयोगात भारतीय परिस्थितीला अनुरूप असा, समाजवादाकडे जाण्याचा मार्ग उपलब्ध आहे हे काही कोणाच्या लक्षातच येत नाही!'

सहकारी शेतीप्रमाणेच चीनमधील पाणीवापराचे धोरणही त्यांना खास दखल घेण्याइतपत जाणवले होते. मोठ्या धरणांबरोबरच छोट्या बंधाऱ्यांचे जलसिंचनप्रकल्पही चीनमध्ये कसोशीने राबविले जाऊन उपलब्ध पाणी जास्तीत जास्त फायदेशीररीत्या वापरले जात होते. याउलट आपल्याकडे मात्र सामान्य-लहान शेतकऱ्याला उपयुक्त



ठरणाऱ्या सिंचनयोजनांकडे दुर्लक्ष करून निव्वळ मोठ्या व बऱ्याच अंशी दिखाऊ भव्यता असणाऱ्या योजनांवर भर दिला जात आहे, व यामुळे फक्त बड्या, श्रीमंत शेतकऱ्यांचा फायदा होत अ ून राष्ट्रीय संपत्तीची नासाडी होत आहे, अशी टीका कोसंबींनी केली आहे. याबाबत पाश्चात्यांचे अनुकरण करण्यापेक्षा चीनचे अनुकरण करणे आपल्या दृष्टीने अधिक योग्य आहे असे त्यांचे मत होते. एकंदरीतच विज्ञान-तंत्रज्ञानाचा जो पुरस्कार त्यांनी केला (ज्याला सध्याच्या परिभाषेत 'लोकविज्ञान' म्हणता येईल) त्या त्यांच्या भूमिकेलाही चीनमधील भ्रमंतीने पाठबळ मिळाले होते.

शांतता परिषदेचे काम, एक सांख्यिकी तज्ञ म्हणून केलेले काम, तसेच प्राच्यविद्या संशोधक म्हणूनही कोसंबींना चीनमध्ये मानाची वागणूक मिळाली, असे म्हणावे लागेल. याचा सकृत्‌दर्शनी पुरावा म्हणजे चीनचे पंतप्रधान चाऊ अन् लाय यांच्याबरोबर झालेली कोसंबींची दीर्घ मुलाखत-वजा-भेट. भारत-चीन सीमावाद सुरू झाल्यानंतर 'हिंदी-चिनी भाई-भाई' वातावरण विरून दोन्ही देशांतील संबंध पार दुरावले. १९६२ मध्ये युद्धाला तोंड फुटण्यापूर्वी परिस्थिती फार चिघळत चालली होती. कोसंबींनी १९६१मध्ये चीनला गेले असता पंतप्रधान चाऊ एन लाय यांची भेट घेऊन भारतीय सीमाप्रदेशातील भिन्न भिन्न समाजगटांचा इतिहास व त्याचा सीमावादाशी असलेला संबंध याविषयी भारताची बाजू त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असे म्हणतात. जाण्यापूर्वी त्यांनी पंतप्रधानांच्या कचेरीशी संबंध साधला होता व कदाचित् पं. नेहरूंचा काही निरोपही त्यांनी नेला असणे शक्य आहे. परंतु कोसंबींची ही शिष्टाई तशी अनधिकृतच होती. त्यावेळच्या राजकीय वातावरणात त्यांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून देण्याच्या मध्यस्थीचा काही परिणाम झाला नाही, हेही उघडच आहे. तरीही चिनी पंतप्रधान चाऊ एन लाय यांनी त्यांना सहा तासाची प्रदीर्घ भेट द्यावी ही गोष्ट महत्त्वाची.

चीनयुद्धानंतरच्या बदललेल्या परिस्थितीत कोसंबींना त्यांच्या या चिनी 'संबंधा'चा त्रासही झाला. एका जर्मन विद्यार्थी-मित्रास लिहिलेल्या पत्रात त्यांनी १९८४ साली तक्रार केली आहे– 'माझा पत्रव्यवहार फोडून तपासला जातो. अकादेमिया सिनिकाची गंमत अशी की पूर्वी मी वर्गणी भरलेली असूनही ते अंक नियमित पाठवीत नसत, आणि आता मात्र एकेका पत्रिकेच्या जादा प्रती ते फुकट पाठवून देतात. यामुळे माझ्या विरुद्ध संशय निर्माण होतो.' कोसंबींच्या तक्रारीत किती तथ्य होते हे समजणे कठीण आहे. तरीपण आधीच प्रस्थापितांपासून दुरावलेल्या कोसंबींच्या विरोधात हा आणखी एक घटक गेला असे म्हणण्यास हरकत नसावी.

चीनमध्ये बघितलेल्या काही गोष्टींमुळे व तेथील राज्यकर्त्यांनी स्वीकारलेल्या काही धोरणांमुळे कोसंबी प्रभावित झाले होते. भारतीय विकासाच्या संदर्भात कोसंबींना अनुकरणीय वाटणाऱ्या अशा त्या गोष्टी होत्या.

येथे थोडे खोलात जाऊन समाज व विज्ञान यांतील परस्परसंबंधांबद्दल कोसंबींनी

व्यक्त केलेल्या विचारांचा मागोवा घेणे योग्य ठरेल. यासंबंधी त्यांनी मांडलेले मूलभूत व मौलिक मुद्दे आजमितीसही विचारात घेण्याजोगे आहेत. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतीय विज्ञानक्षेत्रातील प्रस्थापित जडणघडणीचे व धोरणांचे टीकाकार आणि पर्यायी धोरणांचे पुरस्कर्ते म्हणून कोसंबींना महत्त्वपूर्ण स्थान दिले जाते, ते याचमुळे.

गरिबी व मागसलेपणातून वर येऊन देशाला सुबत्ता व सामर्थ्य यांच्या मार्गावर न्यावयाचे असेल तर आधुनिकीकरण व औद्योगिकीकरण यांची गरज आहे व त्यासाठी आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाचा जाणीवपूर्वक वापर केला पाहिजे ही पुरोगामी भूमिका घेऊनच नेहरूंनी भारतीय विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्राच्या पायाभरणीस व संस्थारचनेस उत्तेजन दिले. त्यांच्या या सर्वसाधारण भूमिकेशी सर्वच वैज्ञानिक सहमत होते. मात्र या दिशेने प्रत्यक्ष वाटचाल कशी करावी हा मतभेदाचा मुद्दा होता. आणि हे मतभेद आधुनिकीकरणाची प्रक्रिया, तसेच विज्ञान व समाज यांतील परस्परसंबंध याविषयी असलेल्या वेगवेगळ्या दृष्टिकोनांशी निगडित होते. भाभा व कोसंबी यांच्या दृष्टिकोनातील फरकात ही गोष्ट स्पष्टपणे जाणवून येते.

भाभा हे भारतीय विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्राचे प्रमुख शिल्पकार व प्रस्थापित जडणघडणीचे आधारस्तंभ. त्यामुळे आधुनिकीकरणाची त्यांची संकल्पना महत्त्वाची ठरते. आपल्या कारकिर्दीतील अखेरच्या भाषणात १९६६ साली भाभांनी म्हटले होते– 'मागस राष्ट्रांकडे ज्याची उणीव आहे अशा दोन गोष्टी प्रगत राष्ट्रांकडे आढळतात. त्या म्हणजे आधुनिक विज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था. त्यामुळे मागस राष्ट्रांचा उत्कर्ष घडवून आणण्याचा प्रश्न हा त्या देशांत आधुनिक विज्ञानाची प्रतिष्ठापना करण्याचा व त्यांच्या अर्थव्यवस्थेचे रूपांतर आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेत करण्याचा प्रश्न आहे.'

येथे आधुनिक विज्ञान व आधुनिक अर्थव्यवस्था यांचा उल्लेख करताना भाभांना पाश्चात्य समाज, व त्यांच्या पावलावर पाऊल टाकत जाणे अभिप्रेत होते. विज्ञान-तंत्रज्ञानविषयक बहुतेक क्षेत्रांत आपली वाटचाल याचप्रकारे झाली. आपल्या विशिष्ट परिस्थितीत काही वेगळा मार्ग चोखाळला पाहिजे असे काही त्यांना वाटत नव्हते.

कोसंबींची संकल्पना यापेक्षा फार वेगळी होती. आशियाई व आफ्रिकी राष्ट्रांमध्ये विज्ञानवाढीसाठी सहकार्य वाढविण्यासंबंधी एक चर्चासत्र १९६६च्या मे महिन्यात दिल्ली येथे योजले गेले होते. त्यावेळी 'मागस देशांतील विज्ञान व तंत्रज्ञानविषयक प्रश्न' या विषयावर कोसंबींनी आपले विचार मांडले. (योगायोगाची गोष्ट म्हणजे वर उल्लेखिलेले भाभांचे भाषण जसे अखेरचे होते, तसेच कोसंबीचेहि हे अखेरचे भाषण ठरले.) विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर करताना पार्श्वभूमी फार महत्त्वाची ठरते हा त्यांच्या प्रतिपादनाचा मुख्य रोख होता व हा मुद्दा ठासून मांडण्यात त्यांचा द्रष्टेपणा दिसून आला. कोसंबींनी म्हटले होते-

'आपल्यापैकी बहुतेकजण विज्ञान-तंत्रज्ञानात इतके व्यग्र होऊन गेलेले असतात की ज्या संदर्भात ह्या विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर करायचा त्या संदर्भाचाच आपणास विसर



पडून जातो. या संदर्भाची तीन अंगे आहेत– राजकीय, आर्थिक व सामाजिक. विज्ञान व तंत्रज्ञान हे काही राष्ट्रीय सीमारेषांत बद्ध झालेले नाही. आणि त्यामुळेच ज्या पार्श्वभूमीवर ते वापरले जाते ती पार्श्वभूमी आपल्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वाची ठरते. राजकीय परिस्थिती हा एक फार महत्त्वाचा घटक आहे. बहुतेक मागस देश दीर्घकाळ परकी वसाहतवाद्यांच्या टाचेखाली होते; खरे पाहता त्यांच्या मागसपणाचे मूळ कारण ह्या परकी वसाहतवाद्यांनी केलेल्या शोषणातच आहे.'

ज्याअर्थी आपली पार्श्वभूमी, आपला संदर्भ पाश्चात्यांपेक्षा वेगळा आहे, त्याअर्थी आपण केवळ पाश्चात्यांचे अनुकरण करणे, त्यांच्या पावलावर पाऊल टाकत जाणे योग्य नाही. आपण आपल्या परिस्थितीनुसार वेगळा मार्ग चोखाळला पाहिजे अशी कोसंबींची भूमिका होती. केवळ अनुकरणापोटी, तसेच येथील वरिष्ठ वर्गाला पुढारलेल्या समाजांच्या तुलनेत न्यूनगंड वाटू नये म्हणून अनेकदा भव्य, दिव्य, व दिखाऊ प्रकल्प आखले गेले व त्यात आपल्या मर्यादित राष्ट्रीय साधनसामग्रीचा अपव्ययच झाला. याऐवजी आपल्या परिस्थितीत उपयुक्ततेच्या व अन्य दृष्टींनी चपखल बसेल, ताबडतोबीच्या गरजांवर उपायकारक ठरेल, तसेच दीर्घकालीन धोरणांनाही अनुकूल राहील असे सुयोग्य तंत्रज्ञान आपण वापरात आणावे असे कोसंबींचे आग्रही प्रतिपादन होते.

मागस देशात वापरण्याचे सुयोग्य तंत्रज्ञान म्हणजे कमी प्रतीचे तंत्रज्ञान अशी एक सर्वसाधारण समजूत आढळते. बऱ्याच वेळा परदेशातील आयात केलेले अद्यावत तंत्रज्ञान आपल्याकडील परिस्थितीत चपखल बसत नाही. कारण त्या तंत्रज्ञानासाठी आवश्यक असलेल्या काही बाह्य घटकांची आपल्याकडे वाण असते, आपला संदर्भ वेगळा असतो. परंतु यावरून पुढारलेल्या देशांत अद्यावत तर मागस देशांत मात्र तेथील दहा-वीस वर्षांपूर्वीचे जुने तंत्रज्ञान योग्य, असे समीकरण मांडणे चुकीचे आहे. पाश्चात्य देशांत सुयोग्य तंत्रज्ञान आपल्या संदर्भात सुयोग्य नाही एवढाच याचा अर्थ होतो.

उलटपक्षी आपल्यासारख्या मागस देशांपुढील प्रश्न अधिक गुंतागुंतीचे व किचकट असल्याने चांगले उच्च दर्जाचे विज्ञान व तंत्रज्ञान यांची आपणास अधिक गरज आहे असेही म्हणता येईल. उत्तम प्रतीचे विज्ञान व तंत्रज्ञान आपणही केले पाहिजे, मात्र आघाडीच्या संशोधनक्षेत्रासंबंधीच्या आपल्या कल्पना आपल्या परिस्थितीनुसार भिन्न असायला पाहिजेत असे कोसंबींना अभिप्रेत होते.

कोसंबींचे ऊर्जाविषयक विचार तपासल्यास ही गोष्ट स्पष्ट होते.

जागतिक शांततेचा पुरस्कार करताना कोसंबींनी भारतीयच नव्हे तर एकूण जगभरच्या प्रस्थापित अणुशक्ति कार्यक्रमाला विरोध केला. कारण अणुशक्तीच्या अण्वस्त्ररूपी अवताराच्या ते विरोधात होते आणि बहुतेक अणुशक्तीकार्यक्रम बाँबनिर्मितीक्षमता डोळ्यासमोर ठेवूनच त्यावेळी कार्यरत झाले होते.

परंतु एक ऊर्जास्त्रोत म्हणून अणुशक्तीला त्यांचा सरसकट विरोध नव्हता. काही

विशिष्ट परिस्थितीत अणुऊर्जेचा वापर फारच चांगल्या क्षमतेचा ठरेल, हे त्यांनीच उत्तमप्रकारे वर्णिलेले आहे.

अशा ऊर्जाकेंद्रांना थोडे इंधन लागते, तेही कित्येक महिन्यांच्या अवधीनंतर पुन्हा भरावे लागते. शिवाय, येथे स्वयंचलित तंत्रज्ञानाचे प्रमाण जास्त असल्याने अशी ऊर्जाकेंद्रे चालविण्यासाठी पारंपारिक केंद्रांपेक्षा कमी मनुष्यबळ लागते. त्यामुळे अडचणीच्या, दुर्गम, व कमी मनुष्यवस्तीच्या जागी अणुऊर्जाकेंद्रे खरोखरच महत्त्वाची ठरतील, ऊर्जानिर्मितीच्या विकेंद्रीकरणालाही त्यामुळे मोठी चालना मिळेल असे कोसंबींचे प्रतिपादन होते. अवकाशयाने, पाणबुड्या वगैरेंसाठी एकदम लहान प्रमाणावरील, अशी ऊर्जानिर्मिती संयंत्रे वापरातही आणली गेली आहेत. परंतु बहुतेक राष्ट्रांच्या ऊर्जानिर्मिती कार्यक्रमांत अणुऊर्जा केंद्रांच्या या विशिष्ट क्षमतेकडे दुर्लक्ष करून दाट लोकवस्तीच्या परिसरात मोठी आणि मुख्य वीजवितरणाच्या जाळयात ओवलेली ऊर्जानिर्मिती केंद्रे उभारली गेली. अणुउत्सर्जनामुळे उद्‌भवणाऱ्या धोक्यांबद्दल पुरेसे संशोधन झाले नसताही, त्याकडे काणाडोळा केला गेला. तसे पाहता अणुउर्जानिर्मितीचा खर्चही अन्य ऊर्जानिर्मितीस्त्रोतांशी तुलना करता अधिक होता. परंतु यातील बराचसा खर्च वैज्ञानिक संशोधनाच्या नावाखाली दाखविला जाऊन ऊर्जानिर्मितीच्या हिशेबात तो घेतला जात नव्हता, आणि उलट अणुऊर्जा अन्य ऊर्जांच्या तुलनेत फारच स्वस्त पडण्याचा काळ लांब नाही असे डांगोरे पिटले जात होते.

कोसंबींच्या मते बहुतेक राष्ट्रांच्या अणुऊर्जा कार्यक्रमांत अण्वस्त्रनिर्मितीची क्षमता उभी करणे हा अंतस्थ हेतू आहे, आणि अणुऊर्जानिर्मिती उद्योगाच्या प्रभावशाली हितसंबंधी गटांना या ऊर्जास्त्रोताला समाजात मान्यता निर्माण करून घ्यायची होती. म्हणूनच हे घडले.

मात्र अणुऊर्जा कार्यक्रमातील धोके व खर्चिकपणा यांची पुढारलेल्या राष्ट्रांना कल्पना आल्याने त्यांनी आपले अण्वस्त्रनिर्मिती कार्यक्रम चालू ठेवले तरी अणुऊर्जानिर्मिती कार्यक्रमास मात्र गाजावाजा न करता कात्री लावण्यास सुरुवात केली आहे असे कोसंबींनी १९६० सालीच लिहून ठेवले होते. यापासून योग्य तो धडा घ्यायच्याऐवजी आपण अणुशक्तीमागे आंधळेपणाने धावतोय याची त्यांना खंत वाटत होती.

सौरशक्तीच्या वापराची भलामण करताना त्यांनी मांडलेले मुद्देही ध्यानात ठेवण्याजोगे आहेत. समशितोष्ण व शीत कटिबंधांतील पुढारलेल्या देशांत सौरशक्तीचे प्रमाणच मुळात कमी आहे. त्यामुळे त्यांना या ऊर्जास्त्रोताचे फार आकर्षण न वाटणे व त्यावर त्यांनी फार संशोधनप्रयत्न न करणे साहजिकच होते. परंतु आपल्याकडे हा एक मुबलक उपलब्ध, फुकट मिळणारा ऊर्जास्त्रोत आहे आणि तो दावणीला बांधता आल्यास फार मोलाचा ठरेल ही तशी साधी गोष्ट सांगून कोसंबींनी पुढे स्पष्ट केले होते की सौरऊर्जेचा योग्य प्रकारे व योग्य क्षमतेने वापर करणे ही मात्र साधी गोष्ट नाही. कमी खर्चात एखादा खेडूत स्वतःच्या बळावर सहजी वापरू शकेल असा काही हा ऊर्जास्त्रोत नाही. सौरशक्ती वापरणे म्हणजे चरखा चालवणे नव्हे. सौरशक्ती वापरणारी



कार्यक्षम संयंत्रे व उपकरणे वैयक्तिक ग्राहकाला पुरवण्याचे काम करावयाचे तर त्यामागे उत्तम दर्जाचे विज्ञान व तंत्रज्ञान उभे करणे आवश्यक आहे. व्यापक प्रमाणावर हे कार्य पार पाडण्यासाठी लागणारे संघटनकौशल्य व व्यवस्थापन कौशल्यही वैज्ञानिक नियोजनपद्धतीवरच आधारित असावे लागेल.

अशा प्रकारचे विचार व्यक्त करणारे कोसंबी हे काही एकटेच नव्हते. इतर अनेकांच्या मनात अशा प्रकारच्या कल्पना घोळत होत्या. कोसंबींशी सहमती व्यक्त करणारेही कमी नव्हते. परंतु देशातील त्यावेळच्या घडामोडींचा रोखच असा होता की या दिशेने फारशी पावले टाकली गेली नाहीत.

ज्या प्रमाणावर अणुशक्तीसंशोधनावर पैसा, साधनसामग्री, व वैज्ञानिकांची बुद्धिमत्ता वापरली गेली त्याच्या एकशतांश हिस्सा जरी या दिशेने वापरला गेला असता तरी आज देशाचे चित्र खूप वेगळे दिसले असते, असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.

सुरुवातीच्या काळात सौरऊर्जेसारख्या क्षेत्रात व्यापक प्रमाणावर संशोधन करणारी संस्था स्थापणे सोपे नव्हते. परंतु ते अशक्यही नव्हते. भाभांसारख्या व्यक्तीकडे अशासारखे पाऊल उचलण्याची व त्याचा पाठपुरावा करण्याची क्षमता होती. भाभांनी १९५१च्या सुमारास मुंबईतील एका भाषणात सौरऊर्जेचा पुरस्कारही केलेला आढळतो. व त्यात कोसंबींच्या प्रतिपादनाशी खूप साम्यही आढळते. परंतु हा पाठिंबा क्षणिक ठरला, भाभा लवकरच अणुऊर्जानिर्मितीला पूर्णपणे वाहिले गेले. कोसंबी व भाभा यांच्यामधून विस्तव जाईनासा झाला, इतके त्यांचे संबंध बिघडले. तोपर्यंत भारतीय विज्ञान-तंत्रज्ञानक्षेत्रात भाभांचे एकमेवाद्वितीय स्थान निर्माण झाले होते, आणि पर्यायी मार्गांचा पाठपुरावा करण्याजोगी सत्ता इतर कोणाकडे राहिली नव्हती.

पुढे जागतिक पातळीवर पाश्चात्य देशांतही ऊर्जाप्रश्नासंबंधी वेगळा विचार होऊ लागला. इंदिरा गांधींच्या कारकिर्दीत खनिजऊर्जा, तसेच अणुऊर्जा यांना पर्यायी असे अपारंपारिक ( renewable ) ऊर्जास्त्रोत वापरण्याच्या प्रयत्नांना सरकारी पातळीवरून उत्तेजन मिळू लागले. अगदी १९९२ साली पंतप्रधान नरसिंहराव यांनी सौरशक्ती दावणीला बांधण्यासाठी सरकार खास प्रयत्न करणार अशी घोषणा स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केली –नवीन काही सांगितल्याच्या आविर्भावात.

हे सर्व लक्षात घेता चाळीस वर्षांपूर्वीच याबाबत पावले उचलली गेली असती तर?–हा विचार अस्वस्थ करणारा ठरतो.

जागतिक शांतता परिषदेच्या कार्यातून कोसंबी राजीनामा देऊन बाहेर पडले ते १९६३ साली. परंतु त्या आधीच एक वर्ष त्यांची टा. मू. सं. सं. मधील कारकीर्द संपुष्टात आली.

टा.मू.सं.सं.मधील कोसंबींची स्थिती फारच काठावरची झाली होती. ही परिस्थिती स्वीकारून आपल्या मार्गाने जात रहाण्याचे कोसंबींनीही ठरवले असावे. भाभांबरोबरीची वितुष्टता त्यांनी संपवून टाकावी असा सल्ला भाभांच्या काही निकटवर्तीयांकडून त्यांना

मिळालाही होता, पण 'आमच्या बाबाचा (दामोदरचा) स्वाभिमान त्याच्या स्वतःपेक्षाहि मोठा आहे' असे जे धर्मानंद एकदा म्हणाले होते ते लक्षात घेता कोसंबींकडून असा सलोख्याचा यत्न अपेक्षिणे व्यर्थच होते.

भाभांशी पटले नाही असे टा.मू.सं.सं.मधील कोसंबी हे काही एकमेव वैज्ञानिक नव्हते. या ना त्या कारणाने न पटल्याने वा भांडण झाल्याने अनेकजण संस्था सोडून गेले होतेच. अल्लाडी रामकृष्णन व रा. प. थत्ते या सुरुवातीच्या विद्यार्थ्यांपासून ते प्रा. गिल, सहियार, मसानी, सिंगवी, जॉर्ज सुदर्शन, इतकेच नव्हे तर बर्नार्ड पीटर्स व अखेरीस खुद्द के. सी. या ना त्या टप्प्यावर संस्था सोडून गेले. कोसंबींनी अशाप्रकारे स्वतः होऊन संस्था सोडली नाही ही गोष्ट तशी समजण्यास अवघडच आहे. परंतु वर उल्लेखिलेल्या बहुतेक वैज्ञानिकांची बांधिलकी आपापल्या विशिष्ट विषयांवर म्हणजे भौतिकी वा गणितावर केंद्रित झालेली होती. त्यामुळे एकदा पटेनासे झाल्यावर त्यांना संस्थेत राहणे अतिशय गुदमरवून टाकणारे झाले असणार व आपल्या कारकिर्दीच्या पूर्तीसाठी ही संस्था सोडून तत्सम दुसऱ्या संस्थेत जाण्याशिवाय गत्यंतर राहिले नसणार. कोसंबींच्या व्यापक संशोधनविषयांमुळे ही गोष्ट त्यांच्या बाबतीत निश्चितच घडली नाही. उलट टा. मु. सं. सं. मधील स्वातंत्र्य व तुलनात्मक आर्थिक सुबत्ता त्यांना त्यांच्या (चांगल्या अर्थाने) व्यक्तीकेंद्रित व सर्वसाधारण प्रचलित प्रस्थापित चाकोरीपलिकडल्या वैविध्यपूर्ण संशोधनाच्या दृष्टीने फायद्याचीच ठरत होती, असे म्हणता येईल.

मात्र राजीनामा देऊन बाहेर पडण्याचा विचार त्यांनी केला नसला तरी संस्थेतून आपल्याला बाहेर काढले जाईल ही गोष्ट कोसंबी मनात बाळगून चालले होते असे स्पष्ट दिसते. आणि ही गोष्ट त्यांनी शांतताचळवळीत काम सुरू केल्यापासूनची. हार्वर्ड विद्यापीठातील डॉ. इंगाल्स यांच्याबरोबर 'सुभाषितरत्नकोशा'ची चिकित्सक आवृत्ती तयार करण्यासंबंधी त्यांचा पत्रव्यवहार चालू असता, १९५२ सालीच 'शांतता चळवळीतील माझ्या सहभागामुळे नजीकच्या काळात संस्थेतून माझी हकालपट्टी होण्याची शक्यता आहे' असे त्यांनी म्हटले होते. हा सर्व त्यांच्या कल्पनेचा खेळ होता व आपल्याविरुद्ध सगळे टपले आहेत अशी त्यांना वाटणारी paranoiaची भावना यामागे होती की थोडीबहुत अतिशयोक्ती करून इतरांना धक्के देऊन डिवचण्याच्या त्यांच्या खोडकर स्वभावाचा तो परिपाक होता, हे सांगणे कठीण आहे.

परंतु काही अंशी त्यांची भीती खरीही असावी. कारण याच सुमारास पुण्यातील विज्ञानवर्धिनी (महाराष्ट्र असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स) या तेव्हा छोटेखानी असलेल्या संशोधनसंस्थेचे संस्थापक-संचालक डॉ. शं. पु आधारकर यांच्या बरोबर बोलताना, कोसंबींनी आपणास तेथे काम करण्याची संधी मिळणे शक्य आहे का अशी, चौकशी केल्याचे सांगतात. कोसंबींची कीर्ती माहीत असलेल्या धीम्या स्वभावाच्या आधारकरांनी 'आपल्यासारख्या थोर विद्वानास या छोट्या ठिकाणी कसे काय जमणार?' असे म्हणून टोलावले होते ते वेगळे. परंतु भाभा व टाटांची नाराजी स्पष्ट जाणवली असल्याने कोसंबींनी अशाप्रकारे, वेळ आल्यास अन्यत्र आसरा शोधण्याची चाचपणी केली असावी असे निश्चित म्हणता येईल. नंतर प्रत्यक्षात वेळ



आल्यावर या विज्ञानवर्धिनीतच त्यांना आसरा मिळाला ही गोष्टही सूचकच मानली पाहिजे.

कोसंबींनी स्वतः होऊन बाहेर पडण्याचे नाकारल्यावर त्यांचे निव्वळ अस्तित्व सहन करण्याचे संस्थेने ठरवले हे खरे, तरी त्यांना बाहेर काढण्याची योग्य संधी व वेळ भाभाही शोधत असावेत.

आणि अशी एक संधी कोसंबींकडून त्यांना प्राप्त झाली असे दिसते.

सकृत्दर्शनी दिसणारे कारण म्हणजे कोसंबींचा, प्रसिद्ध झालेला, एक गणितातील संशोधनलेख

'रिमान हायपॉथेसिस' वा 'रिमान कंजेक्चर' हा गणितातील एक कूटप्रश्न आहे. रिमान या गेल्या शतकातील जर्मन गणितज्ञाने १८५९ सालच्या आपल्या एका लेखात करून ठेवलेला हा तर्क. गणितक्षेत्रातील या प्रश्नाचे स्थान फार महत्त्वाचे आहे, कारण नंबर थिअरी व इतर काही क्षेत्रांतील महत्त्वाचे प्रश्न यांच्याशी निगडित आहेत. रिमानचा तर्क बरोबर वा चूक सिद्ध करून दाखविणारा गणिती फार मोठ्या मानाचा धनी होणार हे त्यामुळे निश्चित आहे. अर्थातच् अनेक महान गणितज्ञांनी यावर डोकेफोड केलेली आहे. एखाद्याला रिमानचा तर्क आपण सिद्ध केला असे वाटावे, पण नंतर त्या सिद्धतेतील चूक कळून यावी असेही बरेचदा घडले आहे. नोर्बर्ट वीनर यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहून ठेवल्याप्रमाणे प्रत्येक सच्च्या गणितज्ञाला अशा कूटप्रश्नांना हात घालावासा वाटतोच, आणि स्वतःची बौद्धिक क्षमता जास्तीत जास्त ताणून आपल्या मर्यादांची जाणीव होण्यासाठी ते आवश्यकच असते.

कोसंबींचा संस्कृत, इतिहास, उत्खनन, इत्यादी क्षेत्रांतील संशोधनपसारा वाढत असतानाही गणितातील त्यांचा रस काही कमी झाला नव्हता. एकांडेपणे का होईना पण डोक्यात घोळणाऱ्या गणितीसमस्यांवरही त्यांचे संशोधन सतत लहान प्रमाणावर चालूच होते. १९५९ साली त्यांनी 'ॲन ॲप्लिकेशन ऑफ स्टोकॅस्टिक कॉन्व्हर्जन्स' या मथळ्याचा जवळजवळ पंधरा पानी लेख लिहिला. त्यात त्यांनी काही प्रमेये सिद्ध केली, आणि अमुक अमुक प्रमेये वापरल्यावर 'रिमानचा तर्क यातून सिद्ध होतो' असे वाक्य लेखाच्या शेवटी शेवटी जोडले. वीनर यांच्या वर उल्लेखिलेल्या मताप्रमाणे रिमान तर्काच्या सोडवणुकीच्या दिशेने प्रयत्न करण्यात कोसंबींनी फार विशेष काही केले होते असे नव्हे. प्रश्न फक्त एवढा होता की इतका मोठा कूटप्रश्न सुटतोय म्हटल्यावर त्यांनी अधिक काळजीपूर्वक तपासणी करून घेणे व खास त्या क्षेत्रातील तज्ञांचे मत आजमावून पाहणे जरूर होते. असे काही परदेशी तज्ञ त्यांच्या वैयक्तिक परिचयाचेही होते. कोसंबींनी तो लेख एखाद्या महत्वाच्या गणितसंशोधनपत्रिकेत प्रसिद्धीला पाठविला असता तर छपाईपूर्वी अशा तज्ञांकडून तपासला गेलाही असता. परंतु कोसंबींनी तो चक्क 'जर्नल ऑफ इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल स्टॅटिस्टिक्स' या पत्रिकेत प्रसिद्धीसाठी पाठविला व १९५९ च्या अकराव्या अंकात तो छापूनही आला.

अशा महत्त्वाच्या सिद्धतेचा दावा करणारा लेख शेतकी संख्याशास्त्रविषयक पत्रिकेत यावा ही गोष्टच शुद्ध रक्ताच्या गणितज्ञांना धक्कादायक व अपमानास्पद वाटणार.

त्यातून कोसंबींच्या सिद्धतेत काही अपूर्णताही होत्या असे दिसते. 'त्यांच्या सिद्धतेत बऱ्याच गोष्टी सोयीस्करपणे गृहित धरल्या गेल्या आहेत.' अशी टीका एका अमेरिकन गणिती पत्रिकेतील परीक्षणात आली होती असे टा.मू.सं.सं.मधील काही तत्कालीन तरुण गणितज्ञांच्या आठवणीत आहे. कोसंबी रिमानचा तर्क सिद्ध करण्यात असफल ठरले, परंतु त्यांच्या त्या लेखात काही महत्त्वाच्या नव्या कल्पना होत्या व दुर्दैवाने त्यांचा नंतर कोणी पाठपुरावा केला नाही असे प्रा. मसानींनी म्हटले आहे. एकंदरीत रिमान तर्काबद्दल कोसंबींची फसगत झाली तरी लेख बऱ्यापैकी दर्जाचा होता असे दिसते.

मात्र लेखातील दावा, तो प्रसिद्ध करण्याचे माध्यम वगैरेतील गफलतींचा फायदा संस्थेतील त्यांच्या हितशत्रूंनी घेतला अशी शक्यता दिसते. कोसंबींनी आपल्या लेखाच्या प्रती संस्थेतील सहकाऱ्यांना वाटल्या नव्हत्या. परंतु कालांतराने याचा सुगावा व त्यावरचे टीकात्मक परीक्षण के. सी. च्या हाती आले. त्यांनी मग कोसंबींच्या अशा अर्ध्याकच्च्या संशोधनामुळे आपल्या विभागाच्या कीर्तीला बाधा येते अशी तक्रार केली. भाभांनी ही तक्रार मनावर घेतली.

संस्थेत बहुतेक नेमणुका या तीन वर्षांच्या कालावधीकरता होत असत. ती मुदत संपल्यावर पुन्हा फेरनियुक्ती मिळे – त्याच पदी वा वरच्या पदी वगैरे. आतापर्यंत कोसंबींना त्याच पदावर फेरनियुक्ती दिली जात होती. पण १९६० सालापासून त्यांना तीनऐवजी एका वर्षाची फेरनियुक्ती देण्यात येऊ लागली. अखेरीस १९६२ साल उजाडले. कोसंबींच्या वयाला पंचावन्न वर्षे पुरी होणार होती. ५५ व्या वर्षी एखाद्या कर्मचाऱ्याला निवृत्त करण्याची सरकारी प्रथा होतीच. तो मोका साधण्यात आला असे दिसते. वर्षाची नियुक्ती संपल्यावर फेरनियुक्ती न देता कोसंबींना संस्थेच्या सेवेतून मुक्त करण्याचा निर्णय कौन्सिलच्या सभेत घेण्यात आला. त्यावेळच्या कौन्सिलसदस्यांपैकी एक व्यक्ती वगळता कोणीही कोसंबींच्या रदबदलीचे प्रयत्न केले नाहीत.

ही गोष्ट घडली १९६२ च्या पूर्वार्धात. उन्हाळ्याच्या रजेत कोसंबी पुण्यास असताना त्यांना भाभांचे पत्र मिळाले. 'संस्थेच्या सेवेतून तुम्हाला मुक्त केले आहे. प्राचीन भारतीय इतिहास वगैरे विषयात संशोधन करण्यात तुम्हाला बराच रस आहे. आता यात अधिक संशोधन करण्यास तुम्हाला अधिक वाव मिळेल' असा टोमणाही पत्रात होता असे म्हणतात. सेवामुक्ती डिसेंबरपासून अमलात यावयाची होती, तोपर्यंतचा पगार त्यांना मिळणार होता. परंतु उन्हाळी रजेनंतर आपण कामावर आला नाहीत तरी चालेल, अशीही पुस्ती पत्रात जोडली होती. पत्र वाचल्यावर कोसंबी फार गरम झाले असे त्यांचे परिचित सांगतात. तसे होणे साहजिक होते. परंतु कोसंबींनाही हे फारसे अनपेक्षित नसावेच. तरीही त्यांनी भाभांना याविरुद्ध पत्र लिहिलेच. आपणास आपल्या खोलीची व टंकलेखकाची गरज भासेल, असेही कळविले. प्रत्यक्षात मात्र ते नंतर फार वेळा संस्थेतही गेले नाहीत. दोन-तीनदा फेऱ्या मारून त्यांनी आपल्या कागदपत्रांची आवराआवर केली व नको त्या कागदांची विल्हेवाट लावली.

संस्था १९६२ साली नेव्हीनगर जवळच्या आपल्या नव्या भव्य सौंदर्यपूर्ण वास्तूत गेली. पेडररोडवरून संस्था गेटवेजवळच्या ओल्ड यॉट क्लबमध्ये हलली, तेव्हा



कोसंबींचे भाभांबरोबरचे संबंध दुरावले होते. आता संस्था स्वतःच्या नव्या आलिशान जागेत आली तेव्हा कोसंबींवर तेथून बाहेर पडण्याची पाळी आली. आणि तीही अशी की संस्थास्थापनेच्या वेळी भाभांखालोखाल स्थान असलेल्या कोसंबींच्या वाट्याला साधा निरोपसमारंभही आला नाही.

टा.मू.सं.सं.मधून बाहेर काढले गेल्यावर वयाच्या ५५व्या वर्षी कोसंबी पूर्णपणे स्वतंत्र झाले असे म्हटले पाहिजे. तसे पाहता त्यांचे आतापर्यंतचे बहुतेक सर्व संशोधन स्वतंत्ररीत्याच झाले होते. बनारस हिंदू विद्यापीठ, अलिगढ मुस्लिम विद्यापीठ, फर्गसन महाविद्यालय, टा.मू.सं.सं. अशा संस्थांत नोकरी करीत असतानाही त्यांचे संस्थेतील नियोजित काम व त्यांचे स्वतःचे संशोधन याचा पूर्ण मिलाफ कधी दिसलाच नाही. गणिताचे प्राध्यापक म्हणून काम करीत असूनही त्यांचे गणिती काम हे एकांडेपणाने व संस्थेतील विद्यार्थी वा सहकाऱ्यांशी फार संबंध न येताच झालेले. अपवाद फक्त टा.मू.सं.सं.मधील दोन-तीन विद्यार्थ्यांचा बाकी विषयांतील संशोधनाचा त्यांच्या गणिताच्या प्राध्यापकपदाशी थेट संबंध नव्हताच. तरीपण आतापर्यंत सतत एक संस्थात्मक आधार त्यांच्या पायाखाली होता. तो आता सुटला.

आणि ही परिस्थिती तशी अवघडच म्हटली पाहिजे ! एका दृष्टीने झाली गोष्ट चांगलीच झाली होती. कारण त्यामुळे पुणे-मुंबई प्रवासाची दगदग वाचून अधिक वेळ त्यांना उपलब्ध झाला होता. लेखनाचे, संशोधनाचे अनेक प्रकल्प त्यांच्या हातात होते, कितीतरी अधिक प्रकल्प त्यांच्या डोक्यात घोळत होते. हे सर्व पार पाडण्यासाठी वेळ आवश्यक होताच. पण आता श्रम वाचविण्याची गरजही उत्पन्न झाली होती, कारण वाढत्या वयाबरोबर शरीराची ताकद कमी होत होती.

कोसंबींची कार्यक्षमता दांडगी व शरीरात ताकद भरपूर सर्वसाधारण दोन-तीन माणसांनी करावे इतके काम ते एकट्याने उरकत आले होते. त्यांचे शारीरिक व्यक्तित्व अतिशय छाप पाडणारे होतेच. भरपूर उंची, रुंद उतरते खांदे, मजबूत मान व हातांचे कमावलेले, उठावदार स्नायू. अमेरिकेत केंब्रिजला असल्यापासूनच्या त्यांच्या व्यायामाचा हा परिणाम होता. व्यायामाचे वेड त्यांनी शेवटपर्यंत जोपासलेच होते. वजन उचलण्याचा व्यायाम ते सातत्याने करीत. त्यांच्या घरी मोठमोठी व्यायामाची वजने होती. सर्वसाधारण व्यक्तीला ती दोन हातांनी सरकवणे पण जड जाई, उचलणे बाजूलाच, असे त्यांच्या एका चाहत्याने सांगितले आहे. टा. मू. सं. सं. मधील त्यांच्या खोलीत पण जड डंबेल्स असायचे व दुपारी काही वेळ खोलीचे दार लावून घेऊन स्नायू मोकळे करण्यासाठी ते व्यायाम करायचे असे म्हणतात. एका जागी बराच काळ वाचत बसल्यावर मान व पाठ दुखून येई, त्यांना मजबुती आणण्यासाठी ते एक मोठा दगड मानेवर ठेवून आपल्या पुण्यातील बंगल्याच्या आवारात झपाझप फेऱ्या मारीत असत. लॉ कॉलेजमागील वेताळ टेकडीवर अश्मयुगीन मानवाच्या खाणाखुणा शोधीत फिरत असताना अधुनमधून मानवी संस्कार झालेल्या शिळा सापडत. असे मोठे दगडही ते

स्वतः उचलून आणीत.

लांब लांब फिरण्याची सवयही त्यांनी केंब्रिजला स्काऊट चळवळीत उचललीं होती. भारतात परतल्यावर आजुबाजूच्या परिसरात इतिहासाचा मागोवा घेण्यासाठी भ्रमंती करण्यात याचे रूपांतर झाले होते. फर्गसनात असताना रोज वेताळ टेकडीवर त्यांची फिरती असे. टा. मू. सं. सं. ला रुजू झाल्यावर जेव्हा रोज पुणे-मुंबई प्रवास त्यांनी सुरू केला तेव्हा पहाटे डेक्कन क्वीन पकडण्यासाठी भांडारकर इन्स्टिट्यूट मार्गावरील घरापासून स्टेशनपर्यंत ते पायीच जात. ('तेवढाच व्यायाम होतो'). मुंबईला पोहोचल्यावरही बरेच वेळा बोरीबंदर ते गेट वे हे अंतरही पायीच काटत. पाठीवर नॅपसॅक टाकून भराभर चालत जाणारी त्यांची रुबाबदार आकृती अजूनही अनेकांना आठवते. (आणि बहुतेकांचा त्यांच्याशी परिचय या दृष्टीदर्शनापुरताच मर्यादित होता.)

सतरा वर्षांच्या टा.मू.सं.सं.मधील कारकिर्दीत दहा वर्षांहून अधिक काळ त्यांनी केलेला पुणे-मुंबई-पुणे प्रवास, क्षेत्रनिरीक्षणाच्या कामासाठी अंतर्भागातील धड रस्ते नसलेल्या प्रदेशात केलेली पायपीट, यांच्याच जोडीला रात्री दोन-दोन वाजेपर्यंत जागून केलेले वाचन व लेखन, आणि स्वतः टंकलेखनाने केलेला मोठ्या प्रमाणावरील पत्रव्यवहार, या गोष्टी त्यांच्या प्रचंड शारीरिक क्षमतेची ग्वाही देतात.

परंतु १९६० पासूनची त्यांची जी पत्रे उपलब्ध आहेत त्यांवरून मात्र त्यांची प्रकृती ढासळल्याचे लक्षात येते. आपली तब्येत फार खराब झाली असून त्यामुळे कामात फार व्यत्यय येतो, आता आणखी किती दिवस काम करता येईल याचा काही भरवसा नाही, अशा प्रकारची वाक्ये ते वारंवार लिहीत होते. एक गोष्ट निश्चित होती ती म्हणजे त्यांचे सधिवाताचे दुखणे बरेच जुने होते. वारंवार सांधेदुखीमुळे हातपाय आखडत व खूप वेदना होत. 'बोटे दुखत असल्याने टंकलेखन फार वेदना देतेय, तेव्हा अधिक काही लिहीत नाही' असे सांगणारे एक पत्र आढळते.

त्यांनी १९५५ साली मॉस्कोला दिलेल्या भेटीत स्वतःवर ओषधोपचार करून घेतले होते. एकंदरीतच या त्रासावर ते मोठ्या प्रमाणावर व अतिचिकित्सेने औषधे घेत असे दिसते. एकीकडे गावठी, वैदूंकडे मिळणारी तेले ते वापरत. ही जंगली औषधीयुक्त तेले गुणकारी असून त्यामुळे वेदनाशमन चांगले होते अशा शिफारशी करून काही परदेशी मित्रांना त्यांनी ती पाठविलीही होती. पण त्याचबरोबर परदेशी औषधे घेण्याकडेही त्यांचा खूप कल होता. आपल्या तरुण विद्यार्थी-सहकाऱ्यांना त्यांनी वारंवार लंडनहून विशिष्ट औषधे, इंजेक्शने पाठविण्याबद्दल लिहिले आहे. भारतात ही औषधे मिळतच नाहीत वा मिळाली तरी ती योग्य दर्जाची नसतात असाही तक्रारीचा सूर त्यांच्या पत्रांत आढळतो. संधिवातावर एका हंगेरियन डॉक्टरचे औषधोपचार ते घेत असत. ती औषधे त्यांना फार गरम पडली असा प्रवादही ऐकू आला.

कोसंबींचे पुण्यातील खास मित्र प्रा. डॉ. गोखले यांच्या मते कोसंबींना औषधे खाण्याची जरा जास्तच सवय होती. याबाबत ते पक्के अमेरिकन म्हणजे tablets popping – जरा काही झाले की औषधी गोळ्या तोंडात टाकणारे होते. त्यांच्या भगिनी मनोरमा साठे यांच्या आठवणीनुसार 'त्याचा स्वभाव याबाबत कुरकुराच होता.



व भित्राही. फार काय नसायचे, पण तो खूपच बाऊ करायचा.'

कोसंबींचे हे स्वभाववैशिष्ट्य होते. परंतु १९६० नंतर मात्र त्यांची तब्येत खरोखरच नीट नसल्याचे जाणवते. कदाचित इतकी वर्षे जादा मेहनत केल्याचा ताण उतारवय सुरू झाल्यावर त्यांना जाणवू लागला असावा. आता फार काळ आपल्याला उरला नाही अशा प्रकारची काहीशी निराशाजनक वाक्ये नाहीतर त्यांच्या हातून उतरली नसती.

सक्तीच्या निवृत्तीवेळच्या या परिस्थितीमुळे त्यांच्यामागची एक दगदग सुटली, आता स्वतःच्या इतिहासविषयक संशोधन-लेखनाकडे लक्ष देण्यास त्यांना अधिक फुरसत मिळाली, असे म्हणणे ही एक बाजू झाली. परंतु स्वतःचे संशोधन चालविण्याच्या दृष्टीने दुसरी बाजूही महत्त्वाची होती व तीही अधिक ताबडतोबीची म्हणावी अशी. ती म्हणजे आर्थिक परिस्थिती !

निव्वळ कौटुंबिक दृष्ट्या विचार करता त्यांची आर्थिक स्थिती वाईट नव्हतीच. पुण्याला स्वतःचे घर पूर्वीपासून होतेच, पत्नीचे माहेरही श्रीमंत होते, शिवाय टा.मू.सं.सं.मधील सुरूवातीच्या काळात त्यावेळच्या मानाने भरपूर पगारही त्यांना मिळत होता. १९६२ पर्यंत संसाराची जबाबदारीही त्यांच्यावर उरली नव्हती. मोठी मुलगी माया केव्हाच लग्न होऊन सौ. माया सरकार बनून पतीबरोबर स्वीडनला मुक्काम करून होती. नात नंदिताचा १९६० साली जन्म होऊन कोसंबी आजोबाही झाले होते. धाकटी मुलगी मीरा फर्गसनात शिक्षण आटोपून काही काळ प्राध्यापकी करून मुंबईस ब्रिटिश कौन्सिल ग्रंथालयात कामास लागली होती. पुस्तकांचे हक्क, इतर लिखाण यातूनही थोडाबहुत पैसा त्यांना मिळत असणारच.

परंतु त्यांची स्वतःची बचत फारशी नसावी. कारण त्यांनी खर्चही चांगलाच उदारपणे व सढळहस्ते केलेला होता.

एक म्हणजे वैयक्तिक बाबतीत त्यांनी स्वतःचे तसे काही हाल करून घेतले नाहीत. धर्मानंदांचा गांधीवादी साधेपणा त्यांनी उचलला नव्हता. डेक्कन क्वीनने ते पहिल्या वर्गाने प्रवास करीत. हार्वर्डमधील संस्कृतज्ञ प्रा. डॅनिएल इंगाल्स यांच्या आठवणीनुसार भारतातील दौऱ्यात इंगाल्स यांनी सर्वत्र तिसऱ्या वर्गाने प्रवास केला होता व त्याला अपवाद फक्त पुणे-मुंबई प्रवासाचा झाला होता. कारण तेव्हा कोसंबी त्यांना निरोप द्यायला मुंबईपर्यंत आले होते व इंगाल्सनी पहिल्या वर्गानेच प्रवास करावा असा आग्रह त्यांनी धरला होता. 'मी अमेरिकन भांडवलशाहीचा प्रतिनिधी, तर ते साम्यवादी. पण....' असे इंगाल्स यांनी खोचकपणे लिहून ठेवले आहे.

खाण्यापिण्याच्या बाबतही ते सढळहस्त होते, आणि स्वतःबरोबर इतरांना खाऊ घालण्याची त्यांना खूप हौस होती. अमेरिकेत उचललेली त्यांची एक सवय म्हणजे चॉकलेटे खाणे. कॅडबरी व इतर इंपोर्टेड चॉकलेटे त्यांच्या आवडीची. 'ते पैसे देऊन ठेवत आणि मी त्यांना इटालियन वगैरे चॉकलेटस्चे बार आणून देत असे. चांगलेच महाग असत,' अशी आठवण टा. मू. सं. सं. मधील एका कर्मचाऱ्याने सांगितली आहे. तर दुसऱ्या एकाच्या आठवणीनुसार 'ते वाचन वा लेखनात मग्न असताना त्यांच्या

असे उपशीर्षक असलेला हा लेखसंग्रह १९६२ सालीच मुंबईच्या पॉप्युलर प्रकाशनतर्फे प्रसिद्ध झाला. पुस्तकाच्या प्रस्तावनेत या स्वयंसेवी सहकाऱ्यांचे आभार मानताना कोसंबींनी चावडा व सिसोदिया यांचा विशेष उल्लेख केला आहे. हे दोघेही संस्थानिक घराण्यांशी संबंधित होते, व भ्रमंतीसाठी आवश्यक ती जीप व मोटारची सुविधा त्यांच्यामुळेच कोसंबींना उपलब्ध होऊ शकली होती. दोघेही पुढे लंडन विद्यापीठातील 'सोसायटी फॉर ओरिएंटल अॅन्ड अॅफ्रिकन स्टडीज्' या संस्थेत शिक्षणाला गेले, परंतु नंतर मात्र या संशोधनक्षेत्राबाहेर पडले. जपानी विद्यार्थी आपल्या मायदेशात प्राचीन भारतीय विद्येचे अभ्यासक म्हणून पुढे मान्यता पावले. परंतु कोसंबींचा सर्वात जास्त प्रभाव पडला तो जर्मन विद्यार्थी गुंथर सोन्थायमर यांच्यावर. पौर्वात्यविद्येचे प्राध्यापकपद हायडेलबर्ग विद्यापीठात भूषविणारे सोन्थायमर यांनी प्रामुख्याने महाराष्ट्राचीच आपल्या संशोधनाची कर्मभूमी म्हणून निवड केली.

येथे लक्षात घेण्याची एक गोष्ट म्हणजे हे सर्व स्वयंसेवी-विद्यार्थी लंडनमधील प्राच्यविद्याभ्यास संस्थेशी संलग्न होते. आणि या संस्थेशी व तेथील प्रमुख संशोधकांशी कोसंबींचे बरेच जवळचे संबंध होते. भारतीय इतिहासावरचे अधिकारी संशोधक बॅशम यांच्याशी कोसंबींची खास मैत्री आधीपासूनच होती. ब्रिटिश कौन्सिलच्या द्वारे आयोजित लंडनचा दौरा १९६० साली कोसंबींनी केला. त्यावेळी प्राच्यविद्याभ्यास संस्थेत त्यांची भाषणे झाली होती. महाराष्ट्रातील नावीन्यपूर्ण क्षेत्रीय निरीक्षण व स्वतः बनवलेल्या उत्कृष्ट स्लाईडस् यांमुळे ही भाषणे फार परिणामकारक व प्रभावी झाली. लंडनमधील या संस्थेशी संबंधित विद्यार्थ्यांचा 'आंतरराष्ट्रीय' चमू त्यांच्या भोवती गोळा होण्यमागे हे धागेदोरे होते.

यातून जाणवणारी दुसरी गोष्ट म्हणजे खेडोपाडी फिरत, निरीक्षण करीत गावकऱ्यांकडून माहिती गोळा करीत हिंडण्याच्या या कामी पुण्यात असलेल्या कोसंबींना परदेशी व अन्य प्रांतीय विद्यार्थी-सहकारी मिळाले तरी स्थानिक मराठी भाषिक विद्यार्थी-विद्यार्थिनी काही मिळाले नाहीत. त्यांच्या या संशोधनकामाचे स्वरूप लक्षात घेता लोकभाषा जाणणारे, लोकधर्माची उपजत जाण असणारे सहकारी बरोबर असते तर त्यांचे कार्य कितीतरी अधिक कार्यक्षमतेने होऊ शकले असते. परंतु येथे ते इतरांपासून व इतर त्यांच्यापासून फटकून दूरच राहिले असे दिसते.

तर कोसंबींना जेव्हा भाभांचे पत्र मिळाले तेव्हा ते या आंतरराष्ट्रीय चमूबरोबरच्या क्षेत्रनिरीक्षणाच्या प्रकल्पात, तसेच अन्य कार्यक्रमांत पूर्ण बुडालेले होतेच.

त्यांनी शांतता परिषदेच्या कामानिमित्त ६२ च्या उन्हाळ्यात रुमेनियाला धावती भेट दिली, व त्यावेळी तेथील पुरातत्त्वज्ञांच्याही गाठीभेटी घेतल्या. जुलैमध्ये पूर्वजर्मनीला भेट देण्याचे आमंत्रण त्यांना होते, परंतु तेथील प्राच्यविद्यापंडित रुबेन यांच्याशी असलेल्या मतभेदांमुळे त्यांनी ते टाळले. ऑक्टोबरात चावडा व सिसोदिया यांच्यासह, जीप वा स्टेशनवॅगन घेऊन भीमानदीच्या खोऱ्याची पहाणी त्यांनी पूर्ण केली. अनेक शिळास्मारके (स्थानिक परिभाषेत खिळा वा खंड), दगडांवरील प्राचीन मानवाचे संस्कार दर्शविणारी कोरीव चिन्हे व आकृत्या त्यांना आढळल्या. हवाई सर्वेक्षण करून



या संपूर्ण विभागातील विखुरलेल्या अवशेषांचा समग्र नकाशा बनविण्याचा प्रकल्प त्यांच्या मनात आकार घेऊ लागला. कोसंबींभोवती जमलेला चमू १९६३ पर्यंत पूर्णपणे विखुरला, पण त्यांचे या क्षेत्रातील काम अखेरपर्यंत चालूच राहिले.

१९५६ साली प्रसिद्ध झालेला 'भारतीय इतिहासाच्या अभ्यासाची तोंडओळख' हा ग्रंथ, १९५७ साली प्रसिद्ध झालेला 'सुभाषितरत्नकोश,' तसेच प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृतीवरचे अनेक लेख यांच्या परिणामी यावेळेपर्यंत प्राच्यविद्याक्षेत्रात त्यांची कीर्ती पसरून त्यांना मान्यता प्राप्तही होऊ लागली होती. यात कदाचित त्यांची टा. मू. सं. सं. मधून मुक्तता झाल्याच्या गोष्टीची भर पडली असावी. कारण या सुमारास कोसंबींना देश-परदेशांतून अनेक निमंत्रणे मिळत गेल्याचे दिसते. यातील बरीचशी आमंत्रणे व कार्यक्रम प्रत्यक्षात उतरू शकले नाहीत हे खरे, परंतु त्यांच्या कार्याची दखल घेणारे, तसेच त्यांच्याबद्दल सहानुभूती व आत्मीयता बाळगणारे अनेकजण अनेक ठिकाणी विखुरलेले होते, याची मात्र यातून चांगलीच प्रचिती येते.

१९६२ साली हार्वर्डहून डॅनिएल इंगाल्स यांचे पत्र कोसंबींना मिळाले. त्यात १९६५-६६ सालची हार्वर्ड विद्यापीठातील 'टागोर मेमोरिअल' भाषणमाला कोसंबींनी द्यावी अशी अनौपचारिक सूचना इंगाल्सनी केली होती. कोसंबींनी इंगाल्स यांना निःसंदिग्धपणे होकार वा नकार दिल्याचे आढळत नाही. मात्र प्राचीन भारतीय संस्कृतीवर भाषणमाला देण्याची तयारी त्यांनी सुरू केल्याचे दिसते. याबाबत संबंधित मित्रांना लिहिलेल्या पत्रातच 'माझ्या प्रकृतीविषयी फार पुढचा विचार करणे मला शक्य होत नाही, अमेरिकेची सफर मला कितपत झेपेल हा एक प्रश्नच आहे' अशा प्रकारची वाक्येही त्यांच्या हातून उतरलेली आढळतात. मात्र अखेर हार्वर्ड विद्यापीठाकडून औपचारिक निमंत्रण काही त्यांना आलेच नाही, व 'टागोर मेमोरिअल' भाषणमालेचा इंगाल्स यांचा प्रस्ताव प्रत्यक्षात उतरण्याचे राहूनच गेले. नक्की काय घडले हे कळण्यास वाव नसला तरी एकीकडे कोसंबींची मार्क्सवादी म्हणून असलेली प्रसिद्धी तर दुसरीकडे अमेरिका विएतनाम युद्धात गुंतल्यामुळे त्या सुरुवातीच्या काळात तेथे निर्माण झालेले कम्युनिस्टविरोधी वातावरण (कालांतराने अमेरिकन जनमत विएतनाम युद्धविरोधी होत गेलं) हे घटक महत्त्वाचे ठरले असावेत असे म्हणता येईल.

याच काळात ऑस्ट्रेलिया, जपान, व जर्मनी येथील आमंत्रणांचे प्रस्तावही कोसंबींपुढे होते. कोसंबींचे जवळचे मित्र प्रा. बॅशम हे लंडन सोडून ऑस्ट्रेलियाला गेले होते, पुण्याच्या भ्रमंतीत त्यांच्याबरोबर असलेला एक विद्यार्थी-सहकारी टोकिओ विद्यापीठात रुजू झाला होता, तर गुंथर सोन्थायमर हायडेलबर्ग विद्यापीठात परतले होते. आपापल्या विद्यापीठात येऊन कोसंबींनी भाषणमाला द्यावी वा एखादा सत्र-वर्ग घ्यावा असे त्यांचे प्रयत्न होते. परंतु याबाबतही पुढची पावले काही पडली नाहीत.

कोसंबींना १९६२ मध्येच आणखी एक महत्त्वाचा प्रस्ताव मिळाला. टागोर मेमोरिअल भाषणमालेप्रमाणेच ह्या प्रस्तावाचा उगमही अमेरिका खंडातूनच झाला होता. परंतु अमेरिकन संयुक्त संस्थानांच्या विरुद्ध गटातून म्हणजे क्यूबातून हा प्रस्ताव पुढे आला होता.

संयुक्त संस्थानांच्या अंगणातल्या क्यूबा या छोटेखानी बेटावर नुकतीच क्रांती झाली होती. फिडेल कॅस्ट्रो यांच्या नेतृत्वाखालील तरुणांच्या सशस्त्र गटाने आधीचा हुकूमशहा बॅटिस्टा याला सत्ताभ्रष्ट करून क्रांतीचा झेंडा उभारला होता. अमेरिकन सरकारच्या या क्रांतीविरुद्धच्या प्रतिक्रियेमुळे कॅस्ट्रोने समाजवादाची कास धरून सोविएत युनियनची मदत स्वीकारली होती. क्रांतीच्या सुरुवातीच्या उत्साहात अनेक नवनवे प्रकल्प संकल्पिले जात होते व त्यातील एक होता शंभर भागांचा विश्वकोश तयार करणे. क्रांती मजबूत करून समाजवादाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी सर्वसामान्यांपर्यंत शिक्षण-ज्ञानाचा प्रसार झाला पाहिजे व यासाठी सोप्या भाषेत जगातील ज्ञानभांडार आपल्या लोकांना उपलब्ध करून दिले पाहिजे, ही क्यूबाच्या विश्वकोश प्रकल्पामागची भूमिका होती. आणि या विश्वकोशासाठी प्राचीन भारतीय संस्कृतीवरचे पुस्तक वा प्रकरण लिहून देण्याचे काम कोसंबींवर सोपविले गेले. आणि कोसंबींनीही ते तत्काळ स्वीकारले, व कामास सुरुवात केली. ते इंग्रजीमध्ये लिखाण करणार होते व त्याचे स्पॅनिशमध्ये भाषांतर करून ते विश्वकोशासाठी वापरले जाणार होते.

क्रांतीच्या सुरुवातीच्या उत्साहात हा असा महत्त्वाकांक्षी प्रकल्प रचण्याचा घाट क्यूबाने घातलेला. क्रांतीनंतरच्या उलथापालथीत क्यूबासारख्या छोट्या, मागस, व गरीब राष्ट्रास हा प्रकल्प कसा काय झेपला असता हाही एक प्रश्नच होता. अखेर हा प्रकल्प बारगळला, पण त्याला तात्कालिक कारण वेगळेच मिळाले. उत्तर अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील फ्लोरिडाच्या आखाताला अधुनमधून मोठ्या वादळांचे तडाखे बसत असतात. या आखातातील क्यूबाच्या बेटालाही त्यांचा फटका बसतोच. 'फ्लोरा' नामक एका चक्रीवादळाने यावेळी क्यूबाला झोडपून काढले व त्या छोट्या देशाचे अतोनात नुकसान घडवून आणले. परिणामी, क्यूबाने कोसंबींना दिलेले आमंत्रण खेदपूर्वक मागे घेतले. असे म्हणतात की क्यूबाच्या सरकारने कोसंबींनी तोपर्यंत केलेल्या परिश्रमांचा मोबदला म्हणून काही मानधनही देऊ केले होते, परंतु कोसंबींनी स्वतः ते न स्वीकारता ते पैसे शांतताचळवळीच्या कार्यासाठी वापरावे असे कळविले.

टागोर मेमोरिअल भाषणमाला देणे, क्यूबाच्या विश्वकोशरचनेला हातभार लावणे अशा मानाच्या संधी कोसंबींच्या हातून निसटून गेल्या हे खरे, पण यासाठी चाललेल्या कामाचा परिपाक म्हणून प्राचीन भारतीय इतिहासावरचे आणखी एक महत्त्वपूर्ण पुस्तक मात्र त्यांच्या नावे प्रसिद्ध झाले, व भारतीय इतिहासक्षेत्रात दीर्घकाळ गाजत राहण्याचा मान त्यांना प्राप्त झाला, कारण या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या व भाषांतरे प्रसिद्ध झाली.

'कल्चर अॅन्ड सिव्हिलायझेशन ऑफ एन्शंट इंडिया'– प्राचीन भारतीय संस्कृती– हा तो गाजलेला ग्रंथ.

तसे पाहता ५६ साली मुंबईच्या पॉप्युलर प्रकाशनतर्फे प्रसिद्ध झालेल्या 'भारतीय इतिहासाच्या अभ्यासाची तोंडओळख' या ग्रंथाचा विषयही हाच होता व हे दुसरे पुस्तकही त्या चौकटीबाहेर फारसे गेले नाही. एकप्रकारे हे दुसरे पुस्तक म्हणजे पहिल्या ग्रंथाचीच सोपी व काहीशी सुधारित आवृत्ती म्हणावी लागेल.



'भारतीय इतिहासाच्या अभ्यासाची तोंडओळख' हा ग्रंथ चांगला जाडजूड चारशे पानी होता. अनेक संदर्भ, अभ्यासपद्धतीची चर्चा यांमुळे तो क्लिष्टही वाटणारा होता. इतिहासाचे अभ्यासक व संशोधक-विद्यार्थी यांच्या दृष्टीने तो ग्रंथ महत्त्वाचा असला तरी सर्वसाधारण सुजाण वाचकाच्या दृष्टीने तो कठीणच होता.

क्यूबाच्या विश्वकोशासाठी लिखाण करताना कोसंबींनी सुबक, थोडक्यात व सोप्या प्रकारे मांडणी करण्याचा प्रयत्न केला होताच. या निमित्ताने अधिक रेखाचित्रे, छायाचित्रे व प्लेटस् यांचीही त्यांनी जुळवाजुळव केली. शिवाय मध्यंतरीच्या काळातील क्षेत्रनिरीक्षणाचा अनुभव मोलाचा झाला. त्यानुसार काही बदल करणे व भर टाकणे जरुर होते. तेव्हा पहिला ग्रंथ व विश्वकोशासाठी केलेले काम यांचा मध्य गाठून व्यापक वाचकवर्गाला आकर्षक वाटेल असे हे पुस्तक त्यांनी तयार केले.

आता प्रश्न उद्भवला प्रकाशकाचा आणि या पुस्तकासाठी भारतापेक्षा इंग्लंडमधील एखादा प्रकाशक मिळावा अशी त्यांची मनातील तीव्र इच्छा होती असे दिसते. यामागे दोन-तीन कारणे होती. प्राचीन भारतीय संस्कृतीवरचे आपले हे पुस्तक खूप दर्जेदार ठरणार असा आत्मविश्वास कोसंबींना निश्चितच होता. त्या दृष्टीने विचार करता हे पुस्तक अधिकाधिक ठिकाणी व अधिकाधिक वाचकांपर्यंत पोचावे असे त्यांना वाटत होते. पुस्तकाचे स्वरूपही खूप आकर्षक होणे जरुर होते. त्यावेळच्या परिस्थितीत उत्तम छपाई व रंगीत चित्रांच्या प्लेटस् वगैरे गोष्टी भारतीय प्रकाशकाद्वारे चांगल्या प्रकारे होणे कठीण जाईल असे त्यांना वाटत होते. शिवाय पुस्तकाची किंमतही फार झाली असती. शिवाय इंग्लंडमधील प्रकाशक मिळाल्यास त्यांच्या आंतरराष्ट्रीय वितरणव्यवस्थेचा व प्रतिष्ठेचा फायदा मोठाच मिळणार होता. क्यूबाच्या विश्वकोशाच्या आमंत्रणामुळे कोसंबींना स्पॅनिश भाषेत प्रसिद्धीची संधी आली होती, तेव्हा इंग्रजीखेरीज अन्य भाषांतही आपल्या पुस्तकाच्या आवृत्त्या निघाव्यात अशी रास्त महत्त्वाकांक्षाही त्यांच्या मनात घोळू लागली होती. त्या दृष्टीनेही या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन भारतापेक्षा इंग्लडमधून होणे आवश्यक होते. कोसंबी या दृष्टीने प्रयत्नशील होते. लंडनच्या व्हिक्टोरिया व अल्बर्ट म्युझियममधील भारतविभागाचे प्रमुख जॉन अर्विन कोसंबींचे खास दोस्त होते. बॅशम तसेच लंडनच्या प्राच्यविद्या संस्थेतील प्राध्यापकांचा सल्ला व शिफारशी घेऊन इंग्लंडमधील प्रकाशकांशी वाटघाटी करण्याचा अधिकार जॉन अर्विन यांना त्यांनी सुपूर्द केला होता. कोसंबींनी पुस्तक लिहिल्याची माहिती अनेक संबंधितांना होतीच. त्यामुळे पुस्तकप्रकाशनासाठी त्यांच्याकडे चौकशीही होऊ लागली होती. पुस्तकाची जर्मन आवृत्ती प्रसिद्ध करण्याची तयारी पूर्व जर्मनीतील सूत्रांनी दर्शविली होती, परंतु कोसंबींना तसे नको होते. काम नीट होईल याची खात्री नाही व शिवाय मानधनाचे पैसे मिळतील याचाही भरवसा नाही, अशी भीती त्यांनीच एका पत्रात व्यक्त केलेली आढळते. भारतीय साम्यवादी पक्षाचे नेते कॉ. डांगे यांना पण पक्षाच्या प्रकाशनसंस्थेतर्फे हे पुस्तक प्रसिद्ध करण्याची इच्छा होती. कोसंबींनी पूर्वी डांगे यांच्या भारतीय इतिहासावरील पुस्तकावर सडकून टीका केली होती व त्यामुळे त्यांच्यातील वैयक्तिक संबंधात कडवटपणाही आला होता. परंतु डाग्यांना कोसंबींच्या

विद्वत्तेची कदर असल्याने मनाचा मोठेपणा दाखवून त्यांनी हे पुस्तक मिळविण्यासाठी कोसंबींकडे निरोप पाठविले. सर्वसामान्यांना परवडू शकेल अशी स्वस्त आवृत्ती निघावी असे कोसंबींनाही वाटत होतेच, परंतु प्रथम दर्जेदार छपाईची आवृत्ती निघावी या इच्छेमुळे डांगे यांच्याकडे पुस्तक देण्यास ते राजी नव्हते. एकदा इंग्लंडमध्ये पुस्तक प्रकाशित झाले की मग स्वस्त आवृत्तीचा विचार करता येईल असे मनात असल्याने त्यांनी डांग्यांना काही दाद दिली नाही.

लंडनमधील रुटलेज अॅन्ड केगन पॉल या प्रकाशनसंस्थेने त्यांचे टंकलिखित १९६३च्या डिसेंबरमध्ये स्वीकारले. आणि मग कोसंबी या पुस्तकाच्या तयारी-प्रक्रियेत उत्साहाने व चिकित्सकपणे बुडून गेले. यावेळी जॉन अर्विन तसेच गुंथर सोन्थायमर यांच्याबरोबर त्यांचा मोठ्या प्रमाणावर नियमित पत्रव्यवहार चालू होता. पुस्तकात प्रसिद्ध करण्यासाठी छायाचित्रे, रेखाचित्रे, स्लाईडस् यांची निवड अतिशय चोखंदळपणे करताना ते दिसतात. पुस्तक शक्यतो परिपूर्ण व्हावे, त्यात लहानसहानही चुका राहू नयेत, तसेच संस्कृत शब्दांच्या उच्चारखुणा बिनचूक याव्यात यासाठी प्रुफे स्वतः नजरेखालून घालण्यावरही त्यांचा कटाक्ष होता. लंडनमध्ये प्रकाशकांशी बोलणी करण्याचे हक्क त्यांनी अर्विन यांना दिले असल्याने वारंवार त्यांच्याकडे चौकशी व तक्रारी करताना ते आढळतात.

एकदा इंग्लंडमधून इंग्रजीमध्ये पुस्तक प्रसिद्ध होणार हे निश्चित झाल्यावर अन्य भाषांत ते प्रसिद्ध होण्याची शक्यता निर्माण झाली, व कोसंबींचा त्या बाबतीतील उत्साहही ओसंडून जाऊ लागला. कोसंबींच्या 'आंतरराष्ट्रीय' भ्रमंतीगटातील विद्यार्थी, तसेच त्यांचे लंडन, पॅरिस, हायडेलबर्ग येथील प्राच्यविद्यातज्ज्ञांबरोबरचे संबंध यामुळे हे काम बऱ्याच अंशी सुकरतेने घडून आले. टंकलिखिताच्या प्रतींवरूनच जर्मन, फ्रेंच व जपानी भाषांतराची कामे स्वीकारली गेली. कोसंबींच्या कामाची अशी कदर होणे ही मोठ्या गौरवाची गोष्ट होती व त्याचा रास्त अभिमानही त्यांना वाटत होता. त्यांची मोठी मुलगी स्वीडनमध्ये स्थायिक झालेली होती. त्यामुळे त्यांचे जावई सरकार यांच्यामार्फत स्वीडिशमध्ये भाषांतर करण्याची बोलणीही चालू झाली. अमेरिकेतून 'मंथली रिव्हयू' या डाव्या विचारांच्या प्रकाशनाचे प्रा. पॉल बॅरन यांनी या पुस्तकाची पेपरबॅक आवृत्ती काढण्याची विचारणा केली होती. याचवेळी पुस्तकाची स्वस्त भारतीय आवृत्ती काढणे, तसेच इतर भारतीय भाषांत त्याचे भाषांतर करण्याचे विचारही कोसंबींच्या डोक्यात घोळू लागले होते.

एकंदरीत हे पुस्तक त्यांच्या कार्याला चांगली दाद मिळवून देणार व मोठी प्रसिद्धी त्यांच्या पदरात घालणार हे जवळजवळ निश्चितच होते. यामुळे कोसंबींचा मूडही खूप उत्साहाचा होता. नियमित व मोठ्या प्रमाणावर चाललेल्या या काळातील पत्रव्यवहारात ते मित्रांजवळ सतत भाषांतराचे काम कोठवर आले याची चौकशी करीत होते. त्यांच्या शिस्तबद्ध व उतावळ्या स्वभावाला अनुसरून 'अमुकजण भाषांतर करायला घेतले आहे म्हणतो, पण त्याचे दोन महिन्यांत काही पत्र नाही; त्याने काम कोठवर केले आहे त्याची चौकशी करा; त्याचा प्रकाशक तयार असल्यास काही नवीन प्लेटस् माझ्याकडे



तयार आहेत त्या वापरतो का विचारा' अशा तक्रारी व सूचना त्यांच्या पत्रांत विखुरलेल्या आढळतात.

यावेळची एक मजेशीर हकीगतही येथे नमूद केली पाहिजे. पुस्तकाच्या मलपृष्ठावर छापण्यासाठी कोसंबींची थोडक्यात वैयक्तिक व संशोधनकार्यविषयक माहिती हवी होती. तेव्हा 'लेखकाविषयी' असे दोन परिच्छेदांचे एक टिपण अतिशय विक्षिप्त पण मिश्किल प्रकारे लिहून खुद्द कोसंबींनी पाठविले होते. 'चूक नेहमी आपल्या भिडूचीच असते' हा ब्रिजच्या पत्त्यांच्या डावातील नियम 'कोसंबी नियम' म्हणून ओळखला जातो; १९४७ साली हार्वर्ड माजी-विद्यार्थी संघाने यांच्या मृत्यूच्या दुखवट्याचा ठराव पसार करून त्याची प्रत इमानेइतबारे यांच्या पुण्याच्या पत्त्यावर पाठविली होती. परंतु पानशेतच्या पुरातून वाचलेल्या उपलब्ध कागदपत्रांवरून १९५८ सालापर्यंत तरी ते जिवंत असल्याचा नक्की पुरावा आढळतो–' अशी मुक्ताफळे त्यात होती. रुटलेज व केगन पॉल सारख्या ब्रिटिश प्रकाशकांनी खणखणीतपणे कोसंबींना बजावून सामान्य तऱ्हेची लेखकाची ओळख लिहून घेतली हे अलाहिदा. कोसंबींनी प्रथम अशी ओळख लिहून पाठविली हाच गमतीशीर विक्षिप्तपणा !

अखेर १९६५ मध्ये हे पुस्तक 'कल्चर अॅन्ड सिव्हिलायझेशन ऑफ एन्शंट इंडिया इन हिस्टॉरिकल आऊटलाईन' अशा शीर्षकाखाली लंडनहून प्रसिद्ध झाले. अमेरिकेत 'मंथली रिव्हयू'तर्फे काही प्रकाशन झाले नाही, पण लंडनच्या प्रकाशकांच्या मार्फतच पँथेऑन प्रकाशनातर्फे हे पुस्तक अमेरिकेतही त्याच वर्षी प्रसिद्ध झाले. कालांतराने जपानी, फ्रेंच, व जर्मन आवृत्त्याही प्रसिद्ध झाल्या. स्वीडिश आवृत्ती निघाली की नाही ते कळत नाही. पुस्तकाचे मराठी भाषांतर करण्याचे काम कोसंबींनी आपली भाची कुंदा साठे (आताच्या सौ. इंद्रायणी सावकार) हिच्याकडे सोपवले होते, व १९६६ मध्ये भाचीला घेऊन त्यांनी पॉप्युलर प्रकाशनच्या भटकळांची भेटही घेतली होती. परंतु हे मराठी भाषांतर काही प्रसिद्ध झाले नाही. (पुढे जयंत गडकरींनी या पुस्तकाचे सारांश स्वरूपात रूपांतर प्रसिद्ध केले.) गुणाकार मुळे यांनी नंतर या पुस्तकाचे हिन्दी भाषांतर केले. पुस्तकाची स्वस्त इंग्रजी आवृत्ती काढण्याची संधी कॉ. डांगे यांना मिळाली नाही. परंतु रुटलेज व केगन पॉलशी खास करार करून दिल्लीच्या विकास प्रकाशन संस्थेने या पुस्तकाची पहिली भारतीय आवृत्ती १९७० मध्ये काढली. भारत सरकारने स्वस्त दराने पुरवलेल्या कागदामुळे नकाशे, रेखाचित्रे, व गुळगुळीत कागदावरच्या बत्तीस प्लेटस् असलेले जवळ जवळ अडीचशे पानी हे पुस्तक विद्यार्थ्याला परवडेल अशा किमतीत उपलब्ध आहे. १९८४ पर्यंत या पुस्तकाच्या आठ आवृत्त्या विकास प्रकाशनाने प्रसिद्ध केल्या. यावरून भारतातच या पुस्तकाला मिळालेला प्रतिसाद लक्षात येतो. परंतु या सर्व नंतरच्या गोष्टी झाल्या. आपल्या पुस्तकाची ही प्रसिद्धी, त्यानुसार त्यांना मिळालेली मान्यता व लाभू शकणारी आर्थिक स्वास्थता अनुभवण्याइतके आयुष्य मात्र कोसंबींच्या नशिबी नव्हते. तरीही १९६५ साली लंडनहून झालेले प्रकाशन व अन्य भाषांतील मार्गी लागलेली भाषांतरे कोसंबींना खूप सुखावून गेली असणार हे निश्चित !

अशा प्रकारे ६३-६४ च्या काळात पुस्तकासंबंधीच्या कामात कोसंबी गुंतले होते

तरी त्यांच्या क्षेत्रनिरीक्षणाच्या कामात खंड पडला नव्हता. सिसोदिया व चावडा हे दोघेही इंग्लंडला गेल्याने त्यांच्या फिरण्यावर मर्यादा आल्या. कारण वाहनाची सोय त्यांच्यामुळे होत होती. पण लवकरच तीही सोय झाली. १९६४ च्या सुरुवातीस लष्कराची जीप (अनधिकृतपणे) कोसंबींना आपल्या भ्रमंतीसाठी वापरण्यास मिळू लागली.

याची पार्श्वभूमीही उल्लेखनीय आहे. यापूर्वीच कोसंबींचा खडकवासल्याच्या राष्ट्रीय संरक्षण अकादमीशी संबंध आला होता. पुण्याजवळ खडकवासला येथे जेव्हा नवी राष्ट्रीय संरक्षण अकादमी स्थापन झाली तेव्हा तेथील पहिले संचालक होते मेजर जनरल हबीबुल्ला. डेहराडूनच्या अकादमीच्या संचालकपदावरून ते या नव्या संस्थेच्या उभारणीसाठी नियुक्त झालेले. जनरल हबीबुल्ला स्वतः एक हौशी पुराणवस्तुसंशोधक होते. पुण्याच्या परिसराचा विचार करता नवीन अकादमीच्या अभ्यासक्रमात 'छंद' सदराखाली पुरातत्त्वविषयाचा समावेश करण्याची कल्पना त्यामुळे साहजिकच त्यांच्या मनात आली, व त्यांनी रा. सं. प्रबोधिनीत 'आर्किऑलॉजिकल सोसायटी' स्थापन केली. विषयाचे तज्ञ म्हणून डेक्कन कॉलेजचे प्रा. सांखलिया व कोसंबी यांची नावे साहजिकच त्यांच्यापुढे आली. कोसंबी राजी होणे कठीण जाईल असे हबीबुल्लांना सांगितले गेले होते. परतु त्यांचा प्रत्यक्ष अनुभव वेगळाच आला. प्रथमभेटीतच कोसंबींनी सहकार्याचा हात पुढे केला, व ते उत्साहाने या कार्यक्रमात सामील झाले. अकादमीत हबीबुल्लांनी उभ्या केलेल्या छोट्या संग्रहालयाला त्यांनी आपल्याजवळील काही अश्मयुगीन छोटी अवजारे भेट दिली. स्नातकांना भाषणे देण्याबरोबरच त्यांना क्षेत्रनिरीक्षणासाठी भटकंतीवर नेणेही त्यांनी सुरू केले. कोसंबींमुळे हा छंद फारच लोकप्रिय झाला, व विद्यार्थ्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवणे अवघड जात होते असे खुद्द हबीबुल्ला यांनी लिहून ठेवले आहे. कोसंबींबरोबरच्या एका भ्रमंतीने तर जनरलसाहेबांना थरारून सोडले होते.

कोसंबींच्या सिद्धान्ताप्रमाणे बौद्धलेणी म्हणजे प्राचीन प्रवासमार्गावरची मुक्कामाची ठिकाणे होत. त्यानुसार प्राचीन व्यापारीमार्गावर साधारण एक दिवसाच्या मजलेच्या अंतरावर लेण्यांचे गट असायला पाहिजेत. घाटावर कार्ला-भाजा हा लेण्यांचा गट आहे. तो कोकणातून वर येणाऱ्या प्राचीन मार्गाजवळ. रायगड जिल्ह्यातील जंजिऱ्याच्या खाडीत प्राचीन बंदर होते. तेथे कुड्याची लेणी आहेत. कार्ला ते कुडा हे अंतर साधारण दोन दिवसांच्या प्रवासाचे. तेव्हा मध्ये एक लेणीसमूह असावा हा कोसंबींचा अंदाज. प्रबोधिनी स्नातकाच्या गटाबरोबर कोसंबींनी घाट उतरण्यास सुरुवात केली व अर्ध्या वाटेवर त्यांना जंगलात दडलेली करसंभळ्याची लेणी सापडलीही. लेणीसमूह चांगलाच मोठा होता. हवामानामुळे व जंगलामुळे तेथील कलाकुसर पठारावरील लेण्यांपेक्षा अधिक खराब झाली होती, परंतु तेथे रंगीत चित्रे होती हे त्यांना आढळून आले. हबीबुल्ला यांच्या म्हणण्यानुसार चांगल्या स्थितीत असताना या लेण्यांनी अजिंठ्यालाही लाजवले असते. काही ब्राह्मी शिलालेखही त्यांना आढळले व ते प्लॅस्टरवर उमटवून घेण्याचे कौशल्य कोसंबींनी प्रबोधिनी-स्नातकांना शिकवले. एकंदरीत जनरल हबीबुल्ला



व त्यांचे सहकारी यांना कोसंबींनी फारच प्रभावित केले होते. गणिती व इतिहासज्ञ होण्याऐवजी त्यांनी लष्करी पेशा स्वीकारला असता तर ते एक उत्तम सेनानी झाले असते अशी दाद हबीबुल्लांनी दिली आहे. कोसंबींशी अल्पकाळ संबंध आला पण त्यामुळे दख्खनचे पठार, आपला देश व समाज इतकेच नव्हे तर संपूर्ण मानवजातीकडे बघण्याचा एक नवा दृष्टिकोन आपणास प्राप्त झाला व पिढ्यानुपिढ्यांच्या मानवी इतिहासाच्या खुणा आपल्या अवतीभोवती बघण्याची आगळी दृष्टी मिळाली असे काहीसे भारावूनच हबीबुल्लांनी लिहिले आहे.

तर या अशा संबंधांमुळे सुटीच्या दिवशी चालकासकट लष्कराची जीप त्यांना वापरासाठी देण्याची व्यवस्था होऊ शकली होती. थेऊरच्या परिसरातील शिळास्मारके, बोल्हाई देवीची शिळा यांचा अभ्यास त्यांनी केला.

उत्तरभारतात भ्रमंती करण्याची संधी १९६४ सालीच कोसंबींना मिळाली. प्रा. आर्. एस्. शर्मा हे प्राचीन भारतीय इतिहासाचे गाढे संशोधक तेव्हा पाटणा विद्यापीठात होते. मार्क्सवादी विचारसरणीच्या शर्मांना कोसंबींबद्दल खूपच आदर व सहानुभूती होती. त्यांनी पाटणा विद्यापीठात भाषणे देण्यासाठी कोसंबींना आमंत्रित केले होते. यावेळी प्रा. शर्मांच्या अनेक विद्यार्थ्यांनी कोसंबींच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाचा लाभ उठवला. याचवेळी राजगीर (राजगृह) या बुद्धकालीन राजधानीच्या गावाचे क्षेत्रनिरीक्षण करण्याचा बेतही कोसंबींनी आखला होता. त्यानुसार राजगीरच्या किल्ल्याच्या अवशेषांची तपासणी करण्यासाठी ते गेलेही होते. परंतु अतिउन्हाळ्याने त्यांच्या शरीरावर मात केली, व हे काम अर्धवट सोडून ते परतले. परतताना वाराणसीला भेट देऊन तेथेही काही भाषणे त्यांनी दिली.

नोव्हेम्बरात पुन्हा एकदा त्यांनी उत्तरेची वारी केली. यावेळी बिहारबरोबरच उत्तरप्रदेशातील बनारस हिंदू विद्यापीठ व अलिगढ मुस्लिम विद्यापीठ येथील आमंत्रणेही त्यांना होती. आपली भारतातील कारकीर्द त्यांनी बनारस व अलिगढ येथेच सुरू केली होती. त्यामुळे कारकिर्दीच्या अखेरीस पुन्हा तेथे जाण्याचा योग समाधानाचाच होता. अलिगढच्या इतिहासविभागातील ज्येष्ठ संशोधक प्रा. नुरुल हसन कोसंबींचे चाहते व हितचिंतक होते. इरफान हबीब, गौड असे पुढे भारतीय इतिहासक्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी करणारे तरुण संशोधकही तेथे होते. त्यामुळे या भेटीमुळे कोसंबी सुखावले होते. बनारसचा मुक्कामही असाच समाधानकारक ठरला. इतिहासज्ञांप्रमाणेच तेथील प्राणीशास्त्रविभागातील विद्यार्थ्यांनीही त्यांच्याशी चर्चा करण्याचा योग साधला. संख्याशास्त्राचा वापर करून अनुवंशशास्त्रात कोसंबींनी काम केले होते. त्यांचा 'कोसंबी फॉर्म्युला' प्रसिद्धच होता. त्यामुळे प्राणीशास्त्र विभागातील संशोधक-विद्यार्थ्यांनी आपल्या कामात संख्याशास्त्राचा वापर करण्यासंबंधाने त्यांचे मार्गदर्शन मागितले. मात्र यामुळे एक गोष्ट कोसंबींना खुपली असे दिसते. या भेटींसंबंधी लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी मनातील एक खंत व्यक्त केली आहे– 'अलिगढ व बनारस या दोन्ही ठिकाणच्या गणितज्ञांनी मात्र माझ्या अस्तित्वाची बिलकुल दखल घेतली नाही.' अर्थात् गणितज्ञ म्हणून आपणास पुरेसा मान मिळत

नाही हे त्यांचे दुःख तसे जुनेच होते. ते काही असो, इतिहासज्ञ म्हणून त्यांच्या कार्याला चांगलीच मान्यता मिळत होती– राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरही– हे मात्र निश्चित.

याचे आणखी एक उदाहरण म्हणजे मॉस्कोहून त्यांना मिळालेले एक आमंत्रण. ३ ते १० ऑक्टोबर १९६४ या काळात अँथ्रॉपॉलॉजी व एथ्नॉग्राफी (मानववंशशास्त्र व मानवविद्या) या विषयाची आंतरराष्ट्रीय परिषद मॉस्कोत भरणार होती. आणि 'सन्माननीय पाहुणे' म्हणून या परिषदेला हजर राहण्याचे आमंत्रण कोसंबींना पाठविले गेले होते. अन्य अडचणींमुळे कोसंबी या परिषदेस हजर राहू शकले नाहीत, परंतु 'अखेर त्यांनी माझ्या या क्षेत्रातील कामाची दखल घेऊन त्याला मान्यता तर दिली' असे वाटण्याचे समाधान तरी त्यांना प्राप्त झाले.

दरम्यान, वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषदेतर्फे (C.S.I.R.) एखादी मानद नेमणूक कोसंबींना मिळवून देण्याची खटपट सुरू होती. डॉ. हुसेन झहीर हे हैद्राबादचे वैज्ञानिक तेव्हा वै. औ. सं. परिषदेचे सर्वसाधारण संचालकपद भूषवीत होते. त्यांच्यामार्फत कोसंबींना वै. औ. सं. परिषदेचे 'सन्माननीय वैज्ञानिक' (एमेरिटस सायंटिस्ट) हे मासिक हजार-दीड हजार वृत्तीचे पद मिळावे अशी हालचाल हबीबुल्ला, नुरुल हसन, अब्दूर रहमान वगैरेंनी सुरू केली.

अर्थात् अशा तऱ्हेचे पद कोसंबींना मिळवून देण्यातही अडचणी होत्याच!

भारतीय विज्ञानक्षेत्रात तोपर्यंत काही सुभेदाऱ्या निर्माण झाल्या होत्या– एकीकडे भाभा व त्यांचे अणुऊर्जाखाते व संबंधित संस्था, तर दुसरीकडे वै. औ. सं. परिषद (C.S.I.R.) व संबंधित राष्ट्रीय प्रयोगशाळांचे जाळे. स्वातंत्र्योत्तर सुरुवातीच्या काळात शांतिस्वरूप भटनागर यांचे विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील महत्व खूपच होते. परंतु भाभांचे महत्त्व वाढते होते. भटनागरांचा मृत्यू १ जानेवारी १९५५ ला झाला. रामन प्रथमपासूनच अलिप्त राहिलेले. मेघनाद शाह बाजूला सारले गेले होतेच आणि त्यांचा मृत्यूही १६ फेब्रुवारी १९५६ ला घडून आला. त्यामुळे भाभांना कोणी स्पर्धक उरला नव्हता. त्यातच भाभांचे पंतप्रधान नेहरूंशी घरगुती म्हणावे असे संबंध, नेहरूंना विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्राबद्दल खास आपुलकी व त्यात वैयक्तिक पातळीवर लक्ष घालण्याचा त्यांचा उत्साह व वृत्ती. या सगळ्याचा गोळाबेरीज परिणाम म्हणजे भारतीय विज्ञान क्षेत्रात निर्माण झालेला भाभांचा अभूतपूर्व प्रभाव.

आणि ही परिस्थिती अनेकांच्या मनात सलत असणे साहजिकच होते. विशेषतः वै. औ. सं. परिषदेशी संबंधित अनेक वैज्ञानिक व दिल्ली-कलकत्ता क्षेत्रातील वैज्ञानिक यांचा यात समावेश होता. या व्यक्तींचे कोसंबींशी वैयक्तिक पातळीवर कितपत पटत असेल हा प्रश्न अलाहिदा. परंतु कोसंबींविषयी सर्वसाधारण आदर भावनेबरोबरच सहानुभूती असणे तर स्वाभाविकच होते. त्यामुळे भाभांनी कोसंबींना टा. मू. सं. सं.मधून काढून टाकल्यावर कोसंबींना पाठिंबा देण्यासाठी काही पावले टाकणे ही त्यांच्या दृष्टीने एक चांगली संधीही होती असे म्हणता येईल.

परंतु वै. औ. सं. परिषदेच्या कामातही पं. नेहरू लक्ष घालीत असत. भाभाही



सल्लागार म्हणून तेथे असत. त्यामुळे या ठिकाणी निर्णय घेतानाही नेहरू भाभांच्या सल्ल्याला मान देत. अशा परिस्थितीत वै. औ. सं. परिषदेतर्फे कोसंबींना एखादे मानदपद मिळवून देण्याच्या प्रयत्नात भाभांचा प्रत्यक्ष रोष ओढवून घेतला जाण्याची शक्यता होतीच. परंतु १९६४ मध्ये परिस्थितीत काही महत्त्वाचे बदल घडून आले होते. पं. नेहरूंची तब्येत बरी नसल्याने १९६३ च्या अखेरपासूनच त्यांचे कामकाजातील लक्ष कमी झाले होते, व ६४ च्या मे महिन्यात त्यांचे निधन झाले. नेहरूंनंतर पंतप्रधानपदी आलेल्या शास्त्रीजींशी भाभांचे सूत जुळणे शक्य नव्हते. या सर्वसाधारण पार्श्वभूमीवर कोसंबींना मानदवृत्ती देण्याचा प्रस्ताव दिल्लीच्या चक्रव्युहात पसार झाला असे मानायला हरकत नसावी.

भाभांच्या विरोधाची शक्यता या अडथळ्याबरोबरच इतरही लहानसहान अडचणी होत्याच. मुख्य म्हणजे अशी मानद वृत्ती मिळणारी व्यक्ती एखाद्या संशोधनसंस्थेशी संलग्न असावी लागते. बहुतेक वेळा ही वृत्ती निवृत्त झालेल्या वैज्ञानिकांना दिली जाते. नियमित जागेवरून वयोपरत्वे निवृत्त झाल्यावर बहुतांशी त्याच संस्थेत पुढे काम करीत राहणे यातून शक्य होते. कोसंबींच्याबाबत मुख्य अडचण येथेच होती. टा. मू. सं. सं. मधून बाहेर काढले गेल्यानंतर त्यांचा संस्थात्मक आधार सुटला होता. संशोधनकार्य स्वतंत्रपणेच चालल्याने नवा कोणताच संस्थात्मक आधार त्यांना उरला नव्हता. हा आधारही पुण्यातच हवा होता. तसे भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत ते संदर्भवाचनासाठी जात असत व त्यांचे संस्कृत ग्रंथसंशोधनातील काही सहकारीही येथे होते. परंतु ही संस्था वै. औ. सं. परिषदेच्या प्रभावक्षेत्राबाहेरची. ज्या कारणासाठी टा. मू. सं. सं. बाद झाली. त्याच कारणासाठी फर्गसन महाविद्यालयही बाद होतेच. सुदैवाने प्रा. शं. पु. आधारकरांनी स्थापन केलेली महाराष्ट्र विज्ञानवर्धिनी ही संस्था पुण्यात होती. बरेचसे निवृत्त संशोधक- कित्येक स्वयंसेवी वृत्तीने- येथे काम करीत होते. घरापासून हाकेच्याच अंतरावर असलेली ही संस्था कोसंबींच्या दृष्टीने योग्य होती. १९५० च्या सुमारास आधारकर हयात असताना कोसंबींनी त्यांच्यापाशी आपणास येथे जागा मिळेल काय अशी चौकशी केल्याचे आपण पाहिलेच आहे. त्यावेळी ते जुळले नव्हते. त्यानंतर संस्था वाढून स्वतःच्या स्वतंत्र वास्तूत आली होती. पण पुन्हा कोसंबींचा विज्ञानवर्धिनीशी कधी संबंध आला नव्हता. तेथील कोणा संशोधकाशी त्यांचे फारसे सख्य असल्याचेही कोठे आढळत नाही. परंतु अखेर ही संस्थाच त्यांच्या कामी आली. वै. औ. सं. परिषदेचे सन्माननीय वैज्ञानिक म्हणून कोसंबींना येथे काम करता येईल अशी मान्यता विज्ञानवर्धिनीकडून मिळाली.

अखेर वै. औ. सं. परिषदेचे 'सन्माननीय वैज्ञानिक' म्हणून महाराष्ट्र विज्ञानवर्धिनीशी संलग्न नेमणूक कोसंबींना मिळाली. साधारण महिना एक हजार मानधन व खर्चाकरिता अन्य काही रकमेची तरतूद होती. प्रत्यक्ष नेमणूकपत्र व मानधन येण्यास अधिक विलंब लागला, पण ही नेमणूक १५ जून १९६४ पासून पाच वर्षांकरिता म्हणून झाली होती.

आणि अशाप्रकारे जवळजवळ दोन वर्षांहून अधिक काळ लोटल्यावर कोसंबींना स्थिरावण्यास आधार मिळाला.

या नेमणुकीमुळे कोसंबी फार खूष झाले असावेत असे काही मानता येणार नाही. कारण त्यांच्या काही निकट सहकारी-मित्रांच्या सांगण्यावरून तरी असे दिसते की आपणास राष्ट्रीय प्राध्यापकपद मिळावे अशी कोसंबींची इच्छा होती. पण तो मान फारच मोठा होता; अगदी वरिष्ठ पातळीवरूनच मिळू शकणारा. तेव्हा पद्मश्री वगैरे सोडाच, कोणत्याही सरकारी समितीवरही सदस्यत्व न मिळालेल्या, एकूणच प्रस्थापितांशी व विशेषतः भाभांशी न पटणाऱ्या कोसंबींना तो मान मिळणे अशक्यच होते. परंतु त्यांच्या स्वतःच्या अपेक्षा यातून दिसून येतात. काही अंशी असे बोलून दाखवणे हा त्यांच्या धक्कादायक वागण्याच्या, डिवचण्याच्या शैलीचाही भाग असावा; कारण आपणास असा मान मिळणे शक्य नाही हे त्यांनाही पक्के ठाऊक होतेच.

या नेमणुकीमुळे ते फार नाराज वगैरे झाले होते असेही दिसत नाही. कारण आपल्या कामाची सोय झाली हे समाधानच त्यांना पुरेसे होते. मानधनाच्या रकमेवर ठरणाऱ्या उतरंडीची त्यांना पर्वा नव्हतीच. उलट यावेळच्या काही उपलब्ध पत्रांत काहीशा कौतुकाने व किंचित प्रौढीने ते या नेमणुकीचा उल्लेख करताना आढळतात. 'याबाबत मला नीट विचार करून ठरवावे लागेल, कारण यात विज्ञानवर्धिनीच्या मानाचाही प्रश्न येतो' अशा प्रकारची वाक्ये त्यांनी लिहिलेली आहेत. सोन्थायमरना लिहिलेल्या एका पत्रात 'तुला किंवा यामाझाकीला भारतात काही काळ यावयाचे असेल- बिहारवगैरे किंवा पुण्यातही- तर मला कळू द्या. आता येथे एखादी छोटीशी शिष्यवृत्ती व भारतातील खर्चाची सोय उपलब्ध करून देणे मला शक्य आहे' असेही त्यांनी कळवले होते.

विज्ञानवर्धिनीमुळे कोसंबींना संस्थात्मक आधार मिळाला खरे, परंतु त्यामुळे कोसंबी संस्थेशी समरस झाले असे काही घडले नाही. संस्थात्मक कारभारात गुंतून घेण्याची त्यांची वृत्तीच नव्हती. आपले काम ते बहुतांशी घरी बसूनच करीत असत. अधुनमधून त्यांची संस्थेत चक्कर पडे. परंतु तेथील कोणा ज्येष्ठ वा कनिष्ठ संशोधकाशी त्यांची खासं मैत्री वगैरे जुळल्याचे आढळत नाही. संस्थेची जीप अधुनमधून त्यांना वापरासाठी मिळू लागली होती. आणि आपल्याकडे जमा झालेले अनेक विषयांवरचे संशोधनलेख व त्यांच्या प्रती वगैरे साहित्य त्यांनी विज्ञानवर्धिनीच्या ग्रंथालयाला भेट देऊन ठेवले होते.

कोसंबींच्या दृष्टीने १९६५ साल खूपच चांगले गेले असे म्हटले पाहिजे. मानदवृत्ती सुरू झाली होती, इंग्लंड व अमेरिकेत 'प्राचीन भारतीय संस्कृती' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. 'अशोक स्तंभः बनारसचे कोडे' हा ६४ साली उत्तरेत केलेल्या भ्रमंतीवर आधारित लेख जानेवारीत 'टाइम्स ऑफ इंडिया'त प्रसिद्ध झाला, तर त्याच वर्षीच्या टाइम्सच्या वार्षिकात 'ऐतिहासिक कृष्ण' हा त्यांचा प्रदीर्घ लेख प्रसिद्ध झाला. बराच काळ त्यांच्या मनात घोळत असलेल्या कृष्णावरच्या पुस्तकप्रकल्पाचा हा एक आराखडाच होता. डिसेम्बरच्या मध्यावर त्यांनी पुन्हा एकवार अलाहाबाद-वाराणसी येथील वारी केली. यावेळी दिल्लीतही त्यांनी मुक्काम केला. मनात घोळणाऱ्या क्षेत्रनिरीक्षणाच्या काही प्रकल्पांसाठी मदत मिळविण्याचे, तसेच अन्य अडचणी दूर



करण्याचे प्रयत्न करण्यासाठी अनेकांच्या गाठीभेटी त्यांनी घेतल्या.

यातील एक होते संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण!

पुण्यातील वेताळटेकडीवर पुरातन अवशेष धुंडाळण्याचे काम कोसंबी अनेक वर्षे करीतच होते. आपल्या अंगणातीलच जणू अशी ही टेकडी, त्यांना लाभलेला एक खजिनाच ठरली होती. छोटी दगडी अवजारे, मानवी हातांनी कोरलेल्या दगडांवरील खुणा, यांप्रमाणेच अश्मयुगीन मानवाच्या दफनजागा (burial sites) त्यांना तेथे आढळल्या होत्या. एव्हाना त्या परिसरात संरक्षण निगडित प्रयोगशाळा स्थापन होऊन टेकडीचा काही भाग संरक्षणखात्याच्या अखत्यारीत गेला होता. त्यामुळे दफनस्थळांच्या अधिक संशोधनासाठी संरक्षणखात्याच्या परवानगीची गरज होती व या निमित्त कोसंबी चव्हाणांना भेटले. साताऱ्याच्या प्रतिसरकार चळवळीच्या काळात कोसंबींची सहानुभूती त्या लढ्याला होती व त्यावेळच्या काही गाठीभेटींत तरुण यशवंतरावांशी त्यांचा जुजबी संबंध आला होता. 'मी काही जुनी ओळख दाखविली नाही, परंतु त्यांनी आपण होऊन त्याचा उल्लेख केला' असे कोसंबींनी नंतर एका पत्रात लिहून ठेवले आहे. अर्थात् कोसंबींची कीर्ती चव्हाणांना ठाऊक असणारच, त्यामुळे संरक्षणमंत्रालयाकडून सहकार्याचे आश्वासन मिळविण्यात त्यांना काही अडचण आली नाही.

याचवेळी एकेकाळी त्यांचा विद्यार्थी असलेल्या एका एअर व्हाइसमार्शलच्या हुद्यावरील हवाईदलाच्या अधिकाऱ्याचीही त्यांनी भेट घेतल्याचे आढळते. आपल्या निरीक्षणक्षेत्राचे हवाई सर्वेक्षण घ्यावे असा त्यांचा मानस होता, व त्यासाठी मदतीचा हात त्यांनी मागितला होता.

कोसंबींनी आपल्या कामाला नव्या उत्साहाने सुरुवात केल्याची ही चिन्हे होती!

मध्ये थोडा नैराश्याचा व काळजीचा कालखंड सहन करावा लागूनही त्यांच्या उत्साहावर व सर्जनशीलतेवर विशेष परिणाम झाला नव्हता.

गणिताचे प्राध्यापकपद सुटले व इतिहासविषयक लिखाण व संशोधनाचे काम जोमाने चालू राहिले तरी कोसंबींचे गणितातील संशोधन-लिखाणही चालूच होते. इतिहाससंशोधनाबरोबरच गणितातही आपणाला बरेच काम करण्याचे शिल्लक आहे, असे ते स्वतः म्हणत होतेच.

६३ व ६४ सालात प्रत्येकी दोन, तर ६५ साली एक गणिती लेख त्यांच्या खाती जमा झाला. संख्याशास्त्र व नंबर थिअरी यातील हे काम आढळते. ६३ साली 'सँम्पलिंग डिस्ट्रिब्यूशन ऑफ प्राइम्स' हा लेख 'प्रोसीडिंग्ज ऑफ नॅशनल अॅकॅडेमी ऑफ सायन्सेस' या अमेरिकन पत्रिकेत प्रसिद्ध झाला, तर मुंबई विद्यापीठाच्या पत्रिकेत 'नॉर्मल सिक्वेन्सेस' या शीर्षकाचा एक छोटेखानी लेख. ६४ मध्ये 'प्रॉबॅबिलिटी अॅन्ड प्राइम नंबर्स' व 'स्टॅटिस्टिकल मेथडस् इन नंबर थिअरी' असे दोन लेख, तर ६५ मध्ये 'सिक्वेन्स ऑफ प्राइम्स' हा लेख.

या पाच लेखांपैकी तीन लेख टोपणनावावर प्रसिद्ध झाले आहेत व ती एक

वेगळीच कथा आहे; –कोसंबींच्या मनातील कडवटपणावर तसेच त्यांच्या विनोदबुद्धीवर प्रकाश टाकणारी.

हे लेख प्रसिद्ध झाले आहेत S. Ducray अशा फ्रेंच वा तत्सम युरोपीय वाटणाऱ्या टोपणनावाने. मुंबई विद्यापीठ संशोधन पत्रिकेतील ६३ सालच्या लेखात हे नाव त्यांनी प्रथम वापरले. या लेखाच्या शेवटी 'प्रा. डी. डी. कोसंबी यांच्या मार्गदर्शना व सहकार्याशिवाय हा लेख तयार झाला नसता' अशी आभारदर्शक पुस्तीही जोडली आहे. या टोपणनावाचा सरळ मराठी उच्चार आहे 'एस्. डुकरे,' व याच अर्थाने ते वापरले आहे.

गणितातील प्रस्थापितांचा आपल्यावर रोष आहे, आपल्या कामाकडे ते जाणूनबुजून दुर्लक्ष करतात व भारतीय गणितक्षेत्रात हे प्रस्थापित चांगलेच सत्ता बाळगून असल्याने आपल्या कामाची अजिबात कदर होत नाही, अशी थोडी खरी, थोडी अतिशयोक्त समजूत कोसंबींची होती. परिणामी, केवळ आपले नाव पाहून बिचकून जाणारे लोक आहेत. तेव्हा टोपणनाव वापरावे असे त्यांच्या डोक्यात आले. प्रथम ते आपला लाडका कुत्रा बोंझो याच्या नावाने लेख पाठवित होते असे म्हणतात. पण मग डुकरे हे उत्तम मराठी व स्पेलिंगमध्ये उत्तम युरोपीय दिसणारे नाव त्यांनी स्वीकारले. मात्र कडवटपणाचा हा पोरकट आविष्कार बाजूला ठेवला तर कोसंबी यावेळी गणितातील आपल्या संशोधनाकडे फार गंभीरपूर्वक बघत होते असे दिसते. सोन्थायमर यांना १९६३ मध्ये लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी आपला एक लेख अमेरिकन संशोधनपत्रिकेत प्रसिद्ध झाला असून (बहुधा 'सॅम्पलिंग डिस्ट्रिब्यूशन ऑफ प्राइम्स') दुसरा तयार आहे असे सांगून 'त्या लेखासाठी तज्ज्ञ पंच (एक्सपर्ट रेफरी) मिळाला पाहिजे व त्यासाठी पॉल एरड्योश हे जगप्रसिद्ध गणिती सध्या इंग्लंडमध्ये आहेत तर त्यांना सहज विचारून पहा. त्यांचे माझ्या गणिती कामाबद्दलचे मत चांगले वाटले तर मग त्यांच्याशी संपर्क साधता येईल' असे कळविले आहे. एरड्योश यांची प्रतिक्रिया विशेष प्रोत्साहनकारक नसावी. कारण मग नतंरच्या एका पत्रात त्यांनी तक्रारवजा सूरात लिहिले आहे की, 'माझे इतके अनेक संबंध असूनही मला तज्ज्ञ पंच अजून मिळत नाही, कारण गणितातील अनके भिन्न शाखा माझ्या लेखात एकत्र येत आहेत व हल्लीचे तज्ज्ञ फारच स्पेशलायझेशनवाले आहेत!'

संख्याशास्त्र व नंबर थिअरी यांचा एकत्रित वापर करून जे काही काम त्यांनी केले होते ते पुस्तकरूपाने त्यांना प्रसिद्ध करावयाचे होते. या पुस्तकाची टंकलिखित वा हस्तलिखित प्रतही त्यांनी तयार केली होती. 'प्राचीन भारतीय संस्कृती' हे पुस्तक प्रसिद्ध करणाऱ्या लंडनच्या रुटलेज व केगन पॉल या प्रकाशकांकडेच त्यांनी हे हस्तलिखित पाठविले होते. तत्संबंधीच्या प्राथमिक पत्रव्यवहारातही हे बाड प्रथम एरड्योश यांचेकडून तपासून घ्यावे, त्यांनी ते मान्य केल्यासच मग प्रकाशनाचा विचार करता येईल, असे कोसंबींनी कळविले होते. त्यांचे हे काम कोठच्या दर्जाचे होते, कितपत महत्त्वाचे होते वगैरेबद्दल आता निश्चितपणे काहीच कळणे शक्य नाही. कारण ते हस्तलिखित पाठविल्यानंतर आठवड्याभरातच कोसंबींचा मृत्यू ओढवला, पुढे



प्रकाशकांकडून ते गहाळ झाले व त्याची दुसरी प्रतही कोणास आढळली नाही असे म्हणतात. स्वतः कोसंबींनी मात्र या कामास 'माझ्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचे काम' (my lifework) असे म्हटले होते. इतिहासक्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावून मान्यता प्राप्तही होत असताना आपल्या मूळ गणित या विषयाचे प्रेम व त्यात महत्त्वपूर्ण काम करून नाव कमावण्याची जिद्द काही त्यांनी अखेरपर्यंत सोडली नव्हती, हेच खरे.

१९६६ साल उजाडले तेव्हा स्थिरस्थावर झालेल्या कोसंबींच्या संशोधनकार्याचे नवीन पर्व सुरू होणार असे वाटण्याजोगी परिस्थिती होती. हाती असलेली बरीच कामे त्यांनी पूर्णत्वास नेली होती, बराच काळ डोक्यात घोळणाऱ्या योजना कार्यान्वित करण्यासाठी ते पावले उचलत होते व अनेक नव्या योजना त्यांच्या मनात आकार घेत होत्या.

'सायंटिफिक अमेरिकन'ने ६५ साली स्वीकारलेला नाणकशास्त्रावरचा लेख फेब्रुवारीत प्रसिद्ध झाल्यावर 'लिव्हिंग प्रीहिस्टरी इन इंडिया' हा कबुल केलेला लेख त्यांनी तयार करून पाठवून दिला. 'प्राइम नंबर्स'वरचे वर उल्लेखिलेले हस्तलिखितही तयार झालेच होते. जे. एल. मॅसन या तरुण अमेरिकन संशोधकाबरोबर भासाच्या 'अविमारक' या काव्याची चिकित्सक आवृत्ती तयार करण्याचे काम चालू होते. तेही बहुतांशी पूर्णत्वास पोहोचले होते. याशिवाय 'नंदीचे वशिंड' (हॅम्प ऑन नंदीज् बॅक) या नावाची बालवाचकांसाठी एक कथा त्यांनी लिहिली होती. कंदमुळे, फळे व शिकार यांवर उपजीविका करण्याच्या स्थितीतून शेतीप्रधान संस्कृतीत झालेली समाजाची उत्क्रांती रूपककथेच्या माध्यमातून त्यांनी मुलांसाठी मांडली होती. योग्य व निवडक रेखाचित्रांसहित आकर्षक स्वरूपात ही कथा-पुस्तिका प्रसिद्ध व्हावी अशी फार तीव्र इच्छा त्यांच्या मनात होती. योग्य व निवडक रेखाचित्रांसहित अनेक भाषांत ही कथा प्रसिद्ध करावी अशी आकांक्षाही ते बाळगून होते. लंडनच्या व्हिक्टोरिया व अल्बर्ट संग्रहालयातील भारतविभागाचे प्रमुख जॉन अर्विन यांची मदतनीस मागरिट हिल हिच्याबरोबर पत्रोपत्री चर्चा व सूचना करून ही रेखाचित्रे तयार करण्याचे कामही जवळजवळ अंतिमस्वरूपात त्यांनी हिलबाईंकडे सोपवले होते व पुस्तकासाठी प्रकाशक मिळवण्याची धडपडही त्यांनी सुरू केली होती.

कृष्णावर पुस्तक लिहिण्याची त्यांची दीर्घकाळची इच्छा होतीच. भारतीय इतिहास व इतिहासमिथ्यातून कृष्णाचे आढळून येणारे बदलते स्वरूप यावर त्यांचा स्वतःचा बराच अभ्यास झाला होताच. १९६५च्या टाईम्सच्या वार्षिकात 'ऐतिहासिक कृष्ण' हा त्यांचा दीर्घलेख प्रसिद्ध झाला होता. परंतु भारतीय संस्कृतीवर उमटलेला कृष्णाचा ठसा अधिक स्पष्टपणे समजून घेण्यासाठी 'ऐतिहासिक कृष्णा'बरोबरच 'कलेतील कृष्ण'ही अभ्यासला जावा असे त्यांना वाटत होते. आणि हा विषय अर्विन यांचा होता. त्यामुळे संयुक्तपणे दोघांनी कृष्णावरचे हे काम करावे अशी इच्छा पूर्वीच अर्विन यांच्याजवळ त्यांनी प्रकट केली होती व तिची पुनरुक्ती ते वारंवार करू लागले होते.

याशिवाय क्षेत्रनिरीक्षणाचे प्रकल्पही होतेच. बंगलोरातील करगा या लोकउत्सवाचे जवळून निरीक्षण त्यांनी केले होते. पुणे व भोवतालच्या परिसरातील शिराळशेटच्या उत्सवाची माहिती जमा करण्यास त्यांनी सुरुवात केली होती व या विषयावर अधिक संशोधन करून लेख प्रसिद्ध करण्याच्या योजना ते आखत होते. पुण्याभोवतालच्या शिळास्मारकांची विस्तृत पहाणी त्यांनी केली होतीच.

प्राचीन भारतीय इतिहासातील निर्देशिलेली अनेक स्थलनामे सांप्रती चुकीच्या स्थळांशी जोडली गेली आहेत याबद्दलही त्यांच्या मनात फार नाराजी होती. हा इतिहास योग्य स्वरूपात मांडण्यासाठी अधिक क्षेत्रनिरीक्षण करून उत्तरपथावरील पुराणातील निर्देशित स्थाने निश्चित करण्याचाही संकल्प त्यांनी सोडला होता.

याखेरीज अर्वाचीन काळातील घटनांचा मौखिक इतिहास नोंदवून ठेवण्याची योजनाही ते आखत होते. सातारची प्रतिसरकार चळवळ, तेलंगणचा सशस्त्र उठाव, बंगालमधील तिभाग शेतकरी चळवळ, यासंबंधीच्या तोंडी आठवणी टेपवर नोंदवून घ्याव्यात यासाठी त्या त्या विभागातील कार्यकर्त्यांच्या शोधात ते होते. याच प्रकारे अंतर्भागातील, शहरीकरणापासून अजूनही दूर राहिलेल्या विभागातील वयोवृद्धांच्या तोंडून जुन्या चालीरीती, रिवाज, देवदैवतांच्या कथा टेपवर नोंदवून ठेवाव्यात असेही बेत ते आखत होते. कालांतराने आधुनिकीकरणाच्या लाटेत या लोकस्मृती पुसल्या जातील, परंतु तेव्हाही या टेपवरील आठवणी तोंडी इतिहाससाधने म्हणून वापरता येतील असा त्यांचा विचार यामागे होता. एखादा छोटासा, समोरच्या खेडवळ व्यक्तीस बिचकावून न सोडणारा टेपरेकॉर्डर जर्मनीहून घेऊन येण्याचा प्रेमळ हुकूमही त्यांनी सोन्थायमरना दिला होता.

अनेक कामे, अनेक प्रकल्प त्यांच्यासमोर होते आणि ते अमलात आणण्याच्या शक्यताही दिसत होत्या. साहजिकच त्यांचा मूड चांगलाच उत्साही व हुरूप आणणारा होता.

परिस्थितीत १९६६ च्या सुरवातीस आणखीही बदल घडून आले होते. २४ जानेवारीला भाभांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू ओढवला होता. भारतीय विज्ञानक्षेत्रातील सत्तासमतोलावर याचा परिणाम होणे साहजिकच होते. अनेक महत्त्वाच्या अधिकारपदांवरील व्यक्तींना कोसंबींबद्दल सहानुभूती असूनसुद्धा भाभांची नाराजी ओढवेल या धास्तीने ते कोसंबींपासून दूर रहात आले होते. नव्या परिस्थितीत यामुळे कोसंबींना अधिक वाव मिळण्याची, त्यांची सल्लामसलत घेतली जाण्याची शक्यता अस्तित्वात आली होती.

जानेवारीतच भाभांच्या आधी पंतप्रधान शास्त्रींचा ताश्कंद येथे मृत्यू झाला होता व २६ जानेवारीस इंदिरा गांधी नवीन पंतप्रधान झाल्या होत्या. नेहरू व भाभांबरोबरच भारतीय विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्राच्या प्राथमिक जडणघडणीचे युग संपले होते व दुसऱ्या टप्प्याला सुरुवात झाली होती. या टप्प्यात पुढली पावले टाकण्यापूर्वी सिंहावलोकन आवश्यक होते, गुण-दोषांची तपासणी जरूर होती. आणि या दिशेने हालचालीही सुरू होत्या. आतापर्यंत पहिल्या टप्प्यात कोसंबींनी टीकाकाराची भूमिका बजावली होती.



त्यामुळे या दुसऱ्या टप्प्यात त्यांची मते, त्यांचा सल्ला यांना अधिक किंमत व वजन प्राप्त होणार होते.

मे महिन्याच्या अखेरीस दिल्लीत तिसऱ्या जगातील विज्ञान व तंत्रज्ञान प्रश्नांवर एक परिषद भरली होती. मागस देशांपुढील प्रश्न व त्यांच्या सोडवणुकीच्या दृष्टीने विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर असा सर्वसाधारण विषय असलेल्या या परिषदेला कोसंबी हजर होते, व त्यांचे या विषयावरील भाषणही महत्त्वाचे ठरले होते. कोसंबींच्या टीकेला व मतांना योग्य ती दाद मिळाली होती.

परंतु मे अखेरचे त्यांचे हे भाषण अखेरचेच ठरले. भाभांच्या बाबतीतही त्यांनी जानेवारीतच मुंबईच्या बिर्ला मातोश्री सभागृहात एका आंतरराष्ट्रीय परिषदेपुढे केलेले भाषण हे अखेरचे ठरले होते. या भाषणांत भाभांनीही भारतीय विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्राच्या जडणघडणीचा अतिशय हिरीरीने आढावा घेतला होता. या दोघांच्या जीवनक्रमातील हा आणखी एक योगायोग!

जूनअखेरीस कोसंबी पुण्यातच होते. नवनव्या योजनांवर मित्रांशी, सहकाऱ्यांशी चर्चा होत होत्या, आखणी चालू होती. त्यांनी एका तज्ज्ञ डॉक्टरांकडे जाऊन आपली पूर्ण शरीरतपासणी २८ जून रोजीच करून घेतली होती व त्यांची प्रकृती ठणठणीत असल्याची सुवार्ताही डॉक्टरांनी त्यांना दिली होती.

परंतु २८ जूनची रात्र ही काळरात्र निघाली. नेहमीप्रमाणेच कोसंबी आपल्या घरातील अभ्यासिकेत रात्री उशिरापर्यंत लेखन-वाचन करीत बसले होते. २९ जूनच्या पहाटे ते बिछान्यावर लवंडले ते पुन्हा उठलेच नाहीत. सकाळी नेहमीची वेळ होऊन गेली तरी त्यांना जाग आली नाही. म्हणून घरच्यांनी काहीसे भीतभीतच दार उघडले तेव्हा कोसंबी चिरनिद्रेत होते. हृदयक्रिया बंद पाडून काळाने त्यांना झोपेतच ओढून नेले होते आणि जवळ जवळ चार दशकांच्या अथक अखंड संशोधनतपस्येची समाप्ती झाली होती.

दामोदर कोसंबी व त्यांचे वडील धर्मानंदजी यांच्या जीवनक्रमात बरीच साम्ये होती, तसेच बरेच विरोधही. दोघांच्या मृत्युची परिस्थिती ही विरोधात्मक ठरली. वय वाढले, ताकद कमी झाली, आजार त्रास देऊ लागले आणि आता आपल्या हातून अधिक काही कार्य घडून येणार नाही हे लक्षात आले तेव्हा धर्मानंदजींनी देहत्याग करण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार अनशन करून ते मृत्यूस सामोरे गेले. याउलट दामोदरांना अवघ्या ५९ व्या वर्षी, अनेक कामे, अनेक योजना हातात असताना व अनेक प्रकल्प डोक्यात घोळत असताना मृत्यूने झोपेतच ओढून नेले. ही फार दुर्दैवी गोष्ट म्हटली पाहिजे.

एखाद-दुसरा अपवाद वगळता त्यांची अर्धवट राहिलेली कामे तशीच राहून गेली, तर काही पूर्णत्वास पोहचलेली कामे प्रकाशात येऊ शकली नाहीत. 'लिव्हिंग प्रीहिस्टरी इन इंडिया' हा लेख 'सायंटिफिक अमेरिकन'च्या फेब्रुवारी १९६७ च्या अंकात प्रसिद्ध झाला, तर १९६९ साली 'अविमारक'ची चिकित्सक आवृत्ती कोसंबी व मॅसन यांच्या संयुक्त नावे प्रसिद्ध झाली. परंतु नंबर थिअरीवरचे हस्तलिखित गहाळच झाले, तर

'नंदीचे वशिंड'चे हस्तलिखित नुसतेच पडून राहिले. सोन्थायमरनी आणलेला टेपरेकॉर्डर काही त्यांच्या दृष्टीस पडला नाही व क्षेत्रनिरीक्षणाचे त्यांचे प्रकल्पही तसेच विरून गेले.

मात्र त्यांच्या कार्याचा प्रभाव मृत्यूनंतर कमी न होता वाढतच गेला. ७४ साली म्हणजे मृत्यूनंतर तब्बल आठ वर्षांनी तीन गौरवग्रंथ प्रसिद्ध होण्याचे भाग्य त्यांना लाभले. तर १९८० साली विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे विज्ञान व समाज यांतील परस्परसंबंधावर महत्वपूर्ण प्रकाश टाकल्याबद्दल 'हरिओमआश्रम पारितोषिक' त्यांना देण्यात आले– मरणोत्तर १४ वर्षांनी. आज पावशतक उलटून गेल्यानंतरही त्यांच्या विचारांची टवटवी कमी झालेली नाही, हेच त्यांना प्राप्त झालेले सर्वात मोठे श्रेय म्हटले पाहिजे.



# परिशिष्ट–१

## अ) पुस्तके व लेख/लेखसंग्रह

१९३० ते ६६ या काळात सुमारे दीडशे लेख कोसंबींच्या नावे जमा झाले. यातील साठेक गणित व संख्याशास्त्र यांतील तर साठेक इतिहास, नाणक शास्त्र यातील संशोधनलेख असून बाकी विज्ञान व समाज या विषयातील आहेत. भारतीय इतिहासावरची दोन, संस्कृत ग्रंथांचे संपादन केलेली सात व त्यांच्या लेखसंग्रहांच्या रूपाने प्रसिद्ध झालेली पाच अशी १४ पुस्तकेही त्यांच्या नावावर आहेत. कोसंबींचे सर्व लिखाण इंग्रजीतच झालेले आहे. निवडक पुस्तकांची ही यादी.

१) An Introduction to the study of Indian History, Popular Prakashan, Bombay, 1956

२) सुभाषितरत्नकोश– संपादन, प्रा. व्ही. व्ही. गोखले यांच्यासह, Harvard Oriental Series 42, 1957

३) श्री भर्तृहरियोगीन्द्र विरचिता सुभाषितत्रिशती–संपादन, पं. नारायण राम आचार्य यांच्यासह, निर्णयसागर प्रेस, मुंबई, १९५७

४) Exasperating Essays (Exerceises in dialectical method), People's Book House, Pune, 1957

५) Myth and Reality – Studies in the formation of Indian culture, Popular Prakashan, Bombay, 1962
(पाच दीर्घ लेखांचा संग्रह)

६) The Culture and Civilisation of Ancient India in Historical Outline, Routledge and Kegan Paul, London, 1965

७) D. D. Kosambi on History and society: Problems of Interpretation, Bombay University, 1985
(भारतविद्याविषयक संशोधनलेखांचा संग्रह)

८) Science, Society and Peace; Academy of Political and Social Studies, Pune, 1986
(समाज व विज्ञान यांतील परस्परसंबंधाविषयक लेखांचा संग्रह)

याशिवाय खालील पुस्तके मराठीत उपलब्ध आहेत–

९) प्राचीन भारतीय समाज संस्कृती संवर्धन; ऐतिहासिक रूपरेखा; निवेदक: जयंत गडकरी, दामोदर धर्मानंद कोसंबी एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई.

१०) प्रा. दामोदर धर्मानंद कोसंबीप्रणीत इतिहासविचारमीमांसा–प्रा. कु. ल. महाले, दा. ध. कोसंबी एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई, १९८६

## ब) कोसंबी स्मृतिग्रंथ

(कोसंबींचे कार्य व चरित्रविषयक आठवणींसाठी)

१) Science and Human Progress Popular Prakashang, Bombay, 1974 ( Prof. D. D. Kosambi Commemoration Committee तर्फे; प्रस्तावना: व्ही. व्ही. गिरी.)

२) Indian Society : Historical Probings, People's Publishing House, Delhi, 1974 (Indian Council of Historical Researchतर्फे पुरस्कृत)

३) Dr. D. D. Kosambi Memorial Volume, Journal of the Asiatic Society of Bombay, Vol. 43-44 (New series) 1968-69

## क) पत्रव्यवहार व अन्य साहित्य

१) श्री. रा. प. नेने, पुणे यांनी उपलब्ध करून दिलेले कोसंबींचे प्रकाशित-अप्रकाशित लेख, कोसंबीविषयक वृत्तपत्रीय लिखाण वगैरे

२) डॉ. जॉन अर्विन (इंग्लंड), प्रा. गुंथर सोन्थायमर (जर्मनी) व प्रा. पिएरे विदाल-नाके (फ्रान्स) यांनी उपलब्ध करून दिलेली कोसंबींची पत्रे

३) प्रा. पेसू मसानी, अमेरिका यांनी पत्रांद्वारे कळवलेली माहिती.



# परिशिष्ट-२

## कोसंबींसंबंधात मुलाखती घेतलेल्या व्यक्तींची नामावली (अंशत:)

१) अर्विन, डॉ. जॉन; व्हिक्टोरिआ व अल्बर्ट म्युझियम, लंडन येथील भारत विभागाचे माजी प्रमुख, कोसंबींचे मित्र

२) अभ्यंकर, प्रा. श्रीराम शंकर; आंतरराष्ट्रीय कीर्तीचे गणितज्ञ, पुणे.

३) ओळकर, श्री. बा. आ.; मुंबई; कोसंबींचे विद्यार्थी

४) कुबेर, श्री. वा. ना.; पुणे

५) केळकर, डॉ. पु. का.; माजी संचालक, कानपूर व मुंबई आय्. आय्. टी. मुंबई,

६) केणी, डॉ. एल्. बी. इतिहासाचे प्राध्यापक; मुंबई.

७) कोगेकर, प्रा. स. वा; माजी प्राचार्य, फर्ग्युसन महाविद्यालय पुणे.

८) कोतवाल, श्री. ज. वि.; टा. मू. सं. सं. मुंबई;

९) कोसंबी श्रीमती नलिनी दामोदर, कोसंबींच्या पत्नी, पुणे;

१०) कोसंबी, डॉ. मीरा; कोसंबींच्या कन्या, पुणे;

११) गोखले, प्रा. व्ही. व्ही.; फर्ग्युसनातील तसेच 'सुभाषित रत्नकोश' संपादनातील कोसंबींचे सहकारी, पुणे;

१२) गोखले, श्रीमती सुशीला; पुणे

१३) जाधव श्री. मदन; पत्रकार, मुंबई;

१४) झा, प्रा. डी. एन्; इतिहासाचे प्राध्यापक, दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

१५) थत्ते, डॉ. रा. प.; पुणे

१६) थापड, प्रा. रोमिला; इतिहासज्ञ जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली.

१७) थापड, श्री. रोमेश; दिल्ली

१८) देशपांडे, प्रा. गो. पु; जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली;

१९) धवन, प्रा. सतीश; भारतीय विज्ञान संस्थेचे माजी संचालक, अवकाश आयोगाचे माजी प्रमुख, बंगलोर;

२०) नाग चौधरी, प्रा. बी. डी.; शाह परमाणुभौतिकी संस्थेचे माजी संचालक; माजी वैज्ञानिक सल्लागार, भारत सरकार, कलकत्ता,

२१) नारळीकर, रँग्लर वि. वा.; मुंबई

२२) नारायणराव, श्री. एन्. एन्.; कोसंबीचे एक विद्यार्थी, पुणे;

२३) नाडकर्णी श्री. द. ना.; टा. मू. सं. सं., मुंबई;

२४) नेने, श्री. रा. प.; पुण्यातील कोसंबींचे तरुण मित्र व सहाय्यक

२५) डांगे, कॉ. श्रीपाद अमृत; मुंबई
२६) पगडी, श्री सेतुमाधवराव; मुंबई
२७) परेलकर, श्री मधुकर; टा. मू. सं. सं., मुंबई;
२८) पटवर्धन, श्री. अच्युतराव; मद्रास
२९) पुत्रन, श्री एन्. आर; माजी रजिस्ट्रार, टा. मू. सं. सं., मुंबई
३०) पंडित प्रा. नलिनी; मुंबई
३१) प्रसाद, डॉ. अरुण; कोसंबींचे भाचे, बंगलोर;
३२) बद्रीनाथ श्री चतुर्वेदी; I.A.S.; मद्रास
३३) बॅनर्जी, श्री. ए. के.; कोसंबींचे मित्र, मुंबई;
३४) ब्रह्मे, डॉ. सुलभा; प्राध्यापिका, गोखले इन्स्टिट्यूट, पुणे;
३५) भटकळ, श्री. रामदास; पॉप्युलर प्रकाशन, मुंबई;
३६) भागवत, श्रीमती कमलाबाई; पुणे.
३७) भूता, डॉ. कमला, कोसंबींच्या धाकट्या भगिनी, मुंबई;
३८) माडगावकर, श्री. बळवंत (बाळ); मुंबई.
३९) मेनन श्री. ओ. टी. जे.; टा. मू. सं. सं., मुंबई;
४०) मेहता डॉ. कुमुद; मुंबई
४१) मंजुळ, डॉ. वा. ल.; ग्रंथपाल, भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्था, पुणे.
४२) यार्दी श्री. एम्. आर I.C.S., कोसंबीचे विद्यार्थी; पुणे.
४३) रेगे, डॉ. मंगेश बा.; टा. मू. सं. सं. माजी संशोधन फेलो, मुंबई.
४४) वर्तक प्रा. एम्. एन्.; भारतीय प्रौद्योगिक संस्था, पवई, मुंबई;
४५) वासुदेवमूर्ती प्रा. ए. आर; भारतीय विज्ञान संस्था, बंगलोर;
४६) वैद्य, कॉ. आत्माराम; मुंबई
४७) सरदार प्रा. गं. बा.; पुणे
४८) सरदेसाई कॉ. श्रीनिवास; तळेगाव-दाभाडे
४९) साठे सौ. मनोरमा; कोसंबींच्या मधल्या भगिनी, पुणे;
५०) सिंह, डॉ. बलदेव; नेहरू मेमोरिअल म्युझियम व लायब्ररी, दिल्ली;
५१) सुखठणकर श्री. ज. स.; धर्मानंदांचे चरित्रकार, मुंबई;
५२) सुंदरराजन प्रा. आर्.; पुणे विद्यापीठ, पुणे;
५३) सोन्थायमर, डॉ. गुंथर; कोसंबींचे शिष्य, जर्मनी;
५४) शहानी श्री. कुमार; मुंबई
५५) शाह, प्रा. अजितकुमार; कलकत्ता, मेघनाद शहा यांचे चिरंजीव
५६) शेट्टी श्री. व्ही. सी.; टा. मू. सं. सं., मुंबई;